ॐ

# श्री जैन सिध्दांत-प्रवेशिका

*

: संपादिका :

सौ. विजयाताई अजितकुमार भिसीकर

इ. स. २००२

दहावी आवृत्ती - २००० प्रती

प्रकाशक -
कंकुबाई पाठ्यपुस्तक माला,
कारंजा ( लाड ), जि. वाशिम ( महाराष्ट्र )

ग्रंथ मिळण्याचा पत्ता -
कंकुबाई पाठ्यपुस्तक माला
C/o.महावीर ब्रह्मचर्याश्रम
मु. पो. कारंजा ( लाड ), जि. वाशिम ( महाराष्ट्र )
पीन कोड - ४४४ १०५.

मुद्रक :
योगेश अनंतराव मिश्रीकोटकर
योगेश ऑफसेट
सावकारपुरा, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती,
दूरध्वनी - ४२९८०
पीन - ४४४ ७०५.

# प्रास्ताविक

मानवी जीवनात सद्विचार, सुदुच्चार व सदाचार या त्रयीचे अतिशय महत्त्व असून सद्विचारांच्या वृद्धीवरच अन्य दोनचा विकास अवलंबून आहे. सद्विचारांची वृध्दी होण्यास जैन तत्त्वज्ञान व त्यातील अहिंसा - अनेकान्त व अपरिग्रह या मौलिक सिध्दान्तांची ओळख असणे नितान्त गरजेचे आहे याची जाणीव जगातील थोर विचारवंतांना अलिकडे अधिक प्रमाणात होत आहे. वैचारिक प्रगतीचे ते एक सुचिन्ह समजले पाहिजे. जैन सिध्दान्तामधील मूळभूत सहा द्रव्ये, सात तत्वे, शुभाशुभ परिणामावर अवलंबित पुण्य-पापादि कर्म व्यवस्था शाश्वत सत्यावर आधारलेली असल्याने विश्वासंबंधीचे कोडे उलगडण्यास व त्याचे यथार्थ दर्शन होण्यास मोठीच मदत होते. हे विश्व ईश्वराने निर्माण केले, तो जगाचा कर्ता-हर्ता आहे. प्राण्यांचे सुख - दु:ख, जीवन-मरण त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. अशा अज्ञपणाच्या समजुती दूर होऊन ते अनादिनिधन व शाश्वत स्वरूपाचे कसे आहे, विश्वातील प्रत्येक प्राणी आपल्या सुख-दु:खास तथा उन्नती - अवनतीस स्वयं जबाबदार कसा, यासंबंधीची मौलीक शिकवण जैन धर्माने दिली आहे. त्यामुळे त्यासंबंधी अधिकाधिक जाणण्याची जिज्ञासा व उत्सुकता विचारवंतांना एवं अभ्यासकांना होत असून ते आपल्या जिज्ञासेच्या पूर्तीसाठी जैन सिध्दान्त ग्रंथाचे अध्ययन-मनन करू इच्छितात.

तथापि हे उच्च कोटीचे सिध्दान्तग्रंथ पूर्वीच्या ज्ञानवंत आचार्यांनी तत्कालीन प्राकृत - संस्कृत भाषेत लिहिले असल्याने सामान्य जनांना ते समजणे कठीण जाते. त्यांना सुलभरीतीने ते समजावेत, त्यातील पारिभाषिक शब्दांचा अचूक अर्थ, त्याचा यथार्थभाव समजावा, यासाठी गतशतकात होऊन गेलेल्या अनेक थोर विद्वद् - रत्नांपैकी थोर विद्वान, न्यायवाचस्पती, वादीभगजकेसरी, स्याद्वाद वारिधी गुरूवर्य पंडितप्रवर श्री. गोपालदासजी बरैय्या यांनी हिंदी भाषेतून प्रश्नोत्तर रुपाने श्री जैन सिध्दांत प्रवेशिका हे एक अतिशय उपयुक्त पुस्तक तयार केले.

पं. गोपालदासजी हे आपल्या कालातील फार मोठे विद्वान व प्रभावी वादपटू होते. त्यावेळच्या अनेक भिन्नमती विद्वानांना वादात जिंकून त्यांनी जिनधर्माची फार मोठी प्रभावना केली होती. मध्यप्रदेशात मोरेना येथे जैन सिध्दान्तग्रंथांच्या सूक्ष्म अध्ययनासाठी एक विद्यालय देखील चालविले.

पं. वंशीधरजी, पं. मक्खनलालजी, व्याख्यानवाचस्पती पं. देवकीनंदनजी, पं. फूलचंदजी सिध्दान्तशास्त्री आदि भारतविख्यात विद्वान तेथूनच तयार झाले होते. त्यांना जीवकाण्ड, कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार आदि करणानुयोगाचे उच्च कोटीचे ग्रंथ शिकवितांना आलेल्या अनुभवातून त्यातील अनेक पारिभाषीक शब्दांचा स्पष्टार्थ सुलभतेने लक्षात यावा याच उद्देशाने वरील ' जैन सिध्दान्त प्रवेशिका ' हे पुस्तक पं. गोपालदासजींनी लिहिले आहे. त्यामुळे अन्य सामान्य जनांनाही जैन सिद्धान्ताची ओळख होण्यास, त्यात प्रवेश होण्यास ही एक गुरूकिल्लीच ठरली आहे. पंडीतजीच्या काली व नंतरही प्रस्तुत पुस्तक इतके लोकप्रिय ठरले की अन्य भाषातून त्याचे अनुवाद होत गेले. मराठी भाषेत पहिला अनुवाद सोलापूरचे ख्यातनाम समाजप्रमुख ब्र. जीवराज गौतमचंद दोशी यांनी करुन स्वखर्चाने तो प्रसिद्धही केला.

यानंतर गुरुकुलातील विद्यार्थ्यांना धर्माभ्यास करण्यास उपयोगी व्हावा या हेतूने पं. पू. गुरुदेव श्री समन्तभद्र महाराज व श्रेष्ठीवर्य प्रद्युम्नसा डोणगांवकर यांच्या सूचनेवरून त्यातील पहिला न्यायविषयक कठीण भाग शेवटी पाचवा अध्याय ठेवून पं. नरेन्द्रकुमार जयवंतसा भिसीकर शास्त्री - न्यायतीर्थ यांनी ' बालबोधिनी जैन सिध्दान्त प्रवेशिका 'या नावाने ती तयार करून व त्यातील काही कठीण व्याख्या वगळून ' श्री कंकूबाई पाठ्यपुस्तकमाला, कारंजा ' तर्फे ३ रे पुष्प म्हणून प्रकाशित करण्यात आला. अनेक गुरूकुले व जागोजागी सुरू झालेल्या पाठशाळा यामाधून या प्रवेशिकेचे अध्ययन वाढत गेल्याने सन ११८५ पर्यंत तिच्या सहा आवृत्ती निघाल्या. दिवसेंदिवस पुस्तकाची मागणी वाढतच होती. सन १९८६ मध्ये सातवी आवृत्ती प्रकाशित करतांना कारंजा येथील सुविख्यात विद्वान पं. धन्यकुमारजी गंगासा भोरे, बी.ए. एल.एल. बी.यांनी प्राप्त अनुभवावरून साततत्त्वे, आत्मत्रयी, गुणस्थान, सैध्धान्तिक व आध्यात्मिक नयव्यवस्था, अनेकान्त व स्याद्वाद आदि संबंधी अधिक खुलासा व्हावा यासाठी काही प्रकरणे जोडली असून आवश्यक तेथे अधिक विस्तारही केला आहे. यापूर्वी मोक्षमार्ग प्रकाशक, पंचास्तिकाय, प्रवचनसार, समयसार, आदि अध्यात्मग्रंथाचे केलेले अनुवाद व त्यावर जागोजागी झालेली विद्वत्तापूर्ण प्रवचने यामुळे त्यांची दृष्टी परिस्कृत व ज्ञान परिपक्व झाले आहे. त्याचा उपयोग या आवृत्तीच्या प्रकाशनात झाल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर प्रौढ स्वाध्याय प्रेमी अभ्यासकांना ही ती अधिक उपयुक्त ठरली, हे सांगवयास नको.

यानंतर हे पुस्तक श्री कंकूबाई श्राविकाश्रमात, तथा अंजनगाव, देऊळगाव आदि ठिकाणी झालेल्या शिबीरातून तसेच घरी दररोज येणाऱ्या प्रौढ महिलांना शिकवितांना पं. धन्यकुमारजींच्या भगिनी पंडिता सौ. विजया अजितकुमार भिसीकर यांना जे विविध प्रकारचे गोड अनुभव आले, व जिज्ञासू महिलांशी झालेल्या चर्चेतून ज्या अडचणी लक्षात आल्या त्या सर्व विचारात घेऊन त्यांनी आवश्यक तेथे स्पष्टीकरण करणारे लहानमोठे नकाशे, विविध दृष्टांत तथा करणानुयोगाचा सूक्ष्म अभ्यास व त्यास प्रवचनसार, समयसार आदि ग्रंथांच्या मननाने मिळालेली अध्यात्मदृष्टीची जोड या आधारे जागोजाग उपयुक्त स्पष्टीकरण देऊन अतिशय परिश्रमाने या प्रवेशिकेची एक सुंदर अभ्यसनीय आवृत्ती तयार केली आहे. गेली चार-पाच वर्षे आपल्या हस्तलिखित आवृत्तीच्या आधारेच त्या अनेक जिज्ञासू महिलांना शिकवित राहील्या. यातील विविध नकाशे व दृष्टांत यामुळे जिनागमातील मौलिक सिध्दान्त सुलभतेने समजणे महिलांना शक्य होऊ लागले. त्यामुळे हे हस्तलिखित लवकर पुस्तक रूपाने प्रकाशित व्हावे अशी सर्वांकडून पुन: मागणी होऊ लागली.

आम्ही प्रस्तुत हस्तलिखिताचे संपूर्ण वाचन मे महिन्यात घरी आलो असतांना सौ. विजया बरोबर दररोज दुपारी दोन तीन तास बसून केले. त्यांनी बरेच परिश्रम घेऊन आगम व अध्यात्म यांचा सुरेख समन्वय असणारी ही विवरणात्मक आवृत्ती तिसऱ्यांदा लिहून काढली आहे. जी तत्त्वजिज्ञासू अभ्यासकांना निश्चितच अधिक उपयुक्त अतएव संग्राह्य वाटेल. प्रपंच सांभाळून यासाठी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल वाचक व अभ्यासकवर्ग त्यांना हार्दिक धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नहीं.

**पाच अध्यायातील विषयक्रम**

यात यापूर्वीच्या आवृत्ती प्रमाणेच पाच अध्यायांचा क्रम ठेवलेला असून पहिल्या अध्यायात द्रव्य-गुण-पर्याय, त्यांचे भेदप्रभेद, सात तत्त्वांचे वर्णन, प्रतिजीवी गुण, चार अभाव यांचे विस्ताराने वर्णन आहे.

दुसऱ्या अध्यायात कर्म तत्त्वज्ञान, कर्माचे भेद-प्रभेद, आयुकर्मातील अपवर्तन व उदीरणा यातील फरक, सहा पर्याप्तींचे वर्णन, घाति-अघाति, पुण्य-पाप, जीव विपाकी - पुद्गल विपाकी आदि रुपाने प्रकृति - प्रदेश-स्थिती - अनुभाग बंध, कर्माच्या आस्रवादि दहा अवस्थांचे वर्णन आले आहे.

तिसऱ्या अध्यायात जीवांचे पाच असाधारण भाव, पाच लब्धि, १४ मार्गणा, १४ जीवसमास तथा त्रिलोकाचे सविस्तर वर्णन आहे.

चवथ्या अध्यायात चौदा गुणस्थानांचे विस्ताराने वर्णन असुन आवश्यक तेथे आकृती नकाशे देऊन खुलासा केला आहे.

अखेरच्या पाचव्या अध्यायात लक्ष्य-लक्षण, प्रमाण - नय निक्षेप त्यांचे भेद-प्रभेद तथा आगम व अध्यात्माच्या दृष्टीने होणारे निश्चय - व्यवहार नयाचे भेद-प्रभेद, व्याप्तीचे भेद-प्रभेद, सप्तभंगी आदिंचे विस्ताराने वर्णन आले आहे.

याप्रमाणे जिनागमातील करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग यातील प्रमुख सर्व विषयांची स्थूल ओळख होण्यास प्राथमिक अभ्यासकांना या पुस्तकाद्वारे बरीच सुलभता प्राप्त झाली आहे. धर्माध्यापकांनाही यातील विषय समजावून देतांना विविध नकाशे व दृष्टान्त आदिंचा विशेष उपयोग होईल यात शंका नही. जिज्ञासू श्रावक-श्राविका तथा तत्त्वाध्ययन-अध्यापन करणारे या पुस्तकाचा जरूर लाभ घेतील ही अपेक्षा.

**माणिकचंद भिसीकर**

# प्रकाशकीय

श्री जैन सिद्धांत प्रवेशिकेची ही दहावी आवृत्ती प्रकाशित होतांन आनंद होत आहे.

पं. गोपालदासजी बरैया यांच्या मूळ संकल्पनेला धरून प्रथम स्व.पं. श्री. नरेंद्रदादा भिसीकर ह्यांनी, तद्नंतर पं. श्री. धन्यकुमार भोरे ह्यांनी संपादन केले व आता सौ. विजयाताई भिसीकर ह्यांनी संपादन केले आहे.

काही पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, अर्थ, स्पष्टीकरण कळाल्याशिवाय आगम समजणे कठीण होते. म्हणून प्रश्नोत्तर रुपाने हे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

प्राथमिकांना अतिसोप्या भाषेत जैन धर्माची मूलतत्त्वे समजावून सांगण्याची सौ. विजयाताईची शैली विशेषच आहे. त्यांच्या ज्ञानाचा व शैलीचा यामधे वापर केला असल्याने, शिवाय काही आकृत्या व नकाशे यात दिलेले असल्याने हे पुस्तक विशेष उपयोगाचे होईल अशी आशा आहे.

सौ. विजयाताईंनी अत्यंत परिश्रमाने संपादन केलेल्या व्याख्या, आकृत्या, नकाशे वगैरेंचा संग्रह प्रकाशित कारण्यास संमती दिली त्याबद्दल पाठ्यपुस्तकमाला त्यांची ऋणी आहे.

कागद, छपाई वगैरेंचे दर खूपचा वाढले आहेत. पण विद्यार्थीवर्गाला कमी किंमतीत देता यावे म्हणून ज्या दातारांनी आर्थिक सहयोग दिला त्या सर्वांची पाठ्यपुस्तकमाला ऋणी आहे.

ह्या पुस्तकाचा विद्यार्थीवर्ग जास्तीत जास्त लाभ घेवून आपले ज्ञान ‘ सम्यक् ’ करून घेतील ही आशा-अपेक्षा आहे.

तसेच मुद्रणाचे काम श्री योगेश मिश्रीकोटकर, अंजनगाव ह्यांनी उत्तरमरितीने पार पाडले त्यासाठी पाठ्यपुस्तकमाला त्यांची आभारी आहे.

आपला

**राजकुमार ध.चवरे**

मंत्री, महावीर ब्र. आश्रम, कारंजा

# संपादिकेचे मनोगत

श्री जैनसिध्दांत प्रवेशिका हे पुस्तक नावाप्रमाणेच संपूर्ण आगमात प्रवेश मिळवून देणास समर्थ आहे. स्व.पं. गोपालदासजी बरैया ह्यांनी संपूर्ण आगमाचे सारभूत असे हे पुस्तक सर्व प्रथम हिंदीमधे लिहीले. नंतर त्याची मराठी संशोधित आवृत्ती कंकुबाई पाठ्यपुस्तक मालेतर्फे पं.नरेंद्रकुमारदादा भिसीकर यांनी व द्वितीय आवृत्ती पं. धन्यकुमारजी भोरे द्वारा संशोधीत स्वरूपात प्रसिद्ध झाली.

या लहान तरी महान अशा ग्रंथाचे महत्व जाणणाऱ्या आमच्या आजोबांनी ( स्व. प्रद्युम्नसावजी डोणगांवकर ) आयुष्यभर हा ग्रंथ बाल, युवा, पुरूष महिला सर्वांना विस्तारपूर्वक तरीही अत्यंत सोप्या भाषेत शिकविला. त्यांची नात म्हणून हा लाभ मला सहजच मिळाला. त्यांच्या अभिजात अध्यापनकलेचे फलित म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी शिकविलेले आजतागायत स्मृतीमधे आहे.

माझी नैसर्गिक रूची अध्यात्माकडे असल्यामुळे करणानुयोगाकडे थोडे दुर्लक्ष असे परंतु प. फुलचंदजी शास्त्री, श्रद्धेय गजाबेन यांच्या सहवासात राहून केलेल्या अध्ययनामुळे त्यात रूची निर्माण झाली. आज तो माझ्या आवडीचा विषय बनला आहे.

पं.पू. गुरुदेव समंतभद्रजी महाराज यांनी अध्ययन व अध्यापनाची प्रेरणा दिली. स्व.तात्याजींनी सतत प्रोत्साहन दिले व कौतुक केले. या सर्व गुरूजनांचे ऋण माझ्या हृदयात सदैव वास करीत राहील.

अत्यंत कुशाग्र बुध्दिमत्ता लाभलेले वडील स्व.गंगासावजी भोरे, करणानुयोग जणू मुखोद्गत असलेली आई स्व.सुंदराबाई भोरे व आजचे मर्धून्य विद्वान बंधूवर्य पं धन्यकुमारसी भोरे, भगिनी डॉ. पद्माताई किल्लेदार यांचा माझ्या आयुष्याच्या जडणघडजीत मोलाचा वाटा आहे. भाऊंमुळेच माझी अध्यात्मशास्त्रातील रूची वाढीस लागली. त्यांचे हार्द ध्यानात आले. ग्रंथकार आचार्यांच्या बुद्धीवैभवाचा व भाषाप्रभुत्वाचा परिचयही भाऊंमुळेच झाला. प्रस्तुत पुस्तकासाठीही भाऊंनी अतिशय परिश्रम घेतले आहेत.

श्रद्देय श्री माणिकचंददादा भिसीकर ( न्यायतीर्थ ) हे गतवर्षभरापासून हे पुस्तक प्रकाशित व्हावे यासाठी प्रयत्नशिल होते. लेखनासाठी सतत प्रेरणा देणे ,कौतुक करणे यासोबतच प्राथमिक वाचन, प्रूफ तपासणे इत्यादी कामांसाठी

त्यांनी आपला अमूल्यवेळ देवून परिश्रमपूर्वक ही कामे पार पाडली.

उपरोक्त सगळयांविषयी मी विनम्र भावपूर्ण कृतज्ञता व्यक्त करू इच्छिते.

ज्यावेळी शिकविण्यास सुरुवात केली, त्यावेळी माझे अध्ययन मर्यादित होते. परंतु जसजशी रूची वाढत गेली, तसतसे वाचन, चिंतन, मनन वाढत गेले. अध्यात्मशास्त्र व करणानुयोगाच्या ग्रंथांच्या अध्ययनाने मिळालेल्या ज्ञानाचा प्रवेशिका शिकवितांना सहज वापर होत गेला. त्यामुळे अध्यापनाचा आनंद वृध्दिंगत झाला. हळूहळू शिकणाऱ्यांची संख्या व रुची वाढती राहीली. अध्यापन कमी वेळात. कमी श्रमात सुलभतेने व्हावे म्हणून वहीमधे महत्वाचे मुद्दे, विशेष, स्पष्टीकरणासाठी आकृत्या, तक्ते, नकाशे, इ. तयार करून त्याचा वापर सुरू केला. ही पद्धती उपयुक्त होते याचा अनुभव आला. प्रस्तुत पुस्तक हे त्याचेच फलित आहे.

या पुस्तकाच्या एक हजार प्रती अवघ्या दोनच महिन्यात संपतील ही अपेक्षा नव्हती. पुस्तकाची मागणी मात्र सुरूच आहे. ह्या काळातही जैन तत्वज्ञानचे मोल करणारे वाचक, अभ्यासू व जिज्ञासू आहेत हे लक्षात आले. व त्यामुळे परत छापण्याच निर्णय घ्यावा लागला. प्रथम आवृत्तीमधील छपाईच्या चुका दुरुस्त कारण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे.

या पुस्तकाच्या प्रथम अध्यायात द्रव्य, गुण, पर्याय यांचे स्वरूप, भेद व जीवाचे विशेषगुण याचे वर्णन आहे. अंती चार अभावांच्या वर्णनाने प्रत्येक वस्तूची स्वतंत्रता सिद्ध केली आहे. दुसऱ्या अध्यायात कर्माचा आस्त्रव, बंध, त्यांचे भेद, कर्मांच्या दहा अवस्था यांचे सविस्तर वर्णन आहे. तिसऱ्या अध्यायात, जीवाचे पाच असाधारणभाव व चौदा मार्गणा यांचे वर्णन आहे. चौथ्या अध्यायात चौदा गुणस्थाने व जीवाच्या त्यातील आवागमनाचे वर्णने आहे. पाचव्या अध्यायात प्रमाण, नय, निक्षेप, व स्याद्वाद यांची चर्चा आहे.

ग्रंथाच्या मूळ लेखकाचा व संपादकांचा अभिप्राय कायम ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतांनाच अधिक स्पष्टीकरणासांठी लब्धीसार, कर्मकांड, प्रवचनसार, समयसार, सर्वार्थसिद्धी, जैनतत्त्व मीमांसा इत्यादि ग्रंथांचा आधार घेतला आहे. विषय क्लिष्ट न व्हावा यासाठी कुठेकुठे शास्त्रीय शद्धाऐवजी सोप्या भाषेचा उपयोग केला आहे.

पूर्वाचार्यांचे ज्ञानवैभव ,महान तत्त्वदृष्टी वाचकांच्या ध्यानात यावी,

करणानुयोग, द्रव्यानुयोग, चरणानुयोगादि आगमामध्ये सहज प्रवेश व्हावा, त्यायोगे त्यांची स्वाध्यायाची रूची व ज्ञानाची सखोलता वाढावी या उद्देशाने हे लिखाण झाले आहे. यात माझे स्वत:चे असे कांहीही नाही. म्हणूनच पुस्तक रूपाने हे प्रकाशित करण्याचा मानस, संकल्प वा प्रयत्न नव्हता. परंतु स्वजनांच्या आग्रहास्तव त्यातही प्रामुख्याने अंजनगावनिवासी श्री अशोक संगई व महिलावर्ग यांची प्रबळ इच्छा, प्रयत्न व चिकाटीने मला छापण्याची संमती घावी लागली. आज हे पुस्तक आपल्या समोर येण्यात या सर्वांची जिनवाणीप्रती असलेली प्रगाढ श्रध्दाच कारणीभूत ठरली आहे.

माझे पती श्री. अजितकुमारजी, मुले, सुना, नातू या सर्वांनी लेखनकाळात सहकार्य केले आहे. त्यांच्या सहयोगाशिवाय हे पुस्तक साकारलेच नसते. श्री अशोक संगई, श्री अशोक चवरे, व कन्या सौ. भारती खंडारे यांचे औपचारीक आभार मानणे त्यांना रुचणार नाही. पण त्यांचे सहकार्य लाभले तर आहेचा.

या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी येथील श्री. कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला या संस्थेने उचलली मी त्या संस्थेविषयी कृतज्ञ आहे.

हे पुस्तक छापून कमी किंमतीत देता यावे म्हणून ज्या ज्या दातारांनी आर्थिक सहयोग दिला त्यांचेही मी आभार मानते.

प्रुफ रिडींगसाठी मदत करणारे श्री रवीन्द्र ल. पाटील, अंजनगाव व मद्रणाची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडणारे श्री योगेश मिश्रीकोटकर, योगेश ओफसेट, अंजनगाव, श्री अजय संगई यांचे तसेच हे पुस्तक प्रकाशित करण्यामधे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या सर्वांचेप्रति माझे अंत:करण कृतज्ञतेच्या भावनेने व्यापून आहे.

शेवटी तत्वज्ञानासंबंधीची दोलायमानता संपवून आत्मकल्याणार्थ या ग्रंथाचा उपयोग वाचक करतील ही अपेक्षा आहे. या पुस्तकातील जे जे चांगले आहे, ते आचार्यांचे, विद्वान व ज्ञानी जणांचे आहे, आणि ज्या तृटी असतील त्या माझ्या आहेत हे समजून घेवून सुबुध्दवाचक क्षमा करतील याभावनेने विराम !

**सौ. विजया अ.भिसीकर**

कारंजा

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अध्याय १ ला | १ |
| अध्याय २ रा | ४७ |
| अध्याय ३ रा | ७८ |
| अध्याय ४ था | १३५ |
| अध्याय ५ वा | १८७ |

# अध्याय पहिला

**प्रश्न–लोक कशास म्हणतात ?**

**उत्तर –** द्रव्यांच्या समूहास लोक ( जग ) म्हणतात.

**प्रश्न – द्रव्य कशास म्हणतात ?**

**उत्तर–** जे आपल्या भूतकालीन अनंत पर्यायांमध्ये ( अवस्था ), एक वर्तमान पर्यायीमध्ये व अनंतानंत भविष्यकालीन पर्यायांमध्ये व्यापक आहे, आपल्या नियत प्रदेशामध्ये व आपल्या अनंतानंत गुणांमध्ये व्यापक आहे, अनादि अनंत, स्वत:सिद्ध, त्रिकाली व स्वाधीन असते. तें द्रव्य होय.

**प्रश्न – व्यापक म्हणजे काय ?**

**उत्तर –** जे स्वत: च्या सर्व पर्यायांत, सर्व गुणांत व प्रदेशांत असते ( व्यापते ) राहते. दृष्टांतासाठी आकृती न.१ पहा.

जे आपल्या सर्व प्रदेशांत व सर्व पर्यायांमध्ये व सर्व गुणांमध्ये एकरूपाने व्यापते ते द्रव्य होय.

**प्रश्न– आपल्या नियत प्रदेशांमध्ये म्हणजे काय ?**

**उत्तर –** प्रत्येक द्रव्याचे प्रदेश निश्चित असतात. ते कमी अधिक होत नाहीत. त्या सर्व प्रदेशामध्ये ते द्रव्य व्यापून असते.

**प्रश्न – द्रव्याचे स्वरूप जाणण्याचे फल काय ?**

**उत्तर –** पर्यायमूढता नष्ट होते ,द्रव्यदृष्टी प्राप्त होते, द्रव्याची प्रभुता व पर्यायांची पामरता दृष्टीत येते.

## गुणांचे स्वरूप

**प्रश्न – गुण कशास म्हणतात ?**

उत्तर - जे द्रव्याच्या सर्वभागांत ( सर्व प्रदेशांत ) व सर्व अवस्थांत ( पर्यायात ) राहतात त्यास गुण म्हणतात.

* जे नित्य ( नष्ट न होणारे ) सहभू ( सह–द्रव्या बरोबर राहणारे ) अन्वयी ( तोच हा तोच हा ) निर्गुण ( गुणांत गुण राहत नाही ) नित्यद्रव्याश्रयी आहे ( सदांसाठी द्रव्याच्या आश्रयी ) त्यास गुण म्हणतात. ते अनादि–

अनंत रूप व त्रिकाली असतात.

**प्रश्न – गुणांत गुण राहत नाहीत याचा अर्थ काय ?**

उत्तर - एका गुणांत दुसरा गण राहील तर तो गुण न राहता द्रव्यच बनेल.

**प्रश्न – नित्य द्रव्याश्रयी म्हणजे काय ?**

उत्तर - पर्याय एक समयमात्र द्रव्याश्रयीच असते. पण गुण तसे नसुन सदाच द्रव्याश्रयी असतात.

✻ दृष्टांत - आंब्यामध्ये असणारे स्पर्शादि गुण सदा त्यासोबत असतात. म्हणून सहभू, नष्ट होतच नाहीत म्हणून नित्य, तोच हा स्पर्श अशी प्रतीती येते म्हणून अन्वयी असतात.

**प्रश्न – गुणांचे स्वरूप जाणण्याचे फल काय ?**

उत्तर - अहंकार व न्यूनगंड राहत नाही व आपल्या पूर्ण वैभवाची जाणीव झाल्यामुळे पुरूषार्थ समीचीन होतो.

**प्रश्न –गुण किती प्रकारचे आहेत ?**

उत्तर - गुण दोन प्रकारचे आहेत. सामान्य गुण व विशेष गुण.

✻ जे सर्वच ( अनेक ) द्रव्यांत आढळतात ते सामान्य गुण होत.

✻ जे आपल्याच ( विशिष्ट ) द्रव्यातच आढळतात ते विशेष गुण होत.


## पर्यायाचे स्वरूप

द्रव्यांच्या व गुणांच्या प्रतिसमय होणाचा अवस्थेला ( बदलास ) पर्याय म्हणतात.

पर्याय अनित्य ( क्षणिक ) व्यतिरेकी ( ती ही नाही )क्रमभू ( कालक्रमाने होणाऱ्या आपल्या नियतकालीच ) असतात.

**प्रश्न – पर्यायाचे स्वरूप जाणण्याचे फल काय ?**

उत्तर - त्या स्वयं स्वभावनेच नष्ट व उत्पन्न होणाऱ्या असल्यामुळे ( जाणल्यामुळे ) सुख दु:ख होत नाही. त्यांना टिकविण्याचा व बदलविण्याचा मिथ्या प्रयास होणार नाही व निमित्ताधीनता जीवातून नष्ट होईल.




(आकृती नं. १)

द्रव्य- हिरवा गोल
गुण - लालरेषा
प्रदेश - काळे गोल
वर्तमान पर्याय - पोपटी गोल
भूत पर्याय - लाल गोल
भविष्य पर्याय - निळा गोल

❖ सर्वपर्यायांत व सर्व गुण व प्रदेशांत व्यापक असते ते द्रव्य हे माळेतील धाग्याच्या दृष्टांताने (कल्पनेने) दाखविले आहे.
❖ पर्यायाकृतीत मोठे गोलाची (मण्याची) कल्पना केली ❖ सर्वच गुण सर्वच पर्यायांत असतात यासाठी सूक्ष्म रेषा दाखविल्या आहेत. ❖ ० प्रदेशासाठी दाखविले.

❖ वर्तमान पर्याय एकच असते.
❖ भूतकालीन पर्यायांना वर्तमानाशी मर्यादा येते, म्हणून ५ दाखविल्या. भविष्य कालीन पर्यायींना अंत नाही, म्हणून ९ दाखविल्या. ❖ द्रव्यामध्ये सर्व प्रदेशांत व सर्व पर्यायांमध्ये व सर्व गुणांमध्ये एक, अखंड रूपात जी व्यापते ते द्रव्य होय.

## सामान्य गुण

*जे सर्व द्रव्यांत असतात ते सामान्यगुण होत. ते सहा आहेत.

| नावे | स्वरूप | फल |
|---|---|---|
| १. अस्तित्व | १. ज्यामुळे बदलातही वस्तू स्वरूपाने विद्यमान राहते त्या गुणास अस्तित्व गुण म्हणतात. | १ प्रत्येक वस्तु सदैव विद्यमान असल्यामुळे तिला उत्पन्न, नष्ट करणारा, रक्षा करणारा, टिकविणारा अन्य कुणीही नाही. हे ज्ञान होते. सातभय असतच नाहीत. |
| २ वस्तूत्व | २. ज्यामुळे पदार्थात अर्थक्रियाकारित्व असते. अर्थ म्हणजे वस्तूचा स्वभाव. क्रिया-स्वभावानुसार कार्य होत राहणे. त्या गुणास वस्तूत्व म्हणतात. वस्तू स्वभावत:च कार्य करीत राहते. हाच तिचा उपयोगी पणा होय. | २. वस्तुमध्ये स्वभावानुसार कार्य प्रतिसमय घडतच राहते. स्वभाव व तद्नुसार क्रिया अन्य द्रव्यांच्या कारणाने होत नाही. जसे गुलाब पुष्पामध्ये सुगंध वस्तुत्व गुणामुळे आहे ही दृष्टी प्राप्त झाल्यामुळे पराचे कर्तृत्व राहात नाही. |
| ३.द्रव्यत्व | ३.ज्यामुळे वस्तू आपले अस्तित्व व स्वभाव न सोडता प्रतिसमय परिणमन ( पर्यायाचा बदल ) करीत असते त्यास द्रव्यत्व म्हणतात. | ३. वस्तु मध्ये स्वभाव वा विभाव परिणमन योग्यतेनुसार वस्तुच्या स्वभावाच्या मर्यादेत स्वयं घडते. ते घडविण्यास अन्य निमित्ताची अपेक्षा नसते. जसे गुलाबाचा वर्ण स्वयं प्रतिसमय बदलत असतो. कुणी घडविणारा अन्य नाही ही जाणीव होते. निमित्ताधीनता राहत नाही. निमत्ताधनताचा खुलासा - वातावरणादिकामुळे बदल घडतो, अशी कल्पना राहात नाही. |

| नावे | स्वरूप | फल |
|---|---|---|
| ४ प्रमेयत्व | ४. ज्यामुळे वस्तू प्रतिसमय कोणत्यातरी ज्ञानाचा विषय होतच असते त्यास प्रमेयत्व गुण म्हणतात. | ४. वस्तू स्वभावनेच ज्ञेय आहे. ज्ञानामुळे ज्ञेय नाही. ज्ञानाचे ज्ञानस्वरूप परिणमन व ज्ञेयाचे त्याचसमयी असणारे ज्ञेय रूपाने परिणमनामुळे ज्ञेयज्ञायक व्यवहार होतो. केवलज्ञानात सर्व ज्ञेयाकार त्याच्या ज्ञानस्वभावाने ज्ञात होतात. व सर्व ज्ञेय स्वभावानेच ज्ञेय, बनतात. हे ज्ञान होते. |
| ५. अगुरू | ५.ज्यामुळे एक द्रव्य अन्य द्रव्यरूप होत लघुत्व नाही एका द्रव्यांतील एक गुण दुसऱ्या गुणरूप होत नाही व ते विखरुन ( वेगवेगळे ) द्रव्यांत राहत नाही त्यास अगुरुलघुत्व गुण महणतात. | ५. लोकाकाशाच्या एका क्षेत्रात सर्व द्रव्य राहतात. तरी एकरूप होत नाहीत. वस्तु सदैव स्वरूपप्रतिष्ठित आहे, ही जाणीव होते. द्रव्यांचे गुणांचे व पर्यायांचे स्वातंत्र्य सिद्ध होते. |
| ६. प्रदेशत्व | ६. ज्यामुळे द्रव्य स्वभावानेच निज नियत प्रदेशी असते त्या गुणास प्रदेशत्व गुण म्हणतात. | ६. प्रत्येक वस्तूस आकार आपल्या प्रदेशांनीच असतो. दुसरा कुणी आकार देतो ही कल्पना होत नाही. लोकाकाशाचे क्षेत्र कोणत्याही द्रव्याने लहान मोठे व्यापले तरी त्याचे ( द्रव्यांचे ) प्रदेश कमी अधिक होत नाहीत. |

* या सहा सामान्यगुणामुळे प्रत्येक वस्तूचे प्रत्येक कार्य आपल्याच योग्यतेने होते. वस्तूस किंचितही परावलंबन नाही. हे सिध्द होते.

* विशेष गुणही कधी सामान्य होतात. जसे ज्ञान नाना जीवाच्या अपेक्षेने सामान्य व पुद्गलाच्या अपेक्षेने विशेष म्हटल्या जाते.

# सहा द्रव्यांचे स्वरूप

**प्रश्न – जीव कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्याला चेतना म्हणजे ज्ञान दर्शन आहे तो जीव होय. चेतना हा ह्या द्रव्याचा विशेष गुण आहे. कारण जाणणे हे कार्य अन्य कोणत्याच पदार्थात दिसून येत नाही. ही ह्याच वस्तूची महानता आहे.

* एका जीवाला लोकाकाशाचे असंख्यातव्याभाग असे असंख्यात प्रदेशच लागतात. तो एका प्रदेशात राहू शकत नाही.
उदा. आकृती नं. २ पहा.

* ही जीवाच्या अवगाहनेची विशेषता आहे.

**प्रश्न – पुद्‍गल द्रव्य कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्यामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण हे गुण असतात त्यास पुद्‍गल द्रव्य म्हणतात. उदा. आकृती नं.२ पहा.

* मूर्तत्त्व हा गुण पुद्‍गलातच आहे म्हणून तो त्याचा विशेष गुण आहे. ह्याचे दोन भेद आहेत.

१. परमाणु व २. स्कंध

परमाणु -पुद्‍गलाच्या सर्वात लहान द्रव्यास परमाणु म्हणतात. ह्याचा परत विभाग होत नाही. हे शुद्ध द्रव्य होय.

शुध्द परमाणु पुद्‍गल जर स्कंध बनले तर तो अशुद्ध होतो. व स्कंधातून परमाणू बाहेर पडला तर परत शुद्ध बनतो. पण जीव शुद्ध ( सिध्द ) झाल्यावर परत अशुध्द ( संसारी ) होत नाही. ही जीवाची विशेषता आहे.

**प्रश्न – स्कंध कशास म्हणतात ?**

उत्तर - अनेक परमाणूंच्या बंधास स्कंध म्हणतात. ही पुद्‍गलाची ( द्रव्याची ) विभावपर्याय आहे.

## धर्मद्रव्याचे स्वरूप

✻ जे स्थितिपूर्वक गमनास उद्युक्त ( तयार ) अशा सर्वच जीव व पुद्‌गलांना एकाच वेळी गमन कर करण्यास उदासीन ( साधारण ) निमित्त असते ते धर्मद्रव्य होय.

✻ हे द्रव्य स्वयं गमन करीत नाहीत. जेथे जीव पुद्‌गल गमन करतात तिथे असते मात्र, जसे मासा स्वयं गमन करील तर तेथे असणारे पाणी निमित्त असते. ( आकृती नं.३ पहा. )

✻ उद्युक्त शब्द गमन करण्यास तयार अशा जीव पुद्‌गलांनाच ते निमित्त म्हटल्या जाते. हे जबरीने गमन करवीत नाही.

✻ हे एक अखंड द्रव्य आहे.

✻ ह्या जीव व पुद्‌गल शब्दामागे सर्व हा शब्द, जेवढे गमन करतात त्या सर्वांनाच व एकाचवेळी हा शब्द क्रमाने नाही यासाठी आहे.


✻ गतिहेतुत्व हा ह्याच द्रव्याचा विशेष गुण आहे. कारण अप्रदेशी काल व पुद्‌गलाचा तो शक्य नाही. समुद्‌घाताविना असंख्यात प्रदेशी जीवाचाही असू शकत नाही. कारण जीव लोकाकाशाच्या असंख्याताव्या भागातच राहतो. आकाश लोकालोकप्रमाण असल्यामुळे त्याचाही नाही, जीव पुद्‌गलांचे गमन लोकाकाशापर्यंत शक्य आहे. कारण त्यांची स्वयंची गमनाची योग्यताच तेवढी आहे. व विरोधी कार्य करणाऱ्या अधर्म द्रव्याचा पण शक्य नाही. म्हणून गतिहेतुत्व हा धर्मद्रव्याचाच विशेष गुण आहे.

**प्रश्न - हे द्रव्य तर दिसत नाही. मग त्यांचे अस्तित्व का व कशावरुन ?**


उत्तर - नामवाचक शब्द असेल तर त्याचे वाच्य असतेच.

✻ ज्याचे ज्ञान आहे, त्याचे ज्ञेय असतेच. हे द्रव्य केवलज्ञानाचा विषय ( ज्ञेय ) आहे.

✻ अनुमान ज्ञान त्याचेच होते. जे कुणाला वा कधीतरी प्रत्यक्ष असतेच ही द्रव्ये अनुमानाने ज्ञाता होतात. म्हणून ही द्रव्ये जगात आहेतच असे मानावे लागते. हे नियम व्याकरण शास्त्राचे आहेत.


एक जीव असंख्यातव्या भागप्रदेश व्यापतो.
एक परमाणू, संख्यात, असंख्यात, अनंत परमाणूंचा स्कंध वा अनंत सुटे परमाणू पण लोकाकाशाच्या एका प्रदेशावर राहू शकतात.

(आकृती नं. २)


धर्म अधर्मद्रव्य म्हणजे
पिवळा भाग
लाल रेघा म्हणजे जीव पुद्‌गलांचे
गमन होत असतांना ही धर्म अधर्म
द्रव्यास गमन करावे लागत नाही.

(आकृती नं. ३ )

# अधर्मद्रव्याचे स्वरूप

**प्रश्न – अधर्मद्रव्य कशास म्हणतात ?**

उत्तर - गमनपूर्वक स्थिती कारण्यास उद्युक्त अशा सर्व जीव पुद्‌गलांना स्थिर राहण्यास एकाच वेळी जे फक्त उदासीन निमित्तमात्र असते ते अधर्मद्रव्य होय.

* हे असंख्यात प्रदेशी एक अखंड द्रव्य आहे.
* ह्याचा विशेषगुण स्थितिहेतुत्व हा आहे. बाकी सर्व धर्मद्रव्यवत्‌च आहे.
* जसे - वाटसरुस वृक्षाखाली थांबल्यानंतर छाया सहजच मिळते.
* तसे जीव, पुद्‌गल स्वयं थांबले तर अधर्मद्रव्य निमित्त होते. ते थांबवीत नाही व थांबविण्यास प्रेरक ( क्रियावान ) निमित्तपण नाही.

# आकाश द्रव्य

**प्रश्न – आकाश द्रव्य कशास म्हणतात ?**

उत्तर - जे सर्व द्रव्यांना एकाच वेळी सामान्य अवगाह ( बाह्यआधार ) देण्यास साधारण हेतु ( उदासीन ) निमित्त असते ते आकाश द्रव्य होय.


* हे एक अखंड अनंत प्रदेशी द्रव्य आहे.
* ह्याचा विशेषगुण अवगाहनहेतुत्व आहे, कारण याच्या एवढे विशाल ( मोठे ) दुसरे कोणतेच द्रव्य नाही.
* प्रत्येक द्रव्याचा आधार त्याचेच नियत प्रदेश आहे. पण बाह्यआधार ( निमित्त ) आकाशद्रव्य नाही.
* ह्याचे भेद दोन आहेत. ( १. ) लोकाकाश व ( २. ) अलोकाकाश
* वस्तुत: आकाश एक अखंडच द्रव्य आहे. पण त्याच्या जेवढ्या भागात सहा द्रव्य राहतात, तेवढ्या भागास लोकाकाश नाव येते. व जिथे एक आकाशच द्रव्य आहे त्यास अलोकाकाश म्हणतात.
* अलोकाकाशात काल द्रव्य नाहीत. तर त्याच्या परिणमनास कोण निमित्त असेल ?
* लोक व अलोक मिळून एक अखंडच आकाश द्रव्य आहे. तर त्याची पर्यायही एकासमयात एकच असेल.

✻ तेव्हा लोकाकाशातील कालाणुच अलोकाकाशाच्या परिणमनास निमित्त असणार आहे.

## कालद्रव्य

**प्रश्न – कालद्रव्य कशास म्हणतात ?**

उत्तर - जे सर्व द्रव्यांच्या परिणमनास फक्त उदासीन निमित्त असते ते काल द्रव्य होय.




✻ हे द्रव्य एक प्रदेशीच आहे. उपचाराने पण परमाणुप्रमाणे बहुप्रदेशी होत नाही. म्हणून अस्तिकाय नाहीत. पण अस्तिरुप आहे.

✻ हे द्रव्यच असंख्यात आहे.

✻ हे द्रव्य परद्रव्यांना बदलवीत नसून त्यांच्या बदलाचे ज्ञापक निमित्त ( दाखविणारे ) आहे.

✻ वर्तनाहेतुत्व हा ह्याचाच विशेषगुण आहे. कारण कालास सोडून बाकी सर्व द्रव्यांच्या प्रत्येक पर्यायामध्ये विशिष्ट समयवृत्तीला ( समयाने विशिष्ट होणारे दाखविल्या जाणारे परिवर्तन ) कारणपणा कालाचाच गमक आहे.


✻ कालाचे समय हाच परिणाम ( पर्याय ) आहे. ह्यासच समयवृत्ती ( समयरुपाने परिणमन ) म्हणतात.

✻ बाकी सर्व द्रव्यांच्या परिणमनास समयविशिष्ट वृत्ती ( कालाच्या समय निमित्तक होणारे परिणमन )म्हणतात.

✻ ह्याप्रमाणे ही जाती अपेक्षेने सहाच द्रव्य आहेत. संख्येच्या अपेक्षेने नाही. प्रत्येकाची संख्या भिन्न आहे.

१. ही चारही द्रव्ये स्पर्शादिकानी रहीत आहे. म्हणून अमूर्त आहेत.

२. ह्यांच्यामधे परिस्पंद नाही म्हणून निष्क्रिय आहेत.




(आकृती नं. ४)

३. ही सर्वच नित्य व अवस्थित आहेत. ( संख्या कमी अधिक होत नाही. )

४. कालाणू सोडून ५ द्रव्ये अस्तिकाय आहेत. कालाणू एमप्रदेशीच आहे.

## पुद्गल स्कंधाचे भेद

**प्रश्न – स्कंधाचे भेद मिती ?**

उत्तर - स्कंधाचे भेद बावीस आहेत. पण जीवाशी संबंधित पाच आहेत. १. आहारवर्गणा, र. भाषा वर्गणा, ३. मनो वर्गणा, ४. तैजस वर्गणा व प. कार्माण वर्गणा

**प्रश्न – आहारवर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या स्कं धापासून औदारिकादि तीन शरिरे बनतात त्यास आहारवर्गणा म्हणतात.

**प्रश्न – औदारिक शरीर कशास म्हणतात ?**

उत्तर - स्थूल शरिरास औदारिक शरीर म्हणतात. हे मनुष्य व तिर्यंचांनाच असते.

**प्रश्न – वैक्रियिक शरीर कशास म्हणतात ?**

उत्तर - सूक्ष्म शरिरास वैक्रियिक शरीर म्हणतात. याने नाना विक्रिया करता येतात. हे देव व नारकींनाच असते.

**प्रश्न – आहारक शरीर कशास म्हणतात ?**

उत्तर - सहाव्या गुणस्थानवर्ती आहारकऋध्दिधारी मुनींना तत्वांत काही शंका निर्माण झाली असता, त्यांच्या मस्तकातून एक हात उंचीचा पांढऱ्या रंगाचा पुतळा निघून केवली वा श्रुतकेवलींच्या पादमूलास स्पर्श करतो. व मुनींची शंका दूर होते. मुनींचे शरीर औदारिकच व पुतळयाचे शरीर आहारक असते. तीर्थयात्रा व असंयम परिहारासाठीही या शरिराचा उपयोग ते मुनी करतात.

**प्रश्न – सहाव्या गुणस्थानवर्ती मुनींनाच का ?**

उत्तर - शंका वा विकल्प ह्या गुणस्थानातच असू शकतात. पुढे नाही.

**प्रश्न –तैजस वर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्यापासून तैजस शरीर बनते त्यास तैजस वर्गणा म्हणतात.

**प्रश्न – भाषावर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या स्कंधापासून शब्द बनतात त्यास भाषावर्गणा म्हणतात.

**प्रश्न – मनोवर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या स्कंधापासून द्रव्यमन बनते त्यास मनोवर्गणा म्हणतात.

**प्रश्न – कार्माणवर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या स्कंधापासून द्रव्यकर्म अर्थात कार्माण शरीर बनते त्यास कार्माण वर्गणा असे म्हणतात. ह्या वर्गणा एकापेक्षा एक सूक्ष्म आहेत.

**प्रश्न – एका जीवास कमीत कमी किती शरीरे असतात ?**

उत्तर - कमीत कमी

दोन शरीरे - कार्माण व तैजस - विग्रहगतीत असता.
तीन शरीरे - कार्माण व तैजस, औदारिक - मनुष्य व तिर्यचांना
तीन शरीरे - कार्माण व तैजस, वैक्रियिक - देव व नारकींना
चार शरीरे - कार्माण व तैजस, औदारिक व आहारक - मुनींना

आहारक व वैक्रियिक वा वैक्रियिक व औदारिक बरोबर राहू शकत नाहीत.

## समुद्घात

**प्रश्न – समुद्घात कशास म्हणतात ?**

उत्तर - मूळ शररास न सोडता आत्मप्रदेश प्रसरण पावणे यास समुद्घात म्हणतात. समुद्घाताचे भेद ७ आहेत.

१. **तैजस समुद्घात कशास म्हणतात ?**

उत्तर - तैजस ऋध्दीमुळे तैजस शरिसोबत आत्मप्रदेश बाहेर पडणे तो तैजस समुद्घात होय. याचे भेद दोन आहेत. शुभ व अशुभ तैजस. शुभ तैजस शरीर चांगले ( शुभ ) कार्य करते. अशुभ तैजस शरीर वाईट ( अशुभ ) कार्य करते.

२. **वेदना –** वेदनेच्या निमित्ताने मुळ शरीरास न सोडता आत्मप्रदेश बाहेर पडणे.

३. वैक्रियिक शरीरधारीना विक्रिया निमित्तक व

औदारिक शरीरधारी वैक्रियिक ऋध्दिधारी मुनींना विक्रिया निमित्तक आत्मप्रदेश बाहेर पडणे.

४. **मारणांतिक स. – मरणापूर्वी पुढील जन्मस्थानास स्पर्श करण्यासाठी आत्मप्रदेश बाहरे पडणे**

**प. कषाय स.** - क्रोधादि कषाय निमित्तक आत्मप्रदेश बाहेर पडणे.

६. **आहारम स. –** आहारक ऋध्दिधारी मुनींना शंमेच्या निरसनासाठी आहारक शरीरासोबत आत्मप्रदेश बाहेर पडणे.

७. **केवल स. –** आयुकर्मासमान तीन अघाति कर्माची स्थिती होण्यासाठी केवलींचे आत्मप्रदेश बाहेर पडणे.

# द्रव्यांची संपूर्ण माहिती

| नं. | नांव | सामान्य गुण | विशेष गुण | चेतन | अचेतन | मूर्त | अमूर्त प्रदेशी | एक प्रदेशी | बहु वान | क्रिया वान | भाव वान | संख्या | प्रदेशी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जीव | ६ | चेतनत्व | आहे | नाही | नाही | आहे | नाही | आहे | आहे | आहे | अनंतानंत | असंख्यात |
| २ | अजीव पुद्गल | ६ | मूर्तत्व | नाही | आहे | आहे | नाही | आहे | आहे स्कंधाने | आहे | आहे | अनंतानंत ×अनंतानंत | एक संख्यात असंख्यात अनंत |
| ३ | धर्म द्रव्य | ६ | गति हेतुत्व | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | एक | असंख्यात |
| ४ | अधर्म द्रव्य | ६ | स्थिति हेतुत्व | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | एक | असंख्यात |
| ५ | आकाश द्रव्य | ६ | अवगाहन हेतुत्व | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | नाही | आहे | एक | अनंत |
| ६ | काल द्रव्य | ६ | वर्तना हेतुत्व | नाही | आहे | नाही | आहे | आहे | नाही | नाही | आहे | असंख्यात | एकप्रदेशी |

# उत्पाद व्यय ध्रौव्याचे स्वरूप

**प्रश्न – उत्पाद कशास म्हणतात ?**

उत्तर - नवीन पर्याय उत्पन्न होणे. उदा. कड्याचे कंकण होणे.

**प्रश्न – व्यय कशास म्हणतात ?**

उत्तर - पूर्व पर्यायीचा अभाव होणे. उदा. कड्याचा अभाव.

**प्रश्न – ध्रौव्य कशास म्हणतात ?**

उत्तर - वस्तूचे वस्तूत्व कायम राहणे. उदा. स्वर्णत्व दोन्ही अवस्थेत आहेच.

**प्रश्न – ह्या तिन्हींचा समय किती ?**

उत्तर - एक समय.

**प्रश्न – ह्या पर्यायी किती ?**

उत्तर - एकच पर्याय आहे.

**प्रश्न – ह्यांना तीन नावे कां ?**


उत्तर - तीन पर्यायींच्या दृष्टीने एकाच पर्यायी कडे पाहिले म्हणून तीन रूप दिसते.

**प्रश्न – उत्पादरूप व व्यय रूप पर्यायीच्या अस्तित्वाचा काल एक का ?**

उत्तर - उत्पादाचा व व्ययाचा काल एक पण दोन पर्यायींचे अस्तित्व भिन्न काली आहे.

**प्रश्न – उत्पादादि एका पयायीचे तीन भाग आहे का ?**

उत्तर - नाही. वर्तमान पर्यायीच्या दृष्टीने ती पूर्ण पर्याय उत्पादरूप आहे. मागच्या पर्यायीच्या दृष्टीने ती पूर्ण पर्याय व्ययरूप आहे. व ध्रौव्याच्या दृष्टीने ती पूर्ण पर्याय ध्रौव्यरूप आहे.




**प्रश्न – उत्पाद व्यय द्रव्यांचे होतात का ?**

उत्तर - नाही. द्रव्यांत होतात. पण द्रव्यांचे नाही. जर द्रव्यांचे झाले तर असत्‌चा उत्पाद व सत्‌चा नाश होईल.

**प्रश्न – गुणपर्यायीवर कसे घटेल ?**

उत्तर - औपशमिक सम्यक्त्वाच्या उत्पादकालीच मिथ्यात्व पर्यायीचा व्यय व सम्यक्त्वगुण कायम हेच ध्रौव्य होय.

**प्रश्न – द्रव्यपर्यायीवर कसे घटेल ?**

उत्तर - देव पर्यायीच्या उत्पत्तिकालीच मनुष्य पर्यायीचा व्यय व जीव द्रव्य कायम ( ध्रौव्य )




प्रथम किलोमिटर संपतो तिथेच दुसरा किलोमीटर सुरु होतो. म्हणजेच प्रथम किलोमिटरचा अभाव तोच दुसऱ्या किलोमिटरचा उत्पाद असतो.

**प्रश्न – पर्याय किती प्रकारच्या आहेत ?**

उत्तर - दोन ( १ ) व्यंजन पर्याय ( द्रव्य पर्याय ) व ( २ ) अर्थपर्याय ( गुणपर्याय ( ह्या प्रत्येकीचे स्वभाव व विभाव उसे दोन भेद होतात.

**प्रश्न – स्वभाव द्रव्य पर्याय कशास म्हणतात ?**

उत्तर - परलक्ष्यावाचून होणाऱ्या द्रव्याच्या आकारास स्वभाव द्रव्य पर्याय म्हणतात.

**प्रश्न – विभाव द्रव्य पर्याय कशास म्हणतात ?**

उत्तर - परलक्ष्ये केल्याने होणाऱ्या द्रव्यांच्या आकारास विभाव द्रव्य पर्याय म्हणतात.

**प्रश्न – स्वभाव गुण पर्याय कशास म्हणतात ?**

उत्तर - परलक्ष्यावाचून होणारी षट्स्थान पतित हानीवृद्धी रूपाने होणारी पर्याय स्वभाव गुणपर्याय होय.

**प्रश्न – विभावगुणपर्याय कशास म्हणतात ?**

उत्तर - पराचे लक्ष्य करून होणारा षट्स्थान पतित हानीवृद्धी रूपाने होणारा गुण पर्याय विभाव गुणपर्याय होय. हा देखील स्वत: तूनच होतो. पराने नाही.

सर्व द्रव्यांच्या होणाऱ्या चार प्रकारच्या पर्यायी दाखविणारा नकाशा

| नं. | द्रव्य | स्वभाव गुणपर्याय | विभाव गुणपर्याय | स्वभाव द्रव्यपर्याय | विभाव द्रव्यपर्याय |
|---|---|---|---|---|---|
| १ | जीवद्रव्य | केवल ज्ञान दर्शनादि | राग द्वेष मोहादि | सिद्ध पर्याय | नरनारकादि चारपर्यायी |
| २ | पुद्गल द्रव्य | शुद्ध परमाणू मधील स्पर्शादिकांची पर्याय | स्कंधामधील होणारी स्पर्शादिगणाची पर्याय | परमाणूचा आकार | स्कंधाचा नानाविध आकार |
| ३ | धर्मद्रव्य पर्याय | गतिहेतुत्वा दि गुणांची | नाही शुद्ध पर्याय | असंख्यातप्रदेशी | नाही |
| ४ | अधर्म द्रव्य गुणांची पर्याय | स्थिति हेतुत्वादि | नाही | असंख्यातप्रदेशी लोकप्रमाण शुद्ध पर्याय | नाही |
| ५ | आकाश द्रव्य गुणांची पर्याय | अवाहनहेतुत्वादि | नाही | अनंत शुद्ध प्रदेशी पर्याय | नाही |
| ६ | कालद्रव्य | वर्तनाहेतुत्वा दि गुणांची स्वभाव पर्याय | नाही | एकप्रदेशी पर्याय | नाही |

**प्रश्न – अनुजीवी गुण कशास म्हणतात ?**

उत्तर - भावस्वरूपी ( अस्तिस्वरूपी ) गुणास अनुजीवी गुण म्हणतात.

**प्रश्न – प्रतिजीवी गुण कशास म्हणतात ?**

उत्तर - अभाव स्वरूपी ( नास्तिरुपात कथन होणाऱ्या ) गुणास प्रतिजीवी गुण म्हणतात.

जीवाच्या अनुजीवी चेतना गुणाचे स्वरूप

**प्रश्न – चेतना कशास म्हणतात ?**

## जीवाच्या अनुजीवी चेतना गुणाचे स्वरूप

**प्रश्न – चेतना कशास म्हणतात ?**

उत्तर - पदार्थाचा प्रतिभास ( चेतन ) होणे यास चेतना म्हणतात. चेतनेचे भेद दोन आहेत. ( १ ) दर्शनचेतना ( २ ) ज्ञानचेतना

**प्रश्न – दर्शन चेतना कशास म्हणतात ?**

उत्तर - वस्तूचा सामान्य रूपाने प्रतिभास होणे.

**प्रश्न – सामान्य रूपाने प्रतिभास म्हणजे काय ?**

उत्तर – भेद न करता फक्त सत्‌चा प्रतिभास होणे. हा सामान्य धर्माचा प्रतिभास नव्हे. ( त्याचा खुलासा नाना शब्दाद्वारे पुढे पहा. )

## दर्शनाचे स्वरूप

१. वस्तूचा निर्विकल्प प्रतिभास प्रकाशवृत्ती प्रकाश - ज्ञान, वृत्ति व्यापार म्हणसे - ज्ञानासाठी व्यापार

२. सत्तामात्राचा ( आहे मात्राचा ) प्रतिभास


३. अंत:श्चितप्रकाश - चेतनेने चेतनेचेच संवेदन करणे.

४. अनाकार ग्रहण - पदार्थांना पृथक् न करता ग्रहण

५. उत्तर ज्ञानाच्या उत्पत्तीला निमित्तभूत प्रयत्नविशिष्ट चेतनेचे स्वसंवेदन. पुढील भाग पान १८ वर पहा.

| नांव | स्वरूप | स्वामी | निमित्त | एकाजीवास युगपत् अस्तित्व |
|---|---|---|---|---|
| चक्षुदर्शन | चक्षुरिंद्रियांनी होणाऱ्या ज्ञाना आधी होणारा सामान्य प्रतिभास | चक्षुरिंद्रियापासून सर्व संज्ञी पंचेंद्रिय गुणस्थान १-१२ पर्यंत | चक्षुरिंद्रिय दर्शनावरणाच्या वर्तमान काळी उदयास येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावीक्षय, पुढे येणाऱ्या त्याचाच सर्वघाति स्पर्धकांचा सद्‌वस्थारूप उपशम व देशघातीचा उदय असा क्षयोपशम. | अचक्षु वा चक्षु<br>अचक्षु, चक्षु,अवधि |
| अचक्षुदर्शन | चक्षु सोडून चार इंद्रिये व मनाने होणांऱ्या ज्ञानाआधी होणारा सामान्य प्रतिभास | एकेन्द्रियापासून सर्व संज्ञी पंचेंद्रियापर्यंत गुणस्थान १-१२ पर्यंत | अचक्षुरिंद्रियावरणाच्या आता उदयास येणाऱ्या सर्वघातीस्पर्धकांचा उदयाभावीक्षय त्याचाच पुढे येणाऱ्या सर्वघातींचा सद्‌अवस्थारूप उपशम व देशघातीचा उदय असा क्षयोपशम. | १. अचक्षुदर्शन<br>२.अचक्षु चक्षु दर्शन<br>३. अचक्षु चक्षुदर्शन अवधिदर्शन |
| अवधि दर्शन | अवधिज्ञाना अगोदर होणारा सामान्य प्रतिभास | संज्ञी पंचेंद्रिय सम्यग्दृष्टी जीवच गुणस्थान ४-१२पर्यंत. मिथ्यादृष्टीस अवधि दर्शन होत नाही | अवधिदर्शनावरणाच्या आता उदयास येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावीक्षय, त्याच्याच पुढे येणाऱ्यांचा सद्‌वस्थारूप उपशम व देशघातीचा उदय असा क्षयोपशम<br>चक्षु, अचक्षु अवधि असे तीनच दर्शन | चक्षु, अचक्षु अवधि असे तीनच दर्शन |
| केवल दर्शन | केवल ज्ञानासोबतच होणारा सामान्य प्रतिभास | अरिहंत व सिध्द १३-१४ गुणस्थान व सिध्द | दर्शनावरणाचा पूर्ण क्षय | एकच केवल दर्शन |

६. प्रथम पदार्थाच्या ग्रहणाच्या ( ज्ञानाच्या ) अंतिम समयानंतर व दुसऱ्या पदार्थाच्या अग्रहणाच्या ( दर्शनाच्या ) अंतिम समयापर्यंत असणारी चेतना म्हणजे दर्शन चेतना होय.




**प्रश्न – दर्शन चेतनेचे भेद किती ?**

उत्तर - दर्शन चेतनेचे चार भेद आहे. चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधिदर्शन व केवलदर्शन ( याचा तक्ता पान १७ वर पहा. )

## ज्ञानचेतना

**प्रश्न – ज्ञानचेतना म्हणजे काय ?**

उत्तर – साकार प्रतिभास, ( पदार्थांना पृथक पृथक करून प्रतिभास ) सविकल्प प्रतिभास म्हणजे ज्ञान चेतना होय.

**प्रश्न – ज्ञान चेतनेचे भेद किती ?**

उत्तर – पांच ( १ ) मतिज्ञान ( २ ) श्रुतज्ञान ( ३ ) अवधिज्ञान ( ४ ) मन:पर्ययज्ञान ( ५ ) केवलज्ञान

**प्रश्न – मतिज्ञान कशास म्हणतात ?**

उत्तर – पाच इंद्रिये व मनाचे निमित्त असताना होणारे ज्ञान म्हणजे मतिज्ञान होय. त्याचे भेद चार ( १ )अवग्रह ( २ ) ईहा ( ३ ) अवाय ( ४ ) धारणा व उत्तर भेद ३३६ ( त्याचा खुलासा नकाशात पहा. )

| व्यंजनाव-ग्रहाचे स्वरूप | अर्थावग्रहाचे स्वरूप | ईहाचे स्वरूप | अवायाचे स्वरूप | धारणाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| अव्यक्त पदार्थाचा अवग्रह<br><br>अस्पष्ट काही तरी आहे | दर्शनानंतर होणारे प्रथम ज्ञान ( व्यक्त पदार्थाचे ).<br><br>ग्रहण, उदा. काहीतरी आहे | अवग्रहाने जाणलेल्या पदार्था बाबत अधिक जाणण्याची इच्छा<br><br>उदा. बगळा असावा | निश्चित निर्णायक ज्ञान<br><br>उदा. बगळा आहे | कालांतरानेही स्मरणात राहणे<br><br>उदा. दहा वर्षांनीपण स्मरण राहणे |
| अवग्रहादि चारपैकी किती होतात ? | अवग्रहादि चारपैकी किती ? | अवग्रहादि चारपैकी किती ? | अवग्रहादि चारपैकी किती ? | अवग्रहादि चारपैकी किती ? |
| १<br>फक्तअवग्रहच<br>१ | १- २- ३- ४<br>↓ ↓ ↓ ↓<br>अ. (अ. ई.) (अ. ई. आ.)<br>४ अ. ई. आ. धा. | २-३-४<br><br>४ | ३+४<br><br>४ | ४ च<br><br>४ |
| किती इंद्रियांनी होतो | किती इंद्रियांनी होतो | किती इंद्रियांनी होतो | किती इंद्रियांनी होतो | किती इंद्रियांनी होतो |
| चक्षु व मनसोडून ४ इंद्रियांनी होतो<br>४ | सदा इंद्रियांनी<br><br>होतो<br>६ | सदा इंद्रियांनी<br><br>होतो<br>६ | सदा इंद्रियांनी<br><br>होतो<br>६ | सदा इंद्रियांनी<br><br>होतो<br>६ |
| किती पदार्थांचा होतो | किती पदार्थांचा होतो | किती पदार्थांचा होतो | किती पदार्थांचा होतो | किती पदार्थांचा होतो |
| १२ | १२ | १२ | १२ | १२ |
| एकूण भेद<br><br>४८ | एकूण भेद<br><br>+७२ | एकूण भेद<br><br>+७२ | एकूण भेद<br><br>+७२ | एकूण भेद<br><br>+७२=३३६ |

**प्रश्न – अवग्रहाची परिभाषा काय ?**

उत्तर - इंद्रिय व पदार्थ आपआपल्या योग्य मर्यादेत असतांना सामान्य प्रतिभासरूप दर्शन होते व त्या नंतरचे प्रथम ज्ञान म्हणजे अवग्रह होय.

## मतिज्ञानाचा अधिक खुलासा

✻ मतिज्ञान प्रमाणात्मकच आहे. त्यामुळे फक्त गुण वा पर्यायीस जाणू शकत नाही. तर गुणयुक्त पदार्थाचे ज्ञान करू शकते. कारण प्रमाणाचा विषय अंश असत नाही. ( भेद ) पूर्ण वस्तू असते.

✻ ह्या अवग्रहादि सर्व मतिज्ञानाच्याच पयायी आहेत. कारण त्याकाली मतिज्ञानावरणाचाच क्षयोपशम असतो.

**प्रश्न – मतिज्ञानावरणाचा क्षयोपशम कसा असतो ?**

उत्तर - आता उदयास येणाऱ्या मतिज्ञानावरणाच्या सर्व घाती स्पर्धकांचा उदयाभावि क्षय, त्याचाच पुढे येणाऱ्यांचा सद्वस्थारूप उपशम व त्यांच्याच देशघातिंचा उदय अशा क्षयोपशमाचे निमित्त मतिज्ञानात असते. ( क्षयोपशमाचाखुलासा दुसऱ्या अध्यायाच्या ७२ पान वर पहा )

✻ इंद्रियांचा विषय पदार्थच होतो. पण मनाचा विषय व अंशही होतो.

✻ स्पर्शनेंद्रिय स्पर्शगुणास जाणते असे वाटले तरी ते स्पर्श युक्त पदार्थाचेच ज्ञान करते.

✻प्रत्येक इंद्रियाच्या विषयांची व इंद्रियांची मर्यादा वेगळी आहे.

✻ चक्षु व मनाचा विषय अप्राप्यच असतो. उदा. डोळ्यात घातलेले काजळ डोळ्याचा विषय होत नाही.

✻ स्पर्शाचे, रसाचे, गंधाचे व शब्दाचे परमाणू त्या त्या इंद्रियांना प्राप्य असतात. उदा. सुगंधाचे परमाणू घ्राणेंद्रियावर प्राप्य होतात तेव्हा ज्ञान होते.

## १२ प्रकारच्या पदार्थाचे स्वरूप

| नांव | अर्थ | स्वरूप |
|---|---|---|
| १. बहु | पुष्पळ वस्तू | एकाजातीचे पुष्कळ गहु-ज्ञान |
| २. एक | एकच वस्तू | एकच गहु - ज्ञान |
| ३. क्षिप्र | जलद वस्तू | धावणाऱ्या गाडीचे - ज्ञान |
| ४. अनिसृत | पूर्ण उघड नसणारी | पाण्यात अर्धवट बुडालेली घागर-ज्ञान |
| ५. उक्त | सांगितलेल्या वस्तूंचे | सांगितल्यावर क्रोधाचे - ज्ञान |
| ६. ध्रुव | निरंतर असणारी वस्तू | नित्यत्त्वाचे ग्रहण - ज्ञान |
| ७. अध्रुव | कधी कधी असणारी वस्तू | कधी कधी ग्रहण - ज्ञान |
| ८. अनुक्त | न कथन केलेली वस्तू | न बोलता क्रोधाचे - ज्ञान |
| ९. निसृत | पूर्ण उघड वस्तू | पूर्ण उघड घागरीचे - ज्ञान |
| १०. अक्षिप्र | हळू अशीघ्र | पॅसेंजरचे - ज्ञान |
| ११. बहुविध | नाना प्रकारचे | अनेक जातीचे गहू - ज्ञान |
| १२. एकविध | एका प्रकारचे | एका जातीचे गहू - ज्ञान |

## श्रुतज्ञानाचे स्वरूप

* मतिज्ञानाने जाणलेल्या पदार्थाचे विशेष ज्ञान म्हणजे श्रुतज्ञान होय. हे संज्ञींना मन:पूर्वकच होते व असंज्ञींना त्या त्या इंद्रियांनी होते. व ते कुश्रुतज्ञानच असते.

* हे मतिपूर्वक होते तरी त्यापासून पृथकच आहे. कारण ह्यासाठी क्षयोपशम श्रुतज्ञानावरणाचाच असतो.

* सम्यक्त्वासोबत सम्यक्ज्ञान होते. तेव्हाही श्रुतज्ञानाची उत्पत्ती मतिपूर्वकच होते. सम्यक्त्व यामध्ये समीचीनता आणण्याचे निमित्त असते. उत्पत्तीचे नाही.

* हे ज्ञान प्रमाणात्मक व नयात्मक दोन्ही प्रकारचे असते.

* हे ज्ञान स्वार्थ ( ज्ञानात्मक ) व परार्थरूप ( वचनात्मक ) असते.

**प्रश्न – ह्या ज्ञानाचे निमित्त काय ?**

उत्तर - आता उदयास येणाऱ्या श्रुतज्ञानावरणाच्या सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावीक्षय, त्याच्याच पुढे येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांचा उपशम व त्याच्याच देशघातीचा उदय.

**प्रश्न – ह्या ज्ञानाचे भेद किती ?**

उत्तर - मूळ दोन भेद अंग बाह्य व अंगप्रविष्ट. त्यात अंग प्रविष्टाचे बारा भेद आहेत.

* अकरा अंगाची नावे १ आचारांग २ सूत्रकृतांग ३ स्थानांग ४ समवायांग ५ व्याख्याप्रज्ञप्तीअंग ६ ज्ञातृधर्मकथांग ७ उपासकाध्ययनांग ८ अंतकृतदशांग ९ अनुत्तरोपपादिकदशांग १० प्रश्नव्याकरणांग ११ विपाकसूत्रांग १२ दृष्टिवादांग. त्याचे भेद - सूत्र, परिकर्म, प्रथमानुयोग, चूलिका, पूर्व

* चौदा पूर्वोंची नावे - उत्पादपूर्व, आग्रायणी, वीर्यानुवाद, अस्तिनास्तिप्रवाद, ज्ञानप्रवाद, सत्यप्रवाद, आत्मप्रवाद, कर्मप्रवाद, प्रत्याख्याननामधेय, विद्यानुवाद, कल्याणनामधेय, लोकबिंदुसार, प्राणावाय, क्रियाविशाल

## श्रुतज्ञानाचे स्वामी

* **सामान्य श्रुतज्ञानाचा स्वामी –** संज्ञी पंचेद्रिय सम्यक्‌दृष्टि जीव ४ अने १२ गुणस्थान

पूर्णश्रुतज्ञानाचा स्वामी - ११ अंग व १४ पूर्वाचेधारी मुनीच- ६ ते १२ गुणस्थान

**जघन्यश्रुतकेवली –** आठप्रवचनमातृकाचा धारी ( पाच महाव्रत व तीन गुप्ती = ८ ) हे ६ ते १२ गुणस्थानवर्ती मुनीच असतात.

## अवधिज्ञानाचे स्वरूप

* जे द्रव्य क्षेत्र काल भावांच्या मर्यादेत रूपी पदार्थास आत्मिकशक्ति ने स्पष्ट जाणते त्यास अवधिज्ञान म्हणतात.

**प्रश्न – द्रव्यादिंची मर्यादा म्हणजे काय ?**

उत्तर - द्रव्य - रूपीच द्रव्यांना, क्षेत्र किती योजनेपर्यंतचे, काल किती भवांचे, भाव - ५ भावांपैकी कोणत्या भावांना जाणते.

**प्रश्न – ह्या ज्ञानाचे भेद किती ?**

उत्तर - ह्या ज्ञानाचे भेद दोन भवप्रत्यय व गुणप्रत्यय, गुणप्रत्ययाचे भेद सहा वा तीन देशावधि, सर्वावधि, परमावधि.

| भवप्रत्यय | गुणप्रत्यय | स्वामी | निमित्त |
|---|---|---|---|
| भवनिमित्तक अवधि ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम होतो. म्हणून भवप्रत्यय म्हणातात. इथे पण क्षयोपशम असतोच. | क्षयोपशम निमित्तक अवधिज्ञाना-वरणाच्या क्षयोपशमाने ज्ञान प्राप्त होतो. भेद ६ - १. अनुगामी २. अननुगामी ३. वर्धमान ४. हीयमान ५. अवस्थित ६. अनवस्थित १. देशावधि २. परमावधि ३. सर्वावधि | भवप्रत्ययाचे स्वामी देव, नारकी व तीर्थकर. देशावधीचे स्वामी विशेष साधना करणारे मनुष्य व तिर्यच. परमावधि व सर्वावधीचे स्वामी मोक्षगामी मुनीच. | १. आता उदयास येणाऱ्या सर्व घातिस्पर्धकांचा उदयाभावी-क्षय, त्यांच्याच पुढे येणाऱ्या सर्वघाति-स्पर्धकांचा उपशम व त्यांच्याच देशघातिचा उदय व २. मिथ्यात्वाचा अनुदय ३. शरिरातील विशिष्ट चिन्ह |

* **अनुगामी –** दुसऱ्या क्षेत्रात किंवा भवात सोबत जाणारे ज्ञान.
* **अननुगामी –** भवाबरोबरच संपणारे ज्ञान.
* **वर्धमान –** झाल्यापासून सतत वाढणारे ज्ञान.
* **हीयमान –** झाल्यापासून सतत कमी होणारे ज्ञान.
* **अवस्थित –** जेवढे उत्पन्न झाले तेवढेच राहणारे ज्ञान.
* **अनवस्थित –** झाल्यापासून कमी जास्त होणारे ज्ञान

## मन: पर्ययज्ञानाचे स्वरूप

**प्रश्न – मन: पर्ययज्ञान कशास म्हणतात ?**

उत्तर - द्रव्य क्षेत्र काल भाव ह्यांच्या मर्यादेत दुसऱ्यांच्या मनातील रूपी विचारांना आत्मिकशक्तीने स्पष्ट जाणते त्यास मन: पर्यय ज्ञान म्हणतात.

| नांव | स्वरूप | निमित्त | स्वामी |
|---|---|---|---|
| ऋजुमति मन:पर्यय ज्ञान विषय - सूक्ष्म | जे ज्ञान स्वत: च्या व दुसऱ्याच्या मनातील रूपी सरळ विचारांना आत्मीक शक्तीने स्पष्ट जाणते ते ऋतुमतिमन:पर्यय ज्ञान होय | मन:पर्ययज्ञानावरणाच्या आता उदयास येणाऱ्या सर्व घाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, त्याच्याच पुढे येणाऱ्यांचा सद्वस्थारूप उपशम व त्याच्याच देशघातीचा उदय अशा कर्माचा क्षयोपशम. | मुनीचे हे ज्ञान प्रतिपाति व कमी विशुध्द मुनीनाच असते. प्रतिपाति- मोक्षास न जाता खाली पडणारे. |
| विपुल- मति मन:- पर्यय ज्ञान | जे ज्ञान स्व व पराच्या मनातील सरळ व वक्र विचारांना आत्मिक शक्तीने स्पष्ट जाणते ते विपुलमति मन:पर्यॆय ज्ञान होय | वरील प्रमाणे क्षयोपशमच निमित्त असते विषय- सूक्ष्मतर पदार्थ. इथे मन ज्ञेयाचे आधार आहे. साधन नाही. | चरमशरीरी मुनींनाच अप्रतिपाति व विशुध्द असते. केवल ज्ञान होईपर्यंत नष्ट न होणारे |

## केवलज्ञानाचे स्वरूप

**प्रश्न – केवलज्ञान कशास म्हणतात ?**

उत्तर - जे ज्ञान अनंतानंत जीव, त्यांच्या अनंतपट पुद्गल, एक धर्मद्रव्य, एकअधर्म द्रव्य, एक आकाश व असंख्यात काल येवढया सर्व द्रव्यांना व प्रत्येकाच्या भूतकालीन अनंत, एक वर्तमान व अनंतानंत भविष्य पर्यायींना युगपत् आत्मिक शक्तीने स्पष्ट जाणते ते केवलज्ञान होय.

**प्रश्न – ह्याचे निमित्त काय ?**

उत्तर - संपूर्ण ज्ञानावरणाचा क्षय कर्मरूप अवस्थेचा अभाव. वस्तुत: ही स्वभाव पर्याय असल्यामुळे पर निमित्त असत नाहीं.

**प्रश्न – केवल शब्दाचा अर्थ काय होतो ?**

उत्तर - केवल = फक्त जाणणे ( इष्टानिष्ट कल्पने विना )
केवल = असहाय्य ( परनिरपेक्ष )
केवल = फक्त आत्म्यासच जाणणे ( परज्ञेय ज्ञानात येतात पण त्यांच्याशी तन्मय न होणे )

**प्रश्न – केवलज्ञानानी जाणल्या म्हणून पर्यायी क्रमनियत आहेत का ?**

उत्तर - वस्तूंच्या पर्यायीच क्रमनियत आहेत म्हणून तशाच केवलज्ञानात ज्ञान होतात. ज्ञानामुळे पर्यायीक्रमनियत नाही.

जर पर्यायी क्रमनियत नसतील तर केवलज्ञानाचीच सिध्दी होत नाही. प्रत्येक समयी होणाऱ्या केवलज्ञान पर्यायातील ज्ञेय ↙

---

अनंतानंत जीव, त्यांच्या अनंतपट पुदगल, एक धर्म, एक अधर्म, एक आकाश व असंख्यात कालद्रव्य, त्यांच्या प्रत्येकाच्या तिन्ही कालीन अनंतानंत गुणांना जाणणारी एक केवलज्ञान पर्याय होय.

---

* निश्चयाने केवलज्ञान स्वत:च्या ज्ञान पर्यायीलाच जाणते म्हणून आत्मज्ञ व ती एक ज्ञानपर्याय सर्व ज्ञेयांना घेऊन आहे म्हणून व्यवहाराने

सर्वज्ञ आहे. सर्वज्ञता व्यवहाराने आहे. त्याचा अर्थ पराची ( परज्ञेयाची ) अपेक्षा आली एवढाच आहे. सर्वज्ञता वास्तविक आहे.


## सम्यक्त्व गुणाचे वर्णन

**प्रश्न – सम्यक्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - शुध्द आत्म्याचा प्रतिभास ( प्रतीति ) होणे, निश्चय सम्यक्दर्शन होय. सात तत्त्वांची, खऱ्या देव शास्त्र व गुरुंची समीचीन श्रध्दा असणे, पंचेद्रियांच्या विषयांची अभिलाषा नसणे यास व्यवहार सम्यक्दर्शन म्हणतात.

**प्रश्न – जिथे व्यवहार सम्यक्दर्शन आहे तिथे निश्चय असेल का ?**

उत्तर - जिथे व्यवहार सम्यक्दर्शन आहे तिथे निश्चयाचा नियम नाही. पण जिथे निश्चयसम्यक्त्व आहे तिथे ( सराग भूमिकेपर्यंत ) व्यवहार सम्यक्त्व असेलच.




✻ गरमपाकातही साखर आपला मधुर स्वभाव सोडत नाही. तद्वत् संसारदशेतही आत्मा आपला ज्ञायकभाव सोडत नाही.

**प्रश्न –मग तो आम्हाला अनुभवास का येत नाही ?**

उत्तर - आमची दृष्टि मिथ्यात्वाने अंध झाल्यामुळे तो दृष्टीत येत नाही. ज्ञानीला तो दृष्टित येतो.

उदा. - सोने व तांबे एकत्र असतानाही ते एकरूप होतच नाहीत. भिन्नच असते म्हणून सुवर्णकारास दिसते. कारण ती भेदाची दृष्टि त्यास आहे.

✻ जैनांच्या मूर्ती अखंड दगडात छाटून कोरल्या जातात तसा शुध्दआत्मा स्वतंत्र ( परा पासून भेद करूनच ) दिसतो.

* सम्यक्दर्शन आत्म्याचा स्वभाव पर्याय आहे.

## सात तत्त्वांचे स्वरूप


* तत् = तो, ती, ते, त्व = स्वभाव, अर्थ = पदार्थ, आपल्या आपल्या स्वभावाने युक्त पदार्थ म्हणजे तत्त्वार्थ होय.

**प्रश्न –तत्त्वे किती आहेत व त्यांची नावे कोणती ?**

उत्तर - तत्त्वे सात आहेत. जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष.

**प्रश्न – जीव तत्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्ञायकस्वरूपी शुध्द आत्मा जीव तत्त्व होय. हा सर्व ( संसारी व मुक्त ) जीवा जवळ असतोच




**प्रश्न – जीव द्रव्य व जीव तत्त्वामध्ये काय अंतर आहे ?**


उत्तर - जीव द्रव्य शुध्द अशुध्द सर्व पर्यायामधे व्यापक आहे. व जीव तत्त्व सर्व विकार, पर्याय भेद ज्यामध्ये गौण आहेत ते जीव तत्त्व होय.

**प्रश्न – अजीव तत्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्यामध्ये चैतन्य नाही. जड आहे ते अजीव तत्त्व होय.

**प्रश्न – तत्त्वांचा हाच क्रम कां ?**

उत्तर - मोक्षमार्गाचे कथन जीवासच अनुसरून आहे, म्हणून प्रथम जीव तत्त्व, विरोधी तत्त्व म्हणून नंतर अजीव तत्त्व. ही दोन मूळ तत्त्वे आहेत. बाकी पांच संयोगी तत्त्वे आहेत. अंतिम साध्य मोक्ष आहे म्हणून शेवटी ठेवले. त्याचे साधन संवर निर्जरा म्हणून त्यापूर्वी सांगितले. आस्रव व बंध संसाराची कारणे आहेत म्हणून त्यापूर्वी निर्देश केला आहे.




**प्रश्न – पुण्य पाप भावांचा तत्त्वामध्ये निर्देश का केला नाही ?**
उत्तर - त्यांचा समावेश आस्रव बंध तत्त्वातच होतो.

**प्रश्न – जीवाच्या विकारी भावांना अजीव तत्त्व का सांगितले ?**
उत्तर - विकारी भावांची व्याप्ती ( बाह्य अविनाभाव ) पुद्गलाशीच ( कर्माशी ) असते.

✻ जिथे रागद्वेष आहे तिथे कर्मोदय आहे.

✻ जिथे कर्मोदय आहे तिथे रागद्वेष आहे.


✻ रागद्वेषाचे कारणही व कार्यही पुद्गल ( अजीव ) कर्म आहे.

✻ कर्माचा उदय कारण-रागादि कार्य - रागादिक कारण व कर्मबंध कार्य.

✻ चिदाभास असूनही ते एकनिष्ठ अजीवाशी आहेत म्हणून अजीव म्हटले आहे अजीवाची पर्याय आहे म्हणून नाही.

## आस्त्रव तत्त्व

**प्रश्न – आस्त्रव तत्त्व कशास म्हणतात ?**




उत्तर - जीवाचे रागद्वेषरूप परिणामाचे निमित्त असतांना कार्माण वर्गणा कर्मरूप होणे यास आस्त्रव तत्त्व म्हणतात.

✻ **आस्त्रव तत्त्वाचे भेद दोन –** ( १ ) भावास्त्रव ( २ ) द्रव्यास्त्रव म्हणतात.

✻ **द्रव्यास्त्रव –** कार्माण वर्गणेच्या कर्मरूप परिणमनास द्रव्यास्त्रव म्हणतात.

✻ **भावास्त्रव –** जीवाचे रागादिक विकारीभाव, व्यभिचारीभाव, आगंतुक भावास ( पाहुणे ) भावास्त्रव म्हणतात.

**प्रश्न – भावास्त्रवाचे भेद किती ?**

उत्तर - भावास्त्रवाचे भेद पाच ( १ ) मिथ्यात्व ( २ ) अविरति ( ३ ) प्रमाद ( ४ ) कषाय ( ५ ) योग

**प्रश्न – मिथ्यात्व कशास म्हणतात ?**

उत्तर - शुध्द आत्म्याचा प्रतिभाव न होणे. खोट्या देव शास्त्र गुरुंची भक्ति व सात तत्त्वांची असमीचीन श्रध्दा ह्यास मिथ्यात्व म्हणतात.

**प्रश्न – मिथ्यात्वाचे भेद किती ?**

उत्तर - भेद पाच आहेत. ( १ ) एकांत ( २ ) वितरीत ( ३ ) संशय ( ४ ) विनय ( ५ ) अज्ञान

✻ **एकांत मिथ्यात्व –** वस्तुअनेकांतात्मक ( परस्परविरोधी धर्मात्मक ) असताना एकच धर्ममय मानणे.

✻ **विपरीत मिथ्यात्व –** वस्तु जशी आहे तशी न मानता मिथ्या मानणे. भेद - तीन स्वरूपविपर्यासादि

✻ **स्वरूपविपर्यास –** वस्तूच्या स्वरूपाबाबत विपरीत मान्यता उदा. जीवाचे स्वरूप ( स्वभाव ) रागादिक मानणे.

✻ **कारणविपर्यास –** कारणाबाबत विपरीत मान्यता.
उदा. सुखाचा ( भावांचा ) अभाव असणाऱ्या अजीवास सुखाचे दु:खाचे कारण मानणे, परद्रव्यास ( जीवास ) सुखादीचे कारण, वा शुभभावास मुक्तीचे कारण मानणे.

✻ **भेदाभेद विपर्यास –** भेदांत अभेद वा अभेदांत भेद करणे.
उदा. रागादिकांना शुध्द आत्म्यापासून अभिन्नच मानणे

✻ **संशय मिथ्यात्व –** दोन्ही कोटीचे ज्ञान असणे. पण निश्चिती नसणे उदा. जिनागम से सांगते ते सत्य की, विज्ञान सांगते ते सत्य.

✻ **विनय मिथ्यात्व –** खऱ्याखोट्यांचा समान विनय करणे.
उदा. खोट्या देव, शास्त्र, गुरुचा व खऱ्या देव, शास्त्र, गुरुचा समान विनय करणे.

✻ **अज्ञान मिथ्यात्व –** बुध्दि असताना कळत नाही म्हणणे ( अज्ञानाचे पांघरून घेणे )
उदा. आपल्याला काहीही कळत नाही. पूर्वज जे करीत आले ते करतो असे म्हणणे.

**प्रश्न – गृहीत मिथ्यात्व कशास म्हणतात ?**

उत्तर - खोट्या देव, शास्त्र, गुरु निमित्तक वा मंत्रतंत्र आदि निमित्तक मिथ्या मान्यता म्हणजे गृहीत मिथ्यात्व होय.
उदा. भगवंताची उपासना सांसारिक सुखासाठी करणे, निमित्ताने बदल घडतो मानणे, मंत्रादिकावर विश्वास असणे, पर्यायाचा ( बदलासाठी ) देव देवतांची आराधना करणे हे गृहीत मिथ्यात्व होय.

**प्रश्न – अगृहीत मिथ्यात्व कशास म्हणतात ?**

उत्तर – केवळ कर्मोदय निमित्तक होणारे मिथ्यात्व. बाकी परद्रव्यांचे निमित्त असत नाही. सात तत्त्वांमध्ये विपरीत मान्यता असणे.

**प्रश्न – मिथ्यादृष्टीच्या जीवनात विपरीत मान्यता कशी असते ?**

उत्तर – परास ( स्व ) मानणारा, पराचे कर्तृत्व, भोक्तृत्व स्वीकारणारा

व परामध्ये एकत्व करणारा.

## आस्त्रवाचे दुसरे कारण - अविरतीचे स्वरूप

**प्रश्न – अविरती कशास म्हणतात ?**

उत्तर - गुरुसाक्षी पूर्वक व्रत न घेणे वा पापांचा त्याग करणाचा भाव न होणे. भेद- बारा

* **षट्कायिक –** ( ५ स्थावर + १ त्रस = ६ ) जीवांची हिंसा करणे व पाच इंद्रिय व मन ( ५ इं. + १ म. = ६ ) = १२, ताब्यात नसणे.

* दुसऱ्या प्रकारे कथन →अविरती - १२

अनंतानुबंधि कषायोदयोजनित अविरती = ४ - १ ते २ गुणस्थानापर्यंत.

अप्रत्याख्यान कषयोदयोजनित अविरती = ४ - १ ते ४ गुणस्थानापर्यंत.

प्रत्याख्यान कषायोदयोजनित अविरती = ४ - १ ते ५ गुणस्थानापर्यंत.

## प्रमादाचे स्वरूप - आस्त्रवाचे तिसरे कारण

**प्रश्न – प्रमाद कशास म्हणतात ?**

उत्तर - धर्मकार्यात अनुत्साह, असावधानता, आत्मस्वरूपात न राहणे यास प्रमाद म्हणतात.

भेद - १५ - १ राजकथा २ भोजनकथा ३ चोरकथा, ४ स्त्री कथा ह्या ४ विकथा, ४ कषाय, ५ इंद्रिये स्नेह आणि निद्रा = १५ भेद.

## कषायाचे स्वरूप आस्त्रवाचे चवथे कारण

**प्रश्न – कषाय कशास म्हणतात ?**

उत्तर -आत्मस्वभावाचा घात करणारे विकारी भाव किंवा आत्म्याशिवाय भिन्न पदार्थावर आसक्ती किंवा मोह करणे यास कषाय म्हणतात. भेद - २५

१. अनंतानुबंधी क्रोध मान माया लोभ→स्वरूपाचरण चारित्राचे घातक

२. अप्रत्याख्यानावरण क्रोध मान माया लोभ →देशचारित्राचे घातक

३. प्रत्याख्यानावरण क्रोध मान माया लोभ →सकलचारित्राचे घातक

४. संज्वलन क्रोध मान माया लोभ →यथाख्यात चारित्राचे घातक

५. नोकषाय - हास्य, शोक, रति, अरति, भय, जुगुप्सा व तीन वेद

## - आस्रवाचे पाचवे कारण योगाचे स्वरूप -

**प्रश्न – योग कशास म्हणतात ?**

उत्तर - मन वचन कायेच्या निमित्ताने आत्मप्रदेशांचे परिस्पंदन ( हलन चलन ) होणे ह्यास योग म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| योगाचे मूळ भेद तीन- | मनोयोग- | वचन योग- | व काययोग |
| योगाचे उत्तर भेद पंधरा | ४ | ४ | ७ |

मनोयोगाचे चारभेद - ✻ सत्य मनोयोग ✻ असत्य मनोयोग ✻ उभय मनोयोग ✻ अनुभय मनोयोग

वचन योगाचे चार भेद - ✻ सत्य वचन योग ✻ असत्य वचन योग ✻उभय वचन योग ✻ अनुभय वचन योग

काय योगाचे सात भेद - ✻ औदारिक काययोग ✻ औदारिक मिश्र काय योग ✻ वैक्रियिक काययोग ✻ वैक्रियिक मिश्र काययोग ✻ आहारक काययोग ✻ आहारक मिश्र काययोग ✻ कार्माण काययोग.

**प्रश्न – औदारिक काययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - औदारिक शरिराची शरीर पर्याप्ती पूर्ण झाल्यावर असणारा काययोग.

**प्रश्न – औदारिक मिश्रकाययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - विग्रहगतीत कार्माण काययोगच होता व जेव्हा औदारिकास सुरुवात झाली तेव्हा कार्माण व औदारिक मिळून औदारिक मिश्र काययोग असतो.

**प्रश्न – वैक्रियिक काययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - वैक्रियिक शरीराची शरीर पर्याप्ती पूर्ण झाल्यापासून पूर्ण त्या भवापर्यंत जो काययोग असतो. तो वैक्रियिक काययोग होय.

**प्रश्न – वैक्रियिकमिश्र काययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - विग्रहगतीत कार्माण काययोग होताच व जेव्हा वैक्रियिक

( शरीरास ) सुरुवात झाली तेव्हा दोन मिळून ( कार्माण व वैक्रियिक ) वैक्रियिकमिश्र काययोग असतो.


**प्रश्न – आहारक काययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - आहारक शरिराची शरीरपर्याप्ती पूर्ण झाली असता जो योग असतो तो आहारक काययोग होय.

**प्रश्न – आहारक मिश्र काययोग कशास म्हणतात ?**

उत्तर - मुनींचे औदारिक शरीर होतेच व जेव्हा आहारक शरिरास सुरूवात झाली तेव्हा दोन मिळून ( औदारिक व आहारक ) जो योग तो आहारकमिश्र काययोग होय. इथे विग्रहगतीत असणारा कार्माण काययोग असत नाही. कारण मरण नसते म्हणून कार्माण व आहारक असा मिश्र नाही.

**प्रश्न – कार्माण काययोग कशास म्हणतात ?**




उत्तर - जेव्हा औदारिकादि तीन शरिरामुळे आत्मप्रदेशांचे परिस्पंदन न होता कार्माण शरीर निमित्तकच परिस्पंद होतो तो कार्माण काययोग होय.

**प्रश्न – आत्मप्रदेशाचे परिस्पंदन होताना प्रदेश आपली जागा सोडतो का ?**

उत्तर - परिस्पंदनकाली आत्मप्रदेश आपली जागा सोडत नाहीत लोकाकाशाची जागा बदलते ( प्रवचनसारच्या दुसऱ्या अध्यायात आचार्यांनी ९९ व्या गाथेत सांगितले आहे की, ' स्वस्वस्थानेषु ' ) प्रदेश आपले स्थान सोडत नाहीत.


उदा. गाडीचे चाक फिरते तेव्हाही चाकाच्या आऱ्यांनी स्वत:ची जागा सोडली नाही. ती जर सुटेल तर चाक राहत नाही. तसे प्रदेश जर आपली जागा सोडतील तर द्रव्याची एकता राहणार नाही. त्यासाठी

वर चाकाचा दृष्टांत दाखविला आहे.

## बंधतत्त्वाचे स्वरूप

**प्रश्न – बंधतत्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - जीवाचे रागद्वेष मोहरूप परिणाम असतांना कार्माणवर्गणां कर्मरूप बनुन आत्मप्रदेश व कर्मप्रदेशाचा परस्परावगाह संबंध म्हणजे बंध होय. ( **नकाशाचा खुलासा –** प्रथम गोलांत अशुभ भाव आहेत. दुसऱ्या गोलांत शुभ भाव आहेत. व तिसऱ्या गोलांत आठ कर्मे दाखविली आहेत यावरून शुभ अशुभ पुण्य व पापभाव दोन्ही आस्त्रव बंधच तत्त्वे आहेत. त्यानिमित्तक आस्त्रवीत होणारी कार्माणवर्गणेचे ८ कर्मरूप परिणमन हे द्रव्यास्त्रव आहेत.




✻ बंधाचे भेद दोन - भावबंध व द्रव्यबंध

## भावबंध

✻ आत्म्याच्या ज्ञानस्वभाव व रागादिकामध्ये एकत्व करणे.

✻ परामध्ये संबंध जोडणे व विकारांत आत्मत्वाची बुध्दि.

✻ अटकने - रागांत राग, प्रीति करणे ( विकारांना स्वभाव मानणे )

✻ जीवाचे रागादिक विकार भाव हे सर्व भावबंध होत. वास्तविक जीवास बंधन स्वत: च्याच विकारी भावांचे आहे.

## द्रव्य बंध

✻ पूर्वबध्दकर्मांशी नवीन कर्म संश्लेषरूपात बध्द होणे.
उदा. गाईला बांधतांना दोरीची गाठ दोरीशीच असते..

## उभय बंध

कर्मांची उदयरूप अवस्था व आत्म्याचे विकारीभाव यामध्ये निमित्त नैमित्तिक संबंध म्हणजे उभयबंध होय.


✻ दोघांचीही स्वभाव च्युति म्हणजे उभयबंध होय.

**प्रश्न – निमित्त नैमित्तिकसंबंध कशास म्हणतात ?**

उत्तर - दोन द्रव्यांच्या दोन वर्तमान विकारी पर्यायांमध्ये जो बाह्य ( दोन द्रव्यांत ) अविनाभाव ( हे असताना ते आहे, ते असताना हे आहेच. )

**प्रश्न – निमित्त नैमित्तिक संबंधामध्ये एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला उत्पन्न वा प्रभाव वा बदल करू शकते का ?**

उत्तर - ह्या संबंधाने परस्परात काहीच न करता ते परस्पराचे फक्त ज्ञापकच आहेत हे सिध्द केले. प्रत्येकाची पर्याय नियत असल्यामुळे असा व्यवहार ( बाह्य कारण व बाह्य कार्यात्वाचा ) होऊ शकतो.
उदा. आकाशात सूर्य स्वयं उगवतो त्याकाली सूर्यकमले स्वयं फुलतात. सूर्याने कमलास फुलविले नाही.



ह्या दोन समांतर रेषेचे दोन समान बिंदू परस्परांना जसे उत्पन्न करीत नाहीत. असतात मात्र (समकाल) तसेच निमित्ताबाबत समजावे.

## संवर तत्त्वाचे स्वरूप

**प्रश्न – संवर कशास म्हणतात ?**

उत्तर - आत्म्याचे शुध्द भाव असताना ( रत्नत्रयरूपभाव ) नवीन कर्मांचा

आस्त्रव न होणे ह्यास संवर म्हणतात. याचे - भाव संवर व द्रव्यसंवर असे दोन भेद आहेत.

**प्रश्न – भावसंवर कशास म्हणतात ?**

उत्तर - आत्म्याचा शुध्दभाव ( शुध्दआत्म्याची उपासना-भक्तिरूप ) परिणामास भाव संवर म्हणतात. हा मिथ्यात्वाच्या अभावात व रागद्वेषांच्या आंशिक अभावातच होतो. भेद- ३ गुप्ती, ५ समिती, १० धर्म, १२ अनुप्रेक्षा, ५ चारित्र, २२ परिषहजय.

**नकाशाचा खुलासा –** जेव्हा हा जीव शुध्दात्म्याची उपासना करतो ( दृष्टीत घेतो ) तेव्हा श्रध्देची पर्याय सम्यक्दर्शनरूप होते. ज्ञानाची पर्याय सम्यक् ज्ञानरूप होते व चारित्राची पर्याय सम्यक् चारित्ररूप होते. ह्या पर्यायी मिश्र म्हणजे शुध्द + अशुध्दरूप चारित्राची व ज्ञानाची पर्याय आहे. हे दर्शविण्यासाठी अर्धाभाग रंगीत व अर्धाभाग पांढराच ठेवला आहे. श्रध्देची पर्याय पूर्ण शुध्दच आहे. ( आकृती नं. ५ पहा. )

## गुप्तीचे स्वरूप व भेद

**प्रश्न – गुप्ती कशास म्हणतात ?**

उत्तर - मन वचन व कायेच्या विकल्पांना रोकणे ह्यास गुप्ती असे म्हणतात. निर्विकल्परूप आत्मानुभूती ह्या तिन्हीच्या विकल्पांना रोकण्यामुळे होते. ह्याचे कायगुप्ती, मनोगुप्ती व वचनगुप्ती असे तीन भेद आहेत. हे संवराचे मूळ कारण आहे.


## समितीचे स्वरूप व भेद

**प्रश्न – समिती कशास म्हणतात ?**

उत्तर - शुध्द आत्म्यात राहणे अशक्य होते, तेव्हा सहज घडणाऱ्या क्रिया सावधानतेपूर्वक होणे यास समिती म्हणतात. समितीचे पाच भेद आहेत.

**१. ईर्या समिती –** पुढील चार हात जमीन पाहून चालणे.

# संवर निर्जरेसाठी नकाशा




(आकृती नं. ५)

**२. भाषा समिती –** हित मित व प्रियच बोलणे. ( तत्त्वानुकुलच )

**३. एषणा समिती –** ४६ दोष व ३२ अंतराय टाळूनच आहार घेणे.

**४. आदाननिक्षेपण समिती –** कोणतीही वस्तु घेताना वा ठेवताना सावधानता ठेवणे.

**५. व्युत्सर्ग समिती –** जागा साफ करूनच मल मूत्राचे विसर्जन करणे. समितीमधे होणाऱ्या क्रिया शुभराग बंधाचेच कारण आहेत. पण त्या बरोबर असणारी शुध्दता संवराचे कारण आहे.

## दहा धर्माचे स्वरूप

**प्रश्न – धर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - आत्मस्वभावास धर्म म्हणतात. वस्तुत: तो एकच आहे त्याचे कथन दहा रूपात होते. भेद - दहा आहेत.

**प्रश्न – धर्माच्या मागे उत्तम विशेषण कां ?**

उत्तर - समीचीनतेसाठी उत्तम विशेषण आहे.

| धर्माची नांवे | स्वरूप |
|---|---|
| १. उत्तमक्षमा | समीचीन रीतीने क्रोधावर विजय मिळविणे |
| २. उत्तममार्दव | समीचीन रीतीने मानावर विजय मिळविणे |
| ३. उत्तमआर्जव | समीचीन रीतीने मायेवर विजय मिळविणे |
| ४. उत्तमशौच | समीचीन रीतीने लोभावर विजय मिळविणे |
| ५. उत्तमसत्य | समीचीन रीतीने हितमित प्रिय ( आगमानुकुलच ) बोलणे |
| ६. उत्तम संयम | समीचीन रीतीने इंद्रियांवर व त्यांच्या विषयांवर विजय मिळविणे |
| ७. उत्तमतप | समीचीन रीतीने इच्छेवर ( मूर्च्छेवर ) विजय मिळविणे |
| ८. उत्तमत्याग | समीचीन रीतीने सत् पात्रांनाच दान देणे |

| | |
|---|---|
| ९. उत्तम आकिंचन्य | समीचीन रीतीने परिग्रहावर ( ममत्वावर ) विजय मिळविणे |
| १०. उत्तम ब्रम्हचर्य | समीचीन रीतीने आत्मस्वरूपात रमणे स्त्री मात्रांचा नवकोटीने त्याग असणे. |

## अनुप्रेक्षा

वारंवार आत्मस्वभावाचे, संसाराचे वा त्याच्या कारणांचे व असारतेचे चिंतन करणे. ह्याचे भेद १२ आहेत.

( पं. जयचदजींच्या बारा भावना पहा. )

**प्रश्न – परिषहजय कशास म्हणतात ?**

उत्तर - दु:ख, आपत्ती, संकट आले तरी धर्मापासून चलित न व्हावे. ह्यासाठी परिषहावर विजय मिळविणे म्हणजे परिषहजय होय. ते २२ आहेत.

ह्या परिषहांना जिंकल्यामुळे आत्मशक्ती जागृत राहते. व कर्मांची निर्जरा वा संवर सतत होत राहतो.

## निर्जरा तत्त्वाचे स्वरूप

**प्रश्न – निर्जरा कशास म्हणतात ?**

उत्तर - शुध्दतेपूर्वक पूर्वबध्दकर्म नवीन कर्माच्या संवरपूर्वक आंशिकरूपाने निघून जाणे ते निर्जरा तत्त्व होय. निर्जरा तत्त्वाचे भेद दोन आहेत. ( १ ) द्रव्यनिर्जरा ( २ ) भावनिर्जरा

**१. द्रव्यनिर्जरा –** नवीन कर्माच्या संवरपूर्वक पूर्वबध्द कर्म निघून जाणे.

**२. भावनिर्जरा –** शुध्दतेची वृध्दी व अशुध्दतेची हानी म्हणजे भावनिर्जरा होय.

**१. सकामनिर्जरा –** इच्छेपूर्वक शुध्दतेमुळे होणारी, मोक्षमार्गास कारणीभूत निर्जरा सकाम निर्जरा होय.

**२. अकामनिर्जरा –** अनिच्छेपूर्वक शुध्दतेविना शांतीमुळे होणारी निर्जरा अकाम निर्जरा होय.


३. **अविपाक निर्जरा –** शुध्दआत्म्याच्या अनुभूतीकाली व परिणतीत शुध्दआत्मा असताना असंख्यातगुणित रूपाने कर्म निघून जाणे ही संवरपूर्वक असते.

४. **सविपाक निर्जरा –** उदय, उदीरणेपूर्वक नवीन कर्माचा बंध होत असताना होणारी निर्जरा ही सदा सुरूच असते.

## मोक्ष तत्त्व

**प्रश्न – मोक्ष तत्त्व म्हणजे काय ?**

उत्तर - आठ द्रव्यकर्माचा, संपूर्ण भावकर्माचा व नोकर्माचा पूर्णत: अभाव, पूर्ण अशुध्दतेचा अभाव, पूर्ण शुध्दतेची प्राप्ती, पूर्ण स्वभाव पर्यायाची प्राप्ती म्हणजे मोक्ष होय.




मोक्षतत्त्व मोक्षपर्याय ही अमल आत्म्याच्या उपासनेने पूर्ण निर्मल बनते. व हे आठ गुण प्राप्त होतात.

**प्रश्न – ह्या तत्त्वामध्ये हेय उपादेय कोणते ?**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर - | जीव | अजीव | आस्त्रव | बंध | संवर | निर्जरा | मोक्ष |
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | ध्येय | ज्ञेय | हेय | हेय | उपादेय | उपादेय | साध्य |

ध्येय = अवलंबन घेण्यायोग्य. ज्ञेय = जाणण्या योग्यच. हेय = सोडण्या लायक, उपादेय = स्वीकार ( ग्रहण ) करण्यायोग्य, साध्य = प्राप्त करण्यायोग्य.


✻ ह्या सात तत्त्वांमध्ये सात न पाहता एक जीव तत्त्व ( ज्ञायकत्व )

जेव्हा दृष्टीत येते तेव्हाच सम्यक्दर्शन प्राप्त होते. कारण ज्ञायक आत्मा सर्व पर्यायात ( ७ तत्त्वांत ) असतोच.

## खऱ्या देवाचे स्वरूप

**प्रश्न – खऱ्या देवाचे स्वरूप काय ?**

उत्तर - जे वीतराग सर्वज्ञ व हितोपदेशी असतात ते खरे देव होत.




✻ **वीतराग –** अठरा दोषांनी रहित, पूर्ण विकारांचा अभाव.

✻ **सर्वज्ञ –** संपूर्ण ज्ञेयांना युगपत् जाणणारे केवलज्ञानी.

✻ **हितोपदेशी –** केवळ कल्याणाचाच उपदेश देणारे.

✻ हे देव भव्य जीवांना प्रतिबिंब स्थानी आहेत ( आपले स्वरूप दाखविणारे ) आरशावत्.

✻ सम्यग्दृष्टी हा निश्चयाने शुध्दआत्मा व व्यवहाराने पंचपरमेष्टी सोडून कुणालाच व कधीच शरण जात नाही.

✻ मंत्रादिकांनी न घडणारे काही घडू शकते हे स्वीकारीत नाही. कारण त्याचा क्रमनियततेवर दृढ विश्वास असतो.

## खरे शास्त्र

**प्रश्न – खरे शास्त्र कशास म्हणतात ?**

उत्तर - जे वीतरागींनी सांगितलेले आहे, ज्यात कुठेही विरोध येत नाही, ज्यात कुमार्गाचे खंडन व स्वमताचे तर्कशुध्द मंडन आहे जे अनेकांताचे कथन करणारे आहे. ज्यात निश्चय व व्यवहार मोक्षमार्गाचे, निर्दोष कथन आहे ते खरे शास्त्र होय.

## खरे गुरु

जे पंचेंद्रियांच्या विषयांच्या आशेच्या अतीत असतात, संपूर्ण

परिग्रह व आरंभांनी रहित असतात, ज्ञान व ध्यानाची आराधना करणारे असतात ते खरे गुरु होत.

✻ जे तपामध्येच अनुरक्त आहेत, त्रस व स्थावर हिंसेचे त्यागी आहेत, सतत धर्म व शुक्लध्यानांत रत असतात ते खरे गुरु होत.

✻ त्यांना एकांतवासच आवडतो, त्यामुळे ते लौकिकजनांचा संपर्क टाळतात.

✻ जे मंत्रतंत्रादि वा औषधोपचारामागे न लागता ध्यानाची शुध्द आत्म्याची आराधना करतात ते खरे गुरु होत.

✻ या प्रमाणे सम्यग्दृष्टि खऱ्या देव शास्त्र गुरुंचीच समीचीन भक्ती करतो हाच शुभराग त्याच्या जीवनात येतो.

✻ ज्ञानीला भोगांत कधीच रुची असत नाही. त्यामुळे पंचेंद्रियांच्या विषांयाची अभिलाषा तो करीत नाही.

## सम्यक् चारित्राचे स्वरूप

**प्रश्न – चारित्राचे स्वरूप काय ?**

उत्तर - बाह्य ( पाच पापरूप क्रिया ) व अभ्यंतर ( कषाय व योगरूप ) क्रियेचा विरोध करून आत्मस्वरूपात लीन होणे ह्यास चारित्र म्हणतात.

✻ **हिंसा –** दुसऱ्यास मारण्याच्या व त्याचे वाईट होण्याच्या भावास हिंसा म्हणतात. आत्म्यामध्ये रागादिकांची उत्पत्ती होणे हीच खरी हिंसा होय.

✻ **असत्य –** खोटे बोलणे, निंद्य, कठोर, कर्कश वचन वा खोटे बोलण्याचा मनात विकल्प येणे हे असत्यपाप होय. तत्त्वांच्या व धर्मांच्या विपरीत बोलणे हेही असत्य होय.

✻ **चोरी –** दुसऱ्याची वस्तु घेणे वा घेण्याचा भाव होणे, ह्यास चोरी म्हणतात. परद्रव्यांस आपले मानणे ही खऱ्या अर्थाने चोरी होय.

✻ **कुशील –** स्व स्त्री वा स्व पुरूष सोडून दुसऱ्या स्त्री वा पुरूषाकडे वाईट दृष्टीने बघणे, रमणे हे कुशील पाप होय. विकार भावांत रमणे हे खऱ्या अर्थाने अब्रम्ह होय.

* **परिग्रह** – परवस्तूला आपले मानणे, त्यावर लोभ वा मूर्च्छा असणे हे परिग्रह पाप होय.
* **क्रोध** – राग व गुस्सारूप भाव म्हणजे क्रोध होय.
* **मान** – गर्व, अहंकाररूप भाव म्हणजे मान होय.
* **माया** – कपट मायाचाररूप भाव म्हणजे माया होय.
* **लोभ** – परपदार्थावर आसक्ती रूप भाव म्हणजे लोभ होय

चारित्राचे पुढील प्रमाणे भेद चार आहेत.

| स्वरूपाचरण चारित्र | देश चारित्र | सकल चारित्र | यथाख्यात चारित्र |
|---|---|---|---|
| अनंतानुबंधी-४ कषायांच्या अभावात असणारा शुध्दभाव निश्चय सम्यक्त्वा बरोबर असणारी आत्मस्वरूपातील लीनता म्हणजे स्वरूपाचरण चारित्र होय. सम्यक्त्वा सहित हे चारित्र आहे. त्यामुळे ह्यास हे नांव आहे. निमित्त- अनंतानुबंधी व मिथ्यात्व कर्मांचा अभाव | अनंतानुबंधी -४ अप्रत्याख्यान - ४ अशा ८ कषायांच्या अभावात असणारी आत्मस्वरूपातील लीनता.<br>बाह्य - श्रावकांच्या बारा व्रतांचे वा अकरा प्रतिमांचे पालन व त्या कषाय कर्मांचा क्षयोपशम हे निमित्त | १२ कषायांच्या अभावात असणारी आत्मस्वरूपातील लीनता.<br>( अ. ४ अप्र ४. प्र. ४ = १२ )<br><br>बाह्य - २८ मूल गुणांचे पालन<br>निमित्त - त्या त्या कर्मांचा क्षयोपशम ( अनंतानुबंधी, ४ अप्रत्याख्यान ४ व प्रत्याख्यान ४ या कर्मांचा क्षयोपशम ) | संपूर्ण २५ कषायांच्या पूर्ण अभावात असणारी आत्मस्वरूपा मधील लीनता.<br>निमित्त - संपूर्ण कषाय भावांच उपशम वा क्षय<br><br>शुध्द आत्म्यांत लीनता रुप चारित्र |

## - जीवत्व गुण -

✻ **स्वरूप –** ज्यामुळे हा जीव चैतन्यप्राणास धारण करतो तो जीवत्व गुण होय.

| परमपारिणामिक जीवत्व | पूर्ण शुध्द जीवत्व | एकदेश शुध्द जीवत्व | अशुध्द जीवत्व |
|---|---|---|---|
| ✻ त्रिकाली शुध्द ज्ञायकत्वरूप ध्रुव प्राण ✻ ध्येयरूप प्राण ↓ ( आश्रय घेण्यालायक प्राण. ) ✻ हे प्राण सदा व सर्वच जीवा जवळ असतात. हा अमल प्राण आहे | ✻ केवलज्ञान केवल दर्शनरूप शुध्द प्राण ✻हे साध्यप्राण होय ✻हे केवली व सिध्दांना असतात ✻निर्मलप्राण साध्य ↓ ( मिळविण्या लायक ) | ✻सम्यक् मति श्रुतादिज्ञान हे आंशीक शुध्द प्राण होय ✻हे ४ ते १२ गुणस्थाना पर्यंतच्या जीवांना असतात ✻ हे साधनरूप प्राण होय | ✻ ५ भावेंद्रिय व ३ बलरूप जीवाची अशुध्द पर्याय ✻ हे अशुध्द प्राण होत. हे १-१२ गुणस्थाना पर्यंत असतात. ह्यामध्ये निमित्त कर्माचा क्षयोपशम असतो. ✻ हे हेयरूप आहे. |

✻ व्यवहार प्राण = ५ द्रव्येंद्रिये, ३ बल, १ श्वासोच्छ्वास,
१ आयु = एकूण १०

हे जड पुद्गलरूप असून हे ज्ञेय आहेत. यामध्ये नाम कर्माचा उदय निमित्त असतो.

**प्रश्न – एका जीवास एकावेळी किती द्रव्यप्राण असतात ?**

उत्तर -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकेंद्रियाला | ४ प्राण - | १ इंद्रिय, | १ बल | आयु | श्वासोच्छवास |
| | | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | | स्पर्श १ | काय | १ | १ |
| द्विन्द्रियांना | ६ प्राण | स्प. र. | का. व. | १ | १ |
| त्रिन्द्रियांना | ७ प्राण | स्प. र. घ्रा. | २ | १ | १ |
| चतुरिन्द्रियांना | ८ प्राण | स्प. र. घ्रा. च. | २ | १ | १ |
| असंज्ञी पंचेन्द्रियांना | ९ प्राण | स्प. र. घ्रा. च. क. | का. व. | १ | १ |
| संज्ञी पंचेन्द्रियांना | १० प्राण | स्प. र. घ्रा. च. क. | का. व. म. | १ | १ |

**प्रश्न – सुख गुण कशास म्हणतात ?**

उत्तर - निराकुल आनंद स्वरूपी आत्म्याच्या भावास सुख म्हणतात. सांसारिक सुख वा दु:ख ह्या त्याच्या विभावअवस्था होत.

✻ **वीर्य –** आत्म्याच्या अनंत सामर्थ्यास वीर्य म्हणतात.

✻ **भव्यत्व –** आत्म्यामध्ये सम्यक्त्वादि पर्याय प्रगट होण्याच्या जीवाच्या पर्यायगत शक्तीस भव्यत्व म्हणतात. ही द्रव्यपर्याय आहे. गुण नाही. त्याबाबत खुलासा

↓

✻ अनादि सान्त असिध्दत्व म्हणजेच भव्यत्व होय

✻ अनादि अनंत असिध्दत्व म्हणजेच अभव्यत्व होय.

✻ असिध्दत्व ही सिध्दत्वाच्या विरोधी द्रव्यपर्याय आहे. म्हणून भव्यत्व व अभव्यत्व ही द्रव्य पर्यायच आहेत.

✻ पर्याय असल्यामुळे सिध्ददशेत भव्यत्वाचा अभाव होतो.

✻ **अभव्यत्व –** आत्म्यामध्ये सम्यक्दर्शनादि पर्यायी प्रगट न होण्याची जीवाची पर्यायगत योग्यता आहे.

✻ भव्याचा कधीच अभव्य होत नाही. व अभव्याचा कधीच भव्य होत नाही.

**प्रश्न – वैभाविक शक्तिकशास म्हणतात ?**

उत्तर - ज्यामुळे जीव व पुद्गलांत निमित्ताचे लक्ष्य करून स्वयं होणाऱ्या

विभाववपरिणतीच्या योग्य वैभाविक शक्ति म्हणतात. ही देखील पर्यायगत योग्यताच आहे. ही योग्यता जीव व पुद्‌गलांतच आहे.

## प्रतिजीवी गुण

**प्रश्न – प्रतिजीवी गुण कशास म्हणतात ?**

उत्तर - अभाव स्वरूपी गुणास प्रतिजीवीगुण म्हणतात.

* **अमूर्तत्व –** मूर्तत्वाच्या अभावात असणारा - पुद्‌गल सोडून ५ द्रव्यातील गुण.

* **अचेतनत्व –** चेतनत्वाच्या अभावात असणारा - जीव सोडून ५ द्रव्यातील गुण.

* **नास्तित्व –** परचतुष्टयाच्या अभावात असणारा - सर्वच ६ द्रव्यात असणारा.

* पुढील चार प्रतिजीवी गुण जीवातच असतात.

१. **अवगाहन हेतुत्व –** आयुकर्माच्या अभावात पारतंत्राच्या अभावास अवगाहन हेतुत्व म्हणतात.

२. **अगुरुलघुत्व –** गोत्र कर्माच्या अभावात उच्चनीचतेच्या अभावास अगुरुलघुत्व म्हणतात.

३. **अव्याबाधत्व –** वेदनीय कर्माच्या अभावात आकुलतेच्या अभावास अव्याबाधत्व म्हणतात.

४. **सूक्ष्मत्व –** नामकर्माच्या अभावात स्थूलतेच्या अभावास सूक्ष्मत्व म्हणतात.

**प्रश्न – अभाव कशास म्हणतात ?**

उत्तर - एका पदार्थाचा वा एका पर्यायीचा दुसऱ्या द्रव्यांत वा पर्यायीत नास्तित्व असणे यास अभाव म्हणतात. ह्यात अभाव म्हणजे एकाचा सद्‌भाव असतो. भेद - ४ ( पुढील तक्ता पहा. )

| प्राग अभाव | प्रध्वंसाभाव | अन्योन्याभाव | अत्यंताभाव |
|---|---|---|---|
| १. एका द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा त्याच्याच भूतकालीन पर्यायीत अभाव तो प्रागभाव होय. २. कार्याचा कारणात अभाव उदा. १० व्या समयातील पर्यायीचा ९ व्या समयातील पर्यायीमध्ये अभाव. ३. वाच्य- उपादान कारण. ४. ह्या अभावाने- पर्यायाची क्रमनियतता व स्वतंत्रता सिद्ध होते. द्रव्याचे पृथकत्व नाही. | १. एका द्रव्या -च्या वर्तमान पर्यायाचा त्याच द्रव्याच्या भविष्यकालीन पर्यायामध्ये अभाव २. वर्तमान पर्याय-कारण, भविष्य पर्याय- कार्य कारणाचा कार्यात अभाव उदा. १० व्या समातील ११ व्या समयातील पर्यायीतअभाव. एकाद्रव्याच्या दोन पर्यायी एकाकाली असत नाहीत. ३. वाच्य- उपादेयकार्य ४. ह्या अभावामुळे पर्यायांची क्रमनियतता व स्वतंत्रता सिद्ध होते. द्रव्याचे पृथकत्व नाही. | १. एका पुद्गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा दुसऱ्या पुद्गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायामध्ये अभाव तो अन्योन्याभाव होय. उदा. स्कंधाच्या मधील एका परमाणूच्या वर्तमानपर्यायाचा दुसऱ्या परमाणूच्या वर्तमान पर्यायात संश्लेष संबंध असूनही वास्तविक अभाव आहे. २. वाच्य - निमित्त नैमित्तिक पर्यायाचे अस्तित्व. ३. ह्या अभावामुळे निमित्त नैमित्तिक संबंधातही प्रत्येकाचे स्वातंत्र्य सिद्ध होते. द्रव्याचे पृथकत्व आहे. | १. एका द्रव्याचा दुसऱ्या द्रव्यामध्ये त्रिकाली अभाव तो अत्यंताभाव होय. २. अभाव हा केवळ अभाव नसतो. तर एकाचा अभाव तो दुसऱ्याचा सद्भाव असतो. ३. वाच्य- प्रत्येक वस्तूचे स्वचतुष्टय हे ह्या अभावाचे वाच्य आहे. व परचतुष्टयाचा अभाव आहे. ४. हा अभाव प्रत्येक वस्तूचे स्वातंत्र्य सिद्ध करतो. द्रव्याचे पृथकत्वच आहे. |

## अध्याय दुसरा

**प्रश्न – संसारी जीव कशास म्हणतात ?**

उत्तर - कर्म व विकार सहित जीवास संसारी म्हणतात.

**प्रश्न – कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - जीवाच्या रागद्वेषरूप परिणामांचे निमित्त असतांना कार्माणवर्गणारूप स्कंध कर्मरूपाने परिणत होणे व जीवप्रदेशाशी बद्ध होते त्यास कर्म म्हणतात.

**प्रश्न – बंध कशास म्हणतात ?**

उत्तर –कार्माणवर्गणा कर्मरूप होऊन परस्परावगाह रूपाने आत्मप्रदेशाशी जो संबंध तो द्रव्यबंध, ज्या जीवाच्या रागादि परिणामाचे त्याकाळी अस्तित्व असते त्या भावास भावबंध म्हणतात.

**प्रश्न – बंधाचे भेद किती ?**

उत्तर - बंधाचे भेद चार आहेत. ( १ ) प्रकृतीबंध- ( २ ) प्रदेशबंध, ( ३ ) स्थितिबंध, ( ४ ) अनुभागबंध

**प्रश्न – प्रकृतीबंध कशास म्हणतात ?**

उत्तर - प्रकृती - स्वभाव, कर्मामधे जीवघाताचा उपचार होईल असा स्वभाव उत्पन्न होणे. तो प्रकृतीबंध होय. जसे - ज्ञानावरण कर्माचा स्वभाव ज्ञानपर्याय प्रगट न होण्यामध्ये निमित्त होणे.

ह्या बंधाचे मूळ आठ भेद व उत्तर भेद १४८ आहेत.

| मूळभेद - | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | |
| | ज्ञानावरण | दर्शनावरण | वेदनीय | मोहनीय | आयु | नाम | गोत्र | अंतराय | |
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | |
| उत्तरभेद - | ५ | ९ | २ | २८ | ४ | ९३ | २ | ५ | =१४८ |

**प्रश्न – ज्ञानावरण कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - जे कर्म आत्म्याच्या ज्ञानगुणांच्या पर्यायावर आवरण टाकण्यास निमित्त असते ते ज्ञानावरण कर्म होय.

✻ **मतीज्ञानावरण कर्म** – आत्म्याच्या मतिज्ञान पर्यायाच्या घातामध्ये जे निमित्त असते. ते मतिज्ञानावरण कर्म होय.

✻ **श्रुतज्ञानावरण कर्म** – आत्म्याच्या श्रुतज्ञान पर्यायाच्या घातामध्ये जे निमित्त असते. ते श्रुतज्ञानावरण कर्म होय.

१ असेच बाकी तीन कर्मावर लावा. मात्र ज्ञानपर्याय बदला. भेद- मतिज्ञानावरण, श्रुतज्ञानावरण, अवधिज्ञानावरण, मन:पर्ययज्ञानावरण, केवलज्ञानावरण.

✻ **दर्शनावरण कर्म** – आत्म्याच्या दर्शनगुणाच्या पर्यायाच्या घातामधे जे निमित्त असते ते दर्शनावरण कर्म होय.

✻ दर्शनावरण कर्माचे ९ भेद आहेत. चक्षुदर्शनावरण, अचक्षुदर्शनावरण, अवधिदर्शनावरण, केवलदर्शनावरण, निद्रा दर्शनावरण, प्रचलादर्शनावरण, निद्रानिद्रादर्शनावरण, प्रचलाप्रचलादर्शनावरण, स्त्यानगृद्धिदर्शनावरण.

✻ **चक्षुदर्शनावरण** – जे कर्म आत्म्याच्या चक्षुदर्शन पर्यायाच्या घातामधे निमित्त असते ते चक्षुदर्शनावरण कर्म होय.

२. असेच बाकी तीनवर लावा. कर्म दर्शन बदला.

✻ **निद्राकर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना श्रमादि दूर होण्यासाठी झोप येते ते निद्राकर्म होय.

✻ **निद्रानिद्रा कर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना पुन: पुन्हा झोप येते. ते निद्रानिद्रा कर्म होय.

✻ **प्रचला कर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना थोडे झोपतो व थोडे जागतो ( जाणतो ) ते प्रचलाकर्म होय.

✻ **प्रचलाप्रचला कर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना हस्तादि अवयव हालतात, तोंडातून लाळ गळते ते प्रचलाप्रचलकर्म होय.

✻ **स्त्यानगृद्धि कर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना स्वप्नामध्ये बडबड करतो, काम करतो त्यास स्त्यानगृद्धिकर्म म्हणतात.

✻ **वेदनीय कर्म** – जो कर्म आत्म्याच्या सुख दु:खरूप भावामधे ( वेदनामधे ) निमित्त असते ते वेदनीय कर्म होय. वेदनीय कर्माचे दोन भेद आहेत.

✻ **सातावेदनीय कर्म –** जे कर्म जीवास सुखाच्या वेदनामध्ये निमित्त असते ते सातावेदनीय कर्म होय.

✻ **असातावेदनीय कर्म –** जीवाच्या दु:खरूपभावाच्या वेदनामधे जे निमित्त असते ते असातावेदनीय कर्म होय.

✻ **मोहनीय कर्म –** जे कर्म आत्म्याच्या सम्यग्दर्शन, सम्यक्चारित्र पर्यायाच्या घातामध्ये व मिथ्यात्व, रागादि परिणामाच्या उत्पत्तीमध्ये निमित्त असते ते मोहनीय कर्म होय. याचे भेद दोन आहेत. दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय कर्म.

**प्रश्न – दर्शनमोहनीय कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माचा उदय जीवाला सम्यग्दर्शन न होऊ देण्यामधे व मिथ्यात्वादि भावामधे निमित्त असतो ते दर्शनमोहनीय कर्म होय. याचे भेद तीन आहेत. मिथ्यात्वकर्म, सम्यग्मिथ्यात्वकर्म व सम्यक्प्रकृतीकर्म.

✻ **मिथ्यात्व कर्म –** ज्या कर्माचा उदय ( निमित्त ) असतांना मिथ्यात्वरूप भाव होतो, शुध्दआत्म्याचा प्रतिभास होत नाही ते मिथ्यात्व कर्म होय.

✻ **सम्यक्मिथ्यात्वकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीवाच्या ठिकाणी मिश्र भाव होतो. ते सम्यक्मिथ्यात्व कर्म होय.

✻ सम्यक्रूप ही म्हणता येत नाही व मिथ्यारूप म्हणता येत नाही असा दोन मिळूनअसणारा एक परिणाम.

उदा. दहि व साखर यांच्या मिश्रणाप्रमाणे मिश्र भाव असतो.

✻ **सम्यक्प्रकृति कर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना सम्यग्दर्शनाचा घात तर होत नाही, पण चल, मल, अवगाढ दोष उत्पन्न होतात.

✻ **चलदोष –** हे माझे मंदीर, माझी वेदी, माझी मूर्ती.

✻ **मलदोष –** शंकादिकापैकी एखादा दोष निर्माण होणे.

✻ **अवगाढदोष –** सर्व अरिहंत अनंतशक्तिशाली असतांनाही शांतिनाथ शांतिदेणारे, पार्श्वनाथ संकट दूर करणारे असा शिथिल परिणामरूप दोष - वृध्दाच्या हातातील काठी कापते तद्वत्.

✻ ह्या तीन भेदापैकी फक्त मिथ्यात्वाचा बंध होतो. इतर दोनचा बंध होतच नाही. सम्यक्दर्शनकाली ह्यांची सत्ता येते.

**प्रश्न – चारित्रमोहनीय कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माचा उदय स्वरूपाचरणादि चारित्र पर्यायाच्या घातामधे व असंयम भाव होण्यामधे निमित्त असतो ते चारित्रमोहनीय कर्म होय.

४ भेद -

| | | | |
|---|---|---|---|
| | अनंतानुबंधीक्रोधादिककर्म | अप्रत्याख्यानावरण | प्रत्याखनावरणकर्म |
| | ४ | ४ | ४ |
| व | संज्वलनकर्म | नोकषाय कर्म | |
| | ४ | ९ | = २५ भेद |

✻ **अनंतानुबंधी कर्म –** ज्याचा उदय स्वरूपाचरण चारित्राच्या घातामधे निमित्त असतो ते अनंतानुबंधी कर्म होय.

✻ अनंत - अनंत संसारास कारण मिथ्यात्व कर्म, त्याचे सहचर सहयोगी - अनुबंधि. ते अनंतानुबंधी कर्म होय.

✻ **अप्रत्याख्यानावरणकर्म –** ज्याचा उदय ( निमित्त ) असतांना देशचारित्र प्रगट होत नाही. अ - किंचित, प्रत्याख्यान-त्याग होऊ देत नाही. ते अप्रत्यायानावरण कर्म होय.

✻ **प्रत्याख्यानवरण कर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना सकल चारित्र होत नाही ते प्रत्याख्यानवरण कर्म होय.

✻ **संज्वलन कर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना यथाख्यात चारित्र होत नाही. ते संज्वलनकर्म व नोकषाय कर्म होय.

✻ **नोकषाय कर्माचे भेद –** १. हास्य, २. शोक, ३. रति, ४. अरति, ५. भय, ६. जुगुप्सा, पुरूषवेद, स्त्रीवेद, नपुंसक वेद

**प्रश्न – आयुकर्म कशास म्हणतात ?**


उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना मनुष्यादि भवामधे जीव अडकून पडतो ते आयु कर्म होय.

✻ ह्याचे भेद - ४ - नरकायु, तिर्यंचायु, मनुष्यायु, देवायु

✻ या कर्माच्या सजातीय प्रकृतीतही संक्रमण ( बदल ) होत नाही. उदा. मनुष्यायु ( तिर्यंच आयुत ) बदलत नाही.

✻ ह्याचा बंध प्रत्येक समयी न होता. आयुच्या त्रिभागानंतरच होतो.
✻ बंध झाल्यावर त्याच आयुत जावे लागते.
✻ आयुचा बंध झाल्यानंतर त्या कर्माचा आबाधा ( निषेक रचना न होणे. उदय न येणे ) त्याच भवांत संपतो. हा आबाधा निश्चित ( नियत ) असतो. त्यामुळे नवीन आयुचा बंध झाला असेल तर भोगणाऱ्या आयुचे अपवर्तन होत नाही. ( पूर्ण निषेकांची उदीरणा होत नाही. ) अपवर्तनाचा नकाशा पुढे दिला आहे. आयुर्बंध त्याकाली असणाऱ्या लेश्यानुसार होतो.

## अपवर्तनाचा नकाशा





### अपवर्तन

✻ ह्या पाच निषेकातील संपूर्ण परमाणू १ त १५ समयात अपकर्षित होऊन आले. निषेकच राहत नाही हे अपवर्तन होय
✻ आयुर्बंध पडण्यापूर्वी विष भक्षणादि अपवर्तनाचे निमित्त म्हटल्या जातात. मरणाचे नाही
✻ अपवर्तनानंतरच नवीन आयुचा बंध पडतो. व त्याचा आबाधा संपल्यानंतर मरण येते.
✻ मनुष्यायु व तिर्यंचायुमध्ये असे अपवर्तन होण्याची त्या कर्माची स्वयंचीच योग्यता असते. म्हणून होते, निमित्ताने नाही.
✻ देवायु व नरकायुमध्ये अपवर्तनाची स्वयंची योग्यता नाही, म्हणून पूर्ण आयु संपेपर्यंत राहावेच लागते. पण काही परमाणु खाली येऊन उदीरणा होते.

✻ आगमात अपमृत्यु शब्द नसून अपवर्तन शब्द आहे.
( तत्त्वार्थसुत्र अ. -२, ५३ ) त्यामुळे क्रमनियततेला बाधा वा निमित्ताच्या कर्तृत्वाला वाव नाही.

✻ अकालमरणा बरोबर अकाल जन्म मानावा लागेल.

## आयुच्या उदीरणेचा नकाशा




**प्रश्न – मनुष्यायु कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माचा उदय ( निमित्त ) असतांना जीव मनुष्यभवात अडकून पडतो ते मनुष्यायु कर्म होय.

असेच तीन आयुकर्माचे लक्षण करा. फक्त मनुष्यायुच्या स्थानी तिर्यंचादि आयु शब्द ठेवा.

## नामकर्म

**प्रश्न – नामकर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना गतिआदि व शरीरादि पुद्गल परिणामांचा संयोग प्राप्त होतो ते नामकर्म होय.

भेद-९३

त्याची विभागणी तीन रूपांत होते. तत्त्वार्थसूत्रांत जे ४२ भेद केले ते पिंडप्रकृतीच्या व प्रतिपक्षी प्रकृतीच्या अपेक्षेने केले आहेत.

✻ १० पिंड प्रकृति = ६३ भेद = पिंड - पोट भेद न पाहता मूळ प्रकृती

उदा. १ ↓ गति ↓ ४ | २ ↓ जाति ↓ ५ | ३ ↓ शरीर ↓ ५ | ४ ↓ अंगोपांग ↓ ३ | ५ ↓ संघात ↓ ५ | ६ ↓ संस्थान ↓ ६ | ७ मूळ भेद ↓ बंधन ↓ ५ उत्तर भेद

८ ↓ संहनन ↓ ६ | ९ ↓ स्पर्शादि ↓ २० | १० मूळ भेद ↓ आनूपूर्वी = ६३ पिंडप्रकृती ↓ ४ उत्तर भेद

✻ प्रतिपक्षी प्रकृती = ११ - प्रतिपक्षी = उलट विरोधी

१ ↓ विहायोगति ↓ शुभ २ अशुभ | २ ↓ प्रत्येक, ↓ २ साधारण | ३ ↓ त्रस-स्थावर, ↓ १-१ | ४ ↓ दुर्भग-सुभग, ↓ १-१ | ५ प्रतिपक्षी ↓ सुस्वर-दुस्वर ↓ १-१

६ ↓ सूक्ष्म-बादर ↓ १-१ | ७ ↓ शुभ-अशुभ ↓ १-१ | ८ ↓ पर्याप्त-अपर्याप्त ↓ १-१ | ९ प्रतिपक्षी ↓ स्थिर- अस्थिर ↓ १-१

१० ↓ आदेय - अनादेय ↓ ↓ १ १ | ११ ↓ यशकिर्ती - अयशकिर्ती ↓ ↓ १ १ = २२ प्रतिपक्षी प्र.

१ ↓ प्रत्येकी एकएक ८ ↓ १ | २ ↓ -निर्माण ↓ १ | ३ ↓ अगुरुलघु ↓ १ | ४ ↓ उपघात ↓ १ | ५ ↓ परघात आतप ↓ ↓ १ १ | ६ ↓ उद्योत

७ ↓ उच्छ्वास १ | ८ ↓ तीर्थंकर = ८ प्रकृती एकएक

**प्रश्न – गति नामकर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माचा उदय असतांना जीवाला नारकादि पर्याय होतात त्यास गतिनामकर्म म्हणतात. भेद-४ नरकगतिनामकर्मादि

✻ **जातिनामकर्म** - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीव एकेंद्रियादि जाति धारण करतो, ते जातिनामकर्म.

✻ ह्याचे भेद - ५ -

एकेंद्रियजातिनामकर्म, द्विद्रिंयजाति नामकर्म, तिन्द्रियजातिनामकर्म
१ २ ३
चतुरिंद्रियजाति नामकर्म पंचेन्द्रियजाति नामकर्म.
४ ५

**प्रश्न – जाति कशास म्हणतात ?**

उत्तर - निर्दोष अशा सारखेपणावरून पदार्थामध्ये एकपणा असणाऱ्या विशेषाला जाति म्हणतात. जसे पाच प्रकारच्या स्थावरांची एकेंद्रिय जाति होय. कारण सर्वानाच एकेंद्रिय असते.

**प्रश्न – शरीर नाम कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना औदारिकादि शरीर प्राप्त होतात ते शरीर नामकर्म होय.

✻ भेद - ५ -

औदारिकशरीर नामकर्म वैक्रियकशरीर नामकर्म आहारकशरीर नामकर्म
१ २ ३
तैजस शरीर नामकर्म कार्माणशरीर नामकर्म
४ ५

✻ शरीरांचे स्वरूप ९ पानावर पहा.

**प्रश्न – अंगोपांग नामकर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना औदारिकादि तीन शरीरांच्या अंगोपांगाची रचना होते. त्यास अंगोपांग नामकर्म म्हणतात.

भेद - ३ - शरीरनामकर्माप्रमाणे

**प्रश्न – निर्माण नामकर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना अंगोपांगाची यथायोग्य

रचना होते. त्यास निर्माण नामकर्म म्हणतात.
**प्रश्न – बंधन नामकर्म कशास म्हणतात ?**
उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना औदारिकादि शरीराच्या परमाणूंचा परस्पर संबंध होतो. त्यास बंधन नामकर्म म्हणतात.
भेद - ५ - शरीरनामकर्मा प्रमाणे. औदारिक बंधन आदि.
**प्रश्न – संघात नामकर्म कशास म्हणतात ?**
उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना औदारिकादि शरीराच्या परमाणूंचा छिद्ररहित एकपणा होतो त्यास संघात नामकर्म म्हणतात.
भेद - ५ - शरीरनामकर्मा प्रमाणे.
**प्रश्न – संस्थान नामकर्म कशास म्हणतात ?**
उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीराचा आकार बनते ते संस्थान नामकर्म होय. भेद - ६
* **समचतुरस्त्र संस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना खालीवर सर्व ठिकाणी योग्य प्रमाणात शरीराचा आकार असतो. ते समचतुरस्त्र संस्थान नामकर्म होय.
* **न्यग्रोधपरिमंडल संस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीराचा आकार वडाच्या झाडावत्, वरील अवयव मोठे व खालील अवयव लहान, असा बनतो त्यास न्यग्रोधपरिमंडल संस्थान नामकर्म म्हणतात.
* **स्वातिसंस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीराचा आकार सर्पाच्या बिळवत्, वरील अवयव लहान व खालील अवयव मोठे असा होतो ते स्वातिसंस्थान नामकर्म होय.
* **कुब्जक संस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीर कुबडे बनते, ते कुब्जक संस्थान नामकर्म होय.
* **वामन संस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीर बुटके बनते, ते वामन संस्थान नामकर्म होय.
* **हुंडक संस्थान नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना

शरीराची रचना हुंडाप्रमाणे होते, ते हुंडक संस्थान नामकर्म होय.
कोणताही आकार हुंडाप्रमाणे प्राप्त होतो.

## संहनन नामकर्म

**प्रश्न – संहनन नामकर्म कशास म्हणतात ?**
उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडांचे बंधन होते त्यास संहनन नामकर्म म्हणतात.
भेद -६ - **वज्रवृषभनाराच संहनन –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडे, वेष्टन, किलीका ही वज्रांची (लोखंडासमान) असतात त्यास वज्रवृषभनाराच संहनन म्हणतात.
वज्र = लोखंड, वृषभ = वेस्टन, नाराच = हाडे
✻ **वज्रनाराच संहनन नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडे व किलीका वज्राची असतात ते वज्रनाराच संहनन होय.
✻ **नाराच संहनन नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडे पूर्णपणे किलीत असतात ते, नाराच संहनन नामकर्म होय.
✻ **अर्धनाराच संहनन नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडांचे सांधे अर्धकिलीत असतात ते अर्धनाराच संहनन नामकर्म होय.
✻ **किलित संहनन नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडांचे सांधे एकमेकांत बसविलेले असतात ते किलित संहनन नामकर्म होय.
✻ **असंप्राप्तासृपाटिका संहनन नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना हाडांचे सांधे परस्पर नसांनी कसलेले असतात त्यास असंप्राप्तासृपाटिका संहनन नामकर्म म्हणतात.
✻ **स्पर्श नामकर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना शरीरात स्पर्श उत्पन्न होतो त्यास स्पर्श नामकर्म म्हणतात. असेच रसादिवर लावा. स्पर्शाच्या जागी रसादि ठेवा.

* **आनुपूर्व्य नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना विग्रहगतीमध्ये जीवाचा आकार मरणापूर्वी असणाऱ्या शरीराकार असतो. त्यास आनुपूर्व्य नामकर्म म्हणतात.
* **भेद चारगतिप्रमाणे** – मनुष्यगत्यानुपूर्वी आदि.
* **मनुष्यगत्यानुपूर्वी** – एक तिर्यंचादि तीन गतितील जीव मरून मनुष्य होतो. तेव्हा विग्रहगतिमध्ये आकार तर पूर्व शरीराचाच असतो. पण उदय मनुष्यगत्यानुपूर्वीचाच असतो. कारण नवीन शरीर विग्रहगतित प्राप्त होत नाही. म्हणून त्याचा आकार राहत नाही.
* असेच सर्व आनुपूर्वीवर लावा.
* **अगुरुलघु नामकर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना शरीर लोखंडवत् जड व कापसासारखे हलकेही होत नाही ते अगुरुलघु नामकर्म होय.
* **उपघातनामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना आपल्या अवयवांनी आपलाच घात होईल असे अवयव प्राप्त होतात, ते उपघात नामकर्म होय.
* **परघातनामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना आपल्या अवयवांनी दुसऱ्याचा घात होईल असे अवयव प्राप्त होतात, ते परघात नामकर्म होय.
* **आतप नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना सूर्यासारखे उष्ण शरीर प्राप्त होते ते आतप नामकर्म होय.
* **उद्योत नामकर्म** – ज्या नामकर्माच्या उदयाचे निमित्त असतांना चंद्रासमान उद्योतरूप शरीर प्राप्त होते ते उद्योत नामकर्म होय.
* **श्वासोच्छ्श्वास नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना श्वास ( हवा घेणे ) उच्छ्वास ( घेतलेली हवा बाहेर सोडणे ) होते यास श्वासोच्छ्श्वास नामकर्म म्हणतात.
* **विहायोगति नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीव लोकाकाशात गमन करू शकतो त्यास विहायोगती नामकर्म म्हणतात. भेद-शुभ-अशुभ.
* **प्रत्येकशरीर नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना

एका शरीराचा स्वामी एकच जीव असतो असे शरीर प्राप्त होते. ते प्रत्येक शरीर नामकर्म होय.

✻ **साधारणशरीर नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना एका शरीराचे अनेक जीव स्वामी असतात असे शरीर प्राप्त होते, ते साधारण नामकर्म होय.

उदा. कांद्यात अनंतानंत जीव असतात.

✻ **त्रसनामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीव द्विन्द्रियांदिकामध्ये उत्पन्न होतो ते त्रसनामकर्म होय.

✻ **स्थावर नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीव एकेंद्रिय होतो, ते स्थावर नामकर्म होय.

✻ **सुभग नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना दुसरे जीव आपणावर प्रीती करतात ते सुभग नामकर्म होय.

✻ **दुर्भग नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना दुसरे जीव आपल्यावर अप्रीती करतात ते दुर्भग नामकर्म होय.

✻ **सुस्वर नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना मधुर आवाज उत्पन्न होतो ते सुस्वर नामकर्म होय.

✻ **दु:स्वर नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना कर्कश आवाज प्राप्त होतो ते दु:स्वर नामकर्म होय.

✻ **शुभनामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना सुंदर शरीर प्राप्त होते, ते शुभनामकर्म होय.

✻ **अशुभ नामकर्म** – ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना कुरूप शरीर प्राप्त होते ते अशुभ नामकर्म होय.

✻ **सुक्ष्मशरीर नामकर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना सुक्ष्म शरीर प्राप्त होते ते सुक्ष्म शरीर नामकर्म होय.

✻ **बादरशरीर नामकर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना बादर ( स्थुल ) शरीर प्राप्त होते ते बादर शरीर नामकर्म होय.

✻ **पर्याप्ती नामकर्म** – ज्या कर्माचा उदय असतांना आपआपल्या योग्य पर्याप्ती पूर्ण होतात ते पर्याप्ती नामकर्म होय.

**✻ अपर्याप्ती नामकर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना एकही पर्याप्ती पूर्ण होत नाही त्यास अपर्याप्ती नामकर्म म्हणतात.

## पर्याप्तीचे स्वरूप

**प्रश्न – पर्याप्ती कशास म्हणतात ?**

उत्तर - आहारवर्गणा, भाषावर्गणा, मनोवर्गणा ह्यांच्या परमाणूंना शरीर, इंद्रिय, भाषा, मन इत्यादिरूप बनविणाऱ्या जीवाच्या शक्तिच्या पूर्णतेला पर्याप्ती म्हणतात. पर्याप्तीचे भेद ६ आहेत.

| आहारवर्गणेच्या निमित्ता पासून | भाषावर्गणेच्या निमित्ता पासून | मनोवर्गणेच्या निमित्ता पासून |
|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ |
| आहार, शरीर, इंद्रिय व श्वासोच्छ्श्वास ह्या ४ पर्याप्ती बनतात. | भाषा पर्याप्ती बनते | मन:पर्याप्ती बनते |

✻ ह्या पर्याप्तींची सुरुवात एकदम होते. पूर्णता क्रमाने होते.

✻ सर्व पर्याप्तींचा कालही अंतर्मुहूर्त व प्रत्येकीचा पूर्ण होण्याचा कालही अंतर्मुहूर्त असतो. सर्वासाठी मोठा व एकासाठी छोटा अंतर्मुहूर्त असतो.

✻ वर्गणा पुद्गलाच्या अवस्था आहे. व पर्याप्ती जीवाची विभाव योग्यता आहे.

✻ वर्गणेपासून आहारशरीरादि पुद्गल द्रव्याच्याच पर्यायी उत्पन्न होतात. जीवाची पर्याप्ती त्यांच्या तशा परिणमणास फक्त निमित्त असते.

**✻ पर्याप्तक –** ज्याची शरीर पर्याप्ती पूर्ण होते तो जीव, पर्याप्तक होय.

**✻ निर्वृत्यपर्याप्तक –** ज्याची शरीर पर्याप्ती पूर्ण झाली नाही, पण नियमाने पूर्ण होतेच तो निर्वृत्यपर्याप्तक जीव होय.

**✻ लब्ध्यपर्याप्तक –** ज्याची शरीर पर्याप्ती कधीच पूर्ण होत नाही तो लब्ध्यपर्याप्तक जीव होय.

**✻ आहार पर्याप्ती –** आहारवर्गणेच्या परमाणूंना खल रस भाग बनण्यास निमित्तभूत जीवाच्या शक्तिची पूर्णता म्हणजे आहारपर्याप्ती होय ( खल-टणक ) ( रस-पातळ )

**✻ शरीर पर्याप्ती –** आहारवर्गणेच्या खलभागरूप परमाणूंना हाडे वेस्टन आदिरूप बनण्यास, रसभागास रक्तादि बनण्यास निमित्तरूप

जीवाच्या शक्तिच्या पूर्णतेला शरीर पर्याप्ती म्हणतात.

**⁕ इंद्रिय पर्याप्ती –** आहारवर्गणेच्या परमाणूंना इंद्रियाकार बनण्यास व त्या द्वारा विषय ग्रहण करण्यास निमित्तरूप जीवाच्या शक्तिच्या पूर्णतेला इंद्रिय पर्याप्ती म्हणतात.

**⁕ श्वासोच्छ्श्वास पर्याप्ती –** आहारवर्गणेच्या परमाणूंना श्वासोच्छ्श्वासारूप बनण्यास निमित्तभूत जीवाच्या शक्तिची पूर्णता यास श्वासोच्छ्श्वास पर्याप्ती म्हणतात.

**⁕ भाषा पर्याप्ती –** भाषावर्गणेच्या परमाणूंना शब्दरूप बनण्यास निमित्त भूत जीवाच्या शक्तिच्या पूर्णतेला भाषा पर्याप्ती म्हणतात.

**⁕ मन: पर्याप्ती –** मनोवर्गणेच्या परमाणूंना द्रव्यमन बनण्यास व त्यांच्या अवलंबनाने विचार करण्यास निमित्तभूत जीवाच्या शक्तिच्या पूर्णतेला मन:पर्याप्ती म्हणतात.

**प्रश्न – कोणत्या जीवास किती पर्याप्ती असतात ?**

उत्तर -

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकेंद्रिय जीवास ४/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | पर्याप्ती |
| द्विंद्रिय जीवास ५/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | भाषा पर्याप्ती |
| तींद्रिय जीवास ५/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | भाषा पर्याप्ती |
| चतुरिंद्रिय जीवास ५/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | भाषा पर्याप्ती |
| असंज्ञी पंचेंद्रिय जीवास ५/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | भाषा पर्याप्ती |
| संज्ञी पंचेंद्रिय जीवास ६/आहार, | शरीर, | इंद्रिय, | श्वासोच्छ्वास | भाषा, मन: पर्याप्ती |

**⁕ स्थिर नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीरातील धातु उपधातू आपआपल्या स्थानी स्थिर राहतात ते स्थिर नामकर्म होय.

**⁕ अस्थिर नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीरातील धातू उपधातू स्थिर राहत नाही ते अस्थिर नामकर्म होय.

**⁕ आदेय नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीरावर कांती येते ते आदेय नामकर्म होय.

**✻ अनादेय नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना शरीरावर कांती असत नाही ते अनादेय नामकर्म होय.

**✻ यशस्कीर्ती नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जगात जीवाच्या पुण्यगुणांची किर्ती होते ते यशस्कीर्ती नामकर्म होय.

**✻ अयशस्कीर्ती नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जगात जीवाच्या अवगुणांची अपकिर्ती होते ते अयशस्कीर्ती नामकर्म होय.

**✻ तीर्थंकर नामकर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीवास तीर्थंकर पद प्राप्त होते ते तीर्थंकर नामकर्म होय.

## गोत्रकर्म

**प्रश्न – गोत्रकर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जीवाला नीच वा उच्च कुलांत जन्म होतो त्यास गोत्र कर्म म्हणतात. याचे भेद दोन आहेत.

उच्चगोत्र व नीचगोत्र

**✻ उच्चगोत्र कर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना लोकपूजीत कुलांमध्ये जन्म होतो ते उच्चगोत्रकर्म होय.

**✻ नीचगोत्र कर्म –** ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना निंद्य नीच कुलांमध्ये जन्म होतो ते नीचगोत्र कर्म होय.

## अंतराय कर्म

**प्रश्न – अंतराय कर्म कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना दानादि कार्यामधे विघ्न येते ते अंतराय कर्म होय.

याचे भेद पाच आहे.

**✻ दानांतराय कर्म –** ज्या कर्माचे निमित्त असतांना दानकार्यामधे अंतराय आणण्यात निमित्त असते ते दानांतराय कर्म होय. असेच चारही प्रकारावर लावा. दानाच्या जागी लाभादिक ठेवा.

## पुण्य-पाप कर्मांची विभागणी

✻ पुण्यकर्म - ६८ आहेत.

| वेदनीय | आयु | गोत्र | नाम |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १, सातावेदनीय | ३, दे. म. तिर्यंचायु | १ उच्चगोत्र | ६३ शुभनामकर्म |

= ६८

✻ शुभनामकर्मांचे भेद - ६३ आहेत.

| गति | आनुपूर्वी | जाति | शरीर | अंगोपांग |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| २, देव व मनुष्य | २, देव व मनुष्य | १, पंचेद्रिय | पाचही | तीनही |

| निर्माण | बंधन | संघात | संस्थान | संहनन | स्पर्शादि | त्रस |
|---|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | ५ | ५ | १ स. सं. | १ व. वृ. ना. | २० | १ |

| अगुरुलघु | परघात | आतप | उद्योत | उच्छ्श्वास | विहायोगति |
|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | १ | १ | १ | १ | १ |

१ प्रत्येक - १ सुस्वर - १ शुभ - १ सुभग - १ बादर - १ पर्याप्तक
१ आदेय - १ यशस्कीर्ति - १ स्थिर - १ तिर्थंकर = ६३

✻ अघाति कर्मामध्येच पुण्य व पाप असा भेद आहे. घातिकर्म सर्वच पापच आहे.

✻ पापकर्मांचे भेद - १०० आहेत.

| ४७ घातिकर्मांचे-ज्ञानावरण | -द. | - मो. | अंतराय |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ५ | +९ | +२८ | +५= ४७ |

+ १ असातावेदनीय + १ नरकायु + १ नीचगोत्र + ५० अशुभनामकर्मांच्या प्रकृती = १०० पापकर्म आहेत.

अशुभनामकर्मांच्या ५० प्रकृती -

| ग. | आ. | जा. | सं. | संह. | स्प. | उ. | अ.विहायोगति |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| २ | २ | ४ | ५ | ५ | २० | १ | १ |

१ स्था. - १ सू. - १ अपर्याप्तक - १ अनादेय - १ अशुभ - १ दुर्भग-
१ दुस्वर - १ अस्थिर - १ साधा - १ अयशस्कीर्ति = ५० प्रकृती

५० अशुभनामकर्म + घातिकर्म ४७ + १ आ. + १ गो. + १ असाता वे. = १०० प्रकृती पाप कर्माच्या आहेत.

* २० स्पर्शादि पुण्य व पाप दोन्ही रूप आहेत. म्हणून १६८ संख्या होते. वस्तुत: १४८ भेद आहेत.

## घातिकर्म व अघातिकर्माचे स्वरूप

* जीवाच्या अनुजीवी गुणांच्या पर्यायाच्या घातामधे ज्याची निमित्तता असते ते घातिकर्म होय. याचे भेद ४ आहेत.

* जीवाच्या अनुजीवी गुणांच्या पर्यायाच्या घातात जे निमित्त होत नाही ते अघातिकर्म होय.

* **घातिकर्माचे भेद –** २ - सर्वघाति व देशघाति

* **सर्वघाति कर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना अनुजीवी गुणांचा पर्यायीचा पूर्णत: घातामधे निमित्त होतो ते सर्वघातिकर्म होय.

* **देशघाति कर्म –** ज्या कर्माचा उदय अनुजीवी गुणांच्या पर्यायाच्या अंशत: घातामधे निमित्त असतो ते देशघाति कर्म होय.

* घातिकर्माच्या प्रकृती -

| ज्ञानावरण | दर्शनावरण | द. मोहनीय | चा. मोहनीय | अंतराय |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ५ | ९ | ३ | २५ | ५ |

**प्रश्न – सर्वघाति व देशघातिंचे प्रकृती किती ?**

उत्तर - सर्वघाति प्रकृती -

**सर्वघाति**

| | |
|---|---|
| १ ज्ञानावरण- | केवल ज्ञानावरण |
| ६ दर्शनावरण- | १ केवलदर्शनावरण + ५ निद्रादीकर्म |
| २ द. मोहनीय - | मिथ्यात्व, सम्यक् मिथ्यात्व |
| १२ चारित्र मोहनीय - | ४ अनंतानुबंधी + ४ अप्रत्याख्यान + ४ प्रत्याख्यानावरण |

२१ सर्वघाति प्रकृती

**देशघाति**

| | |
|---|---|
| ४ ज्ञानावरण- | मति, श्रुत, अवधि, मन: पर्यय |
| ३ दर्शनावरण- | चक्षु, अचक्षु, अवधि |
| १ सम्यक् प्रकृति- | सम्यक् प्रकृती |
| ४ सं. क. + ९ नोकषाय- | चारित्रमोहनीय |
| ५ अंतराय कर्म- | दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य |
| २६ देशघाति कर्म | |

✻ **जीवविपाक कर्म–** ज्या कर्माचो फल जीवाच्याच ठिकाणी होते. ते जीवविपाकी कर्म होय. याचे भेद - ७८ प्रकृति होय.
४७ घातिकर्म + २ गोत्र कर्म + २ वेदनीय कर्म + २७ नामकर्म = ७८ जीवविपाकी

✻ **क्षेत्रविपाकीकर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना विग्रहगतीमधे ( क्षेत्रानुसार फल होते ) जीवाचा आकार पूर्वशरीरा सारखा राहतो त्यास क्षेत्रविपाकीकर्म म्हणतात. याचे भेद ४ आहेत. ४ आनूपूर्वी ह्यांचा उदय विग्रहगतीतच असतो.

✻ **भवविपाकी कर्म –** ज्या कर्माचा उदय असतांना जीव त्या त्या भवामधे राहतात, त्यास भवविपाकी कर्म म्हणतात, त्याचे भेद - ४ आयु.

✻ **पुद्‌गलविपाकी कर्म –** ज्या कर्माचे फल जीव संबंधी पुद्‌गलावरच पडते व शरीर प्राप्त झाल्यावरच त्यांचा उदय सुरु होतो. त्या ६२ आहेत.

## स्थितीबंध

**प्रश्न – स्थितीबंध कशास म्हणतात ?**

उत्तर - कर्म जो पर्यंत आत्म्याबरोबर कर्मरूपात राहते त्या कालमर्यादिला स्थितिबंध म्हणतात.

| कर्म | उत्कृष्ट स्थिती |
|---|---|
| ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय व अंतरायकर्माची | ← प्रत्येकी ३० कोडाकोडी सागर |

| | | |
|---|---|---|
| दर्शनमोहनीय कर्माची | ← | प्रत्येकी ७० कोडाकोडी सागर |
| चारित्रोहनीय कर्माची | ← | प्रत्येकी ४० कोडाकोडी सागर |
| नाम व गोत्र कर्माची | ← | प्रत्येकी २० कोडाकोडी सागर |
| आयु कर्माची | ← | प्रत्येकी ३३ सागर |

| | | | |
|---|---|---|---|
| * वेदनीय कर्माची | → | १२ मुहूर्त आहे | ← जघन्य स्थितीबंध |
| * नाम-गोत्र कर्माची | → | ८ मुहूर्त आहे | |
| * बाकी पाच कर्माची | → | अंतर्मुहूर्त आहे | |

* एकाकोटीस एकाकोटीने गुणीले असता जो गुणाकार येतो. त्यास कोडाकोडी म्हणतात.

| | |
|---|---|
| * असंख्यात व्यवहारपल्याचा | = १ उद्धारपल्य |
| असंख्यात उद्धारपल्याचा | = १ अद्धापल्य |
| दहा कोडाकोडीचा उद्धारपल्याचा | = १ सागर |
| असंख्यात समयांची | = १ आवली. |
| असंख्यात आवलींचा | = १ श्वासोच्छ्श्वास |
| ३७७३ श्वासोच्छ्श्वास | = १ मुहूर्त |
| ४८ मिनीटांचा | = १ मुहूर्त |

* **अंतर्मुहूर्त** – आवली वरून अधिक व मुहूर्तापेक्षा कमी काल म्हणजे अंतर्मुहूर्त होय.

* **श्वासोच्छ्वास** – निरोगी पुरूषाच्या नाडीच्या एका ठोक्यास श्वासोच्छ्श्वास म्हणतात.

## अनुभागबंध

* कर्माच्या फलदायक शक्तिच्या हीनाधिकतेला अनुभागबंध म्हणतात.

## प्रदेश बंध

* बांधल्या जाणाऱ्या कर्मपरमाणूंच्या संख्येचा निर्णय होणे यास प्रदेश बंध म्हणतात. ह्यांच्या विभागणीचा नकाशा खालील दिला आहे.

| | वेदनीय कर्म | मोहनीय | ज्ञानावरण | दर्शनावरण | अंतराय | नामकर्म | गोत्रकर्म | आयुकर्म |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २, मानभाग | २८८० | २८८० | २८८० | २८८० | २८८० | २८८० | २८८० | २८८० |
| एक भाग | + ५७६० | + १४४० | + १२० | +१२० | +१२० | +४५ | +४५ | +३० |
| एकुण | ८६४० | ४३२० | ३००० | ३००० | ३००० | २९२५ | २९२४ | २९१० |

याचा खुलासा पुढील पानावर दिला आहे.

उदा. प्रदेश बंधाच्या विभागणीचे आहे.
✻ समयप्रबद्धाचे प्रमाण - ३०७२० घेतले व आवलीचे प्रमाण - ४
✻ ३०७२० ÷ ४ = ७६८० हा एक भाग मुळ द्रव्य - ३०७२० - ७६८० = २३०४० हा बहुभाग आठ कर्मात समान वाटा -२३०४० ÷ ८ = २८८० प्रत्येक कर्मास समान दिला. ७६८० हा एक भाग शिल्लक होता. त्याला ४ ( संख्यातानी ) ने भागा. ७६८० ÷ ४ = १९२० हा एक भाग मुल द्रव्य - ७६८० - १९२० = ५७६० हा वेदनीयाला द्या. १९२० ÷ ४ = ४८० हा एकभाग १९२० - ४८० = १४४० हा बहुभाग मोहनीयाला दिला. शिल्लक एक भाग ४८० ÷ ४ = १२० एक भाग ४८० - १२० = ३६० हा बहुभाग
✻ ( १ ) ज्ञा. क. ( २ ) द. क. ( ३ ) अं. क. ह्या तीन कर्मामधे समान द्या. ३६० ÷ ३ = १२० प्रत्येकाला द्या. राहिलेला एक भाग १२० ÷ ४ = ३० हा एक भाग १२० - ३० = ९० हा नाम व गोत्रास समान द्या. ९० ÷ २ = ४५ शिल्लक एक भाग ३० आयुकर्मास द्या. ह्या प्रमाणे आठही कर्मास मिळालेला समानभाग व एकभाग ह्यांची बेरीज तेवढे द्रव्य प्रत्येकाच्या वाट्यास आले.

## कारणांचे भेद

✻ **उपादान कारण –** जे कारण स्वयं कार्यरूप होते ते उपादान कारण होय

✻ **निमित्त कारण –** जे कारण स्वयं कार्यरूप न होता कार्यकाली असते मात्र, ते निमित्त कारण होय. ह्यामधे कारणत्वाचा उपचार होतो.

✻ **समर्थउपादान कारण –** उपादान व निमित्त कारणांच्या समग्रतेला समर्थउपादान कारण म्हणतात. हे कारण असतांना अनंतर उत्तर समयात कार्य होतेच. २. पूर्व पर्याय विशिष्ट द्रव्य हे समर्थ उपादान कारण होय यालाच निश्चय उपादान म्हणतात.

✻ **असमर्थ कारण –** वेगवेगळे प्रत्येक कारणास असमर्थ कारण म्हणतात. हे कारण असतांना कार्य होतच नाही.

उदा. उपादान कारण = घागरेची माती

निमित्त कारण = कुंभार वा त्याचे चाकादि.

समर्थ उपादान कारण = घागर बनण्याच्या अनंतर पूर्व समयातील मातीयुक्त पर्याय.

असमर्थ कारण = कुंभार, चाकादि एकएकटे कारण

✻ आस्त्रव व बंधाचे स्वरूप सम्यक्त्वाच्या वर्णनात पहा.

✻ **भावबंधाचे उपादान कारण –** भावबंधाच्या अनंतरपूर्व समयवर्ती योग कषाययुक्त आत्मा भावबंधाचे उपादान कारण.

✻ **भावबंधाचे निमित्त कारण –** उदय उदीरणेला प्राप्त पूर्वबंद्ध कर्म भावबंधाचे निमित्त कारण होय.

✻ **द्रव्यबंधाचे उपादान कारण –** बंध होण्याच्या पूर्व समयवर्ती बंध होण्यास सन्मुख विस्त्रसोपचयरूप कार्माणवर्गणा द्रव्यबंधाचे उपादान कारण होय.

**प्रश्न – द्रव्यबंधाचे निमित्त कारण काय ?**

उत्तर - आत्म्याचे योग कषायरूप परिणाम हे द्रव्यबंधाचे निमित्त कारण होय.

**प्रश्न – उदय कशास म्हणतात ?**

उत्तर - कर्म निषेकांची स्थिती पूर्ण होताच कर्माने फल देणे यास उदय म्हणतात.

✻ **उदीरणा –** बांधलेली कर्मस्थिती संपण्याच्या अगोदर कर्मानी फल देण्यास तयार होणे ह्यास उदीरणा म्हणतात.


उदय व उदीरणा

नकाशा पुढील पानावर

**प्रश्न – आबाधा कशास म्हणतात ?**

उत्तर - कर्माचा बंध झाल्यानंतर ज्या काळापर्यंत ते उदयास येत नाही त्यास आबाधा म्हणतात. ह्यांत निषेक रचना होत नाही.

## उदय उदीरणेचा नकाशा




१००००० ह्या ३४ व्या समयांत एक लाख परमाणू आहेत. त्यातील २००० परमाणू ६ ते १५ पर्यंतच्या निषेकात ( उदयावलीत ) आले म्हणजे ते कर्मस्थिति संपण्या अगोदर फल देणार त्यास उदीरणा म्हणतात. उदीरणेतील परमाणू उदयावलीतच येतात. त्या बाहेर नाही.


उदयावली

उदयावली - ज्यामधील निषेक क्रमाक्रमाने उदयास येतात. त्यास उदयावली म्हणतात.

हे उदीरणा होऊन आलेले द्रव्य होय. २००० परमाणू ह्या सहाव्या समयांत आहे. त्यांची स्थिती ६ समयाची आहे. ते परमाणू त्याच काली फल देतात. तो उदय होय.

✻ **अपकर्षण** – कर्म निषेकाची स्थिती व अनुभाग कमी होणे यास अपकर्षण म्हणतात.

## अपकर्षणाचा नकाशा




१०००० परमाणू २१ व्या समयात आहेत. त्यातील १००० परमाणू १६ व्या समया पासूनखाली एक समयापर्यंत कुठेही आले तर ते अपकर्षण होय.


हे अपकर्षण होऊन आलेले अपकर्षित परमाणू होय. अपकर्षित कर्म परमाणू उदयावली व उदयावलीच्या बाहेरही येतात.

---

✻ **उत्कर्षण** – कर्म परमाणूंची स्थिती व अनुभाग वाढणे यास उत्कर्षण म्हणतात

हे त्याच्याच वा त्याच्या सजातीय प्रकृतीचा बंध असेल तरच होते.

## उत्कर्षणाचा नकाशा


समय
निषेक
ह्या निषेकात ९ परमाणू आहे
३६
३५
३४
३३
३२
३१
३०
२९
२८
२७
२६
२५
२४
२३
२२
२१
२०
१९
१८
१७
१६
१५
१४
१३
१२
११
१०
९
८
७
६
सत्तेतील कर्म परमाणूंच्या स्थितीचा नकाशा
२२-२४ निषेकांत ६ व्या समयातील १०० परमाणू आले तर ते अनुभागाचे उत्कर्षण होय. कारण त्या १०० परमाणूंचा अनुभाग वाढला आहे.
५१२ परमाणू आहेत
५ समयाचा आबाधा
नविन बांधलेल्या कर्माचा नकाशा
२००० कर्मपरमाणूंचे उत्कर्षण होऊन ह्या नवीन बंधामधे गेले हे उत्कर्षण होय. कारण ह्यांची स्थिती वाढली आहे. हे स्थितीचे उत्कर्षण होय.
ह्या १७ समयातील ७००० परमाणू पैकी २००० कर्मपरमाणूंचे उत्कर्षण होऊन नवीन त्याच कर्माच्या बंधामधे गेले. हे स्थितीचे उत्कर्षण होय. - खालील निषेकांत परमाणू जास्त असतात व अनुभाग कमी असतो वर वर परमाणू कमी कमी व अनुभाग अधिक असतो. जेव्हा खालील निषेकातील परमाणू वरील निषेकांत जातात तेव्हा अनुभागाचे उत्कर्षण होते.

✻ **संक्रमण –** एका सजातीय प्रकृतीचा त्याच कर्माच्या दुसऱ्या सजातीय प्रकृतीमधे बदलणे ह्यास संक्रमण म्हणतात.

✻ हे संक्रमण आयुकर्माच्या उत्तर भेदांत व दर्शनमोहनीयाचे चारित्रमोहनीयामधे होत नाही.

## संक्रमणाचे उदाहरण


| | | |
|---|---|---|
| मिथ्यात्व | सम्यक् मिथ्यात्व | सम्यक् प्रकृती |
| १०००० | →५००० | → २००० |

हे मिथ्यात्वाचे सम्यक् मिथ्यात्व व सम्यक् प्रकृतित झालेले संक्रमण होय.


## क्षयोपशम

**प्रश्न – क्षयोपशम कशास म्हणतात ?**

उत्तर - वर्तमान निषेकामध्ये आता उदयास येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभाविक्षय, पुढे उदयास येणाऱ्या सर्वघाती स्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम व त्याच्याच देशघाति स्पर्धकांचा उदय अशी कर्माची अवस्था म्हणजे क्षयोपशम होय.



**⁕ निषेक –** आता उदयास येणाऱ्या कर्मपुंजास निषेक म्हणतात.




**⁕उदयाभाविक्षय –** आपल्या रूपात उदयास न येता एक समय आधि संक्रमण होते तो उदयाभाविक्षय होय.

ह्यालाच स्तिवुक संक्रमण म्हणतात. हे संक्रमण न म्हणता उदयाभाविक्षय हे नाव. ' स्व ' रूपाने उदयाचा अभाव ह्यासाठी आहे. हे एक एक समयआधीच होते. देशघातिचा प्रथम समयाचा जेव्हा उदय असतो, त्या समयी सर्वघातिचा द्वितीय निषेक देशघाति रूपांत संक्रमित होतो. तो उदयाभाविक्षय होय. ( स्वत: च्या रूपात उदयास न येणे ) असे पुढील समयी पण होत राहते.

**⁕ सद्वस्थारूप उपशम –** पुढे उदययोग्य कर्मपरमाणूंचे उदीरणेला अयोग्य होणे म्हणजे सद्वस्था रूप उपशम होय.

**⁕ अविभागप्रतिच्छेद –** ज्याचा परत विभाग होत नाही अशा फलदान शक्तिच्या अविभागी अंशास अविभागप्रतिच्छेद म्हणतात.

**प्रश्न – वर्ग कशास म्हणतात ?**

उत्तर - समान अविभागप्रतिच्छेदास धारण कारणाऱ्या प्रत्येक कर्म परमाणूस वर्ग म्हणतात.

**प्रश्न – वर्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - वर्गाच्या समुहास वर्गणा म्हणतात.

**प्रश्न – स्पर्धक कशास म्हणतात ?**

उत्तर - वर्गणेच्या समुहास स्पर्धक म्हणतात.

( ह्याचा तक्ता पुढील पानावर पहा )

## वर्ग, वर्गणा, स्पर्धकाचा नकाशा

| वर्ग १ | वर्ग १ | वर्ग १ | वर्ग १ | वर्ग वर्गणा =४ = १ |
|---|---|---|---|---|
| ९ वर्ग | ९ वर्ग | ९ वर्ग | ९ | |
| समान अविभाव प्रतिच्छेद | समान अ. प्र. परमाणू | स. अ. प्र. प्र. | स. अ. प्र. प. | १ वर्गणा |
| १० | १० | १० | १० | |
| स. अ. प्र. परमाणू | स. अ. प्र. प. | स. अविभागप्रतिच्छेद | स. अ. प्र. प. | २ वर्गणा |
| ११ | ११ | ११ | ११ | |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | ३ वर्गणा |
| १२ | १२ | १२ | १२ | ४-वर्गणा-प्रथम स्पर्धक होय |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| १८ | १८ | १८ | १८ | १ वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| १९ | १९ | १९ | १९ | २. वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| २० | २० | २० | २० | ३ वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| २१ | २१ | २१ | २१ | ४ वर्गणा / दुसरा स्पर्धक होय. |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| २७ | २७ | २७ | २७ | १ वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| २८ | २८ | २८ | २८ | २ वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| २९ | २९ | २९ | २९ | ३ वर्गणा |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |
| ३० | ३० | ३० | ३० | ४ वर्गणा तिसरा / तिसरा स्पर्धक होय. |
| स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | स. अ. प्र. प. | |

* ९ आदि आकडे म्हणजे तेवढ्या अविभाग प्रतिच्छेदास धारण करणारा प्रत्येक कर्मपरमाणू कर्मपरमाणू म्हणजे वर्ग होय.

* ४ वर्गाच्या समूहास १ वर्गणा म्हणतात.

* जेव्हा प्रथम वर्गातील अविभागप्रतिच्छेद ९ पेक्षा + एक अविभाग प्रतिच्छेद १० वाढतो, तेव्हा दुसरी वर्गणा होते. अशी एकएक वृद्धि जोपर्यंत असते तो पर्यंत एकच **( १ )** स्पर्धक असतो.

* जेव्हा अविभागप्रतिच्छेद प्रथम वर्गाच्या **( १८ )** दुप्पट होतात तेव्हा दुसरा स्पर्धक होतो, त्याच्या तिप्पट **( २७ )** होतात तेव्हा तिसरा स्पर्धक सुरू होतो.

**संकेत सूची**

* स = समान, अ. = अविभागप्रतिच्छेद, प = धारण करणारा प्रत्येक कर्मपरमाणु.ह्या नकाशातील सर्व क्रिया कर्माच्या अनुभागाची तरतमता दाखवितात.

## उपशम

**प्रश्न – उपशम कशास म्हणतात ?**

उत्तर - द्रव्य क्षेत्र काल भाव ह्यांचे निमित्त असतांना कर्माच्या फलदान शक्तिचा उद्‌भव न होणे. त्यास उपशम म्हणतात.

* भेद-दोन-सद्‌वस्थारूप उपशम व अंतरकरणरूप उपशम.


* **सद्‌वस्थारूप उपशम –** भविष्यकाली उदयास योग्य कर्मपरणामू उदीरणेला अयोग्य होणे. ( सत्ता हाच उपशम ) यास सद्‌वस्थारूप उपशम म्हणतात.

**प्रश्न – अंतरकरणरूप उपशम कशास म्हणतात ?**

उत्तर - भविष्यकाली उदयास येणाऱ्या कर्मपरमाणूंच्या निषेक मालिकेत अंतर पडणे. म्हणजेच विशिष्ट काळांतील कर्मपरमाणूंचे मागे होणे. ( अपकर्षण ) वा पुढे होणे ( उत्कर्षण ) ह्यास अंतरकरणरूप उपशम

म्हणतात. हा फक्त मोहनीयाचाच होतो.

## अंतरकरणरूप उपशमाचा नकाशा




नकाशाचा खुलासा

| | |
|---|---|
| [× × × × ×] | अंतरायाम |
| × × × × × × × × | अपकर्षित वा उत्कर्षित होऊन आलेले द्रव्य |
| ☐ | उदयावली व उपरितन स्थिती |

✻ उत्कर्षित द्रव्य नवीन बंधातच जाते. व अंतरायाम समान निषेकांत जात नाही.

* अपकर्षित द्रव्य उदयावलीत येऊन फल देते.

* **अंतरायाम** - जेवढ्या काळांतीत निषेकांचा अभाव होतो तो काळ म्हणजे अंतरायाम होय.

* **उपरितनस्थिती –** अंतरायामा वरील स्थितीस उपरितन स्थिती म्हणतात.


* अनादि काळापासून कर्माचा उदय त्या निमित्तक जीवाचे विकार व त्या निमित्तक नवीन बंध ही साखळी ह्या अंतरकरणउपशमानेच खंडीत होते. व जीव मोक्ष मार्गाचा पायाभूत असे सम्यक्दर्शन स्वयं प्राप्त करतो.

**प्रश्न – सत्ता कशास म्हणतात ?**

उत्तर - बांधलेले कर्म आत्म्याजवळ कर्मरूपात राहणे यास सत्ता म्हणतात. ही अवस्था आठही कर्माची होते.

**प्रश्न – क्षय कशास म्हणतात ?**

उत्तर - कर्म बंधातून, सत्तेतून व उदयातून नष्ट होणे यास क्षय म्हणतात.



क्षयाचा दृष्टांत

* ही क्षय अवस्था आठही कर्माची होते.

* क्षय म्हणजे कर्मरूप अवस्थेचा व्यय व कार्माणवर्गणा रूपाचा उत्पाद होय. व पुद्गलत्व रूपात ध्रौव्य.

* उपशम = कर्म उदीरणेला व संक्रमणास अयोग्य होणे.

* निधत्ति = कर्म उदीरणेला व संक्रमणास अयोग्य होणे.

* निकाचित = कर्म उदीरणा, संक्रमण, अपकर्षण व उत्कर्षणास अयोग्य होणे.

**प्रश्न – समयप्रबद्ध कशास म्हणतात ?**

उत्तर – एका समयांत कर्माचे जे अनंतानंत परमाणू बांधले जातात त्या परमाणूंच्या समूहास समयप्रबद्ध म्हणतात.

## अध्याय ३ रा

**प्रश्न – अ ) जीवाचे असाधारण ( स्वतंत्र ) भाव कोणते ? त्याचे भेद किती आहेत ?**

उत्तर - जे भाव फक्त जीवातच असतात, अन्य द्रव्यात नसतात त्यांना जीवाचे असाधारण भाव म्हणतात. ते ५ प्रकारचे आहेत.

ब ) १. औपशमिक भाव. २. क्षायिक भाव ३. क्षायोपशमिक भाव

↓ ↓ ↓

पोटभेद- २ ९ १८

४. औदयिक भाव ५. पारिणामिक भाव.

↓ ↓

पोटभेद- २१ ३

**प्रश्न – या भावांचे स्वरूप काय आहे ? त्यामध्ये निमित्त कोणते ?**

उत्तर - **औपशमिक भाव –** मोहनीयाचा उपशम असतांना जो भाव होतो तो औपशमिक भाव आहे. हा प्रशस्त ( अंतरकरण रूप ) उपशम फक्त मोहनीयाचाच होतो. त्यांचे दोन भेद आहेत. म्हणून औपशमिक भावाचेही दोन भेद आहेत.

१. औपशमिक सम्यक्त्व २. औपशमिक चारित्र

यामध्ये निमित्त अनुक्रमे दर्शन मोहनीय आणि चारित्रमोहनीय यांचा उपशम

**प्रश्न – क्षायिक भाव कशास म्हणतात ? त्याचे भेद किती ?**

उत्तर - **क्षायिक भाव –** कर्मांचा क्षय असतांना जे भाव होतात त्यांना क्षायिक भाव म्हणतात. क्षय तर आठही कर्मांचा होतो. परंतु जीवाच्या स्वभावाचे घातक चार घातिकर्म आहेत. म्हणून येथे ह्या चार कर्मांचा क्षय अपेक्षित आहे.

| निमित्त | होणारे भाव |
|---|---|
| १. ज्ञानावरणाचा क्षय<br>२. दर्शनावरणाचा क्षय<br>३. दर्शनमोह क्षय<br>४. चारित्रमोह क्षय<br>५. अंतराय क्षय<br>( अंतराय क्षयाचे भेद ५ ) | १. अनंत ज्ञान<br>२. अनंत दर्शन<br>३. क्षायिक सम्यक्त्व<br>४. क्षायिक चारित्र<br>५. क्षायिक दान, ६. क्षायिक लाभ,<br>७. क्षायिक भोग,<br>८ क्षायिक उपभोग, ९. अनंत वीर्य |

**प्रश्न – क्षायोपशमिक भाव कशास म्हणतात ? त्याचे भेद किती ?**

उत्तर - क्षायोपशमिक भाव - जे भाव कर्मांचा क्षयोपशम असतांना होतात ते क्षायोपशमिक भाव होत. हा क्षयोपशमही चार घाति कर्मांचाच होतो.

| निमित्त | होणारे भाव |
|---|---|
| ज्ञानावरणचा क्षयोपशम | ४ ज्ञाने ( मति, श्रुत, अवधि, मन:पर्यय )<br>३ अज्ञान ( कुमति, कुश्रुत, कुअवधि )<br>७ |
| दर्शनावरणाचा क्षयोपशम<br>मोहनीयाचा क्षयोपशम | ३. दर्शन ( चक्षु, अचक्षु, अवधिदर्शन )<br>१ क्षायोपशमिक सम्यक्त्व<br>२ चारित्र ( सकल संयम, देश संयम )<br>३ |
| अंतरायाचा क्षयोपशम | ५ लब्धि |
| एकूण- ७ + ३ + ३ + ५ = १८ | |

**प्रश्न – औदयिक भाव कशास म्हणतात ? त्याचे भेद किती ? निमित्त कोणते ?**

उत्तर - कर्मांचा उदय असतांना जे भाव होतात. ते औदयिक भाव होत. उदय आठही कर्मांचा होतो.

| ज्ञानावरण उदय, | दर्शनमोहउदय, | चारित्रमोहउदय, | नामकर्मोदय, | आठही कर्म |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ अज्ञान | १ मिथ्यात्व | ४ कषाय १ असंयम | ४ गति | असिध्दत्व |
| | | ↓ | | |
| | | ६लेश्या + ३ लिंग = १४ | | |

एकूण - १ + १ + १४ + ४ + १ = २१

दर्शनावरणाचे उदय असतांना अदर्शन व अंतरायाचा उदय असतांना अशक्ति हे भाव अज्ञान द्वारा गृहित आहे. ते अलग सांगितलेले नाहीत.

**प्रश्न – पारिणामिक भाव कशास म्हणतात ? त्याचे भेद किती ?**

उत्तर - ज्या भावामध्ये कर्मांचा उपशम, क्षय, क्षयोपशम, उदय यांची अपेक्षा असत नाही ते भाव पारिणामिक होत.

**१ शुद्ध पारिणामिक –** जीवत्व म्हणजेच व्यापक चेतनास्वभाव ( सामान्य )

**२ अशुद्ध पारिणामिक –** १ भव्यत्व २ अभव्यत्व ३ अशुद्ध जीवत्व

## औपशमिक सम्यक्त्व

**प्रश्न – औपशमिक सम्यक्त्वाच्या उत्पत्तीची कारणे किती ? आणि कोणती आहेत ?**

उत्तर - औपशमिक सम्यक्त्वाच्या उत्पत्तीची कारणे तीन आहेत. ( १ ) बाह्य निमित्त कारण ( २ ) अंतरंग निमित्त कारण ३ ) उपादान कारण

**प्रश्न – बाह्यनिमित्त कारण कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या अन्यद्रव्यरूप निमित्त कारणासह त्यापासून भिन्न नैमित्तिक कार्याची एकतर्फी व्याप्ति असते. ते बाह्य निमित्त कारण जाणावे.

**प्रश्न – एकतर्फी बाह्य व्याप्ति कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या दोन द्रव्याच्या दोन पर्यायामध्ये एकाच बाजूने विधिनिषेधरूप व्याप्ति घटते त्यास एकतर्फी व्याप्ति म्हणतात.

**जसे –** १. जेथे सम्यक्त्व आहे तेथे संज्ञित्व आहे. परंतु जेथे संज्ञित्व असेल तेथे सम्यक्त्व असेलच असा नियम नाही. निषेध व्याप्ती दोन्ही बाजूने घटत नाही.

२. जेथे राग आहे तेथे जीव आहे. पण जीव आहे तेथे राग असेलही अथवा नसेलही.

**प्रश्न – व्याप्ति कशास म्हणतात ? दुतर्फा व्याप्ति कशास म्हणतात ?**

उत्तर - १. अविनाभाव संबंधास व्याप्ति म्हणतात. २. जेथे दोन्ही बाजूने अविनाभाव असतो त्यास दुतर्फा व्याप्ति म्हणतात. जेथे सम्यग्दर्शन आहे तेथे मिथ्यात्व कर्माच्या उदयाचा अभाव आहे. जिथे मिथ्यात्वकर्माचा उदयाचा अभाव आहे तिथे सम्यग्दर्शन असते. २. जेथे ज्ञान आहे तेथे जीव आहे तेथे ज्ञान आहे, जेथे जीव आहे तेथे ज्ञान आहे.

**प्रश्न – समर्थ कारण कशास म्हणतात ?**

उत्तर - जे उपादान कारण अनंतर उत्तर समयात कार्यरूप होते त्यास निश्चय उपादान अथवा क्षणिक उपादान म्हणतात. त्यालाच समर्थ कारण म्हणतात. हा कार्यकारण भाव एक द्रव्याश्रित असतो. जसे घटकार्याचे उपादान कारण घटाच्या अनंतर पूर्व समयवर्ती मृत्तिका द्रव्याचा परिणाम. त्याची घट कार्याशी अंतरंग व्याप्ति असून ते निश्चय उपादान आहे.

**प्रश्न – औपशमिक सम्यक्त्वाची प्राप्ती कोण्या जीवास होते ?**

उत्तर - १ जो आसन्नभव्य आहे, २ असा चारही गतीतील मिथ्यादृष्टि जीव ३ तोही पर्याप्तकच असेल तर ४ संज्ञी पंचेंद्रिय ( तिर्यंच्य ) ( गर्भज ) मनुष्य व तिर्यंच्यासाठी असेल ५. ज्ञानोपयोगी असेल ६ जागृत दशा असेल तोच ७. गर्भज जीव सम्यक्त्व प्राप्त करू शकतो. दर्शनोपयोग असतांना सम्यग्दर्शन होत नाही.

ही कारणे असतील पर सम्यक्त्व व्हायलाच पाहीजे असा नियम नाही. परंतु प्रथमोपशम सम्यक्त्वापूर्वी ही कारणे नियमाने आहेत.

**प्रश्न – औपशमिक सम्यक्त्वाचे निमित्त कारण कोणते ?**

उत्तर - दर्शनमोहनीयाचा अंतरकरणरूप प्रशस्त उपशम व अनंतानुबंधी कषायाचा अप्रशस्त उपशम हे औपशमिक सम्यक्त्वाचे अंतरंग निमित्त आहे. अनादि मिथ्यादृष्टीला फक्त मिथ्यात्व प्रकृतीचीच सत्ता व त्याचाच उदय असतो. त्यास इतर दोहोंची सत्ताच नसते कारण त्या बंध प्रकृति नाहीत. त्यास फक्त मिथ्यात्व कर्माचे अंतरकरण होते. सादि

तिन्ही प्रकृतिचे अंतरकरण होते. या दोन्ही अवस्थेत अनंतानुबंधीचा अप्रशस्त उपशमच असतो.

* **अनादि मिथ्यादृष्टी –** ज्यास अनादिकाळापासून आजपावेतो सम्यक्त्व प्राप्त झालेलेच नाही, तो अनादि मिथ्यादृष्टी जाणावा.

* **सादि मिथ्यादृष्टी –** ज्यास सम्यक्त्व प्राप्त झाल्यानंतर जो परत मिथ्यादृष्टी होतो तो सादि मिथ्यादृष्टी जाणावा.

* सम्यक्त्व झाल्यानंतर मिथ्यात्वाचे सम्यग्मिथ्यात्व व सम्यक्प्रकृतीच्या रूपाने संक्रमण होऊन त्याची सत्ता असते.

**प्रश्न – औपशमिक सम्यक्त्वाचे उपादान कारण कोणते ?**

उत्तर - अनिवृत्ति करणाचा अंतिम समयवर्ती परिणाम हे औपशमिक सम्यक्त्वाचे उपादान कारण आहे. औपशमिक सम्यक्त्वापूर्वी पाचही लब्धि नियमाने असतात.

* औपशमिकसम्यक्त्व होतांना पाच लब्धि होतात.

१ क्षयोपशमलब्धि, २ विशुद्धिलब्धि, ३ देशनालब्धि, ४ प्रायोग्यलब्धि, ५ करणलब्धि

## चार लब्धीचे स्वरूप विशेष

| क्षयोपशम<br>१ लब्धि | विशुध्दि<br>२ लब्धि | देशना<br>३ लब्धि → | उपदेश ग्रहण<br>करण्याची पात्रता | प्रायोग्य<br>४ लब्धि |
|---|---|---|---|---|
| १. तत्त्वविचार होण्यायोग्य क्षयोपशमाची प्राप्ती.<br>२. प्रत्येक समयी अप्रशस्त ( पाप )कर्माचा अनुभाग अनंतपट कमी होणे.<br>३. आत्म-स्वरूपाचे व अध्यात्म जाणण्यासाठी ज्ञानावरणाच्या क्षयोपशमाची प्राप्ती. | १.मंदकषाय-रूप परिणाम होणे हिच विशुध्दि लब्धि होय.<br>२. प्रत्येक समयात अनंतपट विशुध्दि ( तत्त्वरूचि व धर्मानुराग वाढणे. )<br>३. अध्यात्म समजून घेण्याची उत्सुकता, तळमळ, रूचि | १. समीचीन तत्त्वाचा उपदेश देणारे मिळणे व उपदेश ग्रहण करण्याची पात्रता असणे.<br>२. शुध्द आत्मस्वरूपाचे ज्ञान होणे.<br>३. विशुध्दि लब्धीचे फळ | १. कषायांची मंदता<br>२.अभिनि-वेशाचा अभाव<br>३. वक्त्याचा ( उपदेशकाचा ) अभिप्राय जाणून घेणे<br>४. नयाचे थोडे बहुत ज्ञान<br>५. व्यक्ति विषयी दुराग्रह नसणे. | १. पूर्वबध्द व नवीन कर्माची स्थिति अंत:कोटा कोटी मात्र होणे.<br>२. पाप कर्माचा अनुभाग द्विस्थानीय होणे.( दोनरूपा-चा मात्र होणे. )<br>३. पुण्य कर्माचा अनुभाग चतु-स्थानगत होणे.<br>४. प्रदेशबंध अनुत्कृष्ट व अजघन्य होणे.<br>५. चौतीस प्रकृति बंधाप-सरण होणे. |

**प्रश्न – प्रायोग्य लब्धि कशास म्हणतात ?**

उत्तर - आसमंतात योग्यतेची प्राप्ती होणे म्हणजे प्रायोग्य लब्धि होय.

योग्यतेच्या प्राप्तीचा खुलासा - १. आयु सोडून सात कर्मांची स्थिति अंत:कोटाकोटी प्रमाण मात्र होणे व नवीन बंधही अंत: कोटाकोटी प्रमाणच होणे.

२. पाप कर्माचा अनुभाग व्दिस्थानीय म्हणजे कांजी व निंबरूपाचा होणे.

३. पुण्यकर्माचा अनुभाग चतु:स्थानीय चार प्रकारचा होणे.

४. प्रदेशबंध अनुत्कृष्ट व अजघन्य होणे.


५. ३४ प्रकृति बंधापसरण होणे.

## अनुभाग स्थानाचा खुलासा –

नूतन पापरूप घातिकर्माचा अनुभाग - १ शैल, २ अस्थि, ३ दारु व ४ लतारूप अघाति पापरूप कर्माच्या अनुभागाचा दृष्टान्त - १ हलाहल, २ विष, ३ कांजी, ४ निंबरूप

पुण्यकर्माच्या अनुभागाचा दृष्टान्त - १ अमृत, २ खडीसाखर, ३ साखर, ४ गुळ गोडी रूपाचा. १. या लब्धि मध्ये तो घातिकर्माचा अनुभाग दारु लतारूप होतो. २. या लब्धि मध्ये पाप कर्माचा अनुभाग कांजी व निंबरूप होतो. ३. तसेच तो पुण्यकर्माचा अनुभाग दोनरूपाचा होता. साखर व गुळ रूप होतो. तो वाढतो म्हणजे चार रूपाचा १ अमृत खडीसाखर ३ साखर ४ गुळ रूप होतो.

१. अंत:कोटाकोटी म्हणजे कोटी × कोटी = कोटाकोटी म्हणजेच कोटी पेक्षा जास्त व कोटाकोटी पेक्षा कमी. २ सात कर्मांची स्थिती अंत:कोटाकोटी होते. त्याचा दृष्टान्त - ३ ही अंत:कोटाकोटी स्थिती सर्व कर्मांची एकाच कांडकाने ( प्रमाणाने ) शिल्लक राहते.



✻ आठही कर्मांचा नवीन बंधही अंत:कोटाकोटीच प्रमाण पडतो.

**प्रदेशबंध**

✻ **जसे – प्रदेशबंध उदा.** जघन्य ( परमाणू १ ते १० ) अजघन्य ( ११ ते ५० परमाणू ) अनुत्कृष्ट ( ५१ ते ९९ परमाणू ) उत्कृष्ट ( १०० परमाणू ) असा चार प्रकारचा प्रदेशबंध होत असतो.

पण इथे अजघन्य ( ११ ते ५० ) व अनुत्कृष्टच ( ५१ ते ९९ ) प्रदेशबंध होतो. ( हे आकडे समजण्यासाठी आहे, तिथे गणित असंख्यातानीच असते. )

**प्रश्न – प्रकृतीबंधापसरण कशास म्हणतात ?**

उत्तर - बंध होत असलेल्या प्रकृतीतून विशिष्ट प्रकृती कमी कमी होणे हे प्रकृतीबंधापसरण होय.

✻ कर्माच्या उत्तर प्रकृती १४८ आहेत. त्यापैकी बंध होण्यास योग्य प्रकृती १२० च आहेत.

| | |
|---|---|
| २० | स्पर्शादि पैकी ४ चाच बंध होतो. |
| - ४ | |
| १६ | ५ शरीरे + ५ बंधन + व ५ संघात = १५ ह्यापैकी |
| +१० | ५ शरीरांचा बंध होतो ५ बंधन व ५ संघाताचा बंध नाही ५=१० |
| + २ | सम्यक्प्रकृती व सम्यक्मिथ्यात्व या प्रकृती बंध योग्यच नाही. |
| २८ | → एकूण अबंध प्रकृति |

✻ १४८ - २८ = १२० - ३ = आहारकशरीर व आहारक अंगोपांग व तीर्थंकर ह्या तीनचा बंध मिथ्यात्व गुणस्थानात होतच नाही.

१२० - ३ = ११७ चाच बंध जीवास होतो. त्यातून पुन:श्च प्रकृती बंधातून कमी होत जाणे हे प्रकृतीबंधापसरण होय.

ह्या लब्धीमधे हे बंधापसरण ३४ होतात. व प्रकृती ४६ कमी होतात.

## ( दोहोतील फरक )

| प्रकृतीबंधापसरण | बंधव्युच्छित्ती |
|---|---|
| फक्त ह्या ठिकाणी बंध होणार नाही ते प्रकृतीबंधापसरण होय.<br><br>दृष्टांत - मिथ्यात्व गुणस्थानात ह्या लब्धीमधे मनुष्यायु प्रकृतीचे बंधापसरण होते. पण चौथ्या गुणस्थानात बंध होऊ शकतो. | पुढील गुणस्थानात ज्यांचा बंध होणारच नाही ती बंधव्युच्छित्ती होय.<br><br>दृष्टांत - मिथ्यात्वाची बंधव्युच्छित्ति त्याच गुणस्थानात होते. तिथेच बंध आहे. पुढील गुणस्थानात बंध होणारच नाही. ती बंधव्युच्छित्ती. |

## ३४ प्रकृतींचेबंधापसरण

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नरकायु - १ अपुनरूक्त | २३ | तिर्यंचगति, आतप उद्योत-३ अ. |
| २ | तिर्यंचायु - १ अपुनरूक्त | २४ | नीच गोत्र - १ अ. |
| ३ | मनुष्यायु - १ अपुनरूक्त | २५ | अप्रशस्त विहाययोगति-१ अ. |
| ४ | देवायु - १ अपुनरूक्त | २६ | हुंडकसंस्थान सृपाटिकासंहनन दुर्भग, दुस्वर अनादेय |
| ५ | नरकगति नरकगत्यानुपूर्वी-अ. २ | | |
| ६ | सूक्ष्म अपर्याप्तक साधारण-अ. ३ | २७ | नपुंसक वेद |
| ७ | सूक्ष्म अपर्याप्तक प्रत्येक - ३ | २८ | वामन संस्थान व कीलीक संहनन-२ अ. |
| ८ | बादर अपर्याप्तक साधारण- ३ | | |
| | | २९ | कुब्जक संस्थान व अर्धनाराच संहनन-२ अ. |
| ९ | बादर अपर्याप्तक प्रत्येक | | |
| १० | द्विंद्रिय अपर्याप्तक | ३० | स्त्रीवेद - १ अ. |
| ११ | त्रिंद्रिय अपर्याप्तक | ३१ | स्वातीसंस्थान, नाराचसंहनन - २ अ. |
| १२ | चतुरिंद्रिय अपर्याप्तक | | |
| १३ | असंज्ञी पंचेंद्रिय अपर्याप्तक | ३२ | न्यग्रोधपरिमंडल संस्थान - वज्रनाराच संहनन - २ अ. |
| १४ | संज्ञी पंचेंद्रिय अपर्याप्तक | | |
| १५ | सूक्ष्म पर्याप्तक साधारण | ३३ | मनुष्यगति, मनुष्यगत्यानु- पूर्वी, औदारिकशरीर, औदारिक अंगोपांग, वज्रवृषभनाराचसंहनन- ५ - अ. |
| १६ | सूक्ष्म पर्याप्तक प्रत्येक | | |
| १७ | बादर पर्याप्तक साधारण | | |
| १८ | बादर पर्याप्तक प्रत्येक- एकेंद्रिय आतप स्थावर - ३ अ. | | |
| १९ | द्विन्द्रियजाती पर्याप्तक - १ अ | ३४ | असातावेदनीय, अ. अरतिशोक, अस्थिर अशुभ अयशकिर्ती - ६ - अ. असे ३४ वेळा प्रकृतीबंधापसरण होते. व प्रकृती अपुनरुक्त ( पुन: न आलेल्या ) ४६ होत. |
| २० | त्रिंद्रिय जाती पर्याप्तक - २ अ | | |
| २१ | चतुरिंद्रिय जाती पर्याप्तक - ३ अ | | |
| २२ | असंज्ञी पंचेंद्रियजाती पर्याप्तक | | |

ह्या प्रमाणे प्रायोग्य लब्धीचे स्वरूप संपले.

# करणलब्धि

**प्रश्न – करणलब्धि कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्याचा सम्यक्त्वाचा काल अतिनिकट आलेला आहे. व चारलब्धीपूर्वक उपयोग जेव्हा शुध्द आत्म्याकडे लागतो, म्हणजेच क्रमाने अध:करण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरणरूप परिणाम होतात. त्यास करणलब्धी म्हणतात.

**भेद – ३ – अध:करण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण.**

**प्रश्न – अध:करण कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्यामध्ये एक समयवर्ती जीवाचे परिणाम समान व असमान असतात, भिन्न समयवर्ती जीवाचे परिणाम समान व असमान होतात.

याचा खुलासा पुढील नकाशात पहा.

| समय | प्रथम खंड | द्वितीय खंड | तृतिय खंड | चतुर्थ खंड | एकूण परिणाम |
|---|---|---|---|---|---|
| १६ | जघन्य ( ५४ ) उत्कृष्ट | ज. ( ५५ ) उ. | ज. ( ५६ ) उ. | ज. ( ५७ ) उ. | |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| | ६९१ ते ७४४ | ७४५ ते ७९९ | ८०० ते ८५५ | ८५६ ते ९१२ | २२२ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १५ | ६३८ ( ५३ ) ६९० | ६९१ ( ५४ ) ७४४ | ७४५ ( ५५ ) ७९९ | ८०० ( ५६ ) ८५५ | २१८ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १४ | ५८६ ( ५२ ) ६३७ | ६३८ ( ५३ ) ६९० | ६१९ ( ५४ ) ७४४ | ७४५ ( ५५ ) ७९९ | २१४ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १३ | ५३५ ( ५१ ) ५८५ | ५८६ ( ५२ ) ६३७ | ६३८ ( ५३ ) ६९० | ६९१ ( ५४ ) ७४४ | २१० |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १२ | ४८५ ( ५० ) ५३४ | ५३५ ( ५१ ) ५८५ | ५८६ ( ५२ ) ६३७ | ६३८ ( ५३ ) ६९० | २०६ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ११ | ४३६ ( ४९ ) ४८४ | ४८५ ( ५० ) ५३४ | ५३५ ( ५१ ) ५८५ | ५८६ ( ५२ ) ६३७ | २०२ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १० | ३८८ ( ४८ ) ४३५ | ४३६ ( ४९ ) ४८४ | ४८५ ( ५० ) ५३४ | ५३५ ( ५१ ) ५८५ | १९८ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ९ | ३४१ ( ४७ ) ३८७ | ३८८ ( ४८ ) ४३५ | ४३६ ( ४९ ) ४८४ | ४८५ ( ५० ) ५३४ | १९४ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ८ | २९५ ( ४६ ) ३४० | ३४१ ( ४७ ) ३८७ | ३८८ ( ४८ ) ४३५ | ४३६ ( ४९ ) ४८४ | १९० |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ७ | २५० ( ४५ ) २९४ | २९५ ( ४६ ) ३४० | ३४१ ( ४७ ) ३८७ | ३८८ ( ४८ ) ४३५ | १८६ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ६ | २०६ ( ४४ ) २४९ | २५० ( ४५ ) २९४ | २९५ ( ४६ ) ३४० | ३४१ ( ४७ ) ३८७ | १८२ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ५ | १६३ ( ४३ ) २०५ | २०६ ( ४४ ) २४९ | २५० ( ४५ ) २९४ | २९५ ( ४६ ) ३४० | १७८ |
| | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ४ | १२१ ( ४२ ) १६२ | १६३ ( ४३ ) २०५ | २०६ ( ४४ ) २४९ | २५० ( ४५ ) २९४ | १७४ |
| | ↑ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| ३ | ८० ( ४१ ) १२० | १२१ ( ४२ ) १६२ | १६३ ( ४३ ) २०५ | २०६ ( ४४ ) २४९ | १७० |
| | ↑ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| २ | ४० ( ४० ) ७९ | ८० ( ४१ ) १२० | १२१ ( ४२ ) १६२ | १६३ ( ४३ ) २०५ | १६६ |
| | ↑ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | ↓ ↓ | |
| १ | १ ( ३९ ) ३९ | ४० ( ४० ) ७९ | ८० ( ४१ ) १२० | १२१ ( ४२ ) १६२ | १६२ |

**प्रश्न – खंड कशास म्हणतात ?**

उत्तर - एका समयात होणाऱ्या पूर्ण परिणामांच्या विभागणीला खंड म्हणतात.

**उदा. –** अध:करणाच्या प्रथम समयांत १६२ परिणाम असू शकतात. त्यातील १ ते ३९ परिणाम पहिल्याच समयांत आहेत. पुढील कोणत्याच समयी नाहीत. म्हणून तो एक वेगळा खंड झाला. ४० - ७९ हे परिणाम प्रथम व व्दितीय समयातच मिळू शकतात. पुढे नाही. म्हणून तो एक खंड झाला. ८० से १२० परिणाम प्रथम ३ समयांतच असू शकतात. पुढे नाही. म्हणून तो एक खंड झाला. तसेच १२१ ते १६२ हे परिणाम पहिल्या चार समयांत असू शकतात. पुढे नाही. म्हणून तो एक खंड झाला.

१. त्या एका खंडात जघन्य व उत्कृष्ट परिणाम विशुध्दीच्या अपेक्षेने असतात. जसे ( ज/१-उ/३९ ) असे सर्व खंडात जाणावे.

२. प्रथम समयातील जघन्यापेक्षा दुसऱ्या समयातील जघन्य परिणाम अनंतपट विशुध्द आहे. १ प्र. स. - ४० दु. स. ज.

३. प्रथम समयातील जो उत्कृष्ट परिणामापेक्षा दुसऱ्या समयातील जघन्य परिणाम अनंतपट विशुध्द आहे. जसे प्रथम समयातील ३९ ह्या उत्कृष्ट परिणामापेक्षा दुसऱ्या समयातील ७९ वा परिणाम अनंतपट विशुध्द आहे.

४. या प्रमाणे प्रत्येक समयातील जघन्यापेक्षा पुढील पुढील समयातील जघन्य परिणाम अनंत अनंतपट विशुध्द आहे. तसेच प्रथमसमयातील १ दु. स. ज. ४० ते ८० ति. स. ज. ते १२१ च. स. ज. परिणामापेक्षा प्रथम समयांतील उत्कृष्ट परिणाम ( १६२ वा ) हा अनंतपट विशुध्द आहे. त्यापेक्षा पाचव्या समयांतील जघन्य १६३ वा परिणाम अनंतपट विशुध्द असतो. याला अहिगति ( सापाची चाल ) म्हणतात. याचा नकाशा ९० पानावर पहा.


५. चय - प्रत्येक समयांतील परिणामांच्या विशुध्दतेतील वाढ ४ म्हणजे अनंत आहे. प्रथमसमय १६२-१६६ दुसऱ्या समयांतील ४ ची वाढ - आहे. असेच बाकी समांत लावा.

६. अनुकृष्टिचयधन - १ प्रथम समयांतील खंडामधील वाढ चय १ आहे. जस ३९ + १ = ४०, ३९ + २ = ४१, ३९ + ३ = ४२

१ + २ + ३ = ६ हे अनुकृष्टिचय धन आहेत.

७. फक्त या करणांतच खंड कल्पना आहे. कारण या करणांतच पुढील समयवर्ती जीवाचा परिणाम व मागील समयांतील जीवाचा परिणाम सदृश असू शकतो वा वेगळाही असू शकतो.

८. एका जीवास एका समयांतील कोणताही एकच परिणाम होतो.



| समय | जघन्य परिणाम | उत्कृष्ट परिणाम |
|---|---|---|
| ५ | १६३ | ३४० |
| ४ | १२१ | २९४ |
| ३ | ८० | २४९ |
| २ | ४० | २०५ |
| १ | १ | १६२ |

## या अध:करण परिणामांची संदृष्टि

१. **सर्वधन –** पूर्ण १६ समयांतील परिणाम ३०७२ आहेत. हे सर्वधन.

२. **समय १६ –** अध:करणाचा अंतर्मुहूर्त काल उदाहरणासाठी

३. **चय ४ –** प्रत्येक समयांतील वृध्दि

४. **निर्वर्गणाकांडक –** ही समयाच्या समानतेने रहित वरील समयवर्ती परिणाम खंड त्यांच्या कांडक प्रमाण आहेत. ( १६ समयात चार कांडक मिळतो. )

५. **संख्याताचे प्रमाण ३ –** चय काढण्याची रीत - समयाचा वर्ग = $१६^{२}$ = २५६ २५६ × ३ संख्यात = संख्यात = ७६८. सर्वधन ३०७२ ÷ ७६८ = ४ चय

६. **चयधन –** पूर्ण पंधरा समयातील चयाचे प्रमाण ( वाढ )
१६ समय - १ = १५ ÷ २ = ७॥ × ४ चय = ३० × १६ = ४८० चयधन

७. **आदिधन –** सर्वधन ३०७२ - ४८० चयधन = २५९२ आदिधन = चयाविना असणारे

८. **अंत्यसमयातील धन –** १६ समय - १ = १५ × ४ चय = ६० + १६२ ( प्रथम समयातील परिणाम = २२२ अंत्यसमयातील धन. )

९. **अनुकृष्टिचय –** उर्ध्वचय ( समया समयातील वाढ ) ४ ÷ ४ = १ चय अनुकृष्टि गच्छ ( एका समयातील खंड म्हणजे अनुकृष्टि गच्छ होय. )

१०. **प्रथम समयातील प्रथम खंड** = ४ खंड - १ = ३ खंड त्याचे निम्मे ( ३ ÷ २ ) = १॥ × ६ अनुकृष्टि चयधन - ( खंडातील वाढ ) ६ - १६२ प्रथम समयातील परिणाम = १५६ ÷ ४ = ३९ प्र. स. प्र. खंड

१६२ - ६ = १५६ ÷ ४ = ३९ प्रथम खंड.

११. अध:करणातील आवश्यके = ४ आहेत. १. समयासमयागणिक अनंतपट विशुध्दि वाढणे. २. पापकर्माचा अनुभाग द्विस्थानगत होणे. ( १ लतारूप व २ दारूरूप ) ३. पुण्य कर्माचा अनुभाग चतु:स्थानगत होणे. ( १ गुळ २. साखर, ३. खडीसाखर, ४. अमृत ) ४. स्थितिबंधापसरण - नवीन स्थितिबंध कमी कमी होवून बांधणे -

**उदा. संदृष्टि–**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंतर्मुहूर्त | १ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | २ | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| २ | अंतर्मुहूर्त | ३ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | ४ | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| ३ | अंतर्मुहूर्त | ५ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | ६ | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| ४ | अंतर्मुहूर्त | ७ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | ८ | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| ५ | अंतर्मुहूर्त | ९ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | १० | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| ६ | अंतर्मुहूर्त | ११ | १०० | १०० | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | १२ | १०० | १ प्र. कां. | समयाची स्थिति बांधत होता. |
| | | | | | समयाची स्थिति बांधत होता. |

अंतर्मुहूर्ताचे प्रमाण २ घेतले. २ समयापर्यंत समान स्थितिबंध होतो. १०० नंतर ९८ होतो. म्हणजे २ समय स्थितिबंध कमी पडतो. याला स्थितिबंधापसरण म्हणतात. असे स्थितिबंधापसरण या करणात सतत होत राहतात. हे उदाहरण आहे. आगमांत संख्यात हजार संख्या आहे.

## अपूर्वकरण

**प्रश्न – अपूर्वकरण कशास म्हणतात ?**

उत्तर - एक समयवर्ती जीवाचे परिणाम समान व असमान असतात. भिन्न समयवर्ती जीवाचे परिणाम असमानच असतात

* समयांत जर अपूर्वता ( भिन्नता ) असेल तर परिणामही भिन्नच ( अपूर्वच ) असतात.

* ह्या करणात खंड कल्पना नाही. कारण भिन्न समयातील परिणाम कधीच समान राहू शकत नाही ते भिन्नच असतात.

* एका समयांत जघन्य व उत्कृष्ट विशुध्दि असते.

### अपूर्वकरणाचा दृष्टांत नकाशा

| समय | जघन्य परिणाम | उत्कृष्ट परिणाम | चय सहीत परिणाम चय |
|---|---|---|---|
| ८ | ३५२९ | ४०९६ ← | चय<br>४५६ + ११२ =५६८ |
| ७ | २९७७ | ३५२८+५६८ ← | ४५६ + ९६ =५५२ |
| ६ | २४४१ | २९७६+५५२ ← | ४५६ + ८० =५३६ |
| ५ | १९२१ | २४४०+५३६ ← | ४५६ + ६४ =५२० |
| ४ | १४१७ | १९२०+५२० ← | ४५६ + ४८ =५०४ |
| ३ | ९२९ | १४१६+५०४ ← | ४५६ + ३२ =४८८ |
| २ | ४५७ | ९२८+४८८ ← | ४५६ + १६ =४७२ |
| १ | १ | ४५६+४७२ | ४५६ |
| ८ | ३५२९ | ४०९६ | १६+३२+४८+६४+८०+९६+११२<br>=४४८ चयधन |

ह्या करणाचा काल ८ समयाचा आहे कारण ह्याचा काल अध:करणापेक्षा निम्मेच असतो. परिणाम अधिक असतात. ४०९६

* या अपूर्व करणात -सर्वधन मूळधन उत्तरधन कालगच्छ चय

| | सर्वधन | मूळधन | उत्तरधन | कालगच्छ | चय |
|---|---|---|---|---|---|
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | ४०९६ | ३६४८ | ४४८ | ८ | १६ |

संख्याताचे प्रमाण ४ आहे ( ←── ) या खुणांचा खुलासा


प्र. स. ४५६ + ४७२ दु. स. = ९२८
दु. स. ९२८ + ४८८ ति. स. = १४१६
* चय = ८ × ८ = ६४ वर्ग × ४ संख्यात = २५६
सर्वधन ४०९६ ÷ २५६ = १६ चय
* चयधन = ८ - १ = ७ समयांत वाढ ( चय ) आहे.
७ ÷ २ = ३॥ × १६ चय = ५६ × ८ = ४४८ चयधन
* मूलधन - ( चयाविना ) ४५६ × ८ = ३६४८ मूलधन
सर्वधन = ( प्रथमसमयातील प. ४५६ + ५६८ अंतिम समयातील )
४५६ + ५६८ = १०२४ ÷ २ = ५१२ × ८ = ४०९६ सर्वधन.
अंतसमयातील धन = ८ - १ = ७ × १६ = ११२ + ४५६ प्रथमसमयातील धन = ५६८ अंतधन होय.
विशुध्दीची तरतमता = ह्या करणाच्या प्रथम समयातील जघन्य ( १ ) विशुध्दीपेक्षा उत्कृष्ट विशुध्दी ( ४५६ ) अनंतपट व त्यापेक्षा दुसऱ्या समयातील जघन्य विशुध्दि ( ४५७ ) अनंतपट व त्याच समयातील उत्कृष्टविशुध्दि ( ९२८ ) अनंतपट असेच सर्व समयात समजावे.
हे परिणाम विशुध्दतर आहेत. ह्या करणाची आवश्यके - ४ अध:करणाचे तर सर्वच शिवाय ( १ ) गुणसंक्रमण ( २ ) स्थितिकांडकघात ( ३ ) अनुभागकांडकघात ( ४ ) गुणश्रेणी निर्जरा.

**प्रश्न – स्थितिकांडक घात कशास म्हणतात ?**


उत्तर - सत्तेतील स्थिती कांडकरूपांत कमी होणे यास स्थितीकांडक म्हणतात.
* कांडक म्हणजे विशिष्ट प्रमाण
* घात म्हणजे कमी होणे. ( म्हणजेच खालील निषेकांत येणे. )

## स्थितिकांडकघात संदृष्टि


या नकाशात सत्तेतील स्थिती ३४ समय आहे.




* कांडकाचे प्रमाण ३ समय

दृष्टांत-कांडक 

प्रथम कांडक ३४ - ३३ - ३२ असे ३ समय रूप आहे. असेच तीन्ही कांडक आहेत. ह्यातील सर्वच परमाणूखाली ६ ते १८ समयात अपकर्षित होवून आले.

दृष्टांत-निषेक 

*म्हणजे तीनकांडकाने ९ समयाची ३४ ते २६ पर्यंतची स्थिती कमी झाली.

* एक कांडक खाली येण्यास काल अंतर्मुहूर्त लागतो. असे कांडक ह्या करणात संख्यात हजार होतात.

## गुणसंक्रमण

* एका सजातीय प्रकृतीचे दुसऱ्या सजातीयामधे गुणीत रूपाने बदलणे यास गुणसंक्रमण म्हणतात.

* करण परिणाम विशुध्द असल्यामुळे पापाचे पुण्यरूपच संक्रमण होते.

उदाहरण - असाता वेदनीय साता वेदनीय

↓ ↓

| | | | |
|---|---|---|---|
| प्र. समय | १ परमाणू | हा सातारूप - | १ परमाणू संक्रमित झाला. |
| द्वि. समय | ४ परमाणू | हा- सातारूप - | ४ परमाणू संक्रमित झाला. |
| तृ. समय | १६ परमाणू | हा सातारूप - | १६ परमाणू संक्रमित झाला. |
| च. समय | ६४ परमाणू | हा सातारूप - | ६४ परमाणू संक्रमित झाला. |

* असे गुणीत संक्रमण ह्या अपूर्वकरण व अनिवृत्ती करणात सतत होत राहते.

* इथे दर्शनमोहनीयाचे संक्रमण होत नाही. बाकीच्या प्रकृतींचे होते. ह्या प्रकृतींचे संक्रमण सम्यक्त्वाच्या कालात होते.

## अनुभाग कांडकघात


**प्रश्न – अनुभाग कांडकघात कशास म्हणतात ?**

उत्तर - सत्तेतील अनुभाग विशिष्ट प्रमाणात कमी होणे यास अनुभाग कांडकघात म्हणतात.

* खालील निषेकांत परमाणू अधिक असतात. व अनुभाग कमी उ - ५१२ मधे असतो. वरील निषेकांत परमाणू कमी व अनुभाग अधिक असतो. उ - ९

* जेव्हा वरील परमाणू खालील परमाणूत येतात तेव्हा अधिक असणारा अनुभाग खालील परमाणूवत् कमी कमी होतो. म्हणजेच अनुभागकांडकघात होय.

## अनुभागकांडकघात संदृष्टि




खुलासा - १. इथे सत्तेतील स्थिती २७ समय आहे.

२. इथे २७ - २ ६ - २५ - २४ ह्या समयातील परमाणू क्रमाने ९-१०-११-१२ आहेत. पण अनुभाग शक्ति तीव्र आहे.


३. त्यातील परमाणू जेव्हा खालील १ ते ७ समयात अपकर्षित होऊन आले तेव्हा तेथील परमाणूवत् अनुभाग कमी होतो हाच अनुभाग कांडकघात होय.

## गुणश्रेणी निर्जरा


**प्रश्न – गुणश्रेणी – निर्जरा कशास म्हणतात ?**

उत्तर - गुणीत रूपाने कर्म परमाणू निर्जरित होवून निघून जाणे यास गुणश्रेणी निर्जरा म्हणतात. ( आकृति नं. ६ पहा. )

# गुणश्रेणी निर्जरा


निषेककाळ
निषेक
२३
२२
२१
२०
१९
१८
१७
१६
१५
१४
१३
१२
११
१०
९
८
७
६
५
४
३
२
१
ह्या निषेकात प्रथम परमाणू १००० होते व गुणीत रूपाने ९८० आलेले
१०००
+ ९८०
१९८०
ही दोन निषेक
अपकर्षण होणारे २ निषेक ह्यात एक लाख परमाणू ( १००००० ) होते. त्यातील १०, ००० परमाणूंचे अपकर्षण झाले.
अतिस्थापनावली ज्यात अपकर्षित द्रव्य आले नाही.
गुणश्रेणी निर्जरा संदृष्टि
गुणश्रेणी निर्जरा खुलासा
१ त्यातील १००० परमाणू उदयावलीत दिले.
२ ५००० परमाणू गुणश्रेणी आयामांत दिले ( गुणितरूपांत )
३ ४००० परमाणू उपरितनास्थितीत दिले. चयरूपात
४ गुणश्रेणी आयामाच्या प्रथम निषेकात १००० परमाणू होते.
त्यात प्रत्येक समयी गुणित द्रव्य आलेले
४ + १६ + ६४ + १२८ + २५६ + ५१२
९८० + १००० = १९८० परमाणू प्रथम निषेकात झाले.
उपरितनस्थिति
इथे ४००० चयरूपांत दिले.
गुणश्रेणी आयाम
५१२
२५६ - ५१२
१२८ - २५६
६४ - १२८
१६ - ६४
( इथे ५०००= परमाणू गुणीत रूपांत आले. )
४ + १६ + ६४ + १२८ + २५६ + ५१२ = ९८० गुणित रूपाने आलेले.
उदयावली
१००० परमाणू चय रूपांत दिले.
एक एक निषेक फल देऊन निघून जातो.

उदयावलीचा एक एक निषेक उदयास येऊन निघून जातो. व गुणश्रेणी आयामातील एक एक निषेक उदयावलीत येतो. व तो जेव्हा निघून जाईल तेव्हा गुणीत रूपाने कर्मपरमाणू निघून जातील ह्यालाच गुणश्रेणी निर्जरा म्हणतात.




* **अतिस्थापनावली** – ज्या निषेकातील द्रव्य अपकर्षणासाठी घेतले त्याच्याच खालील जेवढ्या निषेकांत द्रव्य देत नाही त्या निषेकांस अतिस्थापनावली म्हणतात. ( नकाशात २१-२०-१९ निषेक )

* **अपूर्वकरणाची ४ आवश्यके** – चार प्रकारचा बंध ( नैमित्तिक ) रूपात कमी होणे.

* स्थितिकांडकघात- स्थितिसत्व कमी होते.
* अनुभागकांडकघात- अनुभागसत्व कमी होते.
* गुणश्रेणी निर्जरा - प्रदेशसत्व कमी होते.
* गुणसंक्रमण - प्रकृतीसत्व कमी होते.
* ह्या करणपरिणामांत ज्ञानोपयोग आपल्या शुध्द आत्म्याकडेच लागलेला असतो. परंतु परिणतीत मिथ्यात्व असते. कारण मिथ्यात्वाचा उदय आहे.

## अनिवृत्तिकरण

१ ह्याचा काल अपूर्वकरणापेक्षा निम्माच असतो

उदा. अपूर्वकरणाचा ८ समय व अनिवृत्तिकरणाचा ४ समय

२ अपूर्वकरणासारखा एका समयातील परिणामात जघन्य व उत्कृष्ट असा भेद असत नाही.

३ जेवढे समय तेवढेच परिणाम असतात. त्या त्या समयात जाणाऱ्या प्रत्येक जीवास तोच परिणाम होतो. कोणत्याही काळामधे वा गतीमध्ये तोच परिणाम त्या समयी होतो.


४. यावरून प्रत्येक कार्याचे उपादान नियतच आहे हे सिध्द होते.
५. ह्या करणाचा बहुभाग अपूर्वकरणाच्याच आवश्यकांनी पूर्ण होतो. व एकभागाचे दोन विभाग होतात. प्रथम भागात अंतरकरणक्रिया व दुसऱ्या भागात उपशम क्रिया होते.
६. ह्या करणांत उपयोग शुध्द आत्म्यामध्येच एकाग्र होतो. परंतु परिणतीत मिथ्यात्व असते. कारण मिथ्यात्व कर्माचा उदय असतो.
७. औपशमिक सम्यक्त्वाचे उपादान कारण - अनिवृत्तिकरणाचा अंतिम समयच असतो.
उदा. - १३७६ नंबरचा विशुध्द परिणाम
८. अंतरकरण - सत्तेतील कर्माच्या निषेकामध्ये विशिष्ट निषेकाचे अपकर्षण होते; व विशिष्ट निषेकाचे उत्कर्षण होवून निषेकमालिकेत अंतर ( खंड ) पडणे यास अंतरकरण क्रिया म्हणतात. मिथ्यात्वाची निषेकमाला खंडीत होणे.


| समय | विशुध्दीची संख्या | परिणाम |
|---|---|---|
| ४ | १३७६ | एकच |
| ३ | १३१२ | १ |
| २ | १२४८ | १ |
| १ | ११४८ | १ |

**⁕ उपशमक्रिया –** भविष्यकाली उदययोग्य कर्मपरमाणू उदीरणेस अयोग्य होणे ह्यास उपशमक्रिया म्हणतात. ( आकृति नं. ७ पहा. )


औपशमिक सम्यक्त्व ज्यावेळी प्राप्त होते तो अंतरायामाचा काळ होय. त्या सम्यक्त्वाच्या काळी मिथ्यात्व प्रकृतीचे सम्यक्मिथ्यात्वरूपाने सम्यग्मिथ्यात्वाचे सम्यक्प्रकृतिरूपाने संक्रमण होते.
( शक्ति कमी होते. )
१. प्रथमस्थितिपर्यंत मिथ्यात्वकर्माचा उदय व मिथ्यात्व रूप जीवभाव आहे. नवीन मिथ्यात्वाचा बंध पण सुरू आहे.

## प्रथमोपशम सम्यक्त्वाचा नकाशा




* ↙ सत्तेतील मिथ्यात्वाचे निषेक व नवीन बांधलेल्या मिथ्यात्वाच्या निषेकांचे द्योतक.



↙ * ज्या निषेकांचे अपकर्षण व उत्कर्षण झाले त्याचे द्योतक अंतरायामातील फुल्या.



↙ * प्रथमस्थितीत आलेले अपकर्षित द्रव्य व नवीन बंधामधे आलेल्या उत्कर्षित द्रव्याचे द्योतक.



* औपशमिक सम्यक्त्व ज्यावेळी प्राप्त होते तो अंतरायामाचा काल होय. त्या सम्यक्त्वाच्या कालात उपरितन स्थितीत असणारे मिथ्यात्व, सम्यक्मिथ्यात्व व कर्म सम्यक्प्रकृतीरूपात संक्रमित होते. ( शक्ति कमी होते. ) त्याचे द्योतक होय.

* जीवाच्या मिथ्यात्व व अनिवृत्तिकरण परिणामाचे द्योतक. ↗



**( आकृति नं. ७ )**

२. याच काळात शुध्द आत्मस्वरूपात उपयोग स्वयं झुकलेला असतो, एक भाग अनिवृत्तिकरण परिणामही असतो.
३. त्या परिणामाचा एका भागाचा अर्धाभाग असतांना कर्मामध्ये ( मिथ्यात्वात दर्शनमोह ) स्वयं अंतरकरण क्रिया होते. उरलेल्या भागांत कर्माचा ( मिथ्यात्व कर्म ) त्याच्या योग्यतेने स्वयं उपशम करण ( उदरणेला अयोग्य ) होते. जीवभावाच्या कारणाने नाही.
४. अनादि काळापासून जीवांना मिथ्यात्वकर्माचा उदय आहे. त्याच समयी मिथ्यात्वाचा जीवभाव आहे. व नवीन मिथ्यात्वकर्माचा बंध ही परंपरा सतत सुरूच आहे.
५. ती परंपरा प्रथम औपशमिक सम्यक्त्वाच्या उत्पत्तिपासून खंडीत होते. अंतरायामाच्या काळातील सर्वच निषेक नष्ट झाल्यामुळे त्या काळात जीवास मिथ्यात्वाचा उदय असत नाही. जीवाला मिथ्यात्व भाव ही असत नाही. या कारणाने नवीन मिथ्यात्व कर्माचा बंध ही होत नाही.
६. येथूनच मोक्षमार्ग प्रारंभ होतो. म्हणून प्रथम अनादि मिथ्यादृष्टीस हेच प्रथमोपशम सम्यक्त्व होते हा नियम आहे.
७. परिणती अनिवृत्तिकरणाच्या अंतिम समयापर्यंत अशुध्द असते. कारण मिथ्यात्वाचा उदय आहे. परंतु उपयोगमात्र शुध्द आत्म्याच्या सन्मुख होतो. ही उपयोगाची शुध्दताच शुध्द पर्यायरूप सम्यग्दर्शनाचे उपादान कारण आहे.
८. करणपरिणामांत उपयोगाचा विषय शुध्दआत्मा. परंतु परिणती अशुध्द आहे.
९. सम्यक्त्वाच्या काळात परिणती शुध्द व उपयोगही शुध्द असतो.
१०.प्रथमोपशम सम्यक्त्वाची प्राप्ती कोणासही अनिवृत्तिकरणाच्या अंतिम समयाच्या अनंतर समयातच होते. यावरून नियत कार्याचे उपादानही नियत असते. कारण कार्यरूप सर्वच पर्याय स्वकाली नियत असतात.
११. परिणती = श्रध्दा व अभिप्रायरूप भूमिका - ( अवस्था )

उपयोग - जानन क्रियेचा झुकाव.

## द्वितीयोपशम सम्यक्त्व

**प्रश्न – द्वितीयोपशम सम्यक्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - अनंतानुबंधी ४ प्रकृतीचे विसंयोजन व दर्शनमोहाचा अंतरकरणरूप उपशम अशी कर्माची अवस्था असतांना जे सम्यक्त्व उत्पन्न होते ते द्वितीयोपशम सम्यक्त्व होय.

**प्रश्न – हे उपशम सम्यक्त्व कोणास व केव्हा होते ? कां ?**

उत्तर - जो उपशम श्रेणी मांडणार आहे. असा साधू तो जर क्षायोपशमिक सम्यग्दृष्टी असेल त्यालाच हे सम्यक्त्व होते. अंतरायामातील अंतरित द्रव्य येण्यास बंध व उदय आवश्यक असतो. या सम्यक्त्वातच तीन पैकी कुणाचाच बंध जरी नाही, तरी सम्यक्प्रकृतीचा उदय असल्यामुळे अपकर्षण होऊ शकते. म्हणून क्षयोपशम सम्यक्त्वातूनच हे द्वितीयोपशम सम्यक्त्व होते. मुनींनाच श्रेणी होत असल्यामुळे मिथ्यात्वातून होणे शक्य नाही. प्रथमोपशम सम्यक्त्वाचा काल अल्प असल्यामुळे त्यातूनही होत नाही.

**प्रश्न – अंतरंग निमित्त कोणते ?**


उत्तर - ४ अनंतानुबंधी कषायकर्मप्रकृति व दर्शनमोहाच्या तिन्ही प्रकृतींचा अंतरकरणरूप उपशम हे या सम्यक्त्वाचे अंतरंग निमित्त आहे.

**प्रश्न – विसंयोजन कशास म्हणतात ?**

उत्तर - अनंतानुबंधी कषायकर्माचे सर्वच परमाणू १. अप्रत्याख्यानावरण २. प्रत्याख्यानावरण ३. संज्वलन या रूपाने संक्रमित होवून अनंतानुबंधीचे सत्त्व, बंध, उदय कांहीच असत नाही. तथापि याला क्षयही म्हणता येत नाही. कारण मिथ्यात्वात आल्यानंतर त्याचा पुनश्च बंध होतो. याच्या विसंयोजनासाठी प्रथमत: तीन करणे होतातच.

✻उपादान कारण - दुसऱ्यावेळी होणाऱ्या अनिवृत्तिकरणाचा अंतिम समयवर्ती परिणाम हे उपादान कारण आहे. ( आकृती नं. ८ पहा. )

## द्वितीयोपशम सम्यत्क्वाची संदृष्टि (नकाशा )




(आकृती नं. ८ )

## नकाशाचा खुलासा -


*हे सम्यक्त्व होणारा जीव क्षयोपशमिक सम्यक्‌दृष्टीच असल्यामुळे उदयास येणारे कर्म सम्यक्‌प्रकृतीच आहे. म्हणून प्रथम सम्यक्‌प्रकृती कर्म व नंतर क्रमाने दोन कर्म आहेत.

* यामध्ये सम्यक् प्रकृतीचा अंतरायाम छोटा व सम्यक् मिथ्यात्व, मिथ्यात्वाचा अंतरायाम मोठा आहे कारण या दोनचा उदय नसल्यामुळे सम्यक्‌प्रकृतीच्या प्रथमस्थिती समान निषेकामधे त्या दोन प्रकृती समकालीन निषेकांत सम्यक्‌प्रकृतीरूपाने संक्रमित होतात.

*सम्यक्‌प्रकृतीच्या अंतरायाम समान मिथ्यात्व व सम्यक्‌मिथ्यात्वाचे निषेक अपकर्षण करून सम्यक्‌प्रकृतीमधे प्रथमस्थितीत आले.



* तीन्ही कर्माच्या अंतरायाम वर समान आहे व खाली मिथ्यात्व व सम्यक्‌मिथ्यात्वाचा मोठा आहे.




* इथे उत्कर्षण होत नही. कारण तीन्ही प्रकृतीपैकी कुणाचाच बंध नाही.

* हे सम्यक्त्वही पूर्ण निर्मलच असते.

* द्वितीय स्थितीतील तिन्ही कर्माचा उपशम होतो. 

*नंतर परत तीन करण करतो व अनिवृत्तिकरणाचा बहुभाग संपून एक भाग शिल्लक राहतो. त्या एक भागाच्या अर्ध्याभागात मोहनीयाच्या ( दर्शनमोहनीयाच्या तीन प्रकृतींचे अंतरकरण करतो. ) राहिलेल्या अर्ध्याभागात द्वितीयस्थितीतील कर्म परमाणूचे उपशमन करतो.

*अनिवृत्तिकरणाचा अंतिम समय व सम्यक्‌प्रकृतीच्या उदयाचा अंतिम समयही संपतो. त्याच क्षणी हा जीव द्वितीयोपशम सम्यक्‌दृष्टि होतो.

*या सम्यक्त्वाच्या कालात तो शुध्दआत्मानुभूतीचे अनुभवन करतो.

**प्रश्न – औपशमिक चारित्र कशास म्हणतात ?**

उत्तर – संपूर्ण चारित्रमोहनीय कर्माचा अंतरकरणरूप उपशम असताना आत्मस्वरूपात लीनता होते. त्यास औपशमिकचारित्र म्हणतात.

* ह्या चारित्राचा पर्याय पूर्ण शुध्दच असतो पण काल अंतर्मुहूर्तच आहे.

**प्रश्न – हे चारित्र कोणास होते ? त्याचे अंतरंग निमित्त कोणते ?**

उत्तर - बाह्य निमित्तकारण = द्वितीयोपशमसम्यक्दृष्टी वा क्षायिक सम्यग्दृष्टी अशा मुनीलाच होते.

* अंतरंग निमित्त कारण = अनंतानुबंधी ४ चे विसंयोजन व चारित्रमोहनीयाचा २१ प्रकृतीचा अंतरकरणरूप उपशम हे अंतरंगनिमित्त आहे.

* उपादान कारण = उपशमश्रेणीच्या सूक्ष्मसांपराय गुणस्थानाचा अंतिम समयवर्ती परिणाम.


* हे चारित्र सुरवात करणारा मुनीच असतो. त्यांना बारा ( ४ अनंतानुबंधी ४ अप्रत्याख्यानावरण व ४ प्रत्याख्यानावरण = १२ ) कषायप्रकृतींचा क्षयोपशम असतोच. ( अनुदय - १२ ) संज्वलनाच्या ४ पैकी एकावेळी एकाच कषायाचा व ३ वेदांपैकी एक वेदाचा उदय असतो. म्हणजे उदयमान - २ ( नकाशाचा खुलासा )

* हे चारित्र होणाऱ्यास बंध ४ सं. कषायांचा व एका वेदाचा असतो. = ५ प्र.

*उदयमान दोनचा ( १ कषाय + १ वेद ) अंतरायाम छोटा ××× व १९ अनुदयमानाचा ×××××× अंतरायाम मोठा असतो कारण त्यांच्या प्रथमस्थितीसमान सर्व निषेकांचे उदयमान दोन प्रकृतींच्या प्रथमस्थिति समानकालीन निषेकांत संक्रमण होते. ←

* इथे अंतरित द्रव्याचे अपकर्षण व उत्कर्षण दोन्ही होतात कारण इथे बंध व उदय ( त्या कर्माचा ) सुरू आहे.

( आकृती नं. ९ पहा )




अनुदय मान प्रकृतींचा अंतरायाम

(आकृती नं. ९)

*हा जीव सातव्यागुणस्थानातच क्षायिक वा द्वितीयोपशम सम्यक्दृष्टि होतो. नंतर असंख्यात वेळा सहाव्या - सातव्या गुणस्थानांत परावर्तन करतो. व सातिशय अप्रमत्त होतो. म्हणजेच उपशम श्रेणीसाठी अध:करण परिणाम करतो. ( चारित्रमोहनीयाच्या उपशम प्रक्रियेला प्रारंभ होतो. )
*अपुर्वकरणाच्या आवश्यकांनी आठव्या गुणस्थानाचा काल पूर्ण करतो.
*६ नोकषायांचा उपशम इथेच होतो. व इथेच उपशमकरणादि बंद होतात.
१. उपशमकरण बंद होणे, - उपशमित कर्मपरमाणू उदीरणेला योग्य होतात.
२. निधत्तिकरणबंद होते उदीरणेला व संक्रमणास अयोग्य होते. ते त्यास योग्य होतात.
*निकाचितकरण बंद होणे - उदीरणा, संक्रमण, उत्कर्षण, अपकर्षणास अयोग्य होते ते इथून योग्य होतात.
*अनिवृत्तिकरणाचा बहुभाग अपूर्वकरणसमान आवश्यकांनी पूर्ण होतो. व एका भागात, अंतरकरण, उपशमकरण बंधापसरण, क्रमकरण, देशघातिकरण सूक्ष्मकृष्टिकरणादि क्रिया होतात. ( ह्याचा खुलासा चारित्राच्या ( क्षायिक ) काली करणार आहोत. )
*दहाव्या गुणस्थानांत सूक्ष्मकृष्टीचे वेदन ( उदय ) करून क्रमाने उदयास येऊन सूक्ष्म लोभही संपतो व अकराव्यात जातो.
*तिथे एकाही कषायांचा उदय व निषेक नसल्यामुळे पुर्णत: आत्मस्वरूपांत लीन होतो. हेच औ. चारित्र होय. अकराव्या गुणस्थानातून तो खाली पडतो त्याचे दोन कारणे आहेत.
***भवक्षय व कालक्षय.**
***भव क्षय –** आयुष्य संपून मरण आले तर चवथ्या गुणस्थानातच येतो.

## काल क्षय

औपशमिक चारित्राच्या कालानंतरही अंतरायाम शिल्लकच असतो. त्यामुळे तो सूक्ष्म लोभाच्या उदयाने खाली आला असे नसून त्या भावाचा काल संपला म्हणून पडतो. ज्यावेळी काल संपतो, तेव्हा अंतरायामातील

निषेकांची उदीरणा होऊन ते खाली येतात व सूक्ष्मलोभाचा उदय सुरू होतो. ( आकृती नं. १० पहा. )

*यावरून हे स्पष्ट होते की, करणानुयोगही तेथे निमित्तास कर्ता मानत नाही. बाह्य व्याप्तीच ( अविनाभाव ) मानतो. ( आकृती नं. १० पहा. )

## क्षायिक भाव

## क्षायिक सम्यक्त्व

नऊ क्षायिक भावापैकी प्रथमत: क्षायिक सम्यक्त्व प्राप्त होते.

**प्रश्न – क्षायिक सम्यक्त्व कशास म्हणतात ?**

उत्तर - ४ अनंतानुबंधी व दर्शनमोहनीयाच्या ३ ( १ मिथ्यात्व २ सम्यग्मिथ्यात्व ३ सम्यक्प्रकृति ) अशा ७ प्रकृतिचा उदय, बंध व सत्ता या तिन्ही प्रकारे पूर्णपणे अभाव झाला असतांना जे सम्यक्त्व प्रगट होते ते क्षायिक सम्यक्त्व होय.

**प्रश्न – हे क्षायिक सम्यग्दर्शन कोणास होते व केव्हा, कोणत्या बाह्य साधनाच्या सद्भावात होते ?**

उत्तर - कर्मभूमितीलच मनुष्य जर तो क्षयोपशम सम्यग्दृष्टि असेल तर त्यास केवली आणि श्रुतकेवलींचे चरण सान्निध्यात क्षायिक सम्यक्त्व प्राप्त होते.


**प्रश्न – त्यास क्षायोपशमिक सम्यग्दर्शन आवश्यक कां आहे ?**

उत्तर - क्षय हा स्व वा पराच्या उदयमुखानेच होतो. प्रथम व द्वितीय औपशमिक या दोन्ही सम्यक्त्वांत उदय नसतो म्हणून त्यातून दर्शन मोहनीय व अनंतानुबंधीचा क्षय होत नाही. क्षयोपशमिकांत ( सम्यक्त्वात ) सम्यक् प्रकृतीचा उदय असतो, म्हणून त्या मुखाने दर्शनमोहनीयाचा क्षय होतो.

**प्रश्न – तो कर्मभूमीचा मनुष्य का असावा ?**

उत्तर - केवली अथवा श्रुतकेवलीचे चरणसान्निध्य कर्मभूमीतच प्राप्त होवू शकते. म्हणून त्याची सुरवात मनुष्य गतीतच होते.

## कालक्षयाचा दृष्टांत


सत्तेतील सूक्ष्म लोभाचे निषेक
वरील लोभाचे निषेक उदीरणा होऊन येतात.
औपशमिक चारित्राचा काल
अंतरायामाचा काल
इथून सूक्ष्म लोभाचे निषेक संपले

**प्रश्न – क्षायिक सम्यक्त्वाचे अंतरंग निमित्त कोणते ?**

उत्तर - अंतरंग निमित्त कारण - ४ अनंतानुबंधीचे विसंयोजन ३ दर्शनमोहनीयाचा क्षय याचे निमित्त ( अंतरंग ) असतांना क्षायिक सम्यक्त्व उत्पन्न होते.

*उपादान कारण - कृतकृत्यवेदक सम्यक्त्वाचा अंतिम समयवर्ती परिणाम हे क्षायिक सम्यक्दर्शनाचे उपादान कारण आहे.

## क्षायिक सम्यक्त्वाच्या उत्पत्तीची प्रक्रिया

*एक क्षायोपशमिक सम्यक्दृष्टि ज्याचा क्षायिक सम्यक्त्वाचा नियत काळ आलेला आहे तो प्रथमत: तीन करण परिणाम यथायोग्य प्रक्रियेने पूर्ण करतो; अनिवृत्तिकरणाचा बहुभाग काल गेल्यानंतर एका भागात अनंतानुबंधीचे गुणितरूपाने १. अप्रत्याख्यानावरण २. प्रत्याख्यानावरण ३. संज्वलन या प्रकृतिरूपाने पूर्णत: संक्रमण ( विसंयोजन ) करतो.

उदा. - अनंतानुबंधीचे दक्षलक्ष परमाणू होते ते सर्वच अप्रत्याख्यानावणादिरूप १०००००० → १०, ००००० गुणितरूपाने परिणमनात त्यांची सत्ताच नष्ट होते. नंतर अंतर्मुहूर्त विश्राम करून नंतर पुन: तीन करणपरिणाम करतो. अनिवृत्तिकरणाचा बहुभाग गेल्यानंतर एका भागात मिथ्यात्वाचे क्रमाने प्रथमत: सम्यग्मिथ्यात्वरूपाने नंतर सम्यग्मिथ्यात्वाचे सम्यक्प्रकृतीरूपाने संक्रमण होवून क्षय होतो. येथे चार अनंतानुबंधी, १ मिथ्यात्व १ सम्यग्मिथ्यात्व या सहा प्रकृतींचा क्षय होतो. मिथ्यात्वाच्या क्षयानंतर अनंतुबंधीचे विसंयोजनही क्षयास प्राप्त होते. तेव्हा जीव कृतकृत्यवेदक होतो. करणपरिणामरूप पुरूषार्थ संपतो सम्यक्प्रकृतीचे फल भोगतो म्हणून वेदक.

१ ) हा कृतकृत्यवेदक जर आयुष्य संपले तर मरतो व आयुर्बंध झालेला असेल तर चार ही आयुमध्ये जाऊं शकतो. व तेथे सम्यक्प्रकृतीचा क्षय करतो.


१. कल्पातीत व कल्पवासीच देव होतो; अथवा भोगभूमितील मनुष्य वा तिर्यंच होतो; प्रथम नरकातच जातो.

अथवा २. जर आयुर्बंध झाला नसेल तर देवातच जन्म घेतो; प्रस्थापक ( क्षपणा करणारा ) क्षायिक सम्यग्दृष्टि -क्षायिक सम्यक्त्वाच्या प्रक्रियेला सुरवात करणारा हा मनुष्य गतीतच असतो.

**निष्ठापकाचे स्वरूप** – क्षायिक सम्यक्त्वाच्या पूर्णतेला करणारा चारही गतीत होतो.

१. कृतकृत्यवेदकाच्या प्रथम भागात मरण आले तर देवच होतो; २. जर दुसऱ्या भागात मरण आले तर देव अथवा मनुष्य होतो. ३. तिसऱ्या भागात मरण आले तर देव मनुष्य तिर्यंच होतो. ४. चवथ्या भागात मरण आले तर चारही आयुमधे जातो.

क्षायिक सम्यक्त्वाचा दृष्टांत



१. आयुष्य संपले नसेल तर तेथेच सम्यक्प्रकृतिचा क्षय होतो व क्षायिक सम्यग्दृष्टि होतो. २. सम्यक्प्रकृतीचे क्षयासाठी करणपरिणाम होत नाही. ३. या सम्यक्त्वाची प्राप्ती ४ ते ७ गुणस्थानापर्यंत कोठेही होऊ शकते.

## क्षायिक चारित्र

**प्रश्न – क्षायिक चारित्राचे लक्षण कोणते ? ते कोणास प्राप्त होते ?**

उत्तर - चारित्र मोहनीयाचा क्षय झाला असतांना शुध्द चारित्र म्हणजे आपल्या शुध्द स्वरूपात निराबाध स्थिरता राहणे हे क्षायिक चारित्र होय. ते चारित्र क्षायिक सम्यग्दृष्टि, चरमशरीरी, तद्भव मोक्षगामी जीवास प्राप्त होते.

**प्रश्न – क्षायिक सम्यग्दृष्टीच का असावा ?**

उत्तर - दर्शन मोहनीयाचा क्षय झाल्यानंतरच चारित्र मोहनीय आणि नंतर इतर कर्मांचा क्षय होतो. क्षायिक सम्यक्त्वानंतर चारित्रमोहनीयाचा क्षय होवून पूर्ण चारित्र प्रगट होते. क्षायिक सम्यक्दृष्टि नसेल तर तो मिथ्यादृष्टि होईल.

**प्रश्न – क्षायिकचारित्राचे अंतरंग निमित्त व उपादान कारण कोणते ?**

उत्तर – चारित्रमोहनीयाच्या अवशिष्ट २१ प्रकृतींचा क्षय हे अंतरंग निमित्त

असून, क्षपक श्रेणी मांडणारा सूक्ष्मलोभ नामक दहाव्या गुणस्थानातील अंत्य समयवर्ती शुध्दोपयोग हे क्षायिक चारित्राचे उपादान कारण आहे.

**प्रश्न – क्षायिक चारित्राची प्रक्रिया कोणती ?**

उत्तर - एक क्षायिक सम्यग्दृष्टी सप्तम गुणस्थानवर्ती साधू श्रेणिसन्मुख असतांना तीन करणद्वारा क्षपक श्रेणि मांडतो, अपूर्व करणातच उपशमकरण निधत्तिकरण, निकाचीतकरण बंद होते, ( याचे स्वरूप औपशमिक चारित्राचे प्रकरणात सांगितलेच आहे. )

⁕ **अनिवृत्तिकरणात होणारी विशेष प्रक्रिया –** १. बंधापसरण - स्थिति बंधापसरणामुळे नूतन बंध कमी कमी स्थितीपूर्वक होतो, २. सत्वापसरण - सत्तेतील कर्मांचा अनुभाग व स्थिती अनुभाग - कांडक व स्थिति कांडकाने सत्व कमी होणे. ३. क्रमकरण - आतापावेतो सात कर्मांचा जो बंध होत होता त्याचा क्रम बदलणे हे क्रमकरण होय. ४. पूर्वबंधाचा क्रम - सर्वात अधिक चारित्र मोहनीय कर्म, नंतर कमी कमी ज्ञानावरण कर्म, दर्शनावरण कर्म, अंतराय कर्म, वेदनीय कर्म, नाम-गोत्र कर्म, असा पूर्व बंधाचा क्रम असतो. पूर्वबंधाचा क्रम येणे प्रमाणे असतो. - उदाहरणसाठी

| चारित्र मोहनीय | ज्ञानावरण दर्शनावरण व अंतरायकर्म | वेदनीय कर्म | नामगोत्र |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १०००००० | १००००० | १००००० | १०००० |

**नवीन बंधाचा क्रम येणे प्रमाणे होतो.**

| वेदनीय | नामगोत्र | ज्ञानावरणादि ३ घातिकर्म | चारित्र मोहनीय |
|---|---|---|---|
| ९०० | ६०० | ४०० | २०० |


५. सर्वात जास्त स्थितिबंध मोहनीयाचा होता ( १०००००० ) तो येथे सर्वात कमी म्हणजे २०० झाला हेच क्रमकरण होय. सर्वात अधिक वेदनीयाचा ९०० झाला.

६. **देशघाति करण –** आतापावेतो बंधामध्ये देशघातिप्रकृतीतही सर्वघाति स्पर्धक राहत होते, पण येथून त्यांचे देशघाति स्पर्धक घेऊनच बंध होतो हे देशघातिकरण होय.


उदा. १. आतापावेतो देशाघातिप्रकृतीमध्ये १००० सर्वघाति स्पर्धक होते

असा बंध होत होता. आता येथून देशघातिप्रकृतिचा देशघातिच स्पर्धक घेवून बंध होतो. १०० स्पर्धक घेवून बंध होणे म्हणजेच देशघाति करण होय.

७. **संक्रमण –** आता आनुपूर्वी संक्रमणच होते - म्हणजेच क्रोधाचे मानांत मानाचे मायेत, मायेचे लोभातच संक्रमण होणे यास आनुपूर्वी संक्रमण म्हणतात. आतापावेतो कुणाचे कुणातही संक्रमण होत होते. लोभाचे कुणामध्येही संक्रमण होत नाही.



←*२१ प्रकृतीचे औपशमिक चारित्राप्रमाणेच अंतरकरण होते.




*अपूर्वस्पर्धक - पूर्वस्पर्धकाच्या जघन्य वर्गणेपेक्षा हे अत्यंत कमी अनुभाग घेऊन स्पर्धक तयार होतात. जो आतापावेतो कधीच नव्हता ह्या ५१२ मधे परमाणू अधिक व अनुभाग सर्वात कमी असतो. येथून आता त्यापेक्षाही कमी अनुभाग घेऊन स्पर्धक होतात. ते अपूर्व स्पर्धक होय.

*कृष्टिकरण - संज्वलन क्रोध, मान, माया, लोभ यांचा अनंतगुणीत अनुभाग कीमी करून सूक्ष्म खंड करणे ( अपूर्व स्पर्धकापेक्षा ) कमी कमी अनुभाग होणे.

| | क्रोध | मान | माया | लोभ |
|---|---|---|---|---|
| पूर्वस्पर्धकातील अनुभाग → | ९६ | ९५ | ९७ | ९८ |
| घातलेला ( कमी ) अनुभाग → | ६४ | ७९ | ८९ | ९४ |
| उरलेला अनुभाग → | ३२ | १६ | ८ | ४ |

अपूर्व अनुभाग ↗

असे अपूर्व स्पर्धक अनंत होतात.

✻ ह्यावेळी क्षय पावणाऱ्या मोहनीयाच्या प्रकृती.

| प्रकृती | कर्म |
|---|---|
| १६ | → १३ प्रकृती नामकर्माच्या, ३ दर्शनावरणाच्या ( निद्रानिद्रादिक ) |
| ८ | → ४ अप्रत्याख्यानावरण व ४ प्रत्याख्यानावरण कर्माचे संज्वलनामधेय संक्रमण |
| ६ | → वेद सोडून हास्यादिक नोकषाय |
| १ | → नपुंसक - वेदाचे स्त्री वेदांत |
| १ | → स्त्री वेद - वेदाचे पुरूष वेदांत |
| १ | → पुरूष वेद - वेदाचे क्रोधात |
| १ | → क्रोधाचे - मानांत |
| १ | → मानाचे - मायेत |
| १ | → मायेचे - लोभात संक्रमण होऊन क्षय |
| ३६ प्रकृती | |

१. क्षायिक चारित्र प्राप्त होण्यापूर्वी जीव क्षायिक सम्यग्दृष्टि असतोच. त्यामुळे ४ अनंतानुबंधी व ३ दर्शनमोहनीचा क्षय झालेलाच असतो.

२. चरम शरीर असल्यामुळे तीन आयुचे सत्त्व नसतेच. ( ३ ) असे ७ + ३ = १० व वरील ३६ + १० = ४६ प्रकृतींचा क्षय होतो.

✻ या करणपरिणामात लोभाचे कृष्टिकरणच झालेले असते. त्याचे वेदन दहाव्या गुणस्थानातच होते. करणानुयोगाच्या दृष्टिने दहाव्या गुणस्थाच्या अंत्य समयी त्यांचा क्षय होतो. आणि तो बाराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयात क्षायिक चारित्री होतो.

✻ कोणत्याही कर्माचा क्षय तेव्हाच संभवनीय असतो की, त्याचा उदय असून बंध नाही.

✻ दहाव्या गुणस्थानांत सूक्ष्म लोभाचा उदय असून मोहनीयाचा बंध नाही. म्हणूनच चारित्र मोहनीयाचा क्षय संभवतो.

✻ तीन घातिकर्मांचा उदय बाराव्याच्या अंतापर्यंत आहे. पण त्याचा बंध नाही तेव्हाच ३ घातिकर्मांचा क्षय होऊ शकतो.

✻ अघातिचा उदय चौदाव्या गुणस्थानात असतो. पण त्याचा बंध नाही. तेव्हाच अघातिकर्मांचा क्षय होतो.

**पाच क्षयिक लब्धि–**

**३. क्षायिक दान लब्धि –** दानांतरायाचा क्षय झाला असतांना जे सामर्थ्य प्रगट होते, ती क्षायिक दान लब्धि होय. निश्चयाने आपल्या सामर्थ्याने अनंतज्ञानादि स्वभावपर्याय स्वत:ला समर्पित करणे ही क्षायिक दान लब्धि होय. दिव्यध्वनी खिरणे वगैरे व्यवहाराने दानलब्धि आहे.

**४. क्षायिक लाभ लब्धि –** लाभांतरायाचा क्षय असतांना जो अविनाशी अनंतचतुष्टयादि स्वभावाचा लाभ होतो ह्यास निश्चयाने क्षायिक लाभ समजावे व ३४ अतिशय आणि ८ प्रातिहार्य यांची ( ४२ ) प्राप्ती होणे हा उपचाराने क्षायिक लाभ आहे.

**५. क्षायिकभोग लब्धि –** भोगांतरायाचा क्षय झाला असतांना जे आत्मिक सामर्थ्य प्राप्त होते स्वभाव पर्यायाचा भोग ही निश्चयाने क्षायिक भोग लब्धि आहे. तर गंधवृष्टी व पुष्पवृष्टी यास उपचाराने क्षायिक भोग लब्धि म्हणतात.

**६. क्षायिक उपभोग लब्धि –** उपभोगांतरायाचा क्षय झाला असतांना जे सामर्थ्य प्रगट होते त्यास निश्चयाने क्षायिक उपभोग लब्धि म्हणतात. भामंडल सिंहासनादिकास उपचाराने क्षायिक उपभोग म्हणतात.

**७. क्षायिक वीर्य लब्धि –** वीर्यांतरायाचा क्षय झाला असतांना आत्म्याच्या शुध्द व स्वभाव भावांची रचना करण्याचे जे अविनाशिक सामर्थ्य प्राप्त होते ती क्षायिकवीर्य लब्धि होय.

१. तत्त्वत:तर या पाचही लब्धि शाश्वतरूपाने परमात्म्यास अनंतवीर्य रूपाने असतात.

२. हे सातही भाव तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयांत यांचा उत्पाद आहे व क्षायोपशमिक ज्ञानदर्शन व लब्धि यांचा व्यय आहे. ज्ञान-दर्शन-वीर्य गुणद्वारा ध्रौव्य आहे.

* या सातही क्षायिक भावांच्या उत्पत्तीमध्ये करण परिणाम होत नाहीत. ते करण परिणाम मोहनीयाचा उपशम, क्षय, क्षयोपशम, यांच्यासाठीच होतात.

## शेष क्षायिक भावांचे स्वरूप

**प्रश्न – राहलेले दोन क्षायिक भाव कोणत्या कर्माचा क्षय असतांना व कसे होतात ? व केव्हा होतात ?**

उत्तर- १. **क्षायिक ज्ञान –** संपूर्ण ज्ञानावरण कर्माचा क्षय झाला असतांना प्रगट होणारा आत्म्याचा पूर्णज्ञानरूपस्वभावपर्याय:: क्षायिकज्ञान ( अनंतज्ञान-केवलज्ञान )

अ. हा भाव तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयांत प्रगट होतो. त्याच समयी छद्मस्थ ज्ञान परिणामाचा व्यय होतो.

ब. हा भाव प्रगट होतो तेव्हा ज्ञानावरण कर्माचा सर्वथा अभाव असतो. कर्मपुनश्च कार्मणवर्गणारूप होते. त्यामुळे त्यास क्षयाचे निमित्त-क्षायिकभाव म्हणणे हा उपचार आहे. याचा अर्थ ज्ञानावरणाचा उदय व छद्मस्थ ज्ञान बाराव्याच्या अंतिम समयापर्यंत असतो. तोपावेतो निमित्त-नैमित्तिकाचा उपचार लागूहोतो असे समजावे.

क. येथे केवलज्ञान पर्यायाचा उत्पाद व छद्मस्थज्ञानाचा व्यय व ज्ञान गुणरूपाने ध्रौव्य हे तिन्ही तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयांत युगपत् असतात.

२. **क्षायिक दर्शन –** समस्त दर्शनावरण कर्माचा सर्वथा अभाव झाला असतांना प्रगट होणारा आत्म्याच्या दर्शनगुणाचा स्वभावपर्याय उत्पन्न होतो. ह्या स्वभाव पर्यायास क्षायिकदर्शन म्हणतात ( अनंतदर्शन-केवल दर्शन )

अ. क्षायिक दर्शन हे क्षयिक ज्ञानासोबतच प्रगट होते. दर्शन व ज्ञान यांचा क्रमवर्तीपणा हा बाराव्या गुणस्थानापर्यंतच असतो. पुढे त्या दोहोंची युगपत् प्रवृत्ती असते.

ब. तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयी क्षायिक दर्शन ह्या पर्यायाचा उत्पाद व चक्षुदर्शनादि तीन दर्शनोपयोगाचा व्यय व दर्शनगुणरूपाने ध्रुवता युगपत् असते.

क. केवलदर्शनाचा परिणाम हा सर्व वस्तुमात्राचा सामान्य ( निराकार-ज्ञेयाकाराविना ) सत्तामात्र प्रतिभास असतो. ज्ञानामध्ये सविकल्प

( साकार, ज्ञेयाकाररूपाने ) विशेष प्रतिभास असतो. केवलज्ञानामध्ये सर्व ज्ञेयाकाररूपाने प्रतिभास असतो.
ड. जसे केवलज्ञानास क्षायिक म्हणणे उपचार आहे तद्वत् केवलदर्शनास क्षायिक म्हणणे हाही उपचार आहे.

## क्षायोपशमिक भाव

**क्षायोपशमिक भाव १८ आहेत.**

क्षायोपशमिक ज्ञान - याचे चार भद आहेत.

१. **मतिज्ञान –** स्पर्शनेन्द्रियादि पाच इंन्द्रिये व ६ वे मन ( अनिंद्रिय ) या सहाच्या निमित्ताने होणाऱ्या ज्ञानास जे प्रतिबंध करतात अशा स्पर्शनेंद्रिय मतिज्ञानावरणादि ( सहा प्रकार होतील. ) वर्तमान काली उदयांत येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय ( उदय नसणे हाच क्षय ) व भविष्यत्काली उदयांत येण्या योग्य सर्वघाति स्पर्धक यांचा सद्‌वस्थारूप उपशम ( सदुपशम-अप्रशस्त उपशम. ते खाली येवून उदयास न येणे ) आणि त्यांच्याच देशघाति स्पर्धकांचा उदय असतांना व त्याच सोबत दर्शनावरण व वीर्यांतरायाचा क्षयोपशम आणि मिथ्यात्वाचा अनुदय असतांना जे परोक्ष ज्ञान होते ते मतिज्ञान होय.

२. **श्रुतज्ञान –** श्रुतज्ञानावरणाच्या वर्तमानकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय आणि भविष्यकाळी उदयात येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा सदुपशम तसेच त्याच्याच देशघाति स्पर्धकांचा उदय असतांना प्रगट होणाऱ्या ज्ञानपरिणामास श्रुतज्ञान म्हणतात.

३. **अवधिज्ञान –** अवधिज्ञानावरण कर्माच्या वर्तमानकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, भविष्यकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा सदुपशम व देशघाति स्पर्धकांचा उदय असतांना जे मूर्त पदार्थास आत्मिक शक्तीने ग्रहण करणारे ज्ञान उत्पन्न होते ते अवधिज्ञान होय. यास द्रव्यक्षेत्रकाल भावाच्या मर्यादा असतात म्हणून त्यास अवधिज्ञान संज्ञा आहे.

४. **मन:पर्ययज्ञान –** मन:पर्ययज्ञानावरण कर्माच्या वर्तमानकाळी

उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय व भविष्यकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा सदुपशम तसेच त्याच्याच देशघाति स्पर्धकांचा उदय अशी कर्माची स्थिती असतांना जे ज्ञान प्रगट होते ते मन:पर्ययज्ञान होय. हे ज्ञान मनातील ऋजु व वक्रविचारांना जाणते. त्यामध्ये द्रव्यमन निमित्त आहे. म्हणून त्यासही रूपी म्हणतात.

**या चार ज्ञानाची विशेषता –**

१. ही चारही ज्ञाने सम्यग्ज्ञान आहेत. म्हणून त्यामध्ये मिथ्यात्वाचा अनुदय नियमाने असतो.

२. मन:पर्ययज्ञान सहाव्या गुणस्थानवर्ती मुनींनाच होते.

३. ही चार ज्ञाने व तीन अज्ञान या सोबत वीर्यांतरायाचा: क्षयोपशमाचे निमित्त अवश्यमेव असते. तसेच दर्शनावरणाचाही क्षयोपशम नियमरूपाने असतो.

*** क्षयोपशमिक अज्ञान याचे तीन भाग आहेत.**

**१. कुमति–**मतिज्ञानामध्ये ज्यारितीने क्षयोपशम म्हणजेच प्रतिपक्षी कर्माचा उदयाभावीक्षय, सद्‌वस्थारूप उपशम व देशघाति च्या उदयामध्ये घटित केला तसेच कुमतिज्ञानातही घटवावेत.

२. **कुश्रुतज्ञान –** तसेच कुश्रुतज्ञानतही क्षयोपशम लावून घ्यावा.

३. **कुअवधि–** कुअवधिज्ञानातही असा क्षयोपशम घटवावा.

*** या तीन कुज्ञानाचे स्वरूप विशेष**

१ **सात ज्ञाने –** ( ४ सम्यग्ज्ञान व ३ मिथ्याज्ञान ) यांना असे ज्ञानावरणाचे क्षयोपशमाचे निमित्त तद्वत् वीर्यांतराय आणि दर्शनावरणाचा यथायोग्य क्षयोपशमाचे निमित्त नियमाने असते.

२. या तीन कुज्ञानामध्ये मिथ्यात्वाचा उदय व सम्यक्त्वाचा अभाव असतो.

३ परंतु ज्ञानाच्या व ३ अज्ञानाच्या उत्पत्तीमध्ये ज्ञानावरणाच्या क्षयोपशमाचे अस्तित्व अवश्यंभावी आहे म्हणून या ज्ञानांना क्षायोपशिक म्हटलेले आहे.

## क्षायोपशमिक दर्शन

**⁕ क्षयोपशमिक दर्शनाचे तीन भेद आहेत.**

१.**अचक्षुदर्शन–**अचक्षुदर्शनावर आवरण टाकणाऱ्या दर्शनावरण कर्माचे जे वर्तमानकाळी उदयात येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धक त्यांचा उदयाभावी क्षय; भविष्यकाली उदायास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम व त्यांच्याच देशघातिचा उदय असतांना होणारे दर्शन ते अचक्षुदर्शन होय.

२. **चक्षुदर्शन–**चक्षुदर्शनावरण कर्माचा सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभाविक्षय व पुढे उदयास येणाऱ्या सर्वघातिस्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम, व त्याच्याच देशघातिचा उदय अशी कर्माची अवस्था निमित्त असतांना होणारा सामान्य सत्तामात्र प्रतिभास नेत्राचे निमित्ताने होतो त्यास चक्षुदर्शन म्हणतात.

३. **अवधिदर्शन–** अवधिदर्शनावरणाच्या आता उदयास येण्यायोग्य सर्वघातिस्पर्धकांचा उदयाभाविक्षय व त्याच्याच पुढे येणाऱ्या सर्वघातिस्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम, व त्याच्याच देशघातिचा उदय अशी कर्माची अवस्था असतांना अवधिज्ञानापूर्वी जो सामान्य प्रतिभास होतो त्यास अवधिदर्शन म्हणतात.

## ज्ञान आणि दर्शनामध्ये अंतर

ज्ञानामध्ये ‘ हा घट आहे ’ ‘ हे वस्त्र आहे ’ अशा प्रकारे ज्ञेयाकारपूर्वक पदार्थांचा प्रतिभास होतो. त्यास सविकल्प, साकार, विशेष प्रतिभास ज्ञानोपयोग अशी संज्ञा आहे. व ज्ञानोपयोगाच्या अवग्रहापूर्वी जो अशा ज्ञेयाकार स्वरूपाच्या प्रतिभासाशिवाय जो सामान्य सत्तामात्र प्रतिभास होतो त्यास निर्विकल्प निराकार दर्शनोपयोग म्हणतात.

**ज्ञानोपयोग आणि दर्शनोपयोगाची प्रवृती –**

या दोहोचाही क्षयोपशम त्या त्या भूमिकेमध्ये त्या पर्याया पर्यंत अवश्य युगपत असतोच. परंतु संसार दशेमध्ये ज्ञानदर्शनावरणाचा उदय

आहे तोपर्यंत छद्मस्थ जीवांना मात्र ज्ञानोपयोगाच्या अवग्रह या प्रथम ज्ञान पर्यायापूर्वी नियमाने दर्शनोपयोगच असतो. संसारी जीवांना बाराव्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत दोन्ही उपयोग युगपत् कधीही असत नाहीत. कारण ज्ञान क्रमवर्ती आहे अवधिज्ञानापूर्वीही अवधिदर्शन असतेच.

✻श्रुतज्ञान मतिज्ञानपूर्वकच होते व मतिज्ञानोपयोगाचा प्रारंभ अवग्रहापासून होतो. अवग्रहापूर्वी दर्शन असते त्यामुळे श्रुतज्ञानापूर्वी दर्शन असत नाही. मतिज्ञानाच्या अपेक्षेने उपचाराने कोणी म्हणेल तर म्हणो.

✻केवली आणि सिध्द यांना मात्र दोन्ही उपयोग युगपत असतात कारण तेथे ज्ञान व दर्शनामधील क्रम तसेच ज्ञानोपयोगातील ज्ञेयाकाराची क्रमप्रवृत्ती असत नाही, म्हणून त्यांना उपयोगाची युगपत प्रवृत्ती होते.

✻कुअवधिज्ञानापूर्वी अवधिदर्शन असत नाही.

✻मन: पर्ययज्ञान मनो मतिज्ञानपूर्वक होते. म्हणून त्या उपयोगापूर्वी दर्शन अनंतर भूमिकेत नसते. परंतु मन-मतिज्ञानापूर्वी मात्र दर्शन नियमाने असते. म्हणून उपचाराने दर्शन म्हणता येते.

✻या तीन क्षायोपशमिक दर्शनासह यथायोग्य ज्ञानावरण आणि वीर्यांतरायाचा क्षयोपशम अवश्य असतो.

✻१ ते ३ इंद्रियधारी जीवांना फक्त अचक्षुदर्शनच असते. पुढे सर्व जीवांना चक्षु व अचक्षु दोन दर्शन असतात. तर सुअवधिज्ञानधारी जीवाला अवधिदर्शन असते. ते संज्ञी सम्यग्दृष्टी जीवालाच असते.

✻एकावेळी ७ प्रकारचा ज्ञानोपयोग ( केवलज्ञान सोडून ) व ३ प्रकारचा दर्शनोपयोग यापैकी एका संसारी जीवास एकच उपयोग असतो.

✻केवलज्ञान व केवलदर्शन हे दोन्ही उपयोग युगपत असतात व तेव्हा इतर १० उपयोग नसतातच. कारण क्षायिकभावामध्ये क्षयोपशमभाव असत नाहीत.

## क्षायोपशमिक पाच लब्धि

१. **दानलब्धि** - दानान्तराय कर्माचे वर्तमानकाळी उदयांत येण्यायोग्य जे सर्वघाति स्पर्धक त्यांचा उदयाभाविक्षय, भविष्यकाळी

उदयांत येण्यायोग्य त्याचेच सर्वघातिस्पर्धकांचा सदुपशम व त्याच्याच देशघाति स्पर्धकांचा उदय अशा अवस्थेचे निमित्त असतांना जे जीवाचे सामर्थ्य प्रगट होते त्यास दानलब्धि म्हणतात.

याचप्रमाणे २ लाभ ३ भोग, ४ उपभोग व ५ वीर्यलब्धि याबाबत १ लाभांतराय, २ भोगांतराय, ३ उपभोगांतराय व ४ वीर्यांतराय या कर्मामध्ये क्षयोपशम घटवावा. त्याचे निमित्त असतांना प्रगट होणाऱ्या जीवभावास लब्धि म्हणतात.

* या पाचही लब्धि एकेन्द्रियापासून व बाराव्या गुणस्थानापर्यंत सर्व जीवांना असतात.

**क्षायोपशमिक सम्यक्त्व –** वर्तमानकाळी उदयास येणाऱ्या १ मिथ्यात्व २ सम्यक्‌मिथ्यात्व व ४ अनंतानुबंधी कषाय यांच्या वर्तमानकाळी उदयांत येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभाविक्षय; तसेच भविष्यकाळी उदयास येण्यायोग्य त्यांच्याच सर्वघाति स्पर्धकांचा सदुपशम व सम्यक्‌प्रकृति नामक मोहनीयाच्या देशघातिचा उदय अशी अवस्था असतांना आत्म्याच्या शुध्द स्वभावाच्या अनुभव स्वरूपाचा जो जीवभाव त्यास क्षायोपशमिक सम्यक्त्व म्हणतात.

१.हे सम्यक्त्व सादि मिथ्यादृष्टीलाच व साताचीही ( दर्शनमोहनीयाच्या ३ व ४ अनंतानुबंधी कषाय ) सत्ता असणाऱ्यासच होते.

२. या सम्यक्त्वाची प्राप्ति ४ थ्या गुणस्थानात व सत्ता ४ ते ७ या गुणस्थानापर्यंतच असते.

३. क्षयोपशमिक सम्यग्दृष्टी श्रेणी मांडू शकत नाही. द्वितीयोपशम अथवा क्षायिक सम्यग्दर्शन होईल तरच श्रेणी मांडेल.

४. या सम्यग्दर्शनातही शुध्द आत्म्याची उपयोगात्मक वा लब्ध्यात्मक अनुभूती असतेच.

**देशसंयम –** ४ अनंतानुबंधी व ४ अप्रत्याख्यानावरण ह्या चारित्रमोहनीयाच्या प्रकृतीच्या वर्तमानकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभाविक्षय; भविष्यकाळात उदयास येण्यायोग्य सर्वघाति

स्पर्धकांचा सदुपशम आणि प्रत्याख्यानावरण व संज्वलनाच्या देशघाति उदय अशी चारित्रमोहनीयाच्या क्षयोपशम अवस्थेचे निमित्त असतांना जो आंशिक चारित्रपरिणाम प्रगट होतो त्यास देश संयम म्हणतात.

**याची विशेषता** १. या संयमाच्या भूमिकेमध्ये १२ व्रते व ११ प्रतिमा पाळण्याचा परिणाम असतो हा व्यवहार संयम होय.

२. हे मनुष्यगतीमध्ये वा तिर्यंचगतीमध्येच होऊ शकते.

**प्रश्न - येथे प्रत्याख्यानावरण सर्वघाति असतांना त्यास उदयरूप सांगून व अनंतानुबंधी ४, अप्रत्याख्यानावरण ४, यांच्या देशघातिचा उदय का सांगितला नाही ?**

उत्तर - सर्वघाति प्रकृतिमध्ये देशघाति स्पर्धक असतच नाहीत. प्रश्नामध्ये निर्दिष्ट आठही प्रकृति सर्वघातीच आहेत. त्यामुळे त्यांच्यात देशघाति जर नाहीच तर त्या कशा सांगता येतील. देशसंयमासाठी प्रत्याख्यानावरण व संज्वलन हे प्रतिबंधक नसल्याने त्यांचा उदय देशघातिसारखाच आहे. प्रत्याख्यानावरण कषायकर्म सर्वघाति असूनही ती देशसंयमाचा घात करत नाही म्हणून देशसंयमासाठी देशघातिचे काम करते.

देशघाति स्पर्धकामध्ये देशघाति व सर्वघाति दोन्ही स्पर्धक असतात. स्पर्धक म्हणजे हीनाधिक अनुभागशक्ती असणाऱ्या कर्मांना स्पर्धक म्हणतात.

## सकल संयम

**प्रश्न - सकल संयम कशास म्हणतात ?**

उत्तर - ४ अनंतानुबंधी कषाय, ४ अप्रत्याख्यानावरण कषाय व ४ प्रत्याख्यानावरण कषाय यांच्या १२ चारित्रमोहनीय कर्माच्या प्रकृतींचा वर्तमानकाळी उदय येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभाविक्षय; त्याच्याच भविष्यकाळी उदयास येण्यायोग्य सर्वघाति स्पर्धकांचा सदुपशम व देशघाति संज्वलन ४ कषायकर्मांचा उदय अशी अवस्था निमित्त असतांना

जो चारित्ररूप जीवपरिणाम प्रगट होतो त्यास सकलसंयम म्हणतात.

**प्रश्न – या सकल संयमाची विशेषता कोणती ?**

उत्तर - हा भाव मनुष्यगतीतच व सहाव्या गुणस्थानापासुन प्रगट होतो. १. हा भाव असतांना अठ्ठावीस मूलगुणांचे पालन रूपाचा व्यवहारसंयम असतो. १२ प्रकृतीच्या उदयाचा अभाव असल्याने निश्चयाने चारित्राची शुध्दता प्रगट होते. त्यावेळी गृहस्थसुलभ वस्त्रादि परिग्रहाचा अभाव असतो, म्हणून दिगंबर दशा असते. अंतर्मुहूर्तामध्ये सहाव्या गुणस्थानातून सातवे गुणस्थान व अंतर्मुहूर्तामध्ये सातव्यातून शुभोपयोगरूप सहावे गुणस्थान होते. २. हे चारित्र ६ ते १० या गुणस्थानांत होते. व त्या जीवांना आचार्य वा उपाध्याय वा साधू संज्ञा असते.

( क्षायोपशमिक अठरा भावांचे वर्णन समाप्त. )

## औदयिक भाव

**प्रश्न – औदयिक भावांचे लक्षण कोणते व त्याचे भेद किती आहेत ?**

उत्तर - कर्माच्या उदयाचे निमित्त असतांना जो जीवभाव प्रगट होतो त्यास औदयिक भाव म्हणतात. त्याचे एकवीस भेद आहेत. ४ गति, ४ कषाय, ३ वेद, ६ लेश्या, १ असंयम, १ अज्ञान, १ मिथ्यादर्शन व १ असिध्दत्व.

**प्रश्न – कोणत्या कर्माच्या उदयाने कोणते भाव होतात ?**

उत्तर - १. गतिनामकर्माचा उदय असतांना ४ गति असतात मनुष्यगति नामकर्माचे उदयामध्ये मनुष्यगति प्राप्त होते. तसेच तिर्यंचगति नामकर्म, नरकगति नामकर्म व देवगति नामकर्म यांचा क्रमाने उदय असतांना तिर्यंचगति, नरकगति व देवगति प्राप्त होते. २. चारित्र मोहनीयाच्या ( कषाय ) उदयाचे निमित्त असतांना ४ कषाय होतात. क्रोध कषायाचे निमित्त असतांना क्रोध कषाय होतो. तसेच मान चारित्रमोहनीय, माया चारित्रमोहनीय, लोभचारित्रमोहनीय यांचा उदय असतांना अनुक्रमे मान, माया व लोभ कषाय होतात. हे चार कषाय चारित्रगुणाचे विकार विभाव पर्याय आहेत.

३. वेद नोकषाय चारित्रमोहनीयाचा उदय असतांना ( १ स्त्रीवेद २ पुरूषवेद ३ नपुंसकवेद या तीन नोकषाय चारित्रमोहनीयाच्या प्रकृति आहेत. ) अनुक्रमे स्त्रीवेद, पुरूषवेद व नपुंसकवेद हे जीवभाव होतात.

* **असंयम –** चारित्रमोहनीयाचा उदय असतांना असंयम भाव होतो. पाच इंद्रिये व मन यांच्या विषयापासून व षटकाय जीवांच्या हिंसेपासून निवृत्त होण्याचा नियम न घेणे, अव्रतरूप परिणाम होते हा असंयम आहे.

* **अज्ञान –** पाचही ज्ञानावरणाचा उदय असतांना जो ज्ञानाचा अभाव असतो त्यास अज्ञान म्हणतात. ज्ञानावरण दर्शनावरण व अंतराय या तिन्ही घाति कर्माचा उदय १२ व्या गुणस्थानाच्या अंतिम समयापर्यंत असतो. त्यामुळे तोपावेतो त्यांचे उदयांत अज्ञानासोबत अदर्शन व अशक्ति असतेच. म्हणजे बहुभाग ज्ञान दर्शन व सामर्थ्याचा अभाव असतो. औदयिक भावात हा अभाव गृहीत आहे. हे म्हणजे विपरीत ज्ञान नव्हे. अज्ञानामध्ये सहभावी अदर्शन व अशक्ति अंतर्भूत आहे.

* **मिथ्यादर्शन –** दर्शनमोहनीयाच्या उदयामध्ये मिथ्यादर्शन होते. तत्त्वाच्या अप्रतीतीला मिथ्यादर्शन म्हणतात.

* **असिध्दत्व –** आठही किंवा चार कर्माचा जो पावेतो उदय आहे. सिध्द दशा प्रगट होत नाही. म्हणून असिध्दत्व आठही कर्माच्या उदयाने होणारा भाव आहे.

* **लेश्या –** कषायांनी अनुरंजित योगप्रवृत्तीलीला लेश्या म्हणतात. लेश्या चारित्रमोहाच्या उदयाने होते. म्हणून तो औदयिक भाव आहे.

लेश्येचे सहा भेद आहे. -

१. कृष्ण लेश्या - अशुभतम
२. नील लेश्या - अशुभतर
३. कापोत लेश्या - अशुभ
४ पीत लेश्या - शुभ
५ पद्मलेश्या - शुभतर
६ शुक्ल लेश्या - शुभतम

याचे वर्णन लेश्या मार्गणेत पाहावे.

## पारिणामिक भाव

**प्रश्न – पारिणामिक भाव कशास म्हणतात ? त्याचे भेद किती व कोणते ?**

उत्तर - कर्माचा उदय, उपशम, क्षयोपशम, क्षय याची अपेक्षा नसतांना स्वभावजन्य जो भाव होतो तो पारिणामिक भाव आहे. त्याचे ३ भेद आहेत. १. जीवत्व २. भव्यत्व ३. अभव्यत्व. यातील निश्चयाने चैतन्यभाव मात्र खऱ्या अर्थाने पारिणामिक व लक्षणभूत भाव आहे. तो नित्य निरावरण आहे. शेष २ पर्यायरूप असल्यामुळे अशुध्द पारिणामिक भाव आहे.

( या भावांचे वर्णन पान ४४ वर पहा. )

## मार्गणा

**प्रश्न – मार्गणा कशास म्हणतात ? मार्गणा किती आहेत ?**

उत्तर - ज्या ज्या धर्म ( गुण ) विशेषाने ( पर्याय ) जीवाचे अन्वेषण ( शोध ) होते त्या धर्म विशेषास मार्गणा म्हणतात.

**मार्गणा १४ आहेत. –** १ गति, २ इंद्रिय, ३. काय, ४ योग, ५ वेद, ६ कषाय, ७ ज्ञान, ८ संयम, ९ दर्शन, १० लेश्या, ११ भव्यत्व, १२ सम्यक्त्व, १३ संज्ञी, १४ आहार.

१. **गति मार्गणा –** गतिचे भेद ४ आहेत.

**प्रश्न – गति कशास म्हणतात ?**

उत्तर - गति नामकर्म व मोहाचा उदय असतांना जो जीवास गतिरूप मानण्याचा हठाग्रह असतो, त्यास गति म्हणतात. पुढे सम्यग्दर्शन झाल्यानंतर मनुष्यगति व आयूचा उदय १४ व्या गुणस्थानापर्यंत असतो. गतीचे वर्णन ( ५३ ) पानावर पहा.

**२. इंद्रिय मार्गणा–**

**प्रश्न – इंद्रिय मार्गणा कशास म्हणतात ? इंद्रिये किती आहेत ?**

उत्तर - इंद्र म्हणजे आत्मा - जीव, इंद्र म्हणजे नामकर्म. आत्म्याचे चिन्हास वा ज्याद्वारा जीव ओळखल्या जातो व जे नामकर्माच्या उदयाचे

नैमित्तिक कार्य आहे त्यास इंद्रिय म्हणतात. इंद्रिये पाच आहेत.
१. स्पर्शनेन्द्रिय २. रसनेन्द्रिय ३. घ्राणेन्द्रिय ४. चक्षुरिंद्रिय ५. कर्णेंद्रिय

**प्रश्न – या प्रत्येक इंद्रियाचे भेद किती आहेत ?**

उत्तर - या पाच इंद्रियापैकी प्रत्येक द्रव्येन्द्रिय व भावेन्द्रिय असे दोन भेद आहेत.

**प्रश्न – द्रव्येन्द्रिय कशास म्हणतात ?**

उत्तर - निर्वृत्ति व उपकरण यांना द्रव्येन्द्रिय म्हणतात.

**प्रश्न – भावेन्द्रिय कशास म्हणतात ?**

उत्तर - लब्धि व उपयोग यांना भावेन्द्रिय म्हणतात.

**प्रश्न – या पाच इंद्रियाचे स्वरूप काय ?**

उत्तर - १. ज्याच्या निमित्ताने स्पर्शाचे ज्ञान होते त्यास स्पर्शनेंद्रिय म्हणतात. २. ज्याच्या निमित्ताने रसाचे ज्ञान होते ते रसनेंद्रिय होय. ३. ज्याच्या निमित्ताने गंधाचे ज्ञान होते ते घ्राणेन्द्रिय होय. ४. ज्याच्या निमित्ताने वर्णाचे ग्रहण होते ते चक्षुरिंद्रिय होय. ५. ज्याच्या निमित्ताने शब्दांचे ग्रहण होते ते कर्णेंद्रिय होय.

| बाह्य निर्वृत्ति | अभ्यंतर निर्वृत्ति | अभ्यंतर उपकरण | बाह्य उपकरण- जे बाह्य निर्वृत्तिचे रक्षण करते त्यास बाह्य उपकरण म्हणतात. उदा. डोळ्याच्या पापण्या, केशादि. |
|---|---|---|---|
| १. निर्वृत्ति - रचना २. बाह्य - ↓ पुद्गलाची ३. पुद्गल प्रदेशांची इंद्रियाकार रचना. ४. उदाहरण - मसुरीच्या डाळीच्या आकाराचा डोळ्यातील छोटा काळा गोलाकाररूप पुद्गल प्रदेशांची रचना. | अभ्यंतर - ↓ जीवप्रदेश निर्वृत्ति - रचना ३. जीव प्रदेशांची इंद्रियाकार रचना यास अभ्यंतर निर्वृत्ति म्हणतात. उ. - मसुरीच्या डाळीच्या आकाराची जीव प्रदेशांची रचना. | उपकरण - रक्षण जे अभ्यंतर निर्वृत्तिचे रक्षण करते ते अभ्यंतर उपकरण होय. उ. डोळ्यातील मोठा पांढरा काळा भागरूप प्रदेशांची रचना. | |

**प्रश्न – लब्धि कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्ञानावरण कर्माचा क्षयोपशम असतांना जाणण्याची ( योग्यता ) शक्तिची प्राप्ती यास लब्धि म्हणतात.

जसे - चक्षुरिंद्रिय मतिज्ञानावरणाचा क्षयोपशम असतांना वर्णास जाणण्याची शक्ती.

**प्रश्न – उपयोग कशास म्हणतात ?**

उत्तर - लब्धिला अनुसरून जो चैतन्यानुविधायी परिणाम त्यास उपयोग म्हणतात.

जसे - जो चक्षुरिंद्रियाचे निमित्ताने वर्णास ग्रहण करण्याचे कार्य. ( १ ) विग्रहगतीमध्ये जीवास लब्धिरूप भावेंद्रिय असते. उपयोग असत नाही. ( २ ) लब्धिला अनुसार द्रव्येंद्रियाची रचना होते.

**प्रश्न – कोणत्या जीवास कोणती इंद्रिये असतात ?**

उत्तर - १. पाच स्थावर जीवांना एक स्पर्शनेंद्रिय असते.

२. द्विंद्रिय जीवास १ स्पर्शनेंद्रिय व १ रसनेंद्रिय अशी दोन इंद्रिये असतात.

३. त्रिंद्रिय जीवास १ स्पर्शना, २ रसना व ३ घ्राणेंद्रिय असतात.

४. चतुरिंद्रिय जीवास वरील तीन व एक चक्षुरिंद्रिय असे चार इंद्रिय असतात.

५. पंचेंद्रिय जीवास पाचही इंद्रिये असतात.

## ३. काय मार्गणा

**प्रश्न – काय मार्गणेचे स्वरूप काय ? व भेद किती ?**

उत्तर - त्रस व स्थावर नामकर्माचा उदय असतांना जीवास शरीरसंबंधी प्रदेश समूह प्राप्त होतो ती काय मार्ग होय. त्याचे दोन भेद आहे.

१. त्रस व २. स्थावर

**प्रश्न – त्रस जीव व स्थावर जीव कोणास म्हणतात ?**

उत्तर - त्रस नामकर्माच्या उदयाने द्विंद्रियादिकांत जन्म होतो ते त्रस होत. स्थावर नामकर्माच्या उदयाने पाच पृथ्वीकायादि एकेंद्रिय भव प्राप्त होतो ते स्थावर होत. एकेंद्रियाचे दोन भेद आहेत. १. सूक्ष्म व २. बादर

**बादर –** जे दुसऱ्या करवी रोखले जातात व जे दुसऱ्यास रोखतात ते बादर एकेंद्रिय होत.

**सूक्ष्म –** जे दुसऱ्या करवी रोकले जात नाहीत व जे दुसऱ्यास रोकत नाहीत ते सूक्ष्म एकेंद्रिय होत.

✻ वनस्पतीकायिकाचे भेद - दोन - १. प्रत्येक व २. साधारण.

| प्रत्येक | साधारण |
|---|---|
| १. प्रत्येक - एका शरीराचा एकच स्वामी असतो त्यास प्रत्येक जीव म्हणतात. | १. साधारण - ज्या जीवांचा आहार, श्वासोच्छवास, शरीर, आयुष्य समान असतात. ( एका बाह्य शरिराचे अनेक स्वामी असतात. ) याचे दोन भेद आहेत. |
| २. सप्रतिष्ठित प्रत्येक - ज्या प्रत्येक जीवाच्या शरीराच्या आश्रयाने अन्य साधारण जीव राहतात ते सप्रतिष्ठित प्रत्येक होय. | २. भेद- नित्य निगोद - ज्यास निगोदाशिवाय दुसरा पर्याय अद्याप प्राप्त झाला नाही त्यास नित्यनिगोद म्हणतात. |
| ३. अप्रतिष्ठित प्रत्येक - ज्यांच्या आश्रयाने अनेक साधारण वनस्पती जीव असत नाही ते अप्रतिष्ठित प्रत्येक होत. | ३. इतरनिगोद- निगोदातून निघून दुसरा पर्याय घेऊन परत निगोदात उत्पन्न होतात ते इतर निगोद होत. |

४. **योगमार्गणा** – योगाचे स्वरूप व भेद - पान ३२ वर पहा.

५. **वेदमार्गणा** – वेदाचे स्वरूप व भेद - पान ११८ वर पहा.

६. **कषायमार्गणा** – कषायाचे स्वरूप व भेद - पान ३१ वर पहा.

७. **ज्ञानमार्गणा** – ज्ञानाचे स्वरूप व भेद - पान १८ वर पहा.

८. **दर्शनमार्गणा** – दर्शनाचे स्वरूप व भेद - पान १६ वर पहा.

९. **संयममार्गणा** –

**प्रश्न – संयम मार्गणा कशास म्हणतात ? त्याचे भेद किती व कोणते ?**

उत्तर - अहिंसादि पाच व्रताचे पालन, कषायांचा निग्रह करणे, इंद्रिये व योगाचा निरोध, समितीचे पालन यास संयम म्हणतात.

**संयम मार्गणेचे भेद –** १ ) सामायिक संयम २ ) छेदोपस्थापना संयम ३ )

परिहारविशुध्दि संयम ४ ) सूक्ष्मसांपराय संयम ५ ) यथाख्यात संयम ६ ) देशसंयम ७ ) असंयम

**प्रश्न – सामायिक संयम कशास म्हणतात ?**

उत्तर - बारा कषायाच्या अभावामध्ये जेवढी वीतरागता प्रगट होते त्यास साम्य समता म्हणतात. समतापूर्वक ( साम्यभावपूर्वक ) शुध्द आत्मस्वरूपांत लीनता यास सामायिक संयम म्हणतात.

**प्रश्न – छेदोपस्थापना संयम कशास म्हणतात ?**

उत्तर - १. शुध्दोपयोगात स्थिरता असत नाही. तेव्हा अट्ठावीस मूलगुणांचे विकल्प येतात यास छेदोपस्थापना संयम म्हणतात.

२. संयमामध्ये दोष लागला असतांना प्रायश्चित्तादिद्वारा त्याचे परिमार्जन करून संयमात स्थिर होणे यासही छेदोपस्थापना संयम म्हणतात.

**प्रश्न – परिहारविशुध्दि संयम कशास म्हणतात ?**

उत्तर - चारित्र व तपाचे सामर्थ्याने ऋध्दिप्राप्त झाली असतांना जीवमात्राचा घात न होता गमनविहारादि होतात, असे हलके शरीर प्राप्त होते, त्यामुळे ते चातुर्मासातही गमन करतात या चारित्र विशेषास परिहारविशुध्दि संयम म्हणतात.

**प्रश्न – सूक्ष्मसांपराय संयम कशास म्हणतात ? यथाख्यात संयम कशास म्हणतात ?**

( या दोन्ही संयमाचे वर्णन क्षायिक चारित्रात अंतर्भूत आहे. तसेच देशसंयमाचे स्वरूप क्षायोपशमिक भावामध्ये आलेले आहे. असंयमाचे स्वरूप औदयिकभावांचे विवेचनात पाहावे. )

१०. **भव्यत्व मार्गणा –** स्वरूप व भेद पान ४४ वर पहा.

११. **सम्यक्त्व मार्गणा –** स्वरूप पान २६ वर पहा. भेद ६ आहे. औपशमिक सम्यक्त्व, क्षायिक सम्यक्त्व, क्षायोपशमिक सम्यक्त्व, सासादन सम्यक्त्व, सम्यक्मिथ्यात्व सम्यक्त्व, मिथ्यात्व सम्यक्त्व

१२. **संज्ञी मार्गणा**

**प्रश्न – संज्ञी मार्गणा कशास म्हणतात ?**

उत्तर - नोइंद्रियावरणाचा क्षयोपशम असतांना होणारी मनद्वारा जाणण्याची योग्यता प्राप्त होते, हेय उपादेय जाणल्या जाते. उपयोग ही होतो. त्यास संज्ञित्व म्हणतात. व ज्यांना असे मन, क्षयोपशम व ज्ञानोपयोग नसतो ते असंज्ञी होय.

१. पंचेंद्रिय तिर्यंच जीवापैकी काही संज्ञी असतात तर काही असंज्ञी असतात. एकेंद्रिय ते चतुरिंद्रिय जीव असंज्ञीच असतात. संज्ञी जीवांना हित - अहिताचा निर्णय करण्याची क्षमता असते. असंज्ञी जीवांना ती क्षमता सर्वथा नसते.

१३. **आहार मार्गणा**

**प्रश्न – आहारक व अनाहारक कोणास म्हणतात ?**

उत्तर - **आहारक –** औदारिकादि शरीर व पर्याप्ति यांच्या योग्य पुद्‌गलांचे ग्रहण ज्यांना असते ते आहारक होय.

**अनाहारक –** औदारिकादि शरीर व पर्याप्ति यांच्या योग्य पुद्‌गलाचे ग्रहण ज्यांना असत नाही ते अनाहारक होय.

विग्रह गतिमध्ये मोडे आहेत त्या समयांपर्यंत सर्व जीव अनाहारक असतात. समुद्‌घातामध्येही सर्वजीव अनाहारकच असतात. शरीर व पर्याप्ति बनण्यायोग्य परमाणूंचे ग्रहण सुरू होते तेव्हा ते आहारक होतात.

१४. **लेश्यामार्गणा**

लेश्येचे स्वरूप औदयिक भावांच्या निरूपणांत आले आहे तेथे पाहावे.

**विशेष –** आयुर्बंध पडण्यामध्ये लेश्यांचे निमित्त असते त्याचा नकाशा पहा.

| कषाय शक्ति स्थान<br>४ ← | शिलाभेद समान<br>१ | | पृथ्वीभेद समान<br>२ | | | | | | | | धुलीरेखा समान<br>३ | | | | | | | | जल रेखा समान<br>४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लेश्या स्थान<br>१४ ← | कृष्ण लेश्या<br>१ | | कृष्ण नील<br>१ | कृष्ण नील<br>२ | कृष्ण नील कापोत<br>३ | | | कृष्णादि.<br>४ | कृष्णादि.<br>५ | कृष्णादि.<br>६ | कृष्णादि सहा लेश्या<br>६ | | | कृष्ण विना<br>५ | कृष्ण नील विना<br>४ | कृष्ण नील कापोत विना<br>३ | | कृष्ण नील कापोत पीत विना<br>२ | कृष्ण नील कापोत पीत पद्म विना<br>१ | शुक्ल लेश्या<br>१ |
| १<br>आयुबंध<br>व<br>अबंध<br>२०←१ | १<br>अबंध<br>का<br>←<br>२ | १<br>नर<br>कायु<br>३ | १<br>नर<br>कायु<br>४ | १<br>नर<br>कायु<br>५ | १<br>नर<br>ति.<br>६ | २<br>न.<br>ति.<br>आ<br>आ<br>७ | ३<br>न.<br>आ<br>म.<br>८ | ४<br>सर्व<br>आ.<br>९ | ४<br>सर्व<br>आ.<br>१० | ४<br>सर्व<br>आ.<br>११ | ४<br>सर्व<br>दे.<br>दे<br>आ.<br>१२ | ३<br>म.<br>१३ | २<br>म.<br>१४ | १<br>दे.<br>१५ | १<br>दे.<br>१६ | १<br>दे.<br>वा<br>यु<br>१७ | ०<br>अ<br>बं<br>ध<br>१८ | ०<br>अबंध<br>१९ | ०<br>अबंध<br>२० | ०<br>अबंध |

लेश्या स्थान

कषायस्थान - कषायांची तीव्र मंद मंदतर स्थानासाठी दिलेल्या ४ उपमा शिलाभेदादि





१. लेश्यास्थान - त्या त्या कषायस्थानांत असणाऱ्या १४ लेश्यांची स्थाने - कृष्णादिलेश्या

३. आयुर्बंध व अबंधाची त्या त्या लेश्येमध्ये होणारी २० स्थाने.

**प्रश्न – विग्रह गती कशास म्हणतात ?**

उत्तर - एक शरीर सोडून दुसरे शरीर ग्रहण करण्यासाठी गमन होते त्यास विग्रह गती म्हणतात. ते गमन आकाशपंक्तीला धरूनच सरळ असते.

## विग्रहगतीचे स्वरूप

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  | प्रकार<br>ऋजुगती<br>१ | विग्रह<br>( मोडे )<br>मोडे रहित<br>सरळ गमन | गति काल<br>१ समय | अनाहारक<br>नाही |
|  | पाणिमुक्ता<br>गती<br>२ | विळया<br>प्रमाणे एक<br>मोडा<br>घेऊन गमन | समय<br>२ | १ समय |
|  | लांगलिका<br>गती<br>३ | नांगरा<br>प्रमाणे<br>दोन<br>मोडे<br>घेऊन गमन | समय<br>३ | २समय |
|  | गोमुत्रिका<br>गती<br>४ | गोमूत्र वत्<br>तीन<br>मोडे<br>घेऊन गमन | समय<br>४ | ३समय |

## जीवसमास

**प्रश्न – जीवसमास कशास म्हणतात ?**

उत्तर - जीवांचे गति, इंद्रिय व पर्याप्त - अपर्याप्त या अपेक्षेने जे विभाजन पध्दतशीर करण्यात येते त्यास जीवसमास म्हणतात.

जीवसमासाचे भेद ९८ आहेत.

गति अपेक्षेने तिर्यंचगति ८५, मनुष्यगती ९, नारकी २, देव २

**तिर्यंचाचे ८५ भेद–**

| एकेंद्रिय | विकलेंद्रिय | गर्भज पंचेंद्रिय तिर्यंच | पंचेंद्रियसंमूर्छन |
|---|---|---|---|
| ४२ | ९ | १६ | १८ |

**एकेंद्रियाचे ४२ जीवसमास –** १ पृथ्वी, २ अप, ३ तेज, ४ वायु, ५ नित्यनिगोद, इतर निगोद - साधारण वनस्पती.

या सहाचे प्रत्येकी २ = १ सूक्ष्म व २ बादर असे एकूण १२ झाले. त्यात प्रत्येक वनस्पतीचे सप्रतिष्ठित प्रत्येक व अप्रतिष्ठित प्रत्येक हे दोन मिळून १४ होतात. प्रत्येकाचे १ पर्याप्तक २ निर्वृत्यपर्याप्तक ३ लब्ध्यपर्याप्तक या भेदाने एकूण ४२ होतात.

**विकलेंद्रियाचे ९ –** १ द्विन्द्रिय २ त्रींद्रिय व ३ चतुरिंद्रिय प्रत्येकाचे १ पर्याप्तक २ निर्वृत्यपर्याप्तक व ३ लब्ध्यपर्याप्तक असे एकूण ३ × ३ = ९

**संमूर्छन पंचेंद्रिय तिर्यंच १८–** १ जलचर २ स्थलचर ३ नभचर याचे प्रत्येक संज्ञी असंज्ञी ( ३ × २ ) भेदाने सहा झाले व त्यात प्रत्येकाचे पर्याप्ति अपेक्षेने प्रत्येकी ३ ६ × ३ = १८

**गर्भज पंचेंद्रिय तिर्यंचाचे १६ त्यात कर्मभूमिजाचे १२ –**

१ जलचर २ स्थलचर ३ नभचर यांचे प्रत्येकी संज्ञी असंज्ञी या भेदाने ( ३ × २ ) ६ होतात. या प्रत्येकाचे पर्याप्तक व निर्वृत्यपर्याप्तक या भेदाने ( ६ × २ ) १२.

**भोगभूमिजाचे ४ भेद –** १ स्थलचर व २ नभचर ( तेथे जलचर नसतात. ते संज्ञीच असतात. ) यांचे प्रत्येकी १ पर्याप्तक व २ निर्वृत्यपर्याप्तक या भेदाने २ × २ = ४ भेद. गर्भजामध्ये लब्ध्यपर्याप्तक नसतातच

( ४२ + ९ + १८ + १६ ) ८५ एकूण

**मनुष्याचे ९ भेद –** ८ भेद गर्भजांचे, १ आर्य, २ म्लेंछ, ३ सुभोगभूमिज, ४ कुभोगभूमिज या प्रत्येकाचे १ पर्याप्तक व २ निर्वृत्यपर्याप्तक या भेदाने ८ होतात. व १ संमुर्छन मनुष्य मिळून ९ भेद होतात.

**देवाचे भेद २ –** १ पर्याप्तक व २ निर्वृत्यपर्याप्तक

**नारकीचे भेद २ –** १ पर्याप्तक व २ निर्वृत्यपर्याप्तक

एकूण - तिर्यंच मनुष्य देव व नारकी असे एकूण ९८ जीव समास आहेत.

८५ ९ २ २

**प्रश्न – लोकाचे भेद किती ?**

उत्तर - तीन १ ) उर्ध्वलोक २ ) मध्यलोक ३ ) अधोलोक

## देवलोकाचे वर्णन

**प्रश्न – उर्ध्वलोक कशास म्हणतात ?**

उत्तर - मेरूपर्वताच्या वर लोकाच्या अंतापर्यंतच्या भागाला उर्ध्वलोक म्हणतात.

**प्रश्न – देवांचे भेद किती ? ते कोठे राहतात ?**

उत्तर - देवांचे भेद चार आहेत. ते उर्ध्वलोकांत राहतात.

| | भवनवासी | व्यंतरवासी- | ज्योतिष्क | वैमानिक |
|---|---|---|---|---|
| भेद- | १० | ८ | ५ | २ |
| | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| | १ असुरकुमार | १ किन्नर | १ सूर्य | १ कल्पोपपन्न |
| | २ नागकुमार | २ किंपुरूष | २ चंद्र | २ कल्पातीत |
| | ३ विद्युतकुमार | ३ महोरग | ३ ग्रह | |
| | ४ सुपर्णकुमार | ४ गंधर्व | ४ नक्षत्र | |
| | ५ अग्निकुमार | ५ यक्ष | ५ प्रकीर्णक तारका | |
| | ६ वायुकुमार | ६ राक्षस | | |
| | ७ स्तनितकुमार | ७ भूत | | |
| | ८ उदधिकुमार | ८ पिशाच | | |
| | ९ द्वीपकुमार | | | |
| | १० दिक्कुमार | | | |

**प्रश्न – कल्पोपपन्न कशास म्हणतात ?**

उत्तर - जेथे इंद्र, सामानिक आदि कल्पना ( भेद ) असतात, त्यास कल्पोपपन्न म्हणतात.

**प्रश्न – कल्पातीत कशास म्हणतात ?**

उत्तर - जेथे इंद्र, सामानिक आदि कल्पना ( भेद ) नसतात, ते कल्पनातीत होय.

**प्रश्न – कल्पोपपन्न देवांचे किती भेद आहेत ?**

उत्तर - १२ भेद आहेत. ( सोळा कल्पविमानांचे स्वामी १२ इंद्र आहेत म्हणून. )

( स्वर्ग सोळा आहेत. त्यांची रचना वर वर आहे. दोन दोन स्वर्गाचे युगल आहे. प्रथम व द्वितीय युगलातील चार स्वर्गामधे चार इंद्र असतात. पाचव्या स्वर्गापासून बाराव्या स्वर्गापर्यंत चार इंद्र असतात. तेराव्या स्वर्गापासून सोळाव्या स्वर्गापर्यंत चारच इंद्र असतात. )

**प्रश्न – वैमानिक देव कुठे राहतात ?**

उत्तर - वैमानिक देव उर्ध्वलोकात राहतात.

**प्रश्न – भवनवासीदेव व व्यंतरदेव कुठे राहतात ?**

उत्तर - प्रथम नरकाचा खरभाग, पंकभाग व तिर्यक्लोकामधे राहतात.

**प्रश्न – ज्योतिष्कदेव कुठे राहतात ?**

उत्तर - पृथ्वीपासून ७९० योजन अंतरावर ९०० योजन उंचीपर्यंत ( ११० योजन ) आकाशाच्या पोकळीत एक राजू लांब रूंद मध्यलोकात राहतात.

## मध्यलोकाचे वर्णन

**प्रश्न – मध्यलोक कशास म्हणतात ?**

उत्तर - मेरू पर्वताची उंची एक लाख चाळीस योजन आहे. तेवढ्या भागाला मध्यलोक म्हणतात.

**प्रश्न – मेरू पर्वत कोठे आहे व त्याची उंची किती आहे ?**

उत्तर - जंबूव्दीपाच्या मध्यभागी मेरू पर्वत आहे. त्याचा पाया जमिनीत एक हजार योजन आहे. जमिनीच्या वर त्याची उंची नव्याण्णव हजार योजन व चूलिका ( शिखर ) चाळीस योजन आहे.

**प्रश्न – जंबूव्दीप कोठे आहे व केवढा आहे ?**

उत्तर - जंबूव्दीप मध्यलोकातील असंख्यात व्दीपसमुद्रांच्या मध्यभागी आहे. त्याचा आकार गोल असून व्यास एक लाख योजन आहे.

**प्रश्न – जंबूव्दीपामधे किती क्षेत्रे आहेत ?**

उत्तर - सात आहेत. १ ) भरत, २ ) हैमवत, ३ ) हरि, ४ ) विदेह ५ ) रम्यक, ६ ) हैरण्यवत, ७ ) ऐरावत.

**प्रश्न – जंबूव्दीपाचे हे सात विभाग कशामुळे झाले आहेत ?**

उत्तर - १ ) हिमवन् २ ) महाहिमवन्, ३ ) निषध, ४ ) नील, ५ ) रुक्मी, ६ ) शिखरिन् या सहा पर्वतांमुळे जंबूव्दीप सात क्षेत्रांमधे विभक्त झाला आहे.

**प्रश्न – या पर्वतावर किती सरोवरे आहेत ?**

उत्तर - वरील सहा पर्वतावर अनुक्रमे १ ) पद्म, २ ) महापद्म, ३ ) तिगिंछ, ४ ) केसरी, ५ ) महापुंडरीक व ६ ) पुंडरीक अशी एकूण सहा सरोवरे आहेत.

**प्रश्न – या सहा सरोवरांतून किती नद्या निघाल्या आहेत ?**

उत्तर - एकूण चौदा नद्या निघाल्या आहेत.

१ ) गंगा, २ ) सिंधु, ३ ) रोहित्, ४ ) रोहितास्या, ५ ) हरित्, ६ ) हरिकांता, ७ ) सीता, ८ ) सीतोदा, ९ ) नारी, १० ) नरकांता, ११ ) सुवर्णकूला, १२ ) रुप्यकूला, १३ ) रक्ता, १४ ) रक्तोदा

**प्रश्न – मनुष्यलोक कशास म्हणतात ?**

उत्तर - जंबूव्दीप, लवणोदधि समुद्र, धातकी खंड, कालोदधि समुद्र व पूर्व पुष्करार्ध व्दीप या प्रमाणे अडीच व्दीपांस मनुष्यलोक म्हणतात. यांच्या

पुढे मनुष्य जाऊ शकत नाही. कारण मध्ये मानुषोत्तर पर्वत आहे.

**प्रश्न – मनुष्यलोकाबाहेरील व्दीप – समुद्रांची रचना कशी आहे ?**

उत्तर –मध्यलोकात एक व्दीप, त्यास वेढलेला दुप्पट विस्ताराचा एक समुद्र, त्यास वेढलेला दुप्पट विस्ताराचा व्दीप अशी असंख्यात व्दीप समुद्रांची रचना मध्यलोकाच्या अंतापर्यंत आहे.

**प्रश्न – कर्मभूमी कशास म्हणतात ?**

उत्तर - जेथे असि, मसि, कृषि, सेवा, शिल्प व वाणिज्य या सहा क्रिया करुन उपजीविका करावी लागते त्या भूमीस कर्मभूमी म्हणतात.

**प्रश्न – कर्मभूमी किती आहेत ?**

उत्तर - पंधरा आहेत. जंबूव्दीपातील १ मेरू, धातकी खंडातील २ मेरू, पुष्कराध्दर्वव्दीपांतील २ मेरू या प्रमाणे पाच मेरूंशी संबंधित ५ भरत, ५ ऐरावत व ५ विदेह ( उत्तरकुरु व देवकुरु सोडून ) अशा पंधरा कर्मभूमी आहेत.

**प्रश्न – भोगभूमी कशास म्हणतात ?**

उत्तर - जेथे सहा क्रिया न करता कल्पवृक्षा पासूनच सर्व इच्छित वस्तू प्राप्त होतात, त्या भूमीस भोगभूमी म्हणतात.

**प्रश्न – भोगभूमी किती आहेत ?**

उत्तर - तीस आहेत. पंचमेरूसंबंधी ५ हैमवत + ५ हैरण्यवत् अशा दहा जघन्य भोगभूमी, ५ हरि + ५ रम्यक अशा दहा मध्यम भोगभूमी, ५ उत्तरकुरू + ५ देवकुरू अशा दहा उत्तम भोगभूमी. अशा एकुण तीस भोगभूमी आहेत.

**प्रश्न – मनुष्याचे किती भेद आहेत ?**

उत्तर - दोन - १ ) आर्य २ ) म्लेंच्छ

**प्रश्न – आर्य कोणास म्हणतात ?**

उत्तर - जे भरतक्षेत्रांतील आर्यखंडात राहतात, त्यांनाआर्य म्हणतात.

**प्रश्न – म्लेंच्छ कोणास म्हणतात ?**

उत्तर - जे म्लेंच्छ खंडात राहतात, त्यांना म्लेंच्छ म्हणतात. म्लेंच्छांचे प्रकार दोन आहेत. १ ) कर्मभूमीज २ ) अंतर्व्दीपज कारण ते या दोन ठिकाणी राहतात.

**प्रश्न – सूक्ष्म एकेंद्रिय जीव कोठे राहतात ?**

उत्तर - सर्व लोकांत राहतात.

**प्रश्न – बादर एकेंद्रिय जीव कोठे राहतात ?**

उत्तर - सर्व लोकाकाशात कुणाच्या तरी आधाराने राहतात.

**प्रश्न – त्रसजीव कोठे राहतात ?**

उत्तर - त्रसनाडीत राहतात.


**प्रश्न – विकलत्रय कोठे राहतात ?**

उत्तर– अडीच व्दीपातील कर्मभूमी, शेवटच्या स्वयंभूरमणव्दीपाचा उत्तरार्ध, स्वयंभूरमण समुद्र व त्याच्या चारही कोनातील पृथ्वी यामध्ये राहतात.

**प्रश्न – पंचेंद्रिय तिर्यंच कोठे राहतात ?**

उत्तर - मध्यलोकात राहतात पण त्यापैकी जलचर, तिर्यंच लवणोदधि, कालोदधि व स्वयंभूरमण या तीन समुद्रांमधे राहातात. इतर ठिकाणी राहत नाहीत.

## जंबुद्वीपाचा नकाशा




भरतक्षेत्रा प्रमाणेच ऐरावतक्षेत्रात रचना आहे.

## अधोलोकाचे वर्णन

**प्रश्न – अधोलोक कशास म्हणतात ?**

उत्तर - मेरू पर्वताच्या खाली सात राजूपर्यंतच्या भागास अधोलोक म्हणतात.

**प्रश्न – नारकी जीव कोठे राहतात ?**

उत्तर - अधोलोकात राहतात.

# अध्याय ४ था

## गुणस्थान

**प्रश्न – गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - मोह आणि योग यांचे निमित्त असतांना संसारी जीवांच्या परिणामांची जी स्थाने होतात, त्यांना गुणस्थान म्हणतात.

१. येथे मोह म्हणजे मोहनीय कर्म. यांचा उदय, उपशम, क्षयोपशम व क्षय याचे निमित्ताने जीवाची स्थाने होतात. ती स्थाने बारा आहेत.

२. योगाचे अस्तित्व व नास्तित्व यामुळे दोन स्थाने होतात. ती तेरावे व चौदावे गुणस्थान आहे.

**प्रश्न – मोह व योग या दोहोंचे निमित्त सांगण्याचे कारण ( हेतू ) काय ?**

उत्तर - १. मोह व योग या दोन कारणांनी संसार आहे. योगाच्या कारणाने आस्रव, प्रकृतिबंध प्रदेशबंध होतो. व मोहनीयाच्या उदयांनी होणाऱ्या भावांनी स्थितिबंध आणि अनुभागबंध होतो.

२. जेथे मोहजनित भाव आहेत तेथे योग आहेच. म्हणूनच दहाव्या गुणस्थानापर्यंत आस्रव आणि बंध दोन्ही आहेत व पुढच्या गुणस्थानात मोहनीयाचा उपशम आणि क्षय असल्या कारणाने बंध मात्र नाही.

**प्रश्न – ११ ते १३ व्या गुणस्थानात आस्रव तर आहेच ना ?**

उत्तर - दहाव्या गुणस्थानापर्यंत जो आस्रवबंध होतो, तो बंध संसाराचे व अशुध्द परिणतीचे कारण आहे. म्हणून त्यास सांपरायिक आस्रव अशी संज्ञा आहे.

परंतु पुढे मोहाचा उदय नाही म्हणून कर्मबंधाचे कारण तर नाही, परंतु योगाचा सद्‌भाव असल्यामुळे फक्त सातावेदनीयाचा आस्रव, प्रकृति व प्रदेशबंध आहे. परंतु हे सर्व म्हणजेच त्यांचा आस्रव बंध उदय व क्षय एकाच समयात असतात. स्थिति आणि अनुभाग बंध असत नाही म्हणून त्यास ईर्यापथ आस्रव म्हणतात. मोहाचा उदय नसतो म्हणून तो संसारास हेतू नाही.

**प्रश्न – परंतु तेथेही तर आस्त्रव प्रकृति – प्रदेशबंध आहे ना ?**

उत्तर - आहे. तेथे संसारास कारणभूत नवीन कर्माचा बंध नाही. परंतु जो संसार आहे तो मोहनीय सोडून इतर तीन कर्मोदयाने ११ व १२ गुणस्थानात अज्ञान, अदर्शन व अशक्ती आहे. तो तर पुर्वबध्द कर्माच्या ( ज्ञानावरण, दर्शनावरण, अंतराय ) उदयाचे कारणाने आहे. पुढे दोन गुणस्थानात तर तेही असत नाही. पूर्ण ज्ञानस्वभाव, दर्शनस्वभाव व वीर्य प्रगट होते. त्यालाच अनंत ज्ञान, अनंत दर्शन व अनंतवीर्य म्हणतात.

अ ) जो संसार आहे, स्वभावाचा घात आहे. तो ११ व १२ गुणस्थानात पुर्वबध्द कर्मोदयाने आहे. ईर्यापथ आस्त्रवामुळे नाही.

ब ) १३ व १४ गुणस्थानामध्ये जीवांचा पूर्ण स्वभाव प्रगट होतो. परंतु पूर्वबध्द चार कर्मांच्या उदयाने असिध्दत्व असते. म्हणून एवढ्याच अपेक्षेने संसार सांगितलेला आहे.

**प्रश्न – दोन्ही मोहनीयाचा उदय दहाव्या गुणस्थानापर्यंत असतो कां ?**

उत्तर - नाही. दर्शनमोहनीयाचा उदय फक्त १ ते ७ गुणस्थानात असतो. तोही क्षयोपशम सम्यक्त्वामध्ये सम्यक् प्रकृतीचाच फक्त उदय असतो. उपशम व क्षायिक सम्यग्दर्शनामध्ये तोही असत नाही.

**प्रश्न – मग दर्शनमोहनीयाच्या प्रधानतेने पहिली चार गुणस्थाने असतात असेच ना ?**

उत्तर - होय. असेच आहे.

**प्रश्न – परंतु चारित्रमोहनीयापैकी अनंतानुबंधी कषायांचा अनुदय तर चौथ्यातही असतो. मग तेथे चारित्रमोहनीयाचे कारण मानावे लागेल की !**

उत्तर - तेथे अनंतानुबंधीचा दोन प्रकारचा स्वभाव कारण आहे. अनंतानुबंधी जसा स्वरूपाचरणाचा घातक आहे. तव्दत् तो सम्यक्त्वाच्या आसादनास कारण आहे. म्हणून या स्वभावामुळे तेथे दर्शनमोहनीयाची प्रधानता आहे.

हा प्रश्न उत्पन्न होण्याचे कारण असे आहे की, अनादिकाळापासून मिथ्यात्वाच्या उदयासोबत चारित्रमोहाच्या सर्वच प्रकृतिचा उदय हा असतोच. परंतु अनंतानुबंधी कषायाचा उदय आणि सम्यक्त्वाची विराधना यांची व्याप्ती आहे. एतावता मात्र अनंतानुबंधीला द्वीस्वभावी मानले आहे. तत्त्वत: तर मिथ्यात्वच सम्यक्त्वाचा घात करते व कषाय कर्म चारित्रस्वभावाचा घात करते.

**प्रश्न – मोह व योग यांच्या निमित्ताने होणारी जीवस्थाने असे गुणस्थानाचे स्वरूप सांगण्याचे प्रयोजन काय ?**

उत्तर - वास्तविक कर्मांच्या आस्रवबंधाचे कारण जीवाचे परिणाम असंख्यात लोकप्रमाण आहेत. परंतु त्या परिणामांची ओळख केवलींना व श्रुतकेवलींना होऊ शकते. म्हणून मध्यमरूची शिष्यासाठी त्या परिणामांचे विभाजन तेरा गुणस्थानामध्ये केलेले आहेत. असे प्रवचनसारमध्ये ९ व्या गाथेमध्ये स्पष्ट खुलासा आचार्य जयसेनांनी केला आहे. आणि त्याही परिणामांचा बोध व्हावा म्हणून अल्परूची शिष्यांकरीता त्याचे १. अशुभोपयोग, २. शुभोपयोग, ३. शुध्दोपयोग अथवा परिणतीच्या अपेक्षेने कर्मफल चेतना, कर्मचेतना व ज्ञानचेतना अशाप्रकारे तीन परिणामामध्ये बंध- मोक्षाच्या कारणाचा संग्रह केलेला आहे. अर्थात् हे तर स्पष्टच आहे की, शुध्दोपयोग अथवा ज्ञानचेतना ही मिथ्यात्वाचा अनुदय असतांना सम्यग्दर्शन पूर्वक मोक्षमार्ग प्रगट होतो म्हणून तो साक्षात् मोक्षमार्ग व मोक्षाचे साधन आहे. आणि अशुभोपयोग, शुभोपयोग व कर्मफलचेतना व कर्मचेतना हे मोहनीयाच्या उदयाने होणारे परिणाम आहेत. त्यामुळे ते बंध हेतू आहेत. म्हणून समयसार गाथा ६६ मध्ये आचार्य कुंदकुंदांनी ' मोह कम्मुदयसंभवा ' असे गुणस्थानाचे स्वरूप सांगितले आहे. त्या सर्व परिणामांचा बंधासह संबंध असतो हे आगमसंमत आहे व म्हणून त्यास बंध हेतू म्हणणे हे तर्कसंगतच आहे. ही तेरा गुणस्थाने बंधहेतू आहेत. हे समयसारामध्ये १०९ ते ११२ गाथामध्ये स्पष्ट केले आहे. आणि त्याच कारणाने सिध्दांना गुणस्थानातीत, असे आगमात सांगितले आहे.

**प्रश्न – जर ही गुणस्थाने बंधहेतू सांगतिली आहे तर त्यासोबत जीवाच्या रत्नत्रयाची विशुध्दतेची तर आगमामध्ये स्वीकृती आहे ना ?**

उत्तर - अर्थात् गुणस्थान क्रमामध्ये जेवढ्या अंशाने मोहनीयाचा उदय आहे तद्नुसार ती धारा तर बंधहेतूच आहे. आणि जेवढ्या अंशाने उदयाचा अभाव आहे तेवढ्या अंशाने विशुध्दता प्रगट होते यात संशय नाही. यावरून एवढेच सिध्द होते की, ४ थ्या पासून १० व्या गुणस्थानापावेतो ज्ञानधारा आणि कर्मधारा यांचे सहावस्थान असते. यांतही मतभेद नाहीतच. परंतु रत्नत्रयाच्या विशुध्दतेला जर गुणस्थानाचे स्वरूप मानले तर सिध्दांना गुणस्थानातीत कसे म्हणता येईल ? म्हणून केवळ दोन्ही एकावेळी असू शकतात. म्हणून रत्नत्रयाच्या शुध्दतेला गुणस्थानाचे स्वरूप मानणे हे तर आगमसंमत म्हणता येणार नाही. त्यामुळे ' मोहजोगभवा ' या लक्षणास निर्दोषत्व सिध्द होणार नाही.

**प्रश्न – गुणस्थाने किती सांगितलेली आहेत ? त्याची नांव काय आहेत ?**

उत्तर - गुणस्थाने १४ सांगितली आहेत. १. मिथ्यात्व, २. सासादन, ३. सम्यग्मिथ्यात्व, ४. असंयत सम्यग्दृष्टि, ५. संयमासंयम, ६. प्रमत्तसंयत, ७. अप्रमत्तसंयत, ८. अपूर्वकरण, ९. अनिवृत्तिकरण, १०. सूक्ष्मलोभ, ११. उपशान्तमोह, १२. क्षीणमोह, १३. सयोगकेवली, १४. अयोगकेवली.

**प्रश्न – या १४ गुणस्थानांच्या संज्ञेमध्ये ' मोहजोगभवा ' हे लक्षण सर्वत्र लागू पडते का. ?**

उत्तर - या पैकी १३ ही गुणस्थानामध्ये प्रत्येकी एक शब्द असा आहे जो मोह आणि योगाच्या सद्भावाचा द्योतक आहे. म्हणून बंधाची कारणे १३ गुण म्हटली आहेत. संसारामध्ये एक अवस्था शेवटी अशी असते की, योगाचा अभाव झाल्यामुळे नवीन आस्रव बंधाचा तर सर्वथा अभाव आहे. परंतु चार पूर्वबध्द अघातिकर्माचा उदय आहे, म्हणून असिध्दत्व आहे. म्हणून संसार आहे. त्याचेच नांव अयोगकेवली गुणस्थान आहे. त्यामुळे १३ पर्यंत योग आहेत व त्यानंतर तो संसारात अत्यल्प असतो. व लवकरच संसाराचा अभाव होऊन सिध्दपद प्राप्त होते.

**प्रश्न – सामान्यत: या गुणस्थानामध्ये मोह व योगाची निमित्तता कशाप्रकारे असते ?**

उत्तर - १ ते ४ गुणस्थाने ही दर्शनमोहनीयाच्या प्रधानतेने आहे. ५ ते १२ ही गुणस्थाने सम्यग्दर्शनपूर्वक परंतु चारित्रमोहनीयाच्या प्रधानतेने आहेत. १३ व १४ ही गुणस्थाने योगाच्या प्रधानतेने आहेत. विशेष - १. येथे हे लक्षात असू द्यावे की, मोहाच्या उदया सोबत योग हा असतोच

२. परंतु मोहनीयाचा उपशम व क्षय झाल्यानंतर ही योग असतो

३. ११ ते १३ गुणस्थानापर्यंत दर्शनमोहाच्या उदयासोबत चारित्रमोहाचा उदयाचा अभाव

**प्रश्न – विशेष अपेक्षेने प्रत्येक गुणस्थानामध्ये निमित्ताची विशेषता कोणती ?**

उत्तर - १. मिथ्यात्व गुणस्थानामध्ये दर्शनमोहनीयाच्या मिथ्यात्व कर्माच्या उदयाचे निमित्त असते.

२. सासादन गुणस्थानामध्ये अनंतानुबंधी चौकडीपैकी एकाचा उदय होतो. तेव्हा मिथ्यात्वाचे आसादन होते.

३.सम्यग्मिथ्यात्व गुणस्थानमध्ये दर्शनमोहनीयाच्या सम्यक्मिथ्यात्वप्रकृतिच्या उदयाचे निमित्त असते.

४. असंयत सम्यग्दृष्टि गुणस्थानामध्ये दर्शनमोहनीयाचा क्षयोपशम, उपशम वा क्षयाचे निमित्त असते. अप्रत्याख्यानावरणाचाही उदय असतो.

५. संयतासंयत गुणस्थानामध्ये प्रत्याख्यानावरण व संज्वलनाचा उदय असतो.

६. प्रमत्तसंयत गुणस्थानामध्ये संज्वलनाच्या तीव्र उदयाचे - प्रमादाचे निमित्त असते.

७. अप्रमत्तविरत या गुणस्थानामध्ये संज्वलनाचा अबुध्दिपूर्वक उदयाचे निमित्त असते. म्हणून प्रमाद नसतो.

८. अपूर्वकरणामध्ये चारित्रमोहनीयाच्या क्रमपूर्वक उपशमाचे वा क्षयाचे निमित्त असते.

९. अनिवृत्तिकरणामध्ये चारित्रमोहनीयाच्या क्रमपूर्वक उपशमाचे वा क्षयाचे निमित्त असते.
१०. सूक्ष्मसांपराय गुणस्थानामध्ये संज्वलन सूक्ष्मलोभाच्या उदयाचे निमित्त असते.
११. उपशांतमोह - समस्त मोहनीयकर्माच्या उपशमाचे निमित्त असते.
१२. क्षीणमोह - समस्त मोहनीयकर्माच्या क्षयाचे निमित्त असते.
१३. सयोगकेवली - घातिकर्माचा क्षय असतो. योगाचे निमित्त असते.
१४. अयोगकेवली - योगाच्या अभावाचे निमित्त असते.

## गुणस्थान १ ले - मिथ्यात्व गुणस्थान

**प्रश्न – मिथ्यात्व गुणस्थानाचे स्वरूप काय आहे ?**

उत्तर - दर्शनोहनीयाच्या मिथ्यात्वकर्माचा उदय असताना जीवांना आत्म्याच्या शुध्दचैतन्याची प्रतीती असत नाही, प्राप्त भव आणि शरीरास आत्मा मानतो, रागद्वेष या चैतन्यविकारांना आत्मा मानतो, सात तत्त्वांचे श्रध्दान व हेयोपादेय विज्ञान असत नाही. सांसारिक सुखाची इच्छा असते. त्या जीवाच्या भूमिकेला मिथ्यात्व गुणस्थान म्हणतात.

**प्रश्न – मिथ्यात्व गुणस्थानाची विशेषता कोणती ? व मिथ्यात्वाचे भेद किती ?**

उत्तर - निगोदापासून तो असंज्ञी पंचेंद्रियापर्यंत सर्वच जीव मिथ्यात्वाने ग्रस्त असतात. संज्ञी पंचेंद्रियातही बहूभाग मिथ्यादृष्टी असतात. अनंत बहूभाग जीव अनादिकालापासून मिथ्यादृष्टीच आहेत.

मिथ्यात्वाचे पाच भेद आहे. १. एकांत मिथ्यात्व, २. विपरीत मिथ्यात्व, ३. संशय मिथ्यात्व ४. विनय मिथ्यात्व व ५. अज्ञान मिथ्यात्व. याचे स्वरूप प्रथम अध्यायात पान नं. २९-३० वर पाहणे.

मिथ्यादृष्टीची मान्यता स्वतत्त्व - परतत्त्व, स्वभाव - विभाव, पुण्यभाव याबाबत समिचीन नसते. त्यास यामधील भेदाची स्पष्ट कल्पना नसते. विकारांना रागादि कषायांना आत्म्याचा स्वभाव मानतो, पुण्यास

मोक्षाचे कारण मानतो. निमित्ताला अन्य द्रव्याच्या कार्याचा कर्ता मानतो.
**प्रश्न – जर जीव अनादित: मिथ्यादृष्टी आहे तर तो सम्यक्‌दृष्टी केव्हा होतो ? व त्यापूर्वी त्याची भूमिका अन्य मिथ्यादृष्टी सारखी असते कां ? वेगळी असते का ?**
उत्तर - जेव्हा जीवाचा संसार परिवर्तनाचा अंत समीप आलेला असतो तेव्हा त्यास सम्यक्त्व नियमाने होतेच. परंतु त्यास सम्यक्त्वापूर्वी ५ लब्धि नियमाने होतात. त्याचे परिणाम शुभ असतात. तत्त्वविचारात रुचि असते. या ५ लब्धि पैकी ४ लब्धि अनेक वेळा होतात परंतु त्यानंतर सम्यक्त्व होईल असा नियम मात्र नाही. पाचवी करणलब्धि झाल्यानंतर अनिवृत्तिकरणाच्या अनंतरसमयी सम्यक्त्व नियमाने होते. त्यास सातिशय मिथ्यादृष्टी अशी संज्ञा पंडित टोडरमलजींनी दिली आहे. या लब्धीचे वर्णन तिसऱ्या अध्यायात औपशमिक सम्यक्त्वाचे प्रकरणात सविस्तर आले आहे. तेथून जाणून घ्यावे.
* सातिशय मिथ्यादृष्टी - करण परिणाम असतांना जीवाचा उपयोग ( ज्ञान ) शुध्दआत्म्याकडे असतो. पण परिणतीत ( श्रध्देत ) मिथ्यात्व भाव असतात. पण हा जीव त्या भावाशी तन्मय होतच नाही. हाच एकमेव मिथ्यात्वभावाच्या अभावाचा उपाय आहे.
* अनादि अनंत काल = अभव्य जीवाचा ह्या भावास सुरवात अंत नाही.
* ह्याचा अनादि सांत काल = भव्य जीवाचा ह्या भावास सुरवात नाही पण अंत आहे.
* ह्याचा सादि सांत काल = पर्याय एक समयमात्र राहते नंतर ती नियमाने संपते. मिथ्यात्व ही पर्यायच आहे. म्हणून सादि व सांत आहे.
* दुसरी विवक्षा - भव्याला एक वेळ सम्यक्त्व झाल्यावर पुन: मिथ्यादृष्टी होतो. तेव्हा त्याच्या मिथ्यात्व भावास सादि ( सुरवात ) व मिथ्यात्वाचा अभाव निश्चित होणार म्हणून सांत असतो.
* ह्या प्रथम गुणस्थानवर्ती द्रव्यलिंगी मुनी शुध्दआत्म्याच्या आश्रयाने

एकदम सातव्या गुणस्थानात जातात. प्रथम बारा कषायांचा व मिथ्यात्वाचा अभाव एकाचवेळेच्या करण परिणामांनी होतो.

* हाच जीव आठकषाय व मिथ्यात्वाचा अभाव एकाच वेळेच्या करणपरिणामानी करतो. भावलिंगी श्रावक होतो.

* हा जीव चार कषाय मिथ्यात्वाचा अभाव करून चवथ्या गुणस्थानात जातो. हे सर्व त्या जीवांच्या भावावर अवलंबून असते.

* वरील गुणस्थानातून मिथ्यात्वात येणाऱ्या जीवास त्याचा हीन पुरूषार्थरूप अपराध कारण असतो. निमित्तरूपात कर्माचा उदय असतो.

* ह्या गुणस्थानातून वरील गुणस्थानात जाणाऱ्या जीवास त्याच्याच शुध्द आत्म्याकडे लागलेला उपयोग, ( शुध्दाचाच आश्रय ) हेच कारण आहे. निमित्तरूपाने कर्मोदयाचा अभाव.

**प्रश्न – मिथ्यादृष्टी गुणस्थानातून वर चढण्याचा क्रम गुणस्थानाच्या क्रमानुसार आहे की त्यात विशेषता आहे ?**

उत्तर - अनादि मिथ्यादृष्टी वर चढतांना २-३ गुणस्थानात जातच नाही. तो ४ - ५ वा ७ व्या गुणस्थानातच जाईल.

१. जर तो अव्रती असेल तर ४ थ्यात जातो.

२. बाह्यत: व्रती असेल तर ५ व्यात जाईल.

३. द्रव्यलिंगी साधू असेल तर तो ७ व्यात जाईल.

**प्रश्न – तो दुसऱ्या व तिसऱ्यात कां जावू शकत नाही ?**


उत्तर - एकतर सासादन गुणस्थान औपशमिक सम्यक्त्वाच्या काळात अनंतानुबंधी एकाचा उदय आला तरच व पडतांना होते. तो नियमाने मिथ्यात्व गुणस्थानातच जातो. त्यास सम्यक्‌मिथ्यात्वाची सत्ताच नसते. म्हणून तो तिसऱ्या गुणस्थानात जात नाही. सहावे गुणस्थान चढतांना होत नाही.

## गुणस्थान २ रे - सासादन गुणस्थान

**प्रश्न –सासादन गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - प्रथमोपशम सम्यक्त्वाचा काळ अधिकाधिक सहा आवली व

## सासादन गुणस्थान




(आकृती नं. ११)

सत्तेतील व उदयमान मिथ्यात्वाच्या निषेकाचे द्योतक

अंतरीत द्रव्याचे द्योतक

औ. सम्यक्त्वाचा काल

औ. सम्यक्त्वाचा सहा आवली शिल्लक काल व अनंतानुबंधीचा उदय सुरू झाला म्हणून सम्यक्त्व राहिले नाही. व मिथ्यात्वी झाला नाही. असा मधला काल सासादनाचा आहे.

कमीतकमी एक समय असतांना अनंतानुबंधी ४ कषायापैकी एकाचा उदय आला असता सम्यक्त्वाचे आसादन ( विराधना ) होते. परंतु मिथ्यात्वाचा उदय नसल्याकारणाने मिथ्यादृष्टीही असत नाही. त्याभूमिकेला सासादन गुणस्थान म्हणतात. त्यावेळी सम्यक्त्व व मिथ्यात्व दोन्ही असत नाही. तेथून तो नियमाने मिथ्यादृष्टीच होतो. यास झाडपासून तुटलेले परंतु जमिनीस न पोचलेल्या फळाचा दृष्टांत देतात. ( आकृती नं. ११ पहा. ) औपशमिक सम्यक्त्वाचा सहा आवली शिल्लक काल अनंतानुबंधीचा उदय सुरू झाला म्हणून सम्यक्त्व राहीले नाही. व मिथ्यात्वी झाला नाही असा मधला काल सासादनाचा आहे.

**प्रश्न – अंतरायामाएवढा सम्यक्त्वाचा काल का नाही ?**

उत्तर - सम्यक्त्व संपते ते मिथ्यात्वकर्माच्या उदयाने नाही. तर आपल्या कालाने संपते. कारण तिथे कर्माचे निषेकच नसतात. ह्याचे प्रतिक अंतरायाम मोठा आहे.

**प्रश्न – औपशमिक सम्यक्त्वातूनच हे गुणस्थान का होते ?**

उत्तर - सम्यक्त्वातून पडणारे व मिथ्यात्वात जाणारे औपशमिक सम्यक्दृष्टिच असतात. कारण तिथे - १. दर्शनमोहनीयाचा उदय नसतांनाही व अनंतानुबंधीचा उदय सुरू झालेला ह्याच सम्यक्त्वाच्या काली शक्य आहे. २. याच्या काळातच सासादनाचा काल आहे.

१. अनंतानुबंधीस सम्यक्त्वाचे घातक म्हणणे हा उपचार आहे. वस्तुत: ती प्रकृती घातक स्वरूपाचरणचारित्राचीच आहे. पण ह्या चारित्राचा अभाव व सम्यक्त्वाचा घात ह्यामध्ये अविनाभाव आहे. म्हणून हा व्यवहार होतो.

२. या गुणस्थानास चारित्रमोहनीयाच्या अपेक्षेने औदयिक व दर्शनमोहनीयाच्या अपेक्षेने पारिणामिक म्हणतात. कारण इथे दर्शनमोहनीयाचा उदय, उपशमादिकांची विवक्षा नाही.

३. सासादनात मरणारा जीव नरकात जात नाही.

४. तीर्थंकर व आहारकाची सत्ता असलेल्या या गुणस्थानात जात नाही.

५. या गुणस्थानात मिथ्यात्वाच्या उदयात असणारी विपरीत श्रध्दा नाही. पण अनंतानुबंधीच्या उदयात यथार्थ श्रध्दानाचाही अभाव आहे.
६. अंतानुबंधीचा अंतरकरणरूप उपशम होत नाही
७. अंतरायामाच्या कालात त्यांचे सत्व जरूर आहे. पण उदयाभाव आहे त्यामुळे त्याचा उदय येऊ शकतो. उदयाभावरूपच उपशम असतो.

**प्रश्न – हे गुणस्थान वरून खाली पडतांना होत असून ह्याचा दुसरा नंबर कसा ?**

उत्तर - हा भाव नियमाने मिथ्यात्वसन्मुखच असतो म्हणून मिथ्यात्वानंतर हे गुणस्थान सांगितले.

**प्रश्न – ह्यास असद्‌दृष्टी म्हणतात, मग नांव सासादन सम्यक्‌दृष्टी का ?**

उत्तर - प्रथम तो सम्यक्‌दृष्टी होता. म्हणून भूतनैगम नयाने त्यास सम्यक्‌दृष्टी म्हटले. दुसरे कारण सम्यक्त्वाच्या कालातच हे गुणस्थान होते, म्हणूनही सम्यक्‌दृष्टी म्हणतात.
८. हा गुणस्थानवर्ती जीव नियमाने मिथ्यात्वातच जातो.
९. सहाव्या गुणस्थानवर्ती, पाचव्या व चौथ्या गुणस्थानवर्ती औपशमिक सम्यक्‌दृष्टीच ह्या दुसऱ्या गुणस्थानात येतो.

## गुणस्थान ३ रे. सम्यग्मिथ्यात्व गुणस्थान

**प्रश्न – सम्यक्‌मिथ्यात्व गुणस्थान कशास म्हणतात ?**


उत्तर - दही - गुळ यांच्या कालवणाप्रमाणे काहीसा खट्टा मिट्ठा स्वादाप्रमाणे एकाचेळी काहीसा सम्यक्त्वरूप व काहीसा मिथ्यात्वरूप असा उभयरूप एक मिश्र परिणाम एक होतो त्यास सम्यग्मिथ्यात्व गुणस्थान म्हणतात.

**प्रश्न – यास दर्शनमोहनीयाचे निमित्त कशा प्रकारे आहे ?**

उत्तर - औपशमिक सम्यक्त्वाच्या निर्मल श्रध्दानामुळे मिथ्यात्वाचे तीन तुकडे होतात. त्यातील काही सम्यक् मिथ्यात्वरूपाने संक्रमित होतात. त्या सम्यक्त्वमिथ्यात्वापैकी काही निषेक सम्यक्‌प्रकृतिरूपाने संक्रमित होतात तेव्हा १. उपशम सम्यग्दृष्टीला सत्तेतील मिथ्यात्वाचा उदय आला तर प्रथमगुणस्थानात जाईल.
२. जर त्याला सम्यक्‌मिथ्यात्वाचा उदय

आला तर तो तिसऱ्या गुणस्थानात जाईल. व ३. जर सम्यक्प्रकृतीचा उदय आला तर तो क्षायोपशमिक सम्यग्दृष्टी होईल. या गुणस्थानास आगमात क्षायोपशमिक भाव म्हटले आहे.

आगमात क्षायोपशमिक भाव म्हटले आहे.




१. ह्या गुणस्थानात मरण नसते.

२. ज्या गुणस्थानात ( प्रथम वा चौथे ) आयुर्बंध केला असेल तिथेच जाऊन मरतो.

३. इथे मिथ्यात्व व अनंतानुबंधीचा उदय असत नाही.

४. हा गुणस्थानवर्ती जीव चौथ्या वा पहिल्यातच जातो.

५. सहाव्या गुणस्थानवर्ती जीव, पाचव्या गुणस्थानवर्ती जीव अथवा चौथ्या गुणस्थानवर्ती जीव या गुणस्थानात जाऊ शकतो.

६. सादि मिथ्यादृष्टीही या गुणस्थानात जाऊ शकतो.

७. या गुणस्थानात अनंतानुबंधीच्या ४ प्रकृतींची व दर्शनमोहीयाच्या तिन्ही प्रकृतींची सत्ता असते.

८. या गुणस्थानात आयुबंध होत नाही. तीर्थंकर प्रकृतीची सत्ता असणारा या गुणस्थानात जात नाही.

## गुणस्थान ४ थे - असंयत सम्यग्दष्टी

**प्रश्न – असंयत सम्यग्दृष्टी गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - दर्शनमोहनीयाच्या तीन व अनंतानुबंधीच्या चार प्रकृतींचा अनुदय असतांना पाच ( अनादि मिथ्यादृष्टीच्या अपेक्षेने ) वा सात ( सादि मिथ्यादृष्टीच्या अपेक्षेने ) प्रकृतीचा अनुदय असतांना जीवाला सम्यक्त्व प्राप्त होते. परंतु अप्रत्याख्यानावरणादि १२ कषाय व ९ नोकषायांचा उदय असल्यामुळे असंयम असतो. व्रते पाळण्याचे परिणाम होत नाही. त्यास असंयत सम्यग्दृष्टी गुणस्थान म्हणतात.

**प्रश्न – या गुणस्थानात दर्शनमोहनीयाचे निमित्त कशाप्रकारे असते ?**

उत्तर - १. दर्शनमोहनीयाच्या दोन सर्वघाति प्रकृतींचा उदयाभावी क्षय, सम्यक्प्रकृतिचा उदय असेल तर तो क्षायोपशमिक सम्यक्दर्शन असते. या सम्यक्त्वात अनंतानुबंधीचा सद्वस्थारूप उपशम असतो. अनंतानुबंधी चौकडी सम्यक्त्वाचे आसादन करणे असाही तिचा स्वभाव असल्यामुळे १ स्वरूपाचरणाचा घात व २ सम्यक्त्वाचे प्रतिबंधक म्हणून त्यास द्विस्वभावी म्हटले आहे. म्हणून येथे अनंतानुबंधीचे दर्शनमोहनीयरूपाने ग्रहण आहे.

२. पाच सात प्रकृतींचा उपशम वा क्षय असतांना औपशमिक वा क्षायिक सम्यग्दृष्टी होतो.

**प्रश्न – सम्यक्त्वाचे अंतरंग स्वरूप व बहिरंग स्वरूप कोणते ?**

उत्तर - १. आत्म्याच्या ज्ञायक स्वभावाची प्रतीती, रागादिकामध्ये परत्वाची मान्यता हे सम्यक्त्वाचे अंतरंग स्वरूप आहे.

२. पंचपरमेष्ठिचे श्रद्धान, कुदेवादिकांना देवादि न मानणे, सात तत्त्वाचे श्रद्धान, प्रशमादिक ४ गुण किंवा ८ अंगानी सहित असणे हे सम्यग्दर्शनाचे बाह्य चिन्ह आहे.

३. सम्यक्त्वापासूनच मोक्ष मार्गाचा प्रारंभ होतो व तो नियमाने अर्धपुद्गल परिवर्तनापूर्वी मोक्षप्राप्त करतो. म्हणून त्यास जिनेश्वराचे लघुनंदन, दृष्टिमुक्त स्वसमय म्हणतात. सम्यग्दर्शन हीच मोक्षमार्गाची प्रथम पायरी आहे, याशिवाय सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र असत नाही.

४.अनंतानुबंधीचा अनुदय असल्यामुळे स्वरूपाचरण चारित्र असते. परंतु अप्रत्याख्यानावरणाच्या उदयाचे निमित्ताने असंयम असतो.

५.अंतरंग स्वरूपसद्भावात बहिरंग चिन्ह असतेच असते परंतु बहिरंग चिन्ह दिसत असूनहि सम्यग्दर्शन असेलच असा नियम मात्र नाही.

**प्रश्न – हे क्षायोपशमिक सम्यक्त्व किती प्रकारचे असते ?**

उत्तर - चार प्रकारचे असू शकते.

१. सम्यक् प्रकृती सोडून वर्तमान काळी उदयास येण्यायोग्य दर्शनमोहनीयाच्या दोन सर्वघातिचा उदयाभाविक्षय व भाविकाळात उदयास येण्यायोग्य यांचाच सद्वस्थारूप उपशम व अनंतानुबंधीचा सदुपम आणि सम्यक्प्रकृतीचा उदय असतांना क्षायोपशमिक सम्यग्दर्शन होते.


२.चार अनंतानुबंधीचे विसंयोजन, मिथ्यात्व व सम्यग्मिथ्यात्वाचा उपशम व सम्यक्प्रकृतीचा उदय.

३.चार अनंतानुबंधीचे विसंयोजन, मिथ्यात्वाचा क्षय, सम्यक्मिथ्यात्वाचा उपशम व सम्यक्प्रकृतीचा उदय असतांना प्रगट होणारे.

४.सम्यक्प्रकृती सोडून सहाचा क्षय व सम्यक्प्रकृतीचा उदय असतांना प्रगट होणारे हे चारही क्षायोपशमिक सम्यक्त्व आहे.

५.सातही प्रकृतीचा उपशम वा क्षय असतांना प्रगट होणारे औपशमिक वा क्षायिक सयग्दर्शन.

## चौथ्या गुणस्थानाचे प्रतीक




१.हा जीव भोग भोगतांना दिसतो पण नाइलाज म्हणून. उदा- खरूज झालेल्या व्यक्तिला खाजवण्याची इच्छा नसते तरी खाजवल्या जातेच तशी याची अवस्था असते.

२.ह्याला प्रशम, संवेग, अनुकंपा, आस्तिक्य हे चार गुण असतातच पण हे आहे म्हणून सम्यक्त्व असेलच हा मात्र नियम नाही.

३.प्रशम - समीचीन रीतीने कषायांची मंदता यास प्रशम म्हणतात.

४.संवेग - संसार, भोग व शरीर ह्या बाबत अरूची ( भीती ) ह्यास संवेग म्हणतात.

५.अनुकंपा - प्राणीमात्राबाबत कल्याणाचा ( दयाभाव ) भाव ह्यास अनुकंपा म्हणतात.

६.आस्तिक्य - धर्मावर व तत्त्वांवर, शुध्दआत्म्यावर अकाट्य विश्वास यास आस्तिक्य म्हणतात.

७.ह्या गुणस्थानवर्ती जीवाचा करणी, मंत्र तंत्र, अतिशय, चमत्कार ह्यावर विश्वास असत नाही. कारण तो निमित्ताची अकिंचीत्करता क्रमनियततेवर विश्वास ठेवणारा असतो.

८.प्रवृत्ती पुण्यरूपाची असते. पण पुण्य व पाप ह्या दोहोसही हेय मानतो. मोक्षमार्ग मानत नाही.

९.हा संसाराचे नाटक करतो. हा जघन्य अंतरात्मा असतो.

१०.कर्मचेतना ( पराचे कर्तृत्व घेणे. ) कर्मफलचेतना ( पराचे भोक्तृत्व

घेणे ज्ञानचेतना ( ज्ञानास्वभावाचे संचेतन ).

११. ह्याला लब्धिरूप ज्ञानचेतना सदाच असते. उपयोगरूप कधी असते कधी नसते.

१२. कर्मचेतना व कर्मफलचेतना ( स्वामित्वाच्या ) रूपाने कधीच असत नाही. ( अभिप्रायातून असत नाही. )

१३. ह्यास शुध्दआत्म्याची अनुभूती अल्पकाळ असतेच. ह्यालाच आचार्य जयसेन शुध्दोपयोग, शुध्दात्मभावना, निश्चय रत्नत्रय म्हणतात. ( समयसार गाथा ३२० )

१४. इथे निश्चय व व्यवहार दोन्ही धर्मध्यान असतात.

१५. ह्यास आठअंगांचे पालन, सातभय व २५ दोषानी रहीत असे सम्यग्दर्शन असते.

१६. २५ दोष -

| दोष | गर्व | मूढता | अनायतन |
|---|---|---|---|
| ८ + | ८+ | ३+ | ६ |

सम्यग्दृष्टी सात भयाने रहित असतो. त्या सात भयाचे स्वरूप खालील प्रमाणे ---

**सात भयाचे स्वरूप**

**१. इहलोक भय व. २. परलोक भय –**

१. ह्या भवांत वा परभवांत माझे कुणी वाईट तर करणार नाही ? वाईटतर होणार नाही ? पापोदय तर उदयास येणार नाही ? दुःख तर भोगावे लागणार नाही अशी भीती म्हणजे इहलोक व परलोकभय होय.

२. ज्ञानीची मान्यता - माझालोक तर सदा शाश्वत, एक चैतन्यरूप, परापासून अत्यंत भिन्न, ध्रुव आहे. हे ज्ञानी मानतो त्यास हे २ भय असत नाहीत.

**३. वेदना भय –**

१. रोग होण्यापूर्वीच रोग होईल या भीतीने सदा ग्रस्त असतो. वा कल्पनेतच वेदना रंगवतो. भयाक्रांत होतो हे वेदनाभय होय.

२. ज्ञानीची मान्यता - अभेदरूप वेद्य वेदकभाव ( आत्माच वेद्य/

भोग्य व आत्माच वेदकही भोक्ता ) स्विकारतो. त्यामुळे रीराश्रित वेदनेस आपली मानत नाही.

**४. मरण भय –**

१. हा अज्ञानी जीव सदाच मरणास भितो. कारण तो द्रव्यपर्यायास आपले स्वरूप मानतो. आपल्या प्राणांचा उच्छेद होईल ही भीती त्यास सदा त्रस्त करीत असते. हे मरण भय होय.

२.ज्ञानीची मान्यता - ज्याचा कधीच वियोग होत नाही अशा चैतन्य प्राणाचा स्वीकार करतो म्हणूनून ज्ञानीस मरणभय असत नाही.

**५. अगुप्ती भय –**

१. आपल्या घरात कुणी शिरु नये म्हणून कडेकोट सुरक्षा करतो. जाग्रण करतो. त्यास सदा अगुप्ती ( असुरक्षा ) चे भय असते.

२. ज्ञानीची मान्यता - प्रत्येक वस्तुचे स्वरूपच स्वयं गुप्त आहे. स्वचतुष्टयाचे उल्लंघन कुणीच करू शकत नाही. व परचतुष्टयाचा स्वीकार कुणी करूच शकत नाही. ही ज्ञानीची मान्यता असते म्हणून त्यास हे भय नाही.

**६. अत्राण भय –**

१. हा जीव सदा स्वत: स व परास अशरण मानतो. नाना गोष्टींना मंत्रादिक, देवादिकांना शरण जातो त्यास अत्राण भय म्हणतात.

२. ज्ञानीची मान्यता - आपला आत्माच सदा शाश्वत, शरणभूत आहे. हे मानतो म्हणून त्यास हे भय असत नाही.

**७. अकस्मात भय –**

१. क्रमनियततेवर विश्वास नसल्यामुळे अकस्मात आपत्ती, रोग, मरणादि येईल ही भीती सतत असते. ह्यास अकस्मात भय म्हणतात.

२. ज्ञानीची मान्यता - त्याचा क्रमनियततेवर पूर्ण विश्वास असतो. त्यामुळे काही कधी अकस्मात घडते ही भिती त्यास असत नाही.

## सम्यक्त्वाची आठ अंगे

### १. नि:शंकित अंग –

१. सम्यक्दृष्टीस सात तत्त्वे, देव, शास्त्र, गुरु, शुद्धआत्मा याबाबत कधीच संशय असत नाही.

२. ह्याला सात भय असत नाही, म्हणून तो नि:शंक, निर्भय असतो.

### २. नि:कांक्षित अंग –

१. ज्ञानी संसारसुखाची व भोगाची कधीच इच्छा करीत नाही. म्हणून नि:कांक्ष असतो.

२.ह्याचे ज्ञायकभावरूपाने परिणमन झाले असते, त्यामूळे सर्व परवस्तु बाबत, कर्म फलाबाबत वा शुभभावा बाबत इच्छा करीतच नाही. म्हणून नि:कांक्षित गुणाने सहीत असतो.

### ३. निर्विचिकित्सा अंग –

१. हा प्रत्येक वस्तुच्या स्वभावाने त्यास स्वीकारतो. त्यामुळे तो वृद्ध, ग्लान, रोगी गुरुबाबतही किळस करीत नाही. म्हणून तो निर्विचिकित्सा अंगाने युक्त असतो.

### ४. अमूढदृष्टी अंग –

हा मिथ्या श्रद्धान व ज्ञानानी रहित असतो. त्यामुळे कोणत्याच प्रकारचा मूढभाव यास नसतो. तो प्रत्येक वस्तुचे स्वातंत्र्य जाणत असल्यामुळे अमूढदृष्टी असतो.

### ५. उपगूहन अंग –

१. स्वत: चे गुण व पराचे दोष झाकणे उपगूहन होय.

२. आपल्या व पराच्या रत्नत्रयाची वृद्धी करणे हे उपबृंहन होय.

३. ज्ञायकभावरूपाने स्वत: स स्वीकारतो त्यामुळे ज्ञानी सर्व शक्ती सिध्दभक्तीमध्ये लावतो. त्यामुळे आत्म्याचे सामर्थ्य वाढविणारा उपबृंहक होतो.

**६. स्थितीकरण अंग –**

१. रत्नत्रय धर्मापासून च्युत झालेल्या स्वत: स वा परास त्यामधे स्थिर करणे यास स्थितीकरण अंग म्हणतात.

२. आत्म स्वरूपामधे सतत स्थिर राहण्याचा प्रयत्न करतो.

३. धर्म बांधवावरील आपत्तीकाली त्यास योग्य ती मदत करून त्यास धर्मामध्ये स्थिर करणे. हे स्थितीकरण अंग होय.

**७. वात्सल्य अंग –**

१. साधर्मी बांधवावर नि:स्वार्थ प्रेम करणे - गोवत्स सम

२. ज्ञानी सदा धर्मवत्सल असतो. त्यामुळे रत्नत्रय धर्मावर वा त्याने युक्त जीवावर अपेक्षा न करता नि:स्वार्थ प्रेम करतो. ह्यास वात्सल्य अंग म्हणतात.

**८. प्रभावना अंग –**

१. जिनधर्माच्या प्रभावनेच्या भावनेपूर्वक पूजा, प्रतिष्ठा शिबिरे, मिरवणुकी आदि करणे हे बाह्य प्रभावना अंग होय.

२. स्वत:च्या आत्म्यास सतत रत्नत्रय तेजाने प्रभावीत करणे. ही निश्चय प्रभावना होय.

३. ज्ञानी सदा ह्या आठ अंगानी युक्तच असतो.

१. औपशमिक सम्यक्त्वीला प्रथम गुणस्थानात गेलेच पाहिजे हा नियम नाही. तो क्षायोपशमिक सम्यक्दृष्टीही होतो. सासादनात, मिश्र गुणस्थानात जातो.

२. महाव्रत वा अणुव्रत पाळण्याचा रागभाव ह्या जीवास नसतो म्हणून असंयमी म्हणतात.

३. ह्या गुणस्थानाचा काळ जघन्य अंतर्मुहूर्त व उत्कृष्ट साधिक तेहतीस सागर दोन मधील सर्वकाळ मध्यम काल असतो.

**४. उत्कृष्ट काळ** - सर्वार्थसिध्दिीमधे ३३ सागर तो अविरत सम्यक्दृष्टि राहतो. त्यानंतर पूर्वकोटी वर्ष आयु घेऊन मनुष्य होतो.

मनुष्य भवांतील ५ ते १४ गुणस्थानाच काळ वजा करुन तो चवथ्यात राहतो. हाच एक कोटीपूर्व साधिक ३३ सागर काळ होय.

५. ह्या गुणस्थानात द्रव्यलिंगी मुनी जर शुध्द आत्मयाचे ध्यान करतो तेव्हा तो सातव्या गुणस्थानात जातो.

६. हाच जीव किंवा द्रव्यलिंगी श्रावक पाचव्या गुणस्थानात जातो.

७. हा जीव संक्लेषाने दुसऱ्यात, तिसऱ्यात व प्रथम गुणस्थानात जातो.

८. या गुणस्थानात पहिल्या, तिसऱ्या पाचव्या व सहाव्या गुणस्थानातून येऊ शकतो.

९. खाली येतांना संक्लेश परिणाम होतात. वरील गुणस्थानात चढतांना शुध्दआत्माच ध्यानाचा विषय असतो.

१०. चवथ्या गुणस्थानाची प्राप्ती पण शुध्द आत्माच्याच ध्यानाने होते.

११. ह्या गुणस्थानातच धर्माची सुरवात होते. मोक्षमार्गस्थही हाच जीव होतो. ह्या सर्वांचे कारण शुध्द आत्मा दृष्टीत येणे हेच याचे स्वरूप आहे.

* गुणस्थानाचा जघन्य काळ अंतर्मुहूर्त व उत्कृष्ट काळ साधिक तेहतीस सागर असतो.

**प्रश्न – या गुणस्थानातून वर कोणत्या गुणस्थानात जातो ? व वरून कोणत्या गुणस्थानातून येतो ?**

उत्तर - तो पाचव्या वा सातव्या गुणस्थानात जावू शकतो व सहाव्यातून, पाचव्यातून खाली येतांना चवथ्यात येतो.

**प्रश्न – या गुणस्थानातून खाली पडेल तर तो कोणत्या गुणस्थानात जाईल ?**

उत्तर - दुसऱ्या तिसऱ्या व पहिल्या गुणस्थानात जावू शकतो.

विशेषता– या गुणस्थानाची प्राप्ती जागृतपणी शुध्दआत्म्याच्या ध्यानपूर्वकच होते. त्यामळे त्याच्या सर्वगुणांचे उर्ध्वगामी परिणमन चालू होते.

## गुणस्थान ५ वे - देशविरत अथवा संयतासंयत

**प्रश्न – संयतासंयम गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - अनंतानुबंधी चार आणि अप्रत्याखानावरण चार अशा आठ कषाय कर्माचा अनुदय असतांना श्रावकांची बारा व्रते व अकराप्रतिमा पाळण्याचे, त्रसहिंसेपासून निवृत्त होण्याचे, मूलगुण व व्रते निरतिचार पाळणे असे संयमाचे परिणाम होतात. परंतु प्रत्याख्यानावरणाचा उदय असल्यामुळे सकल-संयम होऊ शकत नाही म्हणून असंयमही असतो. त्यामुळे स्थावरहिंसा सुटत नाही. गृहस्थसुलभ आरंभ व परिग्रह सुटत नाही. या कारणाने असंयमही असतो. त्यास संयतासंयत अथवा देशसंयम गुणस्थान म्हणतात. ज्या आठ कषायांच्या अनुदयाने आंशिक संयम प्रगट होतो व प्रत्याख्यानाच्या उदयामुळे अविरती असते, म्हणून त्यास उपरोक्त नांवे आहेत. संज्वलन कषायाच्या उदयात सकल संयमाचा घात होत नाही. म्हणून संज्वलन व नोकषायांच्या उदयाने संयमभाव होत नाही. त्याच्या उदयानुसार प्रमत्त-अप्रमत्त भाव होतात.

**प्रश्न – या गुणस्थानाची विशेषता काय आहे ?**

उत्तर - १. हे गुणस्थान नारकी व देवांना होतच नाही. फक्त मनुष्य आणि तिर्यंचांनाच होते. तेच गुरुसाक्षीने व्रते धारण करू शकतात

२. चौथ्या गुणस्थानातील श्रध्देची निर्मलता कायम आहे. परंतु कषाय आणखी घटल्याने संयम प्रगट होतो. परंतु आंशिक अविरतीही असते.

३. चौथ्या गुणस्थानामध्ये मिथ्यात्व व अनंतानुबंधीच्या अनुदया पासून सम्यग्दर्शन प्रगट होते. परंतु चवथ्या पासून तो दहाव्या पर्यंत ज्या अंशाने चारित्रमोहनीयाचा उदय आहे, तद्नुसार कषायभाव असतात. म्हणून कर्मधाराही असते. परंतु ज्या अंशाने कषायांचा अनुदय आहे तद्नुसार शुध्दताही प्रगट होते, त्या अंशाने ज्ञानधाराही असते. अशी ही मिश्र परिणती दहाव्या गुणस्थानापर्यंत असते. त्यामुळे तेथे कषायांच्या अभावानुसार ज्ञानधारा व उदयानुसार कर्मधारा असते.

त्याप्रमाणे तेथे संवर-निर्जरा व आस्त्रव बंध ही असतो.
४. या गुणस्थानातील नाना जीवाच्या अपेक्षेने विशुध्दतेची तरतमताही असते.
१. हे गुणस्थान मनुष्य व तिर्यंचगतितच होते.
२. ह्यांनी गुरुसाक्षीपूर्वक व्रते धारण केली असतात.
३. चवथ्या गुणस्थानापासूनच रागधारा ( कर्मधारा ) व ज्ञानधारा सुरू होते. ह्या गुणस्थानात चवथ्या गुणस्थानाच्या अपेक्षेने ज्ञानधारा वाढली व रागधारा कमी झाली असते.
४. दर्शन प्रतिमा व उद्दिष्ट आहारत्याग प्रतिमेमधे जरी खूप अंतर आहे, तरी दोघांचे गुणस्थान पाचवेच असते.
बारा व्रतांचे स्वरूप
**१. अहिंसाणुव्रत –** १. ज्यात त्रस हिंसेचा त्याग व संकल्पी हिंसेचा त्याग असतो व मिथ्यात्वाचा अभाव असतो ते.
२. प्रमादपूर्वक रागभावांची उत्पत्ती न होणे हे अहिंसाणु व्रत होय.
**२. सत्याणुव्रत –** १. खोटे न बोलणारा किंवा पराच्या सुरक्षेसाठीच क्वचीत खोटे बोलणारा.
२. तत्त्वाबाबत वा शास्त्राच्या प्रतिकूल न बोलण्यास सत्याणुव्रत म्हणतात.
**३. अचौर्याणुव्रत –** १. न दिलेली परवस्तु घेणे वा घेण्याचा भाव ह्यांच्या त्यागास अचौर्याणु व्रत म्हणतात.
२. परपदार्थांचा आपला म्हणून स्वीकार न करण्यास अचौर्याणुव्रत म्हणतात.
**४. ब्रम्हचर्याणुव्रत –** १. स्व. स्त्री सोडून परस्त्रीमात्राचा त्यागी.
२. आत्म्यामधेच रमण्याची इच्छा करणारा.
३. रागादिक व्यभिचारी भावांचा अभिप्रायातून त्याग ह्यास ब्रम्हचर्यव्रत म्हणतात.
**५. परिग्रह परिमाण व्रत –** १. दहा प्रकारच्या बाह्य परिग्रहाची मर्यादा करणे.

२. बाह्य परिग्रह - १. शेती, २. वास्तु, ३. चांदी, ४. सोने, ५. पशु, ६. धान्य, ७. नोकर, ८. भांडे, ९ कपडा, १०, दासी असे दहा परिग्रह, ३. पर व विकार ह्यांच्या ममत्वाचा अभाव ह्यास परिग्रह परिमाण व्रत म्हणतात.

**६. गुणव्रत – दिग्व्रत –** १. दहाही दिशेचा आजन्मासाठी गमागमनाच्या मर्यादेस दिग्व्रत म्हणतात.

२. ह्यात मर्यादेच्या बाहेरील ममत्वाचा व पापांचा त्याग असतो.

**७. देशव्रत –** १. दिग्व्रतात केलेल्या मर्यादेमधे परत दिशांच्या, गावाच, घराच्या, काही कालासाठी गमनागमनाच्या मर्यादेस देशव्रत म्हणतात.

२. ह्याय मनावर, इच्छेवर आळा घालण्यासाठी व संयमाची सवय लागण्यासाठी हा त्याग असतो.

**८. अनर्थ दंड व्रत –** १. अनर्थ - निष्प्रयोजन, दंड-पाप, व्रत-त्याग.

२. विनाकारण होणाऱ्या पापांच्या त्यागास अनर्थदंड व्रत म्हणतात.

३. स्थावरहिंसेचा त्याग नाही. म्हणून जर निर्गल स्थावर हिंसा होत असेल तर त्याचाही ह्या व्रतात आहे.

४. पापभिरूता ह्या व्रतामुळे प्राप्त होते.

५. अणुव्रतास वृद्धिंगत करतात. म्हणून ह्यास गुणव्रत म्हणतात.

६. अनर्थ दंडाचे भेद- पाच आहेत.

**✻ अपध्यान –** वाईट चिंतवन, भूत, भविष्यकालीन पर्यायचे उगीच चिंतवन, आर्त, रौद्र परिणाम

**✻ दुश्रृती –** पाप वा वाईट गोष्ट ऐकणे, पाहणे, वाचणे इंद्रियांच्या पुष्टीकारक वाचनादि रूचिपूर्वक दुसऱ्याची निंदादिक ऐकणे.

**✻ पापोपदेश –** दुसरे पापकृत्यामध्येच प्रवृत्त होतील असा सल्ला वा उपदेश देणे ह्यास पापोपदेश म्हणतात. जसे - ह्या काळात पापाशिवाय जगणे शक्य नाही असे भाव

**✻ हिंसादान –** हिंसेस निमित्तभूत वस्तूंचे दान देणे जसे - चाकू, सूरी, घासलेट आदि ह्यास हिंसादान म्हणतात. यामध्ये हिंसेस अनुमोदन घडते.

**✽ प्रमादचर्या –** १. निष्प्रयोजन स्थावरांची हिंसा करणे.
२. आपल्या सुखासाठी ज्यात स्थावरांची अधिक हिंसा घडते अशी साधने वापरणे. जसे– गॅसमुळे अग्निकायिक जीवांचा अधिक घात होतो. इत्यादी ह्यास प्रमादचर्या म्हणतात. ह्या पाचही अनर्थदंडांचा अनर्थदंडव्रतात त्याग असतो.

**९. शिक्षाव्रते –** १. स्वरूप - मुनींच्या व्रतांची जे शिक्षा देतात ते शिक्षाव्रत होय. ते चार आहेत.
२. सामायिकव्रत - घडलेल्या दोषांच्या परिमार्जनासाठी व आत्मचिंतनासाठी तिन्ही काली साम्यभावास धारण करणे यास सामायिकव्रत म्हणतात.
३. नासाग्रदृष्टी, पद्मासनादि द्वारे मन वचन कायेस स्थिर करून आत्मचिंतन करणे.

**१०. प्रोषधोपवास व्रत –** १. अष्टमी चतुर्दशीस उपवास व पर्वाच्या आदल्या दिवशी व नंतरच्या दिवशी ( ७-९-१३ - पोर्णिमा ) एकासन करणे यास प्रोषधोपवास म्हणतात.
२. ह्यामध्ये एवढ्या काळासाठी सांसारिक कार्यापासून अलिप्त होण्याचा भाव आहे. व आत्म उपासनेचा भाव आहे.
**३. उपवास –** उप=जवळ, वास=राहणे. आत्माची उपासनाच उपवास होय. त्यावेळी बाह्यत: सर्वप्रकारच्या आहाराचा त्याग असतो.
४. प्रोषध=एकासन, उपवास=उपवास एकावन सहित उपवास.

**११. भोगोपभोग परिमाण व्रत –** १. भोग्य ( एकच वेळ भोगण्यायोग्य ) व उपभोग्य ( वारंवार भोगण्यायोग्य ) वस्तूंचे प्रमाण करून बाकी सर्वांचा त्याग करणे. हे भोगोपभोग परिमाणव्रत होय.
२. ममत्वभाव कमी करण्यासाठी हे व्रत धारण करतो.

**१२. अतिथी संविभाग व्रत –** १. आपल्या रोजच्या प्राप्तीतून एक चतुर्थांश भाग रोज दानासाठी काढणे ह्यास अतिथीसंविभाग व्रत म्हणतात.

२. दान देतांना ममत्व आपोआप कमी होते. म्हणून श्रावकाचे दान हे सहा आवश्यकातील एक आवश्यक आहे.
३. याप्रमाणे हे चार शिक्षाव्रतांचे स्वरूप पाहिले.
१. **प्रतिमेचे स्वरूप–** निरतीचारपूर्वक ( दोष न लागता ) सम्यक्‌दर्शन व व्रतांच्या पालनाची प्रतिज्ञा करणे, यास प्रतिमा म्हणतात.
२. ह्यांत चारित्राचा अंश प्रगट होतो. व भोगापासून विरक्ती उत्पन्न होते.

## प्रतिमेचे भेद-११

**१. दर्शनप्रतिमा –** १. सम्यक्‌दर्शन सहित आठ मूलगुणांचे निरतिचार पालन सप्तव्यसनांचा त्याग ह्यास दर्शनप्रतिमा म्हणतात.
२. निरतिचार - दोषांनी रहित
३. सम्यक्‌दृष्टीस ४ अनंतानुबंधी व ३ दर्शनमोहनीयाचाच अभाव असतो. दर्शनप्रतिमाधारीस ह्यानी सहीत ४ अप्रत्याखानाचाही अभाव असतो. त्यामुळे हा बुद्धिपुरस्सर व्रतांचा स्वीकार करतो.
**२. व्रत प्रतिमा –** १. दर्शन प्रतिमे सहीत निरतीचार बारा व्रतांचे पालन करणाऱ्यास व्रत प्रतिमा म्हणतात.
२. हा शुध्दच भोजन करणारा असतो.
**३. सामायिक प्रतिमा –** १. दोन प्रतिमेसहीत सामायिकाचे निरतिचार पालन करणे यास सामायिक प्रतिमा म्हणतात.
२. हा शुध्दआत्म्याचे चिंतवन करणारा असतो.
**४. प्रोषधोपवास प्रतिमा –** १. मागील सर्व प्रतिमेसहीत प्रोषधोपवासव्रताचे निरतिचार पालन.
२. आत्म्याच्या उपासनेत अधिक काळ घालविणारा असतो.
**५. सचित्त त्याग प्रतिमा –** १. मागील सर्व प्रतिमासहीत जीवयुक्त पदार्थांच्या भक्षणाचा त्यागी, प्राणीमात्राबाबत दयेचा भाव. पाणी, भाजी फळे आदि सर्व पदार्थ प्रासुक करूनच भक्षण करणे. यास सचित्तत्याग प्रतिमा म्हणतात.
**६. रात्री भोजन त्याग –** १. चारही प्रकारच्या आहाराचा ( अन्न-धान्य,

पेय - पातळ, खाद्य-पेढादि, लेह्य-चाटण्यायोग्य ) मन, वचन, काय, कृत, कारित, अनुमोदनेने रात्री भोजनाचा त्याग ह्यास रात्री भोजन त्याग प्रतिमा म्हणतात.

२. मागील पाच प्रतिमांसहीत ह्याचे निरतीचार पालन असते.

**७. ब्रम्हचर्य प्रतिमा –** १. मागील सहा प्रतिमेसहीत ब्रम्हचर्यव्रताचे नरतीचार पालन, ' स्व ' स्त्रीचा पण त्याग ह्यास ब्रम्हचर्य प्रतिमा म्हणतात.

२. बाह्यत: - लुंगी, दुपट्टा, बनियन शिवाय बाकी वस्त्रांचा त्यागी असतो.

**८. आरंभत्याग प्रतिमा –** मागील सर्व प्रतिमांसहीत संपूर्ण आरंभाचा ( आवश्यक असाही ) त्यागी, कृताचा त्यागी ह्यास आरंभत्याग प्रतिमा म्हणतात.

**९. परिग्रह त्याग प्रतिमा –** मागील सर्व प्रतिमांसहीत पूर्व परिग्रहाच्या परिमाणांत अजून कमी परिग्रह ठेवणे. बाकी सर्वांचा त्याग ह्यास प्ररिग्रह त्याग प्रतिमा म्हणतात.

**१०. अनुमती त्याग प्रतिमा –** सर्व परिग्रहाबाबत, व ऐहिक कार्यामधे हा अनुमती ( अनुमोदना ) पण देणार नाही. त्यास अनुमती त्याग प्रतिमा म्हणतात.

**११. उद्दिष्टआहार त्याग प्रतिमा –** १. स्वत:च्या उद्देशाने केलेल्या आहाराचा त्याग असतो. कारण त्यामधे होणाऱ्या आरंभी हिंसेचा भागीदार होऊ नये म्हणून.

२. हा गृहत्यागी असतो. धर्माचरणासाठी याचना न करिता भिक्षावृत्तिने आहार ग्रहण करतात.

३. ह्या प्रतिमेचे दोन भेद आहे: - क्षुल्लक व ऐल्लक

**१. क्षुल्लक –** अपुरे वस्त्र, चादर परिधान करतो, खाली बसून व पात्रात आहार घेतो, वाहनात बसू शकतो, कैचीने केस कापू शकतो.

त्यास क्षुल्लक म्हणतात.

**२. ऐल्लक –** लंगोटी मात्र वस्त्र धारण करेल, उभे राहून व हातातच आहार घेईल, पायी चालेल, केशलोच करणारा असतो, त्यास ऐल्लक म्हणतात.

४. सर्वक्रिया मुनीवत् असूनही लंगोटीची मूर्च्छा आहे. म्हणून व प्रत्याख्यानावरण कषाय आहे म्हणून उत्तम श्रावकच म्हटल्या जातो.

५. आर्यिका पण उत्तम श्रावकच असते. तिला उपचाराने महाव्रती म्हणता येते. कारण तिला साडीची मूर्च्छा नाही. स्त्री पर्यायीमुळे नाईलाजाने ती ग्रहण केली असते.

६. ऐल्लक वस्त्र सोडी शकतात. पण मूर्च्छेमुळे जर सोडली नाही तर उपचाराने पण महाव्रती होत नाही.

७. क्षुल्लक व ऐल्लकाचे गुणस्थान पाचवेच आहे. तरी दोघांच्या परिग्रह व आहारादिक क्रियेत अंतर आहेच, पण वीतरागतेत, संवर निर्जरेत, शुध्दोपयोगात, वा शुध्दपरिणतीमधेही अंतर आहे. क्षुल्लकापेक्षा ऐल्लकाला अधिक असते.

८. ऐल्लकाचे प्रत्याखानावरण कषाय मंदतम झाले असतात. म्हणून त्यांना शुद्धि अधिक असते.

## गुणस्थान ६ वे - प्रमत्तविरत गुणस्थान

**प्रश्न – प्रमत्तविरत गुणस्थानाचे स्वरूप काय आहे ?**

उत्तर - चारित्रमोहनीयाच्या प्रथम तीन कषायकर्मांच्या चौकडीचा अनुदय असल्यामुळे अविरती असत नाही. सकल संयम तर प्राप्त होतो. परंतु संज्वलनाच्या तीव्र उदयामुळे प्रमाद असतो, प्रमादामुळे आत्मध्यानात स्थिरता न राहता शुभोपयोग परिणती होते. हे या गुणस्थानाचे स्वरूप आहे.

१. इथे परिणतीत ( श्रध्देत ), शुध्दता असते. व उपयोग ( रागसहित ज्ञानोपयोग ) शुभ असतो.

२. इथे २८ मूलगुण पालन करण्याचा शुभराग असतो.

३. हे गुणस्थान पडतानाच ( उतरतांना ) होते.

४. ' कुशलेषु ( आत्मकल्याणकारी ). अनादर:- प्रमाद: ' आत्म कल्याणारी कार्यामधे अनादरास प्रमाद म्हणतात.

५. प्रमादाचे भेद १५ आहेत-

४. विकथा, ४ कषाय, ५. इंद्रिय, स्नेह, व निद्रा - १५ भेद

६. स्त्री कथा - स्त्रीचे हाव, भाव, क्रिया, रूपआदींचे कथन ( गप्पा ) करणे. त्यामध्येच रमणे ह्यास स्त्रीकथा म्हणतात.

७. चोरकथा - चोरी वा चोरांच्या गप्पेत रंगणे ही चोर कथा होय.

८. राजकथा - राजकारणाच्या गप्पेत रंगणे ही राज कथा होय.

९. भोजनकथा -भोजनाच्या कथेत - चर्चेत रंगणे ही भोजन कथा होय. ह्या चारही कथांमध्ये ज्याला रस वाटतो तो आत्मउपासनेपासून दूर राहतो. ( अरूची राहते. )

१०. मुनींना असणाऱ्या ४ विकथा -

१. स्त्री कथा - प्रथमानुयोगाचे शास्त्र लिहताना, वा कथा सांगताना स्त्री यांचे वर्णन करणे. ही स्त्रीकथा होय.

२. भोजन कथा - चरणानुयोगाचे कथन करतांना अभक्ष्य भक्ष्याचे कथन, गुरुंसमोर आहारात घडलेल्या दोषांचे प्रायश्चित घेतांना आहाराची चर्चा करणे आदि भोजन कथा होय.

३. राजकथा - राजाचे वर्णन सांगताना वा लिहताना होणारी कथा राजकथा होय.

४. चोरकथा - प्रथमानुयोग सांगताना, लिहिताना चोराचे वा चोरीचे वर्णन करणे ही चोर कथा होय.

११. पाच इंद्रियांनी त्यांच्या त्यांच्या विषयाचे ज्ञान होते. तेव्हा त्यातच जर रमलो तर तोही प्रमाद होय.

१२. कषायभाव नियमाने आत्मस्वभावाचे घातकच आहेत. म्हणून

कषायांचा प्रादुर्भाव हा प्रमाद आहेच.

१३. प्रीतीचा परिणाम हा कषायच आहे. म्हणून तो उत्पन्न होणे हा प्रमादच आहे.

१४. निद्रा - ही आत्मस्वरूपातील लीनतेला घातक असल्यामुळे प्रमादच आहे.

**प्रश्न – या गुणस्थानामध्ये तो केव्हा येतो व कधी वर जातो ?**

उत्तर - अ ) हे गुणस्थान पहिल्यातून, चौथ्यातून वा पाचव्यातून वर चढतांना होतच नाही. तो एकदम प्रथमत: सातव्या गुणस्थानातच जातो. व नंतर शुध्दउपयोगात शुभोपयोग असतो परंतु बारा कषायांच्या अनुदयात शुध्दपरिणती मात्र असते.

आ ) सहाव्यातून सातवे व सातव्यातून सहावे अशी पलटणी अंतर्मुहूर्तात होतच अते. जीव या गुणस्थानात सातव्यामधूनच येतो.

## गुणस्थान ७ वे- अप्रमत्तविरत गुणस्थान

**प्रश्न – अप्रमत्तविरत गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - चारित्रमोहनीय व संज्वलनाचा उदय मंद व अबुध्दिपूर्वक असल्यामुळे त्याची आत्मानुभूतीमध्ये सावधानता असते, प्रमाद असत नाही त्यास अप्रमत्तविरत गुणस्थान म्हणतात.

**प्रश्न – या गुणस्थानाचे किती भेद आहेत ? त्याचे स्वरूप काय ?**

उत्तर - या गुणस्थानाचे दोन भेद आहेत.

१. स्वस्थान अप्रमत्त व २. सातिशय अप्रमत्त

**स्वस्थान अप्रमत्त –** जेव्हा जीव सहाव्या व सातव्या गुणस्थानामध्ये अंतर्मुहूर्तामध्ये परिणमन करत असतो, तेव्हा त्यास स्वस्थान अप्रमत्त गुणस्थान म्हणतात.

**सातिशय अप्रमत्त –** जेव्हा जीव श्रेणी चढण्यास सन्मुख होतो व करणपरिणामपूर्वक विशुध्दतेचा प्रारंभ याच गुणस्थानामध्ये

अध: करणापासून होतो त्यास सातिशय अप्रमत्त म्हणतात.

**प्रश्न – श्रेणी चढण्यास कोणता जीव पात्र आहे ?**

उत्तर - १. द्वितीयोपशमिक सम्यग्दृष्टी व क्षायिक सम्यग्दृष्टी मात्र श्रेणी मांडून चढू शकतात.

२. औपशमिक सम्यग्दृष्टी फक्त उपशम श्रेणीच मांडू शकतो. परंतु दोन्ही सम्यग्दृष्टी उपशम श्रेणी मांडू शकतील. क्षपकश्रेणी फक्त क्षायिक सम्यग्दृष्टीच मांडू शकतो.

३. यासाठी क्षायोपशिमक सम्यग्दर्शनातून द्वितीयोपशम सम्यग्दृष्टी होतो, अथवा क्षायिक सम्यग्दृष्टी होतो. तेव्हाच तो श्रेणी मांडू शकतो. उपशम व क्षायिक त्यासाठी ४ अनंतानुबंधीचे विसंयोजन करून दर्शनमोहनीयाच्या तिन्ही प्रकृतींचा अंतरकरण उपशम करून द्वितीयोपशम सम्यग्दृष्टी होतो. अथवा तिन्हीचा क्षय करून क्षायिकसम्यग्दृष्टी होतो. तेव्हाच तो जीव श्रेणी चढण्यास पात्र होतो.

**प्रश्न – श्रेणी चढण्याचे प्रकार किती आहेत ? व त्याची प्रक्रिया कशी आहे ?**

उत्तर - श्रेणी चढण्याचे प्रकार दोन आहेत.

१. उपशम श्रेणी २. क्षपकश्रेणी

**उपशम श्रेणी –** उपशम सम्यग्दृष्टी अथवा क्षायिकसम्यग्दृष्टी चारित्रमोहनीयाच्या अवशिष्ठ एकवीस प्रकृतींचा उपशम करत करत ( ४ अप्रत्याख्यानावरण, ४ प्रत्याख्यानावरण, ४ संज्वलन व ९ नोकषाय ) तो अपूर्वकरण व ९ वे अनिवृत्तिकरण गुणस्थान चढतो. सूक्ष्मलोभ गुणस्थानात जाऊंन संपूर्ण मोहनीयाचा उपशम करतो. त्या उपशमाची कालमर्यादा असल्यामुळे ती स्थिती संपताच तो नियमाने खाली येतो. वर चढू शकत नाही. ७ ते ११ ही उपशम श्रेणीची गुणस्थाने आहेत.

**क्षपकश्रेणी –** क्षायोशमिक सम्यग्दृष्टी व उपशम सम्यग्दृष्टी क्षपकश्रेणी

चढू शकत नाही. क्षायिक सम्यग्दृष्टी जेव्हा त्याच २१ प्रकृतींचा क्षय करत करत आठ, नऊ, दहा गुणस्थान क्रमपूर्वक चढत चढत दहाव्यातून एकदम बाराव्यात जातो. तेथून तो अत्यल्प काळात केवलज्ञानी होऊन नियमाने मोक्ष प्राप्त करतो. ७-८-९-१०-१२ ही क्षपकश्रेणीची गुणस्थाने आहेत.

**प्रश्न – या गुणस्थानांना श्रेणी का म्हणतात ?**

उत्तर - एकतर ही गुणस्थाने अध:करण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, सूक्ष्मलोभ व उपशान्तमोह वा क्षीणमोह या क्रमाने चढतो. दुसरी गोष्ट या अध:करण, अपूर्वकरण व अनिवृत्तिकरण यामध्ये विशुध्दता क्रमाने अनंतगुणित समयासमयागणिक होते. म्हणून त्यास श्रेणी म्हणतात.

**या तीन करणाचे स्वरूप** ( पान ८८ ते ८९ पर्यंत पहा. )

* यातून एक कार्यकारणाचा नियम दृग्गोचर होतो की, एका द्रव्याच्या एका पर्यायीचे क्षणिक-उपादान, निश्चय उपादान एकच असते. एका जीवाच अपेक्षेनेही परिणामाचे उपादान नियतच आहे. या क्रमाने जसे परिणाम एकानंतर एक या क्रमाने होतात तसेच ते परिणामही हे नियतउपादानपूर्वकच होतात. व त्याचे उत्तरसमयवर्ती परिणाम ही नियतच सिध्द होतात. याप्रमाणे प्रत्येक परिणाम हा, ज्याप्रमाणे मोत्याच्या माळेमध्ये प्रत्येक मोती आपल्या नियतस्थानीच असतो त्याप्रमाणे, आपल्या काळी वस्तुस्वभावानेच नियत असतो. ह्या क्रमनियत परिणामाचे स्वरूपच यातून स्पष्ट होते.

१. इथे शुध्दोपयोगच असतो. ह्याचा काल अंतर्मुहूर्तच आहे.

२.बाह्यत: मुनीपद असून मिथ्यादृष्टी असणारा जीव उपशमसम्यक्त्व

व चारित्र एकदम धारण करील तर तीन करण होतात.

३.तोच जीव जर क्षायोपशमिक सम्यक्त्व व चारित्र एकदम धारण करील तर अध: करण व अपूर्वकरण दोनच करण परिणाम होतात.

४. कारण क्षायोपशमिक भावासाठी दोनच करण होतात. इथे

सम्यक्त्व व चारित्र दोन्ही क्षायोपशमिकच आहे.
५. औपशमिक व क्षायिक भावांसाठी तीनच करण होतात.
६. औपशमिक सम्यक्त्व व क्षायोपशमिक चारित्र प्राप्त करणाऱ्यास तीन करणच होतील.
७. ह्या गुणस्थानाचे दोन भाग आहेत स्वस्थान व सातिशय अप्रमत्त. स्वस्थानाच्या काली हा जीव सतत सहावे सातवे परत सहावे असे परिवर्तन करीत असतो.
८. श्रेणी चढण्याच्या सन्मुख झाला म्हणजे क्षायिक वा द्वितीयोपशम सम्यक्त्व, त्यांच्या प्रक्रियेने उपशम श्रेणी चढणारा जीव प्राप्त करतो.
९. क्षपकश्रेणी चढणारा क्षायिक सम्यक्त्वीच होतो. वा असतो. कारण दर्शनमोहनीयाचे सत्व असतांना चारित्रमोहीनीयाचा क्षय होत नाही.
१०. क्षायिक व द्वितीयोपशम सम्यक्त्वाची प्रक्रिया ( तिसऱ्या अध्यायातील पान नं. १०० पहा. )
११. नंतर तो सातिशयअप्रमत्त- अध:करण, होतो. इथून तो वरच चढतो. खाली पडणार नाहीच.

**प्रश्न – श्रेणी कशास म्हणतात ?**

उत्तर - चारित्रमोहनीय कर्माचा क्रमाने उपशम वा क्षय करीत वरच चढणे त्यास श्रेणी म्हणतात. उपशम करणारा अकराव्यातच जातो. व क्षय करणारा बाराव्यातच जातो.
१२. क्षायोपशमिक सम्यक्त्वी श्रेणी चढू शकत नाही.
१३. ह्या गुणस्थानात आयुर्बंध सुरू होत नाही. पण सहाव्यात सुरू झालेला ह्या गुणस्थानात आला तर काही काळ होतो.
१४. ह्या गुणस्थानात करण परिणाम सहा वेळा होतात.
१५. द्वितीयोपशम सम्यक्त्वासाठी २ + क्षायिक सम्यक्त्वासाठी २ + चारित्रमोहनीयाच्या उपशमासाठी १ + वा क्षयासाठी १ = ६ वेळा करण होतात.

१६. हे गुणस्थान ध्यानस्वरूप आहे. आहार विहारादि काली पण असते. पण तेव्हा ध्यान दशाच होते.

१७. अध:करणाची प्रक्रिया पान नं. १६९ पहा. इथे विशुध्दी अधिक व उपयोग शुध्द आत्म्याकडेच असतो.

## गुणस्थान ८ वे - अपूर्वकरण गुणस्थान

**प्रश्न – अपूर्वकरण गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - ज्या भूमिकेमध्ये भिन्नसमयवर्ती जीवाचे परिणामही विसदृशच असतात परंतु एकसमयवर्ती जीवाचे परिणाम मात्र समान किंवा असमान असू शकतात त्यास अपर्वकरण गुणस्थान म्हणतात.

१. हे भाव विशुध्दतर असतात प्रक्रिया ( ९१ ) पानावर पहा.

२. ह्या गुणस्थानात चढताना मरण येऊ शकते.

३. इथे चारित्रमोहनीयाचा क्षयोपशम आहे. म्हणुन क्षायोपशमिक भाव.

४. इथे चारित्रमोहनीयाच्या उपशमास सुरवात आहे म्हणुन औपशमिकभाव

५. इथे चारित्रमोहनीयाच्या क्षयास सुरवात आहे म्हणुन क्षायिकभाव म्हटल्या जातो. ( उपचार होतो. )

६. इथे ध्यान पृथक्त्ववितर्कविचार नांवाचे शुक्लध्यान असते.

७. इथे उपशमकरण निधत्तिकरण निकाचितकरण बंद होते.

| उपशमकरण | निधत्तिकरण | निकाचितकरण |
|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ |
| उपशमित कर्माची उदीरणा सुरू होणे | उपशमित कर्माची उदीरणा व संक्रमण सुरू होणे, | उपशमित कर्माची उदीरणा संक्रमण, उत्कर्षण अपकर्षण सुरू होणे. |

*ह्या अपूर्वकरणभावाचे स्वरूप औपशमिक चारित्राच्या वा क्षायिक चारित्राच्या प्रकरणात बघा.

८. आठही कर्म स्वभावाने जडच आहेत. ते आपल्या परिणमन

स्वभावामुळे कर्मरूप वा उपशम क्षयादिरूप परिणमते. अपूर्वकरणादि परिणाम फक्त निमित्त असतात.
९. ह्या गुणस्थानाचा जघन्य काल एक समयाचा असू शकतो. मरणाच्या अपेक्षेने. अकराव्यातून खाली आठव्यात एक समय राहून मरण येऊ शकते.
१०. ह्या गणस्थानाचा उत्कृष्ट काल अंतर्मुहूर्त आहे.
११. ह्या गुणस्थानवर्ती आत्मा नियमाने नवव्या गुणस्थानातच जातो.
१२. ह्या गुणस्थानवर्ती आत्मा उतरतांना सातव्या गुणस्थानातच जातो.
१३. ह्या गुणस्थानवर्ती आत्मा मरणाच्या अपेक्षेने एकदम चवथ्यातच जातो.
१४. ह्या गुणस्थानवर्ती जीव सातव्यातूनच येतो.
१५. ह्या गुणस्थानवर्ती जीव उतरतांना नवव्यातून येतो. कारण उपशमश्रेणीयुक्त जीव पडला तर अकराव्यातून क्रमाने दहावे, नवव्यात येईल. व मग आठव्यात येईल.
१६. येथेही अपूर्वकरणवत् स्थितीकांडकघातादी सर्व आवश्यके होतात.
१७. ह्या गुणस्थानवर्ती जीवाचे परिणाम एक समयवर्तीचे समान असमान व भिन्न समयवर्तीचे असमानच असतात.

| **जसे –** | जघन्य | उत्कृष्ट |
|---|---|---|
| प्रथम समय - | १ | ४५६ |
| दुसरा समय - | ४५७ | ९२८ |

१८. हा जीव नेहमीच शुध्दोपयोगाने युक्त असतो.

## गुणस्थान ९ वे - अनिवृत्तिकरण गुणस्थान

**प्रश्न – अनिवृत्तिकरण गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर –ज्या भूमिकेमध्ये भिन्न समयवर्ती जीवाचे परिणाम भिन्नच असतात आणि एकसमयवर्ती जीवाचा परिणाम समानच असतो त्यास अनिवृत्तिकरण गुणस्थान म्हणतात.
१. हे भाव विशुध्दतम असतात.

२. इथे २१ प्रकृतीचे उपशम वा क्षयाची प्रक्रिया सुरू होते.

३. आठव्या गुणस्थानवत् इथेही उपशम वा क्षय सुरू होतो. म्हणून औपशमिक वा क्षायिक भाव उपचाराने असतो. वस्तुत: क्षायोपशमिक भाव असतो.

४. इथे ध्यान पृथक्त्ववितर्कविचार हेच असते.

५. इथे चारित्रमोहनीयाच्या २१ प्रकृतींचा ४ अनंतानुबंधी सोडून १२ कषाय व ९ नोकषाय ह्यांचा उपशमश्रेणी क्षपकश्रेणीमध्ये क्रमाने उपशम ( अंतरकरणरूप ) वा क्षय होतो. ह्याचा खुलासा ( १०२ ) पानवर व क्षायिक चारित्राचे १०६ पानवर पहा.


६. ह्या गुणस्थानाचे नांव अनिवृत्तिकरण बादर सांपरायही आहे.

७. अ - नाही = निवृत्ती = भेद, बादर, = स्थूल, सांपराय = कषाय - ज्यांत भेद नाही असा एका समयात एकच परिणाम व दहाव्याच्या अपेक्षेने स्थूल कषाय म्हटल्या जाणारा शुध्दीवान जीव.

८. ह्या गुणस्थानाचा काल जघन्य एक समय मरणाच्या अपेक्षेने.

९. ह्याचा उत्कृष्ट काल अंतर्मुहूर्त आहे.

**अनिवृत्तिकरण मधे होणारा अंतरकरणाचा दृष्टांत**




## गुणस्थान १० वे - सूक्ष्मसांपराय गुणस्थान

**प्रश्न – सूक्ष्मसांपराय गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर –आठव्या व नवव्या गुणस्थानात क्रमाने मोहनीयाचा उपशम वा क्षय करत करत केवळ सूक्ष्म लोभाचा उदयमात्र असतो त्यास सूक्ष्मलोभ गुणस्थान म्हणतात.

**उदा. –** हे तीन करण परिणाम नाना जीवांच्या अपेक्षेने सांगितले आहेत. एकाच जीवाच्या अपेक्षेने तर त्याची विशुध्दता प्रतिसमय वाढतच असते.

**१. अध:करण –** भिन्न समयवर्ती नाना जीवांचे परिणाम जेथे सदृश वा विसदृश असू शकतात, तसेच एक समयवर्ती जीवाचेही परिणाम सदृश वा विसदृश असू शकतात. ते परिणाम अध:करण म्हटले जातात. हे सातिशय अप्रमत्त गुणस्थानात होतात.




**२. अपूर्वकरण –** जेव्हा भिन्न समयवर्ती नाना जीवांचे परिणाम भिन्नच असतात परंतु एक समयवर्ती जीवांचे परिणाम सदृश वा विसदृशही असू शकतात. त्या परिणामांना अपूर्वकरण म्हणतात.

**३. अनिवृत्तिकरण –** जेव्हा भिन्न समयवर्ती जीवाचे परिणाम भिन्नच असतात. व एक समयवर्ती जीवांचा परिणाम एकसारखाच असतो. त्या परिणामांना अनिवृत्तिकरण म्हणतात. निवृत्ती = अंतर. अ–नाही ते अनिवृत्ति होय. हे परिणाम नवव्या अनिवृत्तिकरण गुणस्थानात होतात.

( अ ) या सर्व करणातील परिणाम उत्तरोत्तर ( पूर्वीपेक्षा उत्तर परिणाम ) हा विशुध्दच असतो.

या परिणामावरून कार्यकारणाचे कांही विशेष खास लक्षात येतात

१. एकतर अध:करण यामध्ये जरी स्वस्थान अप्रमत्तापेक्षा विशुध्दता असली तरीही तेथे भिन्न समयवर्ती वा अभिन्न समयवर्ती परिणामामध्ये विशुध्दता सदृश वा विसदृश असूं शकते.

२. अपूर्व करणामध्ये भिन्न समयवर्ती जीवाचे परिणाम भिन्नच असतात हा नियम झाला. पण एक समयवर्ती जीवांचे परिणाम असमानही असूं शकतात हा नियम झाला.

३. तिसऱ्या अनिवृत्तिकरणाचा परिणाम सर्व प्रकारे नियत आहे. भिन्न समयवर्ती जीवांचे परिणाम भिन्नच असतात. आणि एक समयवर्ती जीवाचे परिणाम सदृश्यच असो. असा नियम झाला त्यामुळे जेवढे समय तेवढेच परिणाम हाहि नियम अनिवृत्तिकरणात आहे. तेही परिणाम अनंत आहेत.

४. याचा अर्थ असा आहे की, कारणपूर्वक जो स्वभाव प्रगट होतो त्याचे उपादान कारण नियमाने अनवृित्तिकरणाचा अंतिम समय.

( या तीन करणपरिणामांचा विशेष खुलासा तिसऱ्या अध्यायात प्रथम उपशम सम्यक्त्वाच्या प्रकरणामध्ये विस्तृतपणे केलेला आहे तेथून पाहावा. )

**प्रश्न – सूक्ष्म सांपराय गुणस्थान अलग मानण्याची काय आवश्यकता होती ?**

उत्तर –१. या गुणस्थानातील परिणाम व निमित्त ही पूर्व गुणस्थानातील परिणाम आणि निमित्तापेक्षा वेगळी आहे.

२. या वा पुर्वीच्या गुणांच्या फलात ही फरक आहे.

३. या गुणस्थानामुळेच मोक्षमार्ग निरपवाद व निश्चित होवून मोक्षाची निश्चिती झाली.

**याचे विशेष स्पष्टीकरण –** १. यापूर्वीच्या गुणस्थानामध्ये चारित्रमोहनीयाच्या संज्वलन व नोकषायाचा उदय होता. त्यामुळे ७ किंवा ८ कर्मांचा प्रतिसमयाला बंध होता

२. या १० व्या गुणस्थानामध्ये संज्वलनाचे तीनही कषाय व सर्व नोकषाय कर्मांच्या उदयाचा अभाव आहे. जो लोभ आहे तोही अतिसूक्ष्म

आहे. कषाय तर सातव्यापासूनच अबुध्धिपूर्वक होते. तसाच हाही लोभ अबुध्दिपूर्वकच आहे. परंतु ९ गुणस्थाना पर्यंत असणारा जीवभावाचे निमित्ते असतांना चारित्रमोहनीयासह ७ किंवा ८ कर्मांच्या आस्रवबंधास कारण आहे. तोपावेतो सात किंवा आठ कर्माचा बंध आहे. मोहनीयाच्या उदयाने होणारे भावच नवीन कर्मांच्या आस्रवबंधास कारण आहेत. परंतु या गुणस्थानामध्ये फक्त अतिसूक्ष्म लोभाचा उदय असून तो जळल्या दोरी प्रमाणे आहे. ज्याप्रमाणे जळलेली दोरी तीच आहे परंतु बांधण्यास उपयोगी नाही. तसेच हा सूक्ष्म लोभही नवीन मोहनीयाच्या आस्रव बंधास कारण नाही. म्हणजे मोहनीय, व आयु सोडून सहाच कर्मांचा तेथे आस्रव आणि बंध आहे. व तोही कमीत कमी स्थिती व अनुभाग घेवून आहे.

३. मोहनीयाचा बंध नाही म्हणून पुढे आस्रव बंधाचे कारण असत नाही त्यामुळे पुढे सांपरायिक आस्रव आणि बंधाचा अभाव होतो. ( बंधामध्ये स्थिती आणि अनुभाग प्रधान आहेत. प्रदेश आणि प्रकृतिबंध प्रधान नाही ) त्यामुळे आस्रवबंध पुढे नसल्या कारणाने संसार कारणाची परंपरा खंडीत होते. आता फक्त बध्द कर्माचा उदय व सत्ता आहे. त्यातही तीन घातिचा उदय हा ११- १२ व्यातच आहे. तेराव्या गुणस्थानात त्यांचा अभावाच होतो. अनंतचतुष्टयाची प्राप्ती भावमोक्ष होतो.

४. जर ह्या दहाव्या गुणस्थानातही मोहनीयाचा बंध होईल तर बंधपरंपरा आणि संसारपरंपरा समाप्तच होणार नाही. त्याचमुळे मोक्ष संभवनीय आहे. याचसाठी हे गुणस्थान व चारित्रभेद या दोन्ही अपेक्षेने वेगळेच मानणे भाग आहे.

**१. स्वरूप –** सूक्ष्म लोभ सोडून सर्व कषायांच्या ( २० ) अभावांत असणारी शुध्दी व लोभाच्या ( सूक्ष्म ) उदयांत असणारी आंशीकअशुध्दी जिथे असते त्या भावास सूक्ष्म सांपराय गुणस्थान म्हणतात.

२. नवव्या गुणस्थानांतच कषायांचे कृष्टिकरण ( कृशकरण ) झाले असते. इथे त्याचे वेदन सुरू होते.

३. इथेही प्रत्येकसमयवर्ती जीवाचे परिणाम समानच असतात. व पुढील समयीचे अपूर्व असतात. त्यामुळे स्थितीकांडकादि देखील समानच असतात.

४. पूर्व गुणस्थानाप्रमाणे इथेही उपचाराने औपशमिक व क्षायिकभाव म्हटल्या जातात. वास्तविक क्षायोपशमिक असतो.

५. आत्मा अधिक अधिक काल - शुध्द आत्म्यामधे स्थिर होतो, तसे तसे कर्म सहज ( स्वकालाने ) नष्ट होतात.

६. इथेही शुध्दोपयोगच असतो. व ध्यान प्रथम शुक्लध्यानच असते.

७. सूक्ष्म लोभाचा या रीतीने उपशम होऊन अकराव्यात जातो. वा क्षय होऊन बाराव्यात जातो.

८. उपशम कारणाऱ्यास हे गुणस्थान चढतांना व उतरतांना दोन्ही वेळेसे होते व क्षपकास चढतानांच होते.

९. ह्याच्या क्षयासाठी करण परिणाम होत नाही.

१०. मरण आले तर चवथ्या गुणस्थानातच येतो.

११. ही प्रकृती स्वोदयी - ( स्वत: रूपानेच नष्ट होणे ) आहे. बाकी सर्व ( २४ ) प्रकृती परोदयीच आहे. म्हणून संक्रमणाद्वारे नष्ट होतात.

## गुण स्थान ११ वे - उपशान्त मोह गुणस्थान

**प्रश्न –उपशान्त मोह गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - उपशम श्रेणी मांडणारा जीव चारित्र मोहाचा सर्वस्वी अंतरकरणरूप उपशम करून उदयाचा अभाव करतो तेव्हा त्यास औपशमिक यथाख्यात चारित्र प्राप्त होते तेव्हा त्यास उपशान्त मोह गुणस्थान म्हणतात.

**स्वरूप –**

१. ज्याचे संपूर्ण कषाय उपशांत ( उदयात नसणे ) झाले आहेत, दर्शनमोहनियाचा उपशम वा क्षय झाला आहे. व ज्यास चारित्राची शुध्दपर्याय प्राप्त झाली आहे ( पूर्ण निर्मल आह ) त्यास उपशांत मोह म्हणतात.

२. ह्यास उपशांत कषाय वीतराग छद्मस्थ म्हणतात.

३. इथे भाव एका जीवास पाचही असू शकतात.
४. ह्याची पूर्ण प्रक्रिया औपशमिक चारित्राच्या वर्णनात पहा.
५. क्षायिक चारित्रात व ह्या चारित्रात विषय व पर्यायीची शुध्दता ह्या दृष्टिने काहीच अंतर नाही. काळाच्या अपेक्षेनेच अंतर आहे.
६. दोघांचाही लीनतेचा विषय शुध्द आत्माच आहे. व दोन्ही पर्यायी शुध्दच ( पूर्ण ) आहे.
७. इथे चारित्रमोहनीयाच्या २१ प्रकृतींचा अंतरकरणरूप उपशम असतो.
८. ह्याचा काळ सादिसांतच आहे.
९. ह्या गुणस्थानातून खाली येण्याचे दोन कारण आहेत. भवक्षय ( आयुष्य संपणे ) कालक्षय - त्याभावाचा काल संपणे, कर्माचे निमित्त आचार्यांनी सांगितले नाही. कारण तिथे अंतरायामच असल्यामुळे निषेक असत नाही.
१०. जेव्हा ह्या चारित्राचा काळ संपतो त्याच क्षणी उपरितन स्थितीतील लोभाचे निषेक आपल्या कालाने व योग्यतेनेच उदीरीत होऊन अंतरायामांत येतात. व उदय सुरू होतो. ( आकृती नं. १३ पहा. )
११. भवक्षय - आयुष्य जर संपले तर इथे मरतो. पण गुणस्थान त्याच क्षणी विग्रहगतिमधे चवथे होते. तो नियमाने सर्वार्थसिध्दित देव होतो.
१२. यावरून कर्माची जीवभावांत अकिंचितकरता व क्रमनियतताच सिध्द होते.
१३. हा उतरतांना क्रमानेच १० व्यात नंतर ९ व्यात नंतर ८ व्यात नंतर ७ व्यात, नंतर ६ व्यातच येतो. नंतर तो ५ वे वा ४ थे पहिल्यात एकदम जाऊ शकतो.
१४. श्रेणी चढतांना ज्या गुणस्थानांत ज्या प्रक्रिया झाल्या त्याच्या उलट सर्व प्रक्रिया त्या त्या गुणस्थानांत उतरतांना होतात.
१५. हा जीव जर क्षायिक स. दृ. असेल तर चवथ्याच्याखाली जाणारच नाही. औपशमिक स. दृ. असेल तर प्रथम गुणस्थानातही जाऊ शकतो व तिथे अर्धपुद्गलपरावर्तन काल घालवून नंतर क्रमाने गुणस्थान चढतो. व क्षपकश्रेणी मांडून मोक्षास जातो.
१६. उपशम श्रेणी एका भवांत दोनवेळच चढु शकतो.

१७.ह्या गुणस्थानांत एकाच जीवास पाचही भाव होऊ शकतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षायिक भाव, | औपशमिक भाव, | क्षायोशमिक | औदयिक | पारिणामिक |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| क्षा. - सम्यक्दर्शन, | औ. सम्यक्चारित्र, | ज्ञान दर्शन | गतिआदि | जीवत्व |

१८. अकराव्यातून पडण्याचे निमित्त संक्लेश वा विशुध्दी नाही. कारण ह्या गुणस्थानाच्या पूर्ण कालामधे अवस्थित शुध्दी असते. व कर्मही निमित्त नाही.

१९. जेव्हा सूक्ष्म लोभाचा उदय सुरू होतो तेव्हा अकरावे गुणस्थान राहत नाही.

२०. इथे आस्त्रव फक्त सातावेदनीयाचाच होतो. व तोही इर्यापथच ( एकसमयमात्र ) होतो. उदा. - जसे कोरड्या भिंतीवर धूळ फेकली तर तीतिला न चिपकता लगेच जमिनीवर येवून पडते.

२१. तसे योगामुळे आलेले वेदनीयच कर्म कषायांच्या आभावामुळे त्याच क्षणी निघून जाते.

२२. ह्या गुणस्थानांत जीव येतोही दहाव्यातूनच व जातोही त्यातच व ह्याचा काल अंतर्मुहूर्त आहे. मरणाच्या अपेक्षेने एक समय आहे.

२३. जीवाच्या दु:खाचे मुळ कारण मोह राग द्वेषरूप विकारभाव आहे. मोहाचा पूर्ण अभाव असल्यामुळे हा जीव सुखी होतो. कारण जीवभावाचा व कर्माचा निमित्त नैमित्तिकभाव सत्तेशी नसून उदय उदीरणेशीच असतो. हा भाव पूर्ण शुध्दाचे प्रतिक.

## गुणस्थान १२ वे - क्षीणमोह गुणस्थान

**प्रश्न –क्षीणमोह गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - क्षपक श्रेणी मांडणारा जीव जेव्हा २१ प्रकृतींचा सर्वथा क्षय करतो तेव्हा तो दहाव्यातून एकदम बाराव्या गुणस्थानात जातो, परिपूर्ण वीतरागता यथाख्यात चारित्र प्राप्त करतो. त्यास क्षीणमोह गुणस्थान म्हणतात. ( आकृती नं. १२ पहा. )


१. स्वच्छ जलवत् पूर्ण शुध्दचारित्र ( आत्मस्वरूपांतील ) लीनता म्हणजे गुणस्थान होय.

२. हे गुणस्थान प्राप्त होतांना होणारी प्रक्रिया क्षायिक चारित्रवत् होते.

## बारावे गुणस्थान क्षीणमोह गुणस्थान

उपशमश्रेणीवान २१ प्रकृतीचे अंतरकरणरूप उपशम करतो त्याचा दृष्टांत - पोपटी रंगाची रेघ

क्षपकश्रेणीवान २१ प्रकृतीचे क्षय करतो त्याचा दृष्टांत - केशरी रंगाची रेघ




**( आकृती नं. १२ )**

( १०६ ) पानावर पहा.

३. ह्या भावांत क्षयाची निमित्तता असते. तो क्षय दोन दृष्टीने सांगितल्या जातो.

४. अभाव व सत्ताव्युच्छित्तिच्या रूपाने मोहनीयाचे अंतीम सत्व क्षपकश्रेणीच्या १० व्या गुणस्थानाच्या अंतीम समयी असते. करणानुयोग अंतिमसत्वासच क्षय स्विकारते. ( सत्ताव्युच्छिति ) म्हणून तो दहाव्याच्या अंतिम समयी क्षय म्हणतो.

५. अध्यात्म बाराव्याच्या प्रथम समयीच मोहनीयाचा क्षय मानतो. इथे उत्पाद व्ययाच्या दृष्टीने कथन असते.

६. अध्यात्माच्या दृष्टिने - ( उत्पाद व्ययाच्या दृष्टीने ) मोहनीयरूप कर्म अवस्थेच्या व्ययाचा व कार्माणवर्गणारूप उत्पादाचा समय एकच आहे.

मोहनीयकर्मरूप अवस्था → व्यय ←↓→ उत्पाद → कार्माण वर्गणा
( एकच समय )

सरागतेच्या व्ययाचा क्षण ←↓→ वीतरागाच्या उत्पादाचा क्षण
( एकच समय ) •————————•

७. करणानुयोगाच्या दृष्टीने १० वे १२ वे

समय दोन येतात. दहाव्या गुणस्थानाच्या अंतीम समयी मोहनीयाचा क्षण पण बाराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयी वीतरागतेचा सद्भाव.

* हे कथन सत्ताव्युच्छित्तिच्या व निमित्त नैमित्तिक संबंधाकडे दृष्टी ठेऊन केलेले असते.

८. ह्या गुणस्थानाच्या प्रथम कालांत पृथक्त्ववितर्क शुक्लध्यान व नंतर एकत्ववितर्क शुक्लध्यान असते.

९. ध्यानाचा विषयही एकच शुध्दआत्मा, शब्दही एकच व योगही एकच असतो म्हणून विचार नाही.

१०. ह्याचा काल अंतर्मुहूर्तच आहे. नंतर तो तेराव्यातच जातो.

११. हे गुणस्थान चरमशरीर जीवासच होते. त्यामुळे तो अप्रतिपाति असतो.

१२. हा जीव उत्कृष्ट अंतरात्मा असतो.

१३. ह्या गुणस्थानाच्या प्रथम समयापासूनच असंख्य निगोदिय जीव

प्रत्येक समयास निघून जात असतात.
१४. इथे चारित्रमोहनीयाच्या २१ प्रकृतींचा क्षय असतो.
१५. इथे सम्यक्त्व क्षायिकच असते. व चारित्र क्षायिक यथाख्यात असते.
१६. जीव ह्या गुणस्थानांत १० व्या गुणस्थानांतूनच येतो.
१७. हया गुणस्थानवर्ती जीव १३ व्या गुणस्थानातच जातो.
( आकृती नं. १३ पहा. )

## गुणस्थान १३ वे - सयोग केवली गुणस्थान


तीन घातिकर्माचा क्षय होता क्षणीच केवलज्ञान, केवलदर्शन व अनंतवीर्य प्रगट होते.

**प्रश्न – सयोग केवली गुणस्थान कशास म्हणतात ?**

उत्तर - १ मोहनीय कर्माचा क्षय झाला असतांना यथाख्यात चारित्र प्रगट होते तसेच राहलेल्या ज्ञानावरण, दर्शनावरण व अंतरायाचा क्षय होता क्षणीच जेव्हा या जीवास अनंत - ज्ञान, अनंत - दर्शन, व अनंतवीर्य प्राप्त होते, परंतु मनोयोग, वचनयोग, काययोग असे तिन्ही योगामुळे आत्मप्रदेशाचे कंपन होते. यास सयोग केवली गुणस्थान म्हणतात.

**विशेषार्थ –** वस्तुदृष्टीने तर एकपर्याय उत्पन्न होते तेव्हाच पूर्वपर्याय व्यय पावते. यादृष्टीने केवलज्ञानाच्या उत्पत्तीमध्ये पूर्व छद्मस्थ ज्ञान पर्यायीचा व्यय आहे. तसेच निमित्तभूत कर्मरूप परिणामाचा क्षय म्हणजे कर्म अमकर्मरूप होणे. केवलज्ञानाच्या उत्पत्तीचेक्षणीच त्या ज्ञानावरणाचा क्षय असतो. परंतु करणानुयोगाचे दृष्टीने ज्ञानावरणाचा क्षय बाराव्या गुणस्थानाच्या अंतिम समयात सांगितला आहे. त्याचा अर्थ बाराव्याच्या अंतापर्यंत उदय व सत्ता असते व तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयात अभाव असतो. उदय आहे तो पर्यंत तो जीवपरिणामास निमित्त असतो. हे दर्शविण्यासाठी ही शैली आहे. बाराव्याच्या अंती क्षय सांगितला म्हणजे केवलज्ञानाची उत्पत्ती तेव्हाच होते असा अर्थ नाही. सत्ता असेल तरच निमित्त म्हणता येते म्हणून सत्तेमध्ये क्षयाचा उपचार करून हे कथन आहे. विवक्षाभेद आहे. त्यात विरोध नाही.

## अकराव्यागुणस्थानातून खाली पडण्याचे कालक्षय कारणाचा खुलासा




( आकृती नं. १३ )

या गुणस्थानात असणाऱ्या जीवास सर्वज्ञ, केवली, अरहंत म्हणतात. हेच तीर्थंकर वा केवली आपल्या समवसरणामध्ये दिव्यध्वनीने भव्य जीवांना मोक्षमार्गाचा उपदेश देतात. तीर्थंकरांच्या समवशरणात दिव्यध्वनी खिरते तर सामान्य केवलीनां गंधकुटी असते.

तेराव्या गुणस्थानाच्या अंतापूर्वी जर आयुकर्माची स्थिती आहे त्यापेक्षा तीन अघाती कर्माची स्थिती अधिक असेल तर तो स्थिती आयुएवढी होण्यासाठी केवल समुद्‌घात होतो. प्रथम चार समयात दंड, कपाट, प्रतर, व लोकपुरण या क्रमाने आत्मप्रदेशांचा शरीरा बाहेर विस्तार होतो त्याच व्युत्क्रम पध्दतीने लोकपुरण प्रतर, कपाट व दंड याप्रकारे संकोच होऊन प्रदेश मुळ शरीरात येतात त्यास केवलसमुदघात म्हणतात. जेव्हा केवलसमुदघात होतो तेव्हा शेष कर्माची स्थिती अपकर्षित होऊन आयुकर्माएवढी होते.

१. स्वरूप - ४ घातिकर्माचा क्षय झाला असतांना केवलज्ञानादि अनंतचतुष्टयाची प्राप्ती होते. पूर्ण शुध्द पर्यायी प्राप्त होतात.

२. जे वीतराग, सर्वज्ञ, हितोपदेशी असतात व योगानी युक्त त्यांना सयोगकेवली म्हणतात.

३. ह्यांना केवली, जिन, सर्वज्ञ, अरिहंत, सकलपरमात्मा भावमुक्त आदि नांवे आहेत.

४. ह्यांचे दोन भेद आहे - १ सामान्यकेवली २ तीर्थंकरकेवली

५. अंतरंग भाव, दोघांचे पूर्ण शुध्दरूप समान असतात.

६. तीर्थंकरांना नामकर्माच्या निमित्तामुळे बाह्य विभूती प्राप्त होते.

७. ह्यांचे स्थान पृथ्वीपासून ५००० धनुष्य उंच असते.

८. ह्यांचे शरीर परमऔदारिक बनते. म्हणजेच सप्तधातुरहित असते. ह्यांचे केश वा नख वाढत नाही.

९. कवलाआहार - ( भोजन ) नसतो. गमन अधर ( पृथ्वीला वा कमलांना स्पर्श न करता ) डोळ्यांच्या पापण्या ( मिटत नाही. ह्यांचा विहार इच्छेविना सहज होतो. व आयुच्या अंती तो बंद होतो.

१०. हे भव्यजीवांना आत्मकल्याणाचा उपदेश देतात. म्हणून नेता

( हितोपदेशी ) उपचाराने म्हणतात.

११. इथे क्षायिक नवभावांची प्राप्ती झाली असते.

१२. इथे सूक्ष्मक्रियाप्रतिपाति हे शुक्लध्यान उपचाराने आहे. कारण ध्यान श्रुतज्ञानानेच होते. ह्यांना केवलज्ञान झाल्यामुळे, ध्यानाचे फल निर्जरा पाहून ध्यान सांगितले.


१३. ह्या गुणस्थानांच्या प्रथमसमयी केवलज्ञानाचा उत्पाद व अल्पज्ञतेचा व्यय, ज्ञानत्वाने ध्रौव्य असते.

१४. केवलज्ञानावरणादिक ४ कर्मांचा व्यय व कार्माण वर्गणारूंपाचा उत्पाद व पुद्गलत्वरूपाने ध्रौव्य असते.

१५. ह्या गुणस्थानाचा उत्कृष्ट काल, गर्भदिवस + ८ वर्ष + ८ अंतर्मुहूर्त कमी एक एककोटीपूर्व वर्षाचा असू शकतो.

१६. ह्या गुणस्थानवर्ती ज्या जीवाची आयुकर्माची स्थिती कमी व ३ अघातींची अधिक अशी अवस्था असते तेव्हा केवलसमुद्घात होतो. त्यास आठ समय लागतात. त्यात प्रथम समयात

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दंडाकार, | कपाटाकार, | प्रतराकार, | लोकपूरण, | प्रतराकार, | कपाटाकार, |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| दंडाकार, | मुळशरीर | | | | |
| ७ | ८ | | | | |




आत्मप्रदेश १४ राजूस काही कमी अशा त्रसनाडीत पूर्ण पसरतात. त्यास दंड म्हणतात.

ही त्रसनाडी होय.

इथे औदारीक काययोग असतो.

( दोन्ही दंडामध्ये )




इथे आत्मप्रदेश लोकाकाशाच्या रूंदीप्रमाणे ७ - १ - ५ - १ असे पसरतात. इथे औदारिक मिश्र काय योग असतो.

---


**प्रतर ↙ तिसरा समय**

↙ खोली सर्वत्र सात राजू




ह्या समयांत आत्मप्रदेश पूर्ण रुंदी, व खोली ७ राजू मधे पसरतात. पूर्ण लोकाकाश प्रमाण वातवलय सोडून इथे योग कार्माण काय योग असतो. ( दोन्ही प्रतरांत )

---




---

१. ह्या सयात आत्मप्रदेश पूर्ण वातवलयातही पसरतात.
२. पूर्ण लोकाकाश प्रमाण.
३. इथेही कार्माणकाययोगच असतो.
४. ज्या क्रमाने आत्मप्रदेश प्रसरीत झाले त्याच क्रमाने पुढील चार समयांत संकोच होतो.
५. व्या समयात वातवलयातून निघून प्रतररूप खोलीरूप होतात. नंतर खोलीतून निघून रूंदीरूप होतात. म्हणजे ६ समयात कपाटरूप होतात. नंतर रूंदीतून निघून उंचीरूपच होतात. ७ समयात त्रसनाडी प्रमाण होतात. ८ समयात मूळ शरीररूप होतात.

## योगाचा निरोध

केवलसमुद्घात संपल्यावर होणारी क्रिया.
१. बादरकाययोगाने - बादर मनोयोगाचा निरोध होतो.
२. बादरकाययोगाने - बादर वचनयोगाचा निरोध होतो.
३. बादरकाययोगाने - बादर श्वासोच्छवासाचा निरोध होतो.
४. बादरकाययोगाने - बादर काययोगाचा निरोध होतो.
५. सूक्ष्मकाययोगाने - सूक्ष्म मनोयोगाचा निरोध होतो.
६. सूक्ष्मकाययोगाने - सूक्ष्म वचनयोगाचा निरोध होतो.
७. सूक्ष्मकाययोगाने - सूक्ष्म श्वासोच्छवासाचा निरोध होतो.
८. सूक्ष्मकाययोगाने संपूर्ण काययोगाचा निरोध होतो.
* योगाचा निरोध करीत करीत कृष्टगत योगवान होतो.
* ह्यावेळी सूक्ष्मक्रिया प्रतिपाती शुक्लध्यानाने तो कृष्टिगत योग समाप्त होतो. व आयुकर्माच्या स्थितीसमान तीन अघातिकर्माची स्थिती बनते.
* ह्या गुणस्थानात होणाऱ्या सर्व क्रिया सहज घडतात. भगवान तर स्वमधेच लीन असतात.
* इथे सम्यक्त्व पूर्ण ज्ञानामुळे परमावगाढ व चारित्र परमयथाख्यात असते.

* येथून जीव १४ व्या गुणस्थानातच जातो व १२ व्यातूनच येतो.
* हे जीव अनेक प्रकारचे असतात. ( भूतपूर्व नैगमनयाच्या अपेक्षेने. )
* मूककेवली - दिव्यध्वनि न खिरणे.
* अंत:कृतकेवली -ध्यानमग्न मुनींना पूर्वभवांतील वैरी उचलून नेऊन, समुद्र पर्वतादिकामधे फेकतात, त्या आधिच केवलज्ञान प्राप्त करणारे.
* उपसर्ग केवली - मुनी अवस्थेत उपसर्ग होतानाच केवलज्ञानाची प्राप्ती होणे.

## गुणस्थान १४ वे - अयोग केवली गुणस्थान ( सिध्ददशा )

**प्रश्न –अयोग केवली गुणस्थान कशास म्हणतात ?**
उत्तर - तेराव्या गुणस्थानाच्या अंत्यसमयापर्यंत योग असतो. जेव्हा योग संपतो तेव्हा परमात्मा, अयोगी होतात त्यास अयोग केवली गुणस्थान म्हणतात.
तेव्हा संसार आणि कर्म बंधाचा दोहोचाही एकाच समयात अभाव ( अंतिम उदय ) होतो, व तो अनंतर उत्तरसमयी मुक्त होतो. तेव्हा मात्र कर्म, शरीर, आणि संसार पर्यायांचा सर्वथा अभाव म्हणजे क्षय असतो.
* चौदाव्या गुणस्थानाच्या उपान्त्य समयामध्ये अघातिकर्माच्या ७२ प्रकृतींचा क्षय होतो व अंत्य समयी १३ प्रकृतींचा क्षय होतो.
* या गुणस्थानाचा काल अत्यल्प म्हणजे अइउऋऌ या पाच लघु शब्दांच्या उच्चारणा एवढा मात्र असतो. त्यानंतर त्याचे शरीर कापरासाखे उडून जाते व तो जीव उर्ध्वगमन करून सिध्दशिलेवर जाऊन विराजमान होतो. तेथे त्यांच्या प्रदेशांचा आकार अंतिम शरीरापेक्षा काहीसा न्यून असतो. तेथे ते अनंतकाळ आत्मोत्थ अतींद्रिय सुखाचा स्वाद घेत राहतात. पुनरपि ते संसारात येत नाही.
**टिप –** ही चौदाही गुणस्थाने संसारदशेतच होतात.

## आत्म्याचे तीन भेद

**प्रश्न –जीवाच्या या संसारी व अशुध्ध पर्याय आणि मुक्त – परिपूर्ण शुध्द असंयोगी पर्याय या अपेक्षेने जीवाचे भेद किती आहेत ?**

उत्तर - तीन भेद आहेत. १ ) बहिरात्मा २ ) अंतरात्मा व ३ ) परमात्मा पैकी बहिरात्मा व अंतरात्मा संसारी व अशुध्द असतात. तर परमात्मा हे भावभोक्ष तसेच भावमोक्ष व दव्यमोक्ष उभयरूप असतात.

**प्रश्न –बहिरात्मा कोणास म्हणतात ?**

उत्तर –जो शरीरादि परद्रव्यास आत्मरूपाने आणि कर्मनिमित्तक रागादि विकारांना शुध्द चैतन्यमात्र स्वीकारतो, प्रतीती करतो तो बहिरात्मा होय. बहिरात्मा १-२-३ गुणस्थानात असतो.

**प्रश्न –अंतरात्मा कोणास म्हणतात.**

उत्तर –जो परद्रव्यास पररूपाने व आत्मद्रव्यास आत्मरूपाने मानतो व रागादि कर्मजनित भावाना आत्म्याचे स्वरूप मानत नाही परंतु जो परमात्म पद प्राप्त होईपर्यंत रत्नत्रयाची साधना करतो तो अंतरात्मा आहे.

**प्रश्न –अंतरात्म्याचे भेद किती आहेत ?**

उत्तर - १ ) जघन्य २ ) मध्यम ३ ) उत्तम अंतरात्मा असे तीन भेद आहेत. १. अविरत सम्यग्दृष्टी हा जघन्य अंतरात्मा आहे.
२. व्रती श्रावक आणि शुभोपयोगी श्रमण हे मध्यम अंतरात्मा आहेत.
३. शुध्दोपयोगी श्रमण म्हणजे ७ ते १२ गुणस्थानातील जीव उत्तम अंतरात्मा आहेत. त्यात सर्वोत्तम अंतरात्मा अकराव्या बाराव्या गुणस्थानवर्ती जीव आहे. बहिरात्मा आणि अंतरात्मा यामध्ये अशुध्दता व शुध्दतेची तरतमता असते.

**प्रश्न –परमात्मा कोणास म्हणतात ?**

उत्तर –जो अंतरात्मा संपूर्ण घातिकर्माचा क्षय झाला असतांना निमित्त निरपेक्ष अनंतचतुष्टय स्वभाव प्राप्त करतो त्यास परमात्मा म्हणतात.

**प्रश्न –परमात्म्याचे भेद किती आहेत ?**

उत्तर - दोन आहेत १ ) सकल परमात्मा व २ ) निकल परमात्मा

**प्रश्न – सकल परमात्मा कोणास म्हणतात ?**

उत्तर - चार घातिकर्मांचा क्षय झाला असतांना आपल्या स्वाभाविक अनंतचतुष्टय गुणांनी संपन्न असतो परंतु ज्यास शरीराचा संयोग व अघाति कर्म मात्र असते त्या अरहंत परमात्म्यास सकल परमात्मा म्हणतात.

**प्रश्न – निकल परमात्मा कोणास म्हणतात ?**

उत्तर - आठ कर्मांचा क्षय झाला असतांना ज्यास घाति - अघाति आठ कर्म, रागादिभाव कर्म व शरीरादी नोकर्म यांचा अभाव असतो व जे आठ गुणांनी युक्त असतात ते निकल परमात्मा होय. सिध्द भगवान निकल परमात्मा आहेत.

**प्रश्न – या आत्म्याच्या तीन भेदामध्ये हेयोपादेयता कशी आहे ?**

उत्तर - बहिरात्मता ही कर्मजनित आहे म्हणून हेय आहे. ती सोडावी व अंतरात्मा होऊन आपल्या त्रिकालाध्रुव ज्ञायक स्वभावच्या आश्रयाने रत्नत्रयाची साधना करून परमात्मा व्हावे. परमात्मपद साध्य आहे. अंतरात्मा हे साधन आहे. आपल्या ध्रुव ज्ञायक स्वभावाच्या आश्रयाने ( कारण परमात्म्याचे ध्यान करून ) श्रध्दा ज्ञान चारित्राची साधना करून अंतरात्मा व्हावे व परमात्म पद प्राप्त करून घ्यावे.

**विशेषार्थ –** परमात्म दशा ही जीवमात्राचे अंतिम साध्य आहे. म्हणून ती साध्यरूपाने सर्वथा उपादेय आहे. बहिरात्मदशा दु:खरूप आणि संसाररूप आहे. संसाराचे कारण आहे, म्हणून सर्वथा हेयच आहे. अंतरात्मा आपल्या आत्म्याचा शुध्द चैतन्याचा स्वाद घेतो. तो कर्मजनित भावांना आपले स्वरूप मानीत नाही. जीव म्हणजे चैतन्यमात्र तत्त्व आहे अशी त्याची दृढश्रध्दा असते. तो आपल्या श्रध्दा, ज्ञान, चारित्र या परिणतीद्वारा आपल्या शुध्दआत्म्याचे ध्यान करून तेथे तन्मय होतो. त्यामुळे उत्तरोत्तर विशुध्दता वाढून रागादि संसारकारणांचा व आकुलतेचा अभाव होतो. अतएव अंतरात्मतत्त्व हे परमात्मपदाच्या प्राप्तीचे कारण

असल्यामुळे साधन रूपाने उपादेय आहे. जीवाने बहिरात्म दशेचा त्याग करून अंतरात्मा व्हावे व परमात्म्याचे ध्यान करून अंतरात्म तत्त्वाच्या साधनेने परमात्मपद प्राप्त करावे.

## गुणस्थान

| गुणस्थान | गमन-जाणे | आगमन-येणे | गुणस्थानाचे निमित्त |
|---|---|---|---|
| १. मिथ्यात्व गुणस्थान | ३रे, ४थे, ५वे, ७वे | ३रे, ४थे ५वे, ६वे, २रे गुणस्थान | मिथ्यात्व कर्माचा उदय |
| २. सासाद गुण. | १ ले गुणस्थान | ४थे, ५वे, ६वे गुण. | अनंतानुबंधीचा उदय |
| ३. मिश्र गुण. | १ ले, ४थे गुण. | १ले, ४थे, ५वे ६वे गुण. | सम्यग्मिथ्यात्वाचा उदय |
| ४. अविरत सम्यग्दृष्टी गुण. | १ ले, २ रे, ३ रे ५ वे, ७ वे | १, ३, ५, ६ | मिथ्यात्व कर्माचा क्षय, उपशम, क्षयोपम |
| ५. देशविरत गुण. | १ ले, ४ थे, ७वे | १ले, ४थे, ६वे गुण | अप्रत्याखानावरणाचा क्षयोपशम |
| ६. प्रमत्तविरत गुणस्थान | ४थे, ५वे, ३रे, २रे १ले गुणस्थान | ७ वे गुणस्थान | १२ कषायांचा क्षयोपशम व संज्वलनाचा तीव्र उदय |
| ७.अप्रमत्तविरत गुणस्थान | ६वे, ८वे गुणस्थान | १ले, ४थे, ५वे, ६वे ८ वे गुणस्थान | १२ कषायांचा क्षयोपशम संज्वलनाचा मंद उदय |
| ८. अपूर्वकरण गुणस्थान | ९वे गुणस्थान | ७वे ९ वे गुणस्थान | चारित्र मोहनीयाचा उपशम व क्षयाची सुर वात |
| ९. अनिवृत्ति-करण गुणस्थान | १० वे गुणस्थान | ८, वे १० वे गुणस्थान | चारित्रमोहनीयाचा उपशम व क्षयाची पूर्णता. |
| १०. सूक्ष्म सांपराय गुण. | ११वे, १२ वे गुण. | ९ वे, ११ वे गुणस्थान | सूक्ष्म लोभाचा उदय |
| ११. उपशांत मोह गुणस्थान | १० वे गुणस्थान | १० वे गुणस्थान | चारित्रमोहनीयाचा ( पूर्ण ) उपशम |
| १२. क्षीणमोह गुण | १३ वे गुणस्थान | १० वे गुणस्थान | पूर्ण चारित्रमोहनीयाचा क्षय |
| १३. सयोग केवली गुण. - | १४ वे गुणस्थान | १२ वे गुणस्थान | ४ घातिकर्माचा क्षय व योगाचा उदय |
| १४. अयोग केवली गुण | सिध्द | १३ वे गुणस्थान | योगाचा अभाव |

# सिध्ददशा

**१. स्वरूप –**ज्यांच्या भावकर्माचा, द्रव्यकर्माचा, नोकर्माचा पूर्णत:
↙ ↙ ↙
क्षय झाला आहे. ( रागादिविकार, ज्ञानावरणादि ८ कर्म, शरीरादि - नोकर्म )

२. पूर्ण शुध्दतेची ( पर्यायीची ) प्राप्ती झाली आहे. आठ स्वभाव भावांची प्राप्ती होते ते सिध्द होय.


३. ज्या आसनानी मुक्त होतो तसाच आत्मप्रदेशांचा आकार राहतो. आसन तीन आहेत. पद्मासन, अर्धपद्मासन खड्गासन.

४. जीवाची ही अवस्था अतिपावन, पूर्ण शुध्द निर्मल आहे. याचे कारण मोक्षमार्गपर्याय आहे.

५. मोक्षमार्गाचा पाया सम्यक्दर्शन आहे. त्याचे ध्येय शुध्द आत्माच आहे. हा अमलच आहे. शुध्द पारस मणीवत् आहे. सदाच आत्म्याजवळ असणारा आहे. त्याचे ज्ञान साततत्वाचे भूतार्थनयाने जाणल्यानेच होते.

६. साततत्त्वाचे यथार्थ ज्ञान आगमाभ्यासानेच होते. म्हणून ह्या मनुष्यभवाचे आघकर्तव्य आगमाभ्यासच होय.

७. ह्यालाच कार्यपरमात्मा, ज्ञानशरीर, परमसुखी नांवे आहेत.




८. ह्याचा काल सादिअनंत आहे.

९. एका सिध्दाच्या आकारात अनेकसिध्द अमूर्तीक असल्यामुळे राहतात. पण एक होत नाही.

# गुणस्थानांची अनेकरूपात विभागणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अविरत<br>↓<br>१ - ४ गुणस्थान | विरत<br>↓<br>६ - १४ गुणस्थान | | देशविरत<br>↓<br>५ वे गुणस्थान<br>↓ |
| २. | मिथ्याज्ञानी<br>↓<br>१ - २ गुणस्थानवर्ती | सम्यक्ज्ञानी<br>↓<br>४-१२ गुणस्थानवर्ती | | |
| ३. | अल्पज्ञ<br>↓<br>१-१२ गुणस्थानवर्ती | सर्वज्ञ<br>↓<br>१३-१४ गुणस्थानवर्ती | | |
| ४ | प्रमत्तअप्रमत्त गुरु<br>↓<br>६. ७ गुणस्थानवर्ती<br>मुनी परावर्तन करणारे<br>भावलिंगी मुनी | अप्रमत्त गुरु<br>↓<br>७-१२ गुणस्थानवर्ती | | परमगुरु<br>↓<br>१३-१४ गुणस्थानवर्ती |
| ५. | रागी<br>↓<br>१-३ गुणस्थानवर्ती | मिश्र<br>↓<br>४-१० गुणस्थानवर्ती | | वीतरागी<br>↓<br>११-१४ गुणस्थानवर्ती |
| ६. | दु:खी<br>↓<br>१-३<br>↓<br>गुणस्थानवर्ती | मिश्र<br>↓<br>४-१०<br>↓<br>गुणस्थानवर्ती | पूर्णसुखी<br>↓<br>११-१२<br>↓<br>गुणस्थानवर्ती | अनंतसुखी<br>↓<br>१३-१४<br>↓<br>गुणस्थानवर्ती |
| ७. | बहिरात्मा<br>↓<br>१-२ गुणस्थानवर्ती | अंतरात्मा<br>↓<br>४-१२ गुणस्थानवर्ती | | परमात्मा<br>↓<br>१३-१४ गुणस्थानवर्ती |
| ८. | अशुभोपयोगी<br>↓<br>१-३<br>गुणस्थानवर्ती ( मुख्यत: ) | शुभोपयोगी<br>↓<br>४-६<br>गुणस्थानवर्ती ( मुख्यत: )<br>गौणरूपांत शुध्दोपयोगी | | शुध्दोपयोगी<br>↓<br>७-१४ गुणस्थानवर्ती |
| ९. | अयथार्थ पुरूषार्थी<br>↓<br>१-३ गुणस्थानवर्ती | यथार्थ पुरूषार्थी<br>↓<br>४-१४ गुणस्थानवर्ती | | |

## अध्याय ५ वा

| लक्ष्य | लक्षण | लक्षणाभास |
|---|---|---|
| १. ज्याचे लक्षण केल्या जाते ते लक्ष्य होय.<br><br>( उदा. जीवाचे लक्षण चैतन्य ↓<br>जीव = लक्ष्य<br>चैतन्य = लक्षण ) | १. अनेकवस्तूमध्ये एका वस्तूस वेगळ्या करणाऱ्या हेतूस लक्षण लक्षण म्हणतात. उदा. - जीव चैतन्यमय आहे.<br>↓<br>लक्षण | १. ज्या लक्षणात दोष असतात त्यास लक्षणाभास म्हणतात. उदा. - जीवाचे लक्षण अस्तित्व वा रागादिक. |

✻ लक्षण दोन प्रकारचे असतात. आत्मभूत व अनात्मभूत

**प्रश्न – आत्मभूत लक्षण कशास म्हणतात ?**

उत्तर - जे वस्तूच्या स्वरूपाशी तन्मय असते ते आत्मभूत लक्षण होय. जसे - अग्नीचे उष्णत्व लक्षण

✻ **अनात्मभूत लक्षण –** जे वस्तूच्या स्वरूपाशी तन्मय नसून पृथक् असते ते अनात्मभूत लक्षण होय. जसे - काठीवाला पुरूष

**प्रश्न – लक्षणाभास किती आहेत ?**

उत्तर - तीन आहेत.

| १. अव्याप्ति दोष | २. अतिव्याप्ति दोष | ३. असंभवी दोष |
|---|---|---|
| जे लक्षण लक्ष्याच्या सर्व अवस्थेत व्यापून नसते ते अवयाप्ति दोषाने युक्त असते. जसे - जीवाचे राग वा केवलज्ञान लक्षण करणे. | जे लक्षण, लक्ष्य व अलक्ष्य दोहोमधे व्यापते ते अतिव्याप्ति दोष युक्त होय. जसे-जीवाचे लक्षण अस्तित्व करणे. | लक्ष्यामधे लक्षणाचा अभावच असणे. जसे-जीवाचे लक्षण मूर्तिकत्व करणे. |

## प्रमाण

१**. प्रमाणाचे स्वरूप –** खऱ्या ज्ञानास प्रमाण म्हणतात.

२. **सकलादेशी –** पूर्ण वस्तूस ग्रहण करणाऱ्या ज्ञानास प्रमाण म्हणतात.

३**. धर्मांतराचे आदान –** एका धर्ममुखाने दुसऱ्या ( सर्व ) धर्मांचे ग्रहणास प्रमाण म्हणतात.

उदा. स्यात् जीव नित्य - नित्य धर्ममुखाने स्यात् शब्दाद्वारे अनित्यतेचे ग्रहण. २. जो आत्मा नित्य आहे तोच अनित्य आहे. ३ दोन्ही धर्मांचे मुख्यरूपाने ग्रहण प्रमाणात असते.

४. **प्रमाणाचे भेद दोन** - प्रत्यक्ष व परोक्ष

५. **प्रत्यक्ष** - जे ज्ञान आत्मिकशक्तीने पदार्थास स्पष्ट जाणते त्यास प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात. भेद दोन

६. **पारमार्थिक प्रत्यक्ष –** जे इंद्रिय वा मनाविना आत्मिकशक्तीने स्पष्ट जाणते ते पारमार्थिक प्रत्यक्ष होय.

७. **सांव्यवहारिक प्रत्यक्ष** - जे इंद्रिय व मन यांच्या निमित्ताने स्पष्ट जाणते ते सांव्यावहारिक प्रत्यक्ष होय.

८. **पारमार्थिक प्रत्यक्षाये दोन भेद आहे.**

९. **सकलप्रत्यक्ष –** केवलज्ञान, **विकल प्रत्यक्ष** - अवधिज्ञान व मन:पर्ययज्ञान

**पूर्ण प्रत्यक्ष –** केवलज्ञान, आंशिक प्रत्यक्ष अवधिज्ञान व मन: पर्ययज्ञान.

१०. **परोक्षप्रमाणाचे भेद –** पांच-स्मृति, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान व आगम.

**स्मृति –** पुर्वी अनुभवलेल्या पदार्थाची आठवण होणे त्यास स्मृति म्हणतात. काल शिकलेले आज आठवणे.

**प्रत्यभिज्ञान –** स्मृति व प्रत्यक्ष यांच्या जोडरूप ज्ञानास प्रत्यभिज्ञान म्हणतात. जसे - काल पाहिले ते हेच. याचे भेद तीन

अ. **सादृश्य प्रत्यभिज्ञान –** काल पाहिली तशीच ही गाय आहे.

ब. **एकत्व प्रत्यभिज्ञान** - काल पाहिली तीच ही गाय आहे.
क. **अन्यत्व प्रत्यभिज्ञान** – काल पाहिली ती ही गाय नाही.
११. **तर्क** – व्याप्तिज्ञानास तर्क म्हणतात.
**व्याप्ति** – साध्य साधनाच्या अविनाभावास व्याप्ति म्हणतात. जिथे धूर ( साधन ) असतो तिथे अग्नि ( साध्य ) असतोच.
१२. **अविनाभाव** – जिथे साधन असेल तिथे साध्य अवश्य असणे. व जिथे साध्य नसेल तिथे साधन नसणे. अशा संबंधास अविनाभाव म्हणतात.

**प्रश्न – साधन कशास म्हणतात ?**

उत्तर - जे साध्या विना असू शकत नाही. ते साधन होय.

जसे- धूर अग्नीविना असतच नाही.
↓ ↓
साधन साध्य

१३. साध्य-जे इष्ट अबाधित व असिध्द असते.
↓ ↓ ↓
मिळवावयाचे निराबाध अस्तित्व नसणे.

१४. **अनुमानज्ञान** – साधनावरून साध्याचे ज्ञान होणे. हे अनुमानज्ञान ( प्रमाण ) होय. जसे - इथे धूर दिसतो आहे, तेव्हा इथे अग्नि असलाच पाहिजे.

*अनुमानज्ञानाची पाच अंगे आहेत.
१. प्रतिज्ञा, २ हेतू, ३. उदाहरण, ४. उपनय, व ५. निगमन.

*पक्ष आणि साध्य ह्या दोहोंचे कथन करणे, ह्यास
↓ ↓
( पर्वत अग्नि )
प्रतिज्ञा म्हणतात. जसे - हा पर्वत अग्निमान आहे लोकाकाशात ( पक्ष ) जीव ( साध्य ) आहे.

*साधनाचे कथन करणे यास हेतू म्हणतात.
जसे - कारणतो धूमवान आहे. -कारण तो ज्ञानवान आहे.
↓ ↓ ↓ ↓
पर्वत हेतू साध्य हेतू

* उदाहरण - व्याप्ति पूर्वक दृष्टांताचा उच्चार करणे. जसे - ज्या ज्या ठिकाणी धूर असतो तिथे तिथे अग्नि असतोच ( व्याप्ति ) जसे स्वयंपाक घर, जसे-जिथे ज्ञान असते तिथे जीव असतोच. तसा हा मनुष्यही ज्ञानवान आहे.

१५. **उपनय -** पक्ष आणि साधन ह्यामधे दृष्टांताचे
↓ ↓
सादृश्य दाखविणे. जसे-हा पर्वतही स्वयंपाक घराप्रमाणे धूमपान आहे.
↓ ↓ ↓
पक्ष दृष्टांत साधन

दुसरे उ. - तसा हा मनुष्यही जीववत् ज्ञानवान आहे.
↓
पक्ष

१६. **निगमन -** तथ्यांश काढून प्रतिज्ञेला दुजोरा देणे. जसे - म्हणून हा पर्वत अग्निमान आहे हे सिध्द होते. जसे - ह्यावरून हा जीव आहे, हे सिध्द होते.

१७. **पूर्णवाक्य -** ह्या पर्वतावर अग्नि आहे. → ( प्रतिज्ञावाक्य )
कारण तो धूमवान आहे. → ( हेतुवाक्य )
जिथे धूम असतो तिथे अग्नि असतोच. → ( व्याप्तीचे ज्ञान )
उदा. स्वयंपाक घर → ( दृष्टांत )
तसा हा पर्वतही धूमवान आहे. → ( उपनय )
म्हणून तो अग्निमान आहे. → ( निगमन )

१८. **दुसरे वाक्य -** इथे जीव आहे कारण तो ज्ञानवान आहे.
↓ ↓
( प्रतिज्ञा वाक्य ) ( हेतु वाक्य )

जिथे ज्ञान असतेच तिथे जीव असतोच - ( व्याप्तिचे ज्ञान )
जिवंत मनुष्य ( दृष्टांत ) तसा हाही ज्ञानवान आहे. - ( उपनय )
२ १
म्हणून जीव आहे. - ( निगमन )

## दृष्टांताचे भेद

१. **अन्वय दृष्टांत –** ज्या दुष्टांतात साधनाच्या अस्तित्वावरून साध्याचे अस्तित्व दाखविल्या जाते त्यास अन्वय दृष्टांत म्हणतात. जसे - स्वयंपाकघरातील धुरावरून अग्निचे अस्तित्व दाखविणे. जसे - मनुष्यामधे ज्ञानाचे अस्तित्व पाहून आत्म्याचे अस्तित्व दाखविणे. जसे - मनुष्यामधे ज्ञानाचे अस्तित्व पाहून आत्म्याचे अस्तित्व दाखविणे.

२. **व्यतिरेक दृष्टांत –** जिथे साध्याच्या अभावावरून साधनाचा अभाव दाखविल्या जातो, तो व्यतिरेक दृष्टांत होय. जसे - तलावामधे अग्नि नाही म्हणून धूर नाही. जसे - पुद्गल, जिथे जीव नाही तिथे ज्ञान नाही. दृष्टांताचे कथन म्हणजेच उदाहरण होय.

## हेतूचे भेद

१. **केवलान्वयीहेतू –** ज्या हेतूमधे फक्त अन्वयदृष्टांत ( आहे रूपाचा ) असेल त्या हेतूस केवलान्वयीहेतू म्हणतात.

२. जीव अनेकांतस्वरूपी आहे. कारण तो सत्स्वरूपी आहे. जे सत् असते ते अनेकांतस्वरूपी असते. जसे - ज्या स्वयंपाक घरात धूर असतो, तिथे अग्नि असतोच,

३. **केवलव्यतिरेकी हेतू –** ज्या दृष्टांतामधे व्यतिरेकी ( नाही रूपाचा ) हेतु असतो त्यास केवलव्यतिरेकी हेतू म्हणतात. जसे - जिवंत शरीरात आत्मा आहे. कारण त्यामधे श्वासोच्छवास आहे. जिथे आत्मा नसतो, तिथे श्वासोच्छवास नसतो. जसे - चौरंग

४. **अन्वयव्यतिरेकी हेतू –** ज्या हेतूमधे अनवयव्यतिरेक दोन्ही दृष्टांत असतात त्यास अन्वयव्यतिरेकी हेतू म्हणतात जसे - ज्या ठिकाणी धूम असतो तिथे अग्नि असतो, जसे - स्वयंपाकघर. जिथे अग्नि नाही, तिथे धूर नाही. जसे - तलाव.

५. इथे जीव आहे कारण तिथे ज्ञान आहे. जिथे ज्ञान असते तिथे जीव असतो. जसे - मनुष्य.

६. जिथे जीव नाही तिथे ज्ञान नाही. जसे - धर्मद्रव्य.

**प्रश्न – हेत्वाभास कशास म्हणतात ?**

उत्तर - जो हेतू दोषयुक्त असतो त्यास हेत्वाभास म्हणतात. त्याचे चार भेद आहे.

१. **असिध्द हेत्वाभास –** जिथे हेतूचाच अभाव वा शंका असेल त्यास असिध्द हेत्वाभास म्हणतात. जसे - शब्द नित्य आहे, कारण तो नेत्राचा विषय आहे. शब्द हा करणेंद्रियाचा विषय आहे. नेत्राचा म्हणणे हा असिध्द हेत्वाभास होय. जसे - आत्मानित्य आहे कारण तो शरीररूप आहे.

२. **विरूध्द हेत्वाभास –** साध्याच्या विरोधी पदार्थाबाबत ज्याची व्याप्ति आहे तो विरूध्द हेत्वाभास होय. जसे - शब्द नित्य आहे, कारण तो परिणामी आहे. जसे - आत्मा नित्य आहे. कारण तो परिणामी आहे.

३. **अनेकांतिक हेत्वाभास –** जो हेतू पक्ष ( कोठा ), सपक्ष ( स्वयंपाकघर ), विपक्ष ( लोखंडाचा गोळा ) यामधे व्यापून असतो. जसे - या कोठ्यात धूम आहे, कारण इथे अग्नि आहे. जसे - आत्मा नित्य आहे. कारण तो सत् आहे. सपक्ष = आत्मा, विपक्ष = अचेतन, पक्ष = मनुष्य सत् हा हेतू ह्या तिघातही आहे.

४. **अकिंचित्कर हेत्वाभास –** जो हेतू कोणतेच कार्य करण्यास समर्थ नाही त्यास अकिंचित्कर हेत्वाभास म्हणतात. जसे - अग्नि उष्ण आहे, कारण स्पर्शनेंद्रियाने तशीच प्रतीती होते. ह्याचे दोन भेद आहेत.

१. **सिध्दसाधन हेत्वाभास –** ज्या हेतूचे साध्य सिध्द झाले असेल त्यास सिध्धसाधन हेत्वाभास म्हणतात. जसे - अग्नि उष्ण आहे कारण तशीच प्रतीती होते.

२. **बाधितविषय हेत्वाभास –** ज्या हेतूच्या साध्यामधे दुसऱ्या प्रमाणाने बाधा येते, त्यास बाधितविषय हेत्वाभास म्हणतात. ह्याचे भेद–चार आहेत.

अ. **प्रत्यक्षबाधित –** साध्यातील ज्या हेतूस प्रत्यक्षबाधा येते त्यास प्रत्यक्षबाधित म्हणतात. जसे - अग्नि थंड आहे. कारण तो द्रव्य आहे. द्रव्य हा हेतू प्रत्यक्ष बाधित आहे. जसे - जीव चेतन आहे कारण तो जाणत नाहीं.

ब. **अनुमानबाधित –** साध्यातील ज्या हेतूस अनुमानाने बाधा येते त्यास अनुमानबाधित म्हणतात. जसे - जगातील पदार्थांचा कोणीतरी कर्ता आहे कारण ते कार्य आहेत. पदार्थांचा कुणी कर्ता नाही कारण ते शरीरधारीनी बनविले नाही. जे पदार्थ शरीरधारींनी बनविले नाही ते पदार्थ कर्त्याने बनविले नाहीत. जसे - आकाश

क. **आगमबाधित हेत्वाभास** - ज्यामधे आगमाने बाधा येते त्यास आगमबाधित हेत्वाभास म्हणतात. जसे - पाप सुख देणारे आहे, कारण ते कर्म आहे. जे कर्म आहे ते सुख देणारे आहे. जसे - पुण्य कर्म. आगमांत पापकर्म दु:ख देणारे सांगितले आहे.

ड. **स्ववचनबाधित –** ज्यामधे आपल्याच वचनाने बाधा येते त्यास स्वचनबाधित म्हणतात. जसे - माझी आई वांझ आहे. कारण पुरूष संयोग होऊनही गर्भधारणा होत नाही.

✻ आतापर्यंत हेतू व हेत्वाभासाचे वर्णन झाले. परोक्षप्रमाणाचे जे पाच भेद होते त्यातील चार प्रमाण झाले आता आगमप्रमाण सांगतात.

✻ **आगमप्रमाण –** आप्तवाक्यादिकावरून प्राप्त झालेल्या ज्ञानास आगमप्रमाण म्हणतात.

✻ **आप्त –** वीतराग सर्वज्ञ व हितोपदेशी देवास आप्त म्हणतात.

| **सपक्ष** | **पक्ष** | **विपक्ष** |
|---|---|---|
| १. ज्या ठिकाणी साध्याच्या अस्तित्वाची निश्चिती असतो त्यास विपक्ष म्हणतात. उदा. - स्वयंपाकघर, आत्मा | ज्या ठिकाणी साध्याच्या अस्तित्वाची असते त्यास सपक्ष त्यास पक्ष म्हणतात, उदा. कोठा, पर्वत, मनुष्यत्व | ज्या ठिकाणी साध्याच्या अस्तित्वाचा अभावच शक्यता असते म्हणतात. उदा. अग्नियुक्त लोखंडाचा गोळा, अचेतन द्रव्य |

**प्रश्न – प्रमाणाचा विषय कोणता ?**

उत्तर -सामान्य धर्म व विषेश धर्म, ज्यात मुख्य आहे असा धर्मी प्रमाणाचा विषय असतो, जसा - समुद्र

१. वस्तूच्या एका विशिष्ट धर्मास वा पर्यासीस विशेष ( समुद्राच्या लाटा ) म्हणतात.

२. सहभावीविशेष - गुणांना सहभावी विशेष म्हणतात.

३. क्रमाने होणाऱ्या पर्यायास क्रमभावी विशेष म्हणतात.

**प्रश्न –प्रमाणाभास कशास म्हणतात ?**

उत्तर -मिथ्याज्ञानास प्रमाणाभास म्हणतात.

## नय वर्णन

१. **नय –** अनेकधर्मात्मक वस्तूमधे एका धर्मास मुख्य करून ग्रहण करणाऱ्या ज्ञानास नय म्हणतात. याचे भेद दोन - निश्चयनय व व्यवहार नय.

२. एका वस्तूच्या द्रव्य गुण पर्यायीस वा कार्य कारणादि भावास वा त्याच्या स्थायी भावास ग्रहण करणाऱ्या ज्ञानास निश्चय नय म्हणतात. जसे मातीच्या घागरीस मातीची म्हणणे, आत्मपरिणामाचा कर्ता जीवासच म्हणणे.

१. **व्यवहारनय –** एका वस्तूच्या भावाचा प्रयोजनवश दुसऱ्या वस्तूच्या भावावर आरोप करणे व अन्य द्रव्याच्या भावरूपाने जाणणे वा कथन करणे व्यवहारनय होय. जसे - तूप ठेवलेल्या बरणीस तूपाची म्हणणे, जीवास कर्माचा कर्ता म्हणणे.

✻ ह्या नयाचा विषय असत्य असतो. पण ह्याचे प्रयोजन सत्य असते. म्हणून ह्यास सम्यक्नय म्हणतात.

✻ ह्या नयाचे प्रयोजन संयोगाचे वा निमित्ताचे ज्ञान करून देऊन व त्यावरून निश्चयाचे ज्ञान करून देणे हे आहे.

२. **निश्चय नय –** निश्चय नयाचे दोन भेद आहे. द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक

✻ जो द्रव्याच्या सामान्य अंशाला मुख्य करून जाणतो त्यास द्रव्यार्थिक नय म्हणतात जसे - आत्मा नित्य आहे.

| सामान्यधर्म | - | विशेषधर्म |
|---|---|---|
| ↓ | | ↓ |
| नित्य | - | अनित्य |
| एक | - | अनेक |
| तत् | - | अतत् |
| सत् | - | असत् |

३. **पर्यायार्थिक नय –** जो विशेषाच्या म्हणजे पर्यायाच्या मुख्यतेने वस्तूस जाणतो, त्यास पर्यायार्थिक नय म्हणतात. जसे - जीवास नरनारकादी पर्यायरूप जाणणे.

*** द्रव्यार्थिक नयाचे भेद –** नैगम, संग्रह, व्यवहारनय

*** पर्यायार्थिक नयाचे भेद –** ऋजुसूत्रनय, शब्दनय, समभिरूढनय, एवंभूतनय.

## निश्चय नयाचे भेद

**परमशुध्द निश्चयनय –**

१. त्रिकाली ज्ञायक शुध्द आत्म्यास ग्रहण करणारा परमशुध्द निश्चयनय.

२. विषय - एक अखंड शुध्दआत्मा

३. जसे - बदामाचे हिरवे, पिवळे, लाल टरफल सहित असूनही आत स्वच्छ पांढरी बदाम ‘ बी ’

४. स्वामी - सर्वच जीव.

**पूर्ण शुध्द निश्चय नय –**

१. पूर्ण शुध्दपर्यायीस ग्रहण करणारा पूर्णशुध्दनय होय.

२. विषय - पूर्ण शुध्दपर्यायी - केवलज्ञानादिक

३. जसे - पूर्ण टरफल निघून गेलेली पांढरी बदाम ‘ बी ’

४. स्वामी - १३-१४ वे गुणस्थानी सिध्द जीव.

**एकदेश शुध्द निश्चयनय –**

१. आंशीक शुध्द पर्यायीस ( रत्नत्रय ) ग्रहण करणाऱ्या नयास

एकदेशशुध्द नय म्हणतात.

२. विषय - निश्चयरत्नत्रयरूप पर्याय

३. उदा. बदामबीचे अर्धवट निघालेले लाल टरफल युक्त बदाम ‘ बी ’

४. स्वामी - रत्नत्रययुक्त ४-१२ गुणस्थानवर्ती जीव.

**अशुध्द निश्चय नय –**

१. द्रव्याच्या विकारी पर्यायीला जीवाचे जाणणाऱ्या ( सांगणारा ) नयास अशुध्द निश्चय नय म्हणतात.

२. विषय - विकारी भाव

३. जसे - लाल टरफल सहित बदाम बी

४. स्वामी - १-३ गुणस्थानवर्ती जीव- अध्यात्मदृष्टिने
स्वामी-१-१० गुणस्थानवर्ती जीव - आगमाच्यादृष्टिने

**आगमाने – सद्‌भूत व्यवहार नय**

१. स्वरूप - अखंडवस्तूत भेद करणे, वा त्या द्रव्याच्या पर्यायीला त्यांचेच म्हणणे यास सद्‌भूत व्यवहार नय म्हणतात.

**आगमाने –असद्‌भूत व्यवहारनय–**

१. भेदांत अभेद करणे व एका द्रव्याच्या गुणपर्यायीचा दुसऱ्या द्रव्याच्या गुणपर्यायीवर आरोप करणे.

## सद्‌भूत व्यवहाराचे भेद-२

| | |
|---|---|
| १. अनुपचरित ( परलक्ष्याविना ) सद्‌भूत ( त्याचेच गुणधर्म ) व्यवहारनय ( अखंडात भेद )<br>२. विषय - पूर्णशुध्दपर्यायी ( केवलज्ञानादिक ) वा गुणभेद ( ज्ञान, दर्शनादि )<br>३. जसे - सर्व टरफलाविना शुध्द बदाम - ‘ बी ’ | १. उपचरित ( पराचे लक्ष्याने ) सद्‌भूत ( त्याचेच गुणधर्म ) व्यवहारनय ( अभेदात भेद )<br>२. विषय - अशुध्द पर्यायी ( मतिज्ञानादिक वा रागादिकभाव )<br>३. बदाम ‘ बी ’ लालटरफल सहित. |

## असद्भूत व्यवहाराचे भेद

| | |
|---|---|
| १. अनुपचरित ( संश्लेषसंबंधी ) असद्भूत ( एकाच्या धर्माचा दुसऱ्याच्या धर्मावर आरोप ) व्यवहार ( भेदात अभेद )<br>२. विषय - शरीर कर्मादिक<br>३. जसे - बदामाचे पिवळे टरफल सहित बदाम ' बी ' | १. उपचरित ( अत्यंत भिन्न घर, पुत्रादिक ) असद्भूत ( भिन्न वस्तूत, अभेद करणे. ) व्यवहार ( भेदात अभेद )<br>२. विषय - घर, पुत्र, पैसा आदी<br>३. जसे - हिरव्या टरफल युक्त बदाम. |

**द्रव्यार्थिक नयाचे भेद – १. नैगमनय –**

✻ **नैगमनय –** अनिष्पन्न पदार्थाचे संकल्पमात्राने ग्रहण करणे.

✻ **नैगम** = न एक गमयति इति नैगम: जो एकास ग्रहण न करिता नेहमी दोघे वा अनेकास ग्रहण करतो.

✻ **दोन धर्मीमधे एकतेचा संकल्प –** जसे - ( धर्मद्रव्यामुळे जीवद्रव्य चालतो. )

✻ दोन धर्मात एकतेचा संकल्प - जसे - ज्ञानाने इतर गुण जाणले जातात.

✻ धर्मी व धर्मामधे एकतेचा संकल्प. जसे - आत्मा ज्ञानवान आहे.

✻ ह्याचा विषय ज्ञानाविकल्प आहे. महणून ह्यास ज्ञाननय म्हणतात. व ह्याचा विषय वस्तू आहे, शब्द नाही. म्हणून अर्थनय म्हणतात.

✻ ह्या नयामुळेच तीर्थंकरांचे कल्याणिक, भविष्यालीन चोवीसीची व वर्तमान सीमंधरादिकांची स्थापना होऊन वर्तमाना प्रमाणे व्यवहार होतो. जसे - आज महावीर जयन्ती आहे.

२. **संग्रहनय –**

१. आपल्या विशेष जातीला विरोध येणार नाही. अशा सर्व विशेषामधे एकत्व रूपाने ग्रहण करणे ह्यास संग्रहनय म्हणतात.

भेद - २. शुध्द व अशुध्द संग्रहनय
**शुध्द संग्रहनय** - सर्वच पदार्थांना आपल्यात सामावून घेण्यास समर्थ अशा ' सत ' सामान्यास जो ग्रहण करतो तो शुध्दसंग्रहनय होय. जसे - सत, महासत्ता.
**अशुध्द संग्रहनय –** आपल्यामधे आपल्या संपूर्ण जातीला सामावून घेणाऱ्या धर्मीचे ग्रहण यास अशुध्दसंग्रहनय म्हणतात. जसे - जीव, घट, अवांतरसत्ता.
२. हा नय नानापदार्थामधे समानतेच्या आधारावर एकता स्थापीत करतो.
३. **व्यवहार नय –**
१. **स्वरूप –** संग्रहनयाने जाणलेल्या पदार्थांचे विधीपूर्वक भेद करणे ( क्रमाने ) ह्यास व्यवहार नय म्हणतात.
२. ह्या क्रमाने भेद करीत जातो. पण वर्तमान पर्यायास ग्रहण करीत नाही. म्हणून द्रव्यार्थिकच आहे.
**शुध्द व्यवहार नय –** शुध्दसंग्रह नयाचा विषय ' सत् ' त्याला ६ द्रव्यरूपांत भेद करणे. जसे - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल.
**अशुध्द व्यवहार नय –**अशुध्द संग्रहाचा विषयरूप जीवांत संसारी मुक्त असा भेद करणे. जसे– संसारी जीवाचे त्रस, स्थावर असा भेद करणे.
१. व्यवहारनय, संग्रहनयाने जे एकत्व पाहीले त्या पदार्थाचे वर्तमान पर्याय सोडून अंतीम बिंदू पर्यंत भेद करीत जातो.
२. संग्रहनय, व्यवहाराने जे भेद केले त्यात त्या सर्वांना अंतीम बिंदू पर्यंत एक ( संग्रहीत ) करतो. असे विरूध्द कार्य करीत असूनही एकमेकांचे पूरक आहेत.
३. हा नय भेद करतो पण फक्त समजण्यासाठी, अखंडतेला खंडीत करण्यासाठी नाही.
४. संग्रहनय संधी समास करतो.

## ऋजुसूत्र नय - ( पर्यायार्थिक नय )

१. **स्वरूप** – जो वर्तमान पर्यायमात्र वा एकसमयमात्र असणाऱ्या पर्यायीला जाणतो, त्यास ऋजुसूत्र नय म्हणतात. ह्याचे दोन भेद आहेत.

अ. **सूक्ष्म ऋजुसूत्रनय** - एक समयमात्र पर्यायीचे ( अर्थपर्याय ) ग्रहण करतो तो सूक्ष्मऋजुसूत्रनय होय.

✻ ह्या नयाचा विषय केवलज्ञानगम्य असतो ह्यांनी व्यवहार चालत नाही.

ब. **स्थूलऋजुसूत्रनय** – अनेक समयवर्ती एका व्यंजन ( स्थूल ) पर्यायीचे ग्रहण करणारा स्थूलऋजुसूत्रनय होय.

✻ ह्या नयाचा विषय क्षायोपशमिक ज्ञानाचा होतो. ह्याने व्यवहार चालतो. जसे- वर्तमान चोवीसी म्हणणे.

✻ धवलाकार एका विवक्षित द्रव्यपर्यायीच्या प्रारंभापासून तो तिच्या अंतापर्यंतच्या कालास वर्तमान काल म्हणतात व कथंचित् द्रव्यही म्हणतात. कारण अनेक समवर्ती द्रव्य पर्याय आहे.

✻ ह्या चारही नयास अर्थनय म्हणतात. कारण ह्यांचा विषय शब्द नसून मुख्य रूपाने पदार्थ आहे.

## शब्द नय

**१. शब्दनय** – जे ज्ञान लिंग वचन कारक काल उपसर्गादिकांच्या भेदावरूप पर्यायामधे भेद करून ग्रहण करते त्यास शब्दनय म्हणतात,

✻ जसे- स्त्री, दारा, कलत्र, ही तीन शब्द एकाच स्त्री पर्यायीचे वाचक आहे. पण यामधे लिंग भेद आहे. म्हणून हा नय भेद मानतो.

✻ अपस् जल एकाच पाणी पर्यायाचे वाचक आहे. पण वचन भेदामुळे हा नय वाच्य भेद मानतो.

✻ हा नय व्याकरणाचे नियम काटेकोर पाळतो. भिन्न भिन्न लिंग वचनादिकामध्ये शब्द भिन्न अर्थाचेच वाचक मानतो.

**लिंग व्यभिचार** – पुष्य ( पु. लि. तारका ( स्त्री ) नक्षत्र ( नपुंसक ) लिंगभेद आहे तर यांचा वाच्यपण भिन्नच आहे.

**साधन व्यभिचार** – सेना पर्वतम् अधिवसति – इथे अधिकरणासाठी

सप्तमी न ठेवता द्वितीया विभक्ती ठेवली. हा साधन व्यभिचार आहे.

**पुरूष व्यभिचार –** एहि मन्ये रथेन यास्यसि इथे यास्यामि पाहीजे पण इथे मन्ये व यास्यसि आहे. हा पुरूष व्यभिचार आहे.

**संख्या व्यभिचार –** आम्रा: ( बहुवचन ) वनम् ( एकवचन ) संख्याभेद आहे. म्हणून संख्या व्यभिचार होय.

## समभिरूढ नय

१. **स्वरूप –** लिंगादिकांनी भेद नसूनही शब्द भेद जर आहे तर वाच्य भेद निश्चित असतो. त्यास समभिरूढ नय म्हणतात.

जसे - इंद्र - ऐश्वर्याचा भोग घेणारा.

शुक्र - सामर्थ्याचा वापर करणारा.

पुरंदर - गावाची विभागणी करणारा.

२. ह्या तीन शब्दामधे लिंगादि सर्वच समान आहे. पण शब्दभेद आहेत तर त्यांचे वाच्यही भिन्नच आहे असे हा नय जाणतो.

३. ह्या शब्दांचे वाच्यार्थ भिन्न असूनही सर्वथा भिन्न पदार्थाचे वाचक नाही. हे भिन्न भिन्न वाच्यार्थ्यांनी देवेंद्रालाच दाखवितात.

४. एकाच व्यक्तीमध्ये त्या त्या शब्दाच्या वाच्यभूत अनेक योग्यता आहे. त्याचे दर्शन त्याच व्यक्तीमधे भिन्न काली होऊ शकते.

**दुसरा अर्थ –**

१. एका शब्दाचे अनेक अर्थ होत असूनही एकच रूढ अर्थ ग्रहण करणाऱ्या ज्ञानास समभिरूढनय म्हणतात.

२. गो शब्दाचे - गाय, वाणी, गमन, पृथ्वीआदी, अकरा अर्थ होतात. पण एक गायच अर्थ करणे.

३. जो पदार्थास शब्दारूढ ( गौ शब्दाचे अनेक अर्थ होतात तरी गायच अर्थ घेणे ) व शब्दास अर्थारूढ ( इंद्र, शुक्र, पुरंदर ह्यांचा वाच्य भिन्न मानणे. ) समजतो.

४. हा नय शब्दनयापेक्षाही सूक्ष्म आहे. कारकादि भेद नसूनही वाचक भेद आहे. तर वाच्य भेद मानतो.

५. हे शब्दनय एका वर्तमान पर्यायातही शब्दाद्वारे भेद करतात म्हणून पर्यायार्थिक शब्दनय होय.

६. ह्या तिन्ही नयाचा विषय शब्द आहे व शब्द ही पुद्‌गलाची द्रव्यपर्याय आहे. म्हणून हे पर्यायार्थिक नय आहेत.

## एवंभूत नय

१. **स्वरूप –** ज्या पदार्थाची ज्यावेळी जी क्रिया घडते, त्यावेळी त्याच शब्दाने दाखवितो ( जाणतो ) त्यास एवंभूत नय म्हणतात.

२. बसली वा उभी चालत असणाऱ्या गायीलाही समभिरूढनय गायच म्हणतो. पण हा नय ती चालत असतांनाच गाय म्हणेल बाकी वेळी नाही.

३. हा नय क्रियाभेदाने शब्द भेद वा शब्दभेदाने क्रियापरिणत वाच्यभेद जाणतो. याचा विषय अतिसूक्ष्म आहे.

## निक्षेप

१. ज्यामुळे वस्तूची निश्चिती होते त्या शब्द व्यवहारास निक्षेप म्हणतात.

२. ज्याद्वारे शब्दाचा लोकव्यवहार होतो. त्यास निक्षेप म्हणतात.

३. ह्याचे प्रयोजन-१. संशयाचे निराकरण, २. वस्तूची निश्चिती, ३. प्रकृताचे कथन, ४. अप्रकृताचे निराकरण

४. भेद चार आहे. नामनिक्षेप, स्थापना निक्षेप, द्रव्यनिक्षेप, भाव निक्षेप.

अ. **नामनिक्षेप** - पूज्य अपूज्य बुध्दिविना लोकव्यवहार चालावा म्हणून ठेवलेले नांव जसे - मुलाचे आदिनाथ नाव ठेवणे.

ब. **स्थापनानिक्षेप –** एका वस्तूची दुसऱ्या वस्तूत ‘ तोच ’ हा, असा संकल्प करणे. ह्यामधे पूज्य अपूज्य बुध्दि असते. ह्यास स्थापना निक्षेप म्हणतात. जसे - पाषाणाच्या मुर्तिमधे आदिनाथांची स्थापना करणे. हा पुद्‌गलामधेच बसतो.

क. **द्रव्यनिक्षेप** - भूत व भाविकालीन पर्यायीचा वर्तमान पर्यायीत

आरोप करणे यास द्रव्यनिक्षेप म्हणतात. जसे आज आदिनाथांची जयंती म्हणणे ( ते तर आज सिध्द आहेत. )

ड. **भावनिक्षेप –** वर्तमान पर्याय वाचक शब्द – जसे – तीर्थंकरपदात असतांना आदिनाथ भगवान म्हणणे.

**प्रश्न –नाम व स्थापना निक्षेपात अंतर काय ?**

उत्तर – नाम निक्षेपात पूज्य अपूज्य बुध्दि नसते पण स्थापनामध्ये पूज्य अपूज्य बुध्दि असते.

५. कोणत्याही शब्दाचा व्यवहार वरील कथनाप्रमाणे चार प्रकारचा होतो. एकाच शब्दाने चार पदार्थ दर्शविले जातात.

६. तीन ( प्रथम ) निक्षेप द्रव्यार्थीक नयाचे विषय आहे. व भावनिक्षेप पर्यायार्थिक नयाचा विषय आहे.

**नामनिक्षेपाचा दृष्टांत =** सम्यग्दर्शन नामक व्यक्ती

**द्रव्य निक्षेपाचा दृष्टांत =** पूर्व व उत्तर व्यवहार सम्यक्त्व

**स्थापना निक्षेपाचा दृष्टांत =** सम्यग्दर्शनाचे यंत्र

**भावनिक्षेपाचा दृष्टांत =** शुध्दआत्मानुभवनरूप भाव, निश्चय सम्यग्दर्शन.

७. कुठे कोणता अर्थ अभिप्रेत आहे. हेच निक्षेपाचे प्रयोजन आहे.

८. जिथे जो निक्षेप व्यवहार आहे तोच पदार्थ समजला तरच इष्ट सिध्दि होते. नाही तर नाही.

९. निक्षेप हा ज्ञानाचा शुब्दरूप ज्ञेय आहे.

| | | |
|---|---|---|
| जसे – घोडा वस्तू | घोडा हा शब्द | घोडानिमित्तक ज्ञान पर्याय |
| ↓ | ↓ | ↓ |
| ज्ञेय ( वाच्य ) | ज्ञेय ( वाचक ) | ज्ञान पर्याय ( नय ) |

| | | |
|---|---|---|
| १०. ऋजुसूत्रनय | एवंभूतनय | भावनिक्षेप |
| ↓ | ↓ | ↓ |
| एकसमयवर्ती पर्यायीला | वर्तमान क्रियावाचक शब्दाद्वारे | वर्तमान क्रियावाचक |
| ↓ | | |
| जाणणारी ज्ञान पर्याय | वर्तमान पर्यायीला जाणणारे | शब्दाद्वारे व्यवहार |
| ↓ | ↓ | निश्चित करतो |
| | | ↓ |
| ज्ञान पर्याय | शब्दाद्वारे व्यक्तज्ञानपर्याय | शब्दरूप ज्ञेय. |

**प्रश्न – प्रमाण व नयातील अंतर काय ?**

उत्तर - प्रमाणामधे संपूर्ण वस्तूचे अभेदरूपाने ग्रहण असते तर नयामधे वस्तूच्या एका धर्माचे ग्रहण असते.

## सप्तभंगी

१. सातही भंगाचे वाच्य भिन्न भिन्न सात धर्म आहे. पण त्या धर्माचे ज्ञान व कथन दोन भंगाच्या संयोगाने होते.

२. **मुळभंग तीन** - १ अस्ति, २. नास्ति, ३ अवक्तव्य

**संयोगी भंग चार** - १ अस्तिनास्ति, २ अस्तिअवक्तव्य, ३ नास्तिअवक्तव्य,

४. अस्तिनास्ति अव्यक्तव्य

स्यात्वाद सप्तभंगी

स्यात् अस्ति एव - स्वचतुष्टयाच्या अपेक्षेने सत् आहे.

स्यात् नास्ति एव- परचतुष्टयाच्या अपेक्षेने असत् ( नास्ति ) आहे.

स्यात् अवक्तत्व एव - युगपतकथनाच्या अपेक्षेने अवक्ततव्य आहे.

स्यात् अस्ति नास्ति - क्रमाने कथनाच्या अपेक्षेने अस्ति नास्ति आहे.

स्यात् अस्ति अवक्तव्य - स्वचतुष्टयाच्या अपेक्षेने अस्ति व युगपत् कथनाच्या दृष्टिने अवक्तव्य

स्यात् नास्ति अवक्तव्य - परचतुष्टयाच्या अपेक्षेने नास्ति युगपत् कथनाच्या दृष्टिने अवक्तव्य

स्यात् अस्ति, नास्ति, अवक्तव्य - स्व, परचतुष्टयाच्या व युगपत् कथनाच्या दृष्टिने अस्ति, नास्ति अवक्तव्य

उदा. - ' अ ' ( अस्ति ) ब ( नास्ति ) क ( अवक्तव्य ) मूळभंग
↓ ↓ ↓
वाच्य १ २ ३
वाच्य अब ( अस्तिनास्ति ) बक ( नास्ति अवक्तव्य )
↓ ↓
वाच्य १२ २३
वाच्य अक ( अस्ति अवक्तव्य ) संयोगी भंग
↓
वाच्य १३
वाच्य अबक ह्यामधे जसे शब्द तीच आहेत पण
१२३ आकडे वेगळे वेगळे आले तसे सप्तभंगीचे शब्द

जरी तीच आहेत तरी वाच्यभूत धर्म भिन्न भिन्न सात आहेत.

४. स्यात्काराचा प्रयोग विरोधी धर्मातच होतो.

५. मुख्य गौण व्यवस्था वाणीतच असते. वस्तूत नाही.

६. जसे - स्वात्आत्मा नित्यही आहे. प्रमाण वाक्य

७. स्यात् - आत्मा नित्यच आहे, नय वाक्य.

८. नित्यही हा शब्द समन्वयाचा सूचक नसून अनुक्ताच्या सत्तेचा वाचक आहे. हा अन्यधर्माबाबत मौन ठेवून त्याच्या निश्चित सत्तेचा सूचक आहे.

९. ' ही ' ' च ' हा शब्द आग्रहाचा सूचक नसून दृढतेचा सूचक आहे. हा सर्व शंकांचा अभाव करून दृढता प्रदान करतो.

१. अपूर्णास पूर्ण न समजावे म्हणून ' हि ' चा प्रयोग केला आहे. जसे - आत्मा नित्य ही आहे. नित्य म्हणणे हे अपूर्ण आहे.

२. अंशामधे जे कथन आहे ते त्या दृष्टिने सत्यच आहे. ह्या करिता ' च ' चा प्रयोग केला आहे. जसे - ध्रौव्याच्या अपेक्षेने आत्मा नित्य ' च ' आहे.

३. जिथे अपेक्षा दाखविली नसते तिथे ' ही ' चा प्रयोग होतो. उदा. -आत्मा कुण्या अपेक्षेने नित्य ' ही ' आहे.

४. जिथे अपेक्षा दाखविली असते तिथे ' च ' चा प्रयोग होतो. जसे - ध्रौव्याच्या अपेक्षेने आत्मा नित्य ' च ' आहे.

५. अपूर्णाच्या दृष्टिने आंशीक सत्य आहे. म्हणून ' ही ' लावावा.

६. अंशाच्या दृष्टिने पूर्ण सत्य आहे. म्हणून ' च ' लावावा.

७.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कोण | कुठे | केव्हा | का ? - | प्रश्न |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| द्रव्य | क्षेत्र | काल | भाव - | उत्तर |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| सर्व | सर्वत्र | सर्वदा | सर्वथा - | अर्थ |

८. ज्ञानामधे अर्थजन्य, शब्दजन्य प्रतिभास होतो. तद्वत कल्पनाजन्य पण प्रतिभास होतो.

९. **कल्पनाजन्य** - ज्ञानात्मक विकल्प - व्यवहारनयाचा विषय असतो.

१०. ज्ञानात्मक जगत कथंचित् सत् ( ज्ञान पर्यायीमधे ) ती कल्पना खरोखर उत्पन्न आहे. म्हणून सत् आहे. पण कल्पने प्रमाणे वस्तू जगत नाही म्हणून असत् आहे

११. **जसे** - तुपाची बरणी.

१२. **प्रतिपाद्य** - कथन करण्यायोग्य. प्रतिपादक = कथन करणारा

१३. **वाच्य** - शब्दाद्वारे सांगितल्या जाणारा पदार्थ

१४. **वाचक** - वाच्याला सांगणारा शब्द.

१५. खिडकीतून पूर्वेला माझ्या बोटाकडे बघ, त्या झाडावर

↓ ↓ ↓ ↓ ↓

खिडकी दिशा बोट पहा झाड वाच्य

आहे तो - वाचक - प्रतिपादक - व्यवहार नय.

१६. **प्रतिपाद्य** - निश्चयनय ( पोपट )

१७. व्यवहाराचा वाच्य निश्चयनयाचा विषय नसून तो निश्चयाचा विषय प्रतिपाद्य आहे. हे या दृष्टांतावरून सिध्द होते.

१८. **सद्भूत अनुपचरित व्यवहार** – सद्भूत उपचरित व्यवहार वाचक

↓ ↓

गुणभेद ज्ञेयामुळे ज्ञायकत्व ज्ञेयसापेक्ष पर्याय वाच्य

१९. **असद्भूत अनुपचरित व्यवहार** – उपचरित असद्भूत व्यवहार वाचक

↓ ↓

**अबुध्दिपूर्वक राग द्वेष–वाच्य बुध्दिपूर्वक राग द्वेष – वाच्य.**

२०. ह्या सर्व व्यवहाराचे वाच्य मागील वाक्यात दाखविल्या प्रमाणे आहे. पण ह्या नयाचे ते प्रतिपाद्य नाही. ह्यांचे प्रतिपाद्य निश्चयनयाचा विषय आहे. उदा. पोपट वा शुध्द आत्मा

## संबंध

१. त्रिकाली तादात्म्य संबंध = गुण गुणीमधे असणारा अविनाभाव

२. कादाचित्क तादात्म्य संबंध = पूर्ण शुध्द पर्याय व द्रव्यामधे असणारा अविनाभाव

३. संयोगसिध्द संबंध = विकारी पर्याय व द्रव्यामध्ये असणारा अविनाभाव
४. संश्लेष संबंध = पुद्गला पुद्गलामधे असणारा संबंध
५. परस्परावगाह संबंध = जीव व पुद्गलाच्या दोन वर्तमान पर्यायीमधील असणारा निमित्तनैमित्तिक संबंध.
६. एक क्षेत्रावगाह संबंध = सहाही द्रव्यामधे असणारा. लोकाकाशाच्या एका प्रदेशावर सर्व द्रव्य राहातात.

## कार्यकाली असणारा पाच कारणांचा समवाय

१. त्रिकाली उपादान कारण - सदा असणारी योग्यता
२. जसे - मातीमधे घट होण्याची योग्यता सदाच असते.
३. नियति - कार्य होण्याच्या पूर्वीचे अनंतर समयवर्ती विशिष्ट पर्याययुक्त द्रव्य.
४. जसे - घट पर्यायीच्या अनंतर पूर्व समयवर्ती विशिष्ट पर्याययुक्त माती - घट पर्याय कार्य → - कुशूल पर्याय कारण → नियतउपादान कारण
५. **पुरूषार्थ** - कार्य होतांना लागणारी शक्ती ( बल, वीर्य )
६. जसे - घटरूप पर्याय होतांना लागणारी ( मातीची शक्ती )
७. **स्वकाल** – प्रत्येक पर्याय व्यक्त ( प्रगट ) होतांना तिचा नियतकाल.
जसे - घट पर्यायीचा स्वकाल.
८. **निमित्त** - जे कारण कार्यरूप न होता कार्यकाली बाह्यव्याप्ती रूपात असणारी पराची त्यासमयीची पर्याय. जसे - घट काली कुंभकाराचा योग उपयोगरूप पर्याय.
९. कार्य होतांना पाच कारणे असतात. पण कार्य चार ( उपादान ) कारणामधूनच होते निमित्तातून नाही.

## अन्वय व्याप्ती

१०. **लक्षण** - आहे रूपाचा ( अन्वय ) अविनाभाव ( व्याप्ति ) ह्यास अन्वय व्याप्ति म्हणतात.

**अन्वय सम व्याप्ति –** १. दोन्ही कडून आहेरूपाची, जसे - जिथे जीव आहे, तिथे ज्ञान आहेच, व जिथे ज्ञान आहे तिथे जीव आहेच.
२. जिथे संवरनिर्जरा आहे तिथे ज्ञानचेतना आहेच, जिथे ज्ञानचेतना आहे तिथे संवरनिर्जरा आहेच.

**विषम अन्वय व्याप्ति –** १. एकतर्फी व्याप्ति असणे. जसे - जिथे राग आहे तिथे जीव आहेच. जिथे जीव आहे, तिथे राग असेलही नसेलही.
२. जिथे उपयोगरूप ज्ञानचेतना आहे तिथे लब्धिरूप ज्ञानचेतना आहेच. पण लब्धिरूप ज्ञानचेतना आहे तिथे उपयोगरूप ज्ञानचेतना असेलही नसेलही.

## व्यतिरेक व्याप्ति - नाहीरूपाचा अविनाभाव

१. **समव्यतिरेक व्याप्ति –** अ- जिथे जीव नाही तिथे ज्ञान नाही. जिथे ज्ञान नाही तिथे जीव नाही.
ब - जिथे लब्धिरूप ज्ञानचेतना नाही तिथे संवर निर्जरा नाही. जिथे संवर निर्जरा नाही तिथे लब्धिरूपही ज्ञानचेतना नाही.
२. **विषम व्यतिरेक व्याप्ति** - अ - जिथे जीव नाही तिथे राग नाहीच पण जिथे राग नाही तिथे जीव नाहीच असे नाही.
जसे - सिध्द जीव
ब- जिथे लब्धिरूप ज्ञानचेतना नाही, तिथे उपयोगरूप ज्ञानचेतना नाहीच. पण जिथे उपयोगरूप ज्ञानचेतना नाही तिथे लब्धिरूप ज्ञानचेतना असेलच.

**अंतरंग व्याप्ति** - एका द्रव्यातील गुणात वा पर्यायीतील अविनाभाव
१. सम अंतरंग व्याप्ति
२. एक द्रव्य व गुणामधे असणारा त्रिकाली अविनाभाव
३. जसे - जिथे जीव आहे, तिथे ज्ञान आहेच, जिथे ज्ञान आहे तिथे जीव आहेच.
१. विषम अंतरंग व्याप्ति

२. द्रव्य व पर्यायीमधील अविनाभाव

३. जिथे केवलज्ञान आहे तिथे जीव आहेच, पण जिथे जीव आहे तिथे केवलज्ञान असेलच असे नाही.

**बहिरंग व्याप्ति** - दोन द्रव्याच्या दोन वर्तमान पर्यायीतील बाह्य अविनाभाव

१. **बहिरंग समव्याप्ति** - जिथे क्रोध कर्माचा उदय आहे तिथे क्रोध भाव आहे, व जिथे क्रोधभाव आहे, तिथे क्रोधकर्माचा उदय आहेच.

१. **बहिरंग विषम व्याप्ति** - क्रोध कर्माचा उदय आहे तिथे बुध्दिपूर्वक राग असेलच असे नाही.

१. **कालद्रव्याची विशेषता** - प्रवचनसार गाथा - १३९

२. जसे लोकाकाशाच्या एका प्रदेशांत विशिष्ट अवगाहामुळे अनंत परमाणूंचा स्कंध राहतो. तरी आकाशप्रदेशाचे वा अणूचे विभाग होत नाही.

३. तसे परमाणू तीव्र गतिने एका समयांत आलोकांत गमन करतो. तरी समयाचे विभाग होत नाही. कारण तो अविभागी कालांश आहे.

४. काल द्रव्य एकच प्रदेशी का ? प्रवचनसार - गाथा - १४४

५. काल द्रव्य एक प्रदेशी न मानले तर पर्याय समयाची उत्पत्ती होत नाही.

६. द्रव्यसमयाचे ( कालाणुचे ) उल्लंघन करणाऱ्या परमाणूच्या मंदगतिमुळेच पर्याय समयाची सिध्दि होते.

७. जर कालाला असंख्यात प्रदेशी एक द्रव्य मानले तर व त्याच्या एका प्रदेशाचे उल्लंघन करणाऱ्या परमाणूच्या गतीमुळे पर्याय समय सिध्द होईल असे मानले तर दोन दोष उत्पन्न होतात.

अ. **प्रथमदोष** - द्रव्यातील एका प्रदेशातील परिणमनास सर्व प्रदेशातील परिणमन मानावे लागेल. पण ते शक्य नाही, कारण समय हा सूक्ष्म पर्याय एका प्रदेशाचा नसून पूर्ण कालद्रव्याचा असतो. एका प्रदेशाच्या परिणमनास समय म्हणता येत नाही.


ब. **दुसरा दोष –** तिर्यक् प्रचयालाच ( प्रदेश समूह ) उर्ध्वप्रचय

( क्रमवर्ती पर्याय समूह ) मानावा लागेल.
८. प्रथम एका प्रदेशात परिणमन होईल, नंतरच्या समयात दुसऱ्या प्रदेशात परिणमन होईल असे परिणमनामुळे

तिर्यकप्रचय ↓ प्रदेशसमूहच

उर्ध्वप्रचय ↓ कालक्रमाने होणारे पर्याय

होईल.




असे असंख्यातप्रदेशी काल द्रव्य मानले.

१. तिर्यक्प्रचय उर्ध्वप्रचयाचा नकाशा. जर कालद्रव्य असंख्यात प्रदेशी एक मानले तर परमाणू एका कालाणूच्या प्रदेशाचे उल्लंघन करतो तेव्हा प्रथम समय पर्याय होईल, दुसऱ्या प्रदेशाचे करील तर दुसरा समय पर्याय होईल. अशा परिणमनात कालक्रम असतो. ( उर्ध्वप्रचय ) व प्रदेश म्हणजे ( तिर्यक्प्रचय ) असतो. यावरून तिर्यक्प्रचयच उर्ध्वप्रचय होईल. ही आपत्ती कालास असंख्यात प्रदेशी मानले तर येते.
२. म्हणून काल द्रव्य एक प्रदेशीच स्विकारावे लागते.

## षटकारक

प्रत्येक कार्य होतांना सहा कारक होतातच.

* कर्ता-स्वतंत्र होऊन जो कार्य करतो तो कर्ता.
* कर्म - कर्त्याकरवी जे केल्या जाते ते कर्म.
* करण - कार्य ज्या साधनाने करतो ते करण.
* संप्रदान-ज्याच्या साठी वा ज्याला कार्य सोपविले जाते ते संप्रदान.
* अपादान- ज्यामधून कार्य होते, ते अपादान.
* अधिकरण - ज्या प्रदेशात कार्य घडते ते अधिकरण.

## व्यवहाराने सहा कारक ( भिन्न द्रव्याश्रित )

| कुंभकाराने | काठीने | पाणीभरण्यासाठी | टोपलीतील मातीमधून | आपल्या अंगणात | घट केला |
|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| कर्ता | करण( साधन ) | संप्रदान | अपादान | अधिकरण | कर्म |

## निश्चयाने सहा कारक ( एकद्रव्याश्रित )

| माती | स्वत: च्या योग्यते | स्वसाठीच | स्वत:हातूनच | स्वप्रदेशातच | घटरूप | स्वयंबनली |
|---|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| कर्ता | करण | संप्रदान | अपादान | अधिकरण | कर्म | क्रिया |

## जीवावर निश्चय कारक

| आत्मा | स्वयोग्यते नेच | स्वसाठीच | स्वत: हूनच | आपल्या क्षेत्रातच | सिध्द | झाला. |
|---|---|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| कर्ता | करण( मोक्षमार्ग ) | मोक्ष | अपादान | अधिकरण | कर्म | क्रिया |

✧✧✧